श्री नवनाथ कथासार



0155,6
N8

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

0155,6x1,1 8216
N8

Deole, S. R., B.A.
Shrinavnath Kathasar

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

0155,6x1,1
N8
8216
इश्वर मारायल सनो

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

0155, 6x1,1
NA

प्रस्तावना

गोरक्ष जालंदर चर्पटाश्च । अडबंग कानीफ मच्छिंद राद्या: ।
चौरंगि रेवाणकभर्त्रि संज्ञा । भूम्यां बभूवुर्नवनाथ सिद्धा :।।

श्रीनवनाथ भक्तिसार हा श्रेष्ठ, परमपावन, प्रासादिक आणि अद्‌भुत असा ग्रंथ आहे. भक्तांना, साधकांना आणि भक्तिभावाने वाचणाऱ्यांना तो दिव्य अनुभव देणारा आणि इच्छा तृप्त करणारा असा हा ग्रंथ आहे.

या ग्रंथात चाळीस अध्याय आहेत. याची ओवीसंख्या ७६०० आहे. या ग्रंथाचा कर्ता धुंडिसुत मालुकवी या नावाचा आहे. तो नरहरी वंशातील असून श्रेष्ठ असा भक्त आहे. शके १७४१ प्रमाथी नाम संवत्सरात ज्येष्ठ महिन्यात शुद्ध प्रतिपदेला हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला, असे लेखकाने शेवटी म्हटले आहे.

रामायण आणि महाभारत यांच्यासारखाच श्रीमद्‌भागवत हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. भागवताच्या अकराव्या स्कंधामध्ये निमिराजाशी नवनारायणाचे संवाद झाले आहेत. हे नवनारायण म्हणजे ऋषभ देवांच्या शंभर पुत्रांपैकी देवांचे नऊ श्रेष्ठ भक्त. भगवान श्रीकृष्णांच्या आज्ञेने त्यांनी विविध अवतार घेतले. कवी नारायणाने मच्छिंद्र हे नाव घेतले. हरीने गोरक्ष हे नाव घेतले, त्याचप्रमाणे अंतरिक्षाने जालंदर, प्रबुद्धीने कानिफ, पिप्पलायनाने चरपट, अविर्होत्राने नागेश, द्रुमिलाने भरतनाथ, चमसाने रेवण आणि करभंजनाने गहिनी अशी नावे घेऊन कलियुगात अवतार घेतले. मूळ श्रीदत्तात्रेयांपासून हा नाथ संप्रदाय निर्गाण झाला.

'श्री नवनाथ भक्तिसार ' या ग्रंथाचा मथितार्थ सर्वसाधारण लोकांना समजण्यासाठी सोप्या व साध्या, परंतु रंजक अशा भाषेत या पुस्तकात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ....8216........

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अनुक्रमणिका

अध्याय १ ला- १
मंगलाचरण, मच्छिंद्रनाथाची जन्मकथा
अध्याय २ रा- ८
दत्तात्रेय-शंकर यांचे दर्शन व विद्यासिद्ध
अध्याय ३ रा- १३
मारुतीची भेट, स्त्रीराज्यात गमन
अध्याय ४ था- २०
अष्टभैरव-चामुंडा यांना वश केले.
अध्याय ५ वा- २४
वेताळावर विजय
अध्याय ६ वा- २७
कालिकास्त्राची प्राप्ती
अध्याय ७ वा- ३२
वीरभद्राची कथा
अध्याय ८ वा- ३८
रामचंद्राचे दर्शन, सूर्याबरोबर युद्ध
अध्याय ९ वा- ४३
गोरक्षनाथाची जन्मकथा
अध्याय १० वा- ४८
गहिनीनाथाचा जन्म व संगोपन
अध्याय ११ वा- ५३
जालिंदरनाथाची कथा
अध्याय १२ वा-
कानिफाची कथा
अध्याय १३ वा- ६४
जालिंदर-मैनावती आख्यान
अध्याय १४ वा- ६९
गोपीचंदाची कथा
अध्याय १५ वा- ७४
कानिफा-मारुतीचे युद्ध, कानिफाचे स्त्रीराज्यात गमन
अध्याय १६ वा- ८१
कानिफाची व गोपीचंदाची भेट
अध्याय १७ वा- ८८
कानिफाने गुरूस बाहेर काढले व गोपीचंदालाही वाचविले.
अध्याय १८ वा- ९५
गोपीचंदाच्या बहिणीची कथा
अध्याय १९ वा- १०१
मारुती व गोरक्षाची भेट
अध्याय २० वा- १०७
गोरक्षनाथ स्त्रीराज्यात जातो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २१ वा- १९५
गोरक्षनाथ गुरूस घेऊन येतो
अध्याय २२ वा- १२१
मीननाथाची कथा
अध्याय २३ वा- १२६
गहिनीनाथास उपदेश
अध्याय २४ वा- १३४
भर्तृहरीची जन्मकथा
अध्याय २५ वा- १३९
सुरोचन गंधर्वाची कथा
अध्याय २६ वा- १४७
विक्रम-भर्तृहरी
अध्याय २७ वा- १५४
भर्तृहरीची कथा
अध्याय २८ वा- १६२
भर्तृहरीचे तपाचरण
अध्याय २९ वा- १६८
भर्तृहरीला विरक्ती
अध्याय ३० वा- १७४
चौरंगनाथाची जन्मकथा
अध्याय ३१ वा- १८०
चौरंगाची कथा
अध्याय ३२ वा- १८७
त्रिविक्रमाची कथा
अध्याय ३३ वा- १९४
माणिक शेतकऱ्याची कथा
अध्याय ३४ वा- २०५
रेवणनाथाची जन्मकथा
अध्याय ३५ वा- २१२
रेवणनाथाची कथा
अध्याय ३६ वा- २२१
वटसिद्ध नागनाथाची कथा
अध्याय ३७ वा- २३२
नागनाथाची व मच्छिंद्र-नाथाची भेट
अध्याय ३८ वा- २३८
चरपटीची जन्मकथा
अध्याय ३९ वा- २४६
चरपटीनाथाची कथा
अध्याय ४० वा- २५३
इंद्राचा सोमयाग, फलश्रुती
श्लोक व आरत्या २६३

प्रकाशक : प्रकाश य. कुंदूर, मे. शारदा साहित्य, २८ ए, अंबर चेंबर बुधवार पेठ, पुणे - २.

मुद्रक : आनंद अं. कुंदूर ६/२००२
मे. श्रीराम ऑफसेट, सर्व्हे नं. १४/२३, 'गायत्री', धायरी, पुणे ४१.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ८



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १४



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १६



अध्याय १७

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १८



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



अध्याय १९

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १८



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



अध्याय २१

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २८



अध्याय २९

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय 23



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २५



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २६



अध्याय २७

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ८७



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २८

अध्याय २९

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २९

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय 39



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection; Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



अध्याय ३७

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३७



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

श्री नवनाथ कथासार

अध्याय १ ला

(मंगलाचरण मच्छिंद्रनाथांची जन्मकथा)

श्री गणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।।
श्री पांडुरंगाय नमः ।। श्री कुलदेवतायै नमः ।।
श्री मातापितृभ्यां नमः ।।

कलियुग सुरू झाल्यावर श्रीविष्णूने नवनारायणांना द्वारकेत बोलावण्यासाठी आपल्या दूतांना पाठवले. त्या प्रसंगी विष्णू स्वतः सोन्याच्या सिंहासनावर बसले होते. तेवढ्यात निरोप पाठविल्याप्रमाणे नवनारायण तेथे आले. हे नऊ नारायण म्हणजे कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, अविर्होत्र, द्रुमिल, चमस

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आणि करभंजन हे होत.

त्या नवनारायणांना पाहताच विष्णूला फार आनंद झाला. ते लगेच सिंहासनावरून उतरले आणि मोठ्या प्रेमाने त्यांना भेटले. मग त्यांना सन्मानाने सुवर्ण सिंहासनावर बसवून त्यांची षोडशोपचारांनी पूजा केली. तो मान-सन्मान पाहून नवनारायणांनी विचारले, ' आम्हाला कशासाठी येथे बोलावले ?'

त्यांचा प्रश्न ऐकून विष्णू म्हणाले, ' तुम्हाला येथे बोलावण्याचे कारण असे की, आपल्या सर्वांना आता कलियुगात अवतार घ्यावयाचे आहेत. ज्याप्रमाणे राजहंस एकजुटीने समुद्राच्या पाण्यात जातात त्याचप्रमाणे आपण सर्व एकदम अवतार घेऊन भूलोकात प्रगट होऊ.'

श्री लक्ष्मीविष्णूची ही कल्पना ऐकून ते म्हणाले, ' जनार्दन! आपण आम्हाला अवतार घ्यायला सांगता, पण तो कोणत्या नावाने आणि कुठे घ्यायचा ते सांगा.'

यावर द्वारकाधीशाने सांगितले, ' तुम्ही सर्वांनी अवतार घेऊन संप्रदाय स्थापन करा व दीक्षा देऊन उपदेश करीत रहा. यावर तुम्ही कदाचित असे म्हणाल की, आम्हालाच फक्त अवतार घ्यायला सांगता; पण असे मनात आणू नका. तुमच्याबरोबर मृत्युलोकात जन्म घेणारे बहुत जण आहेत. प्रत्यक्ष वाल्मीकी हा तुळशीदास होईल. शुक्रमुनी हा कबीर, व्यासमुनी हा जयदेव होईल, तर माझा अगदी सर्वांत आवडता जो उद्धव, तो नामदेवाचा अवतार घेईल. जांबुवंत हा नरहरी या नावाने मृत्युलोकी प्रसिद्धीस येईल; तर माझा भाऊ बलराम हा पुंडलिक बनेल. एवढेच नव्हे तर मीसुद्धा तुमच्याबरोबर नामदेव या नावाने अवतार घेऊन येणार आहे; तसेच कैलासाधिपती शंकर हा निवृत्ती होईल. ब्रह्मदेव सोपान या नावाने अवतार घेईल. योगमाया मुक्ताबाई आणि हनुमान रामदास होईल.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कुब्जा जनीदासी या नावाने प्रसिद्धीस येईल. एवढे झाले की मग आपण कलियुगात भक्तीचा महिमा वाढवू.'

मग अवतार कोणत्या ठिकाणी व कसा घ्यायचा ते सविस्तर सांगण्यासाठी नवनारायणांनी विनंती केली.

या विनंतीला मान देऊन हरीने सांगितले, ' पराशर ऋषींचा पुत्र जो व्यासमुनी त्याने ही सर्व माहिती भविष्यपुराणात मागेच लिहून ठेवली आहे. ती आता नीट ऐका. पूर्वी ब्रह्मदेवाच्या वीर्यापासून अठ्ठ्याऐंशी हजार ऋषी निर्माण झाले. त्यावेळी त्या वीर्याचा काही भाग यमुनेत पडला. त्याचे तीन भाग झाले. त्या तीन भागांपैकी दोन भाग द्रोणात पडले व एक भाग यमुनेच्या पाण्यात पडला. पाण्यात पडलेले ते वीर्य लगेच एका मच्छीने गिळले. त्या मच्छीच्या पोटात कवी नारायणाने संचार करून ' मच्छिंद्रनाथ ' नावाने जगात प्रगट व्हावे. शंकराने आपल्या तिसऱ्या डोळ्याने जाळून भस्म केलेला काम अग्नीने प्राशन केला आहे. म्हणून आता अंतरिक्ष नारायणाने त्यांच्या पोटी जन्म घेऊन ' जालिंदर ' या नावाने प्रसिद्धीस यावे. कुरुवंशात जनमेजय नावाचा राजा सर्पसत्र करील. त्यांच्याच वंशातील बृहद्रवा राजा हवन करील, तेव्हा अग्नी आपला गर्भ सांडेल आणि ही संधी साधून त्या प्रसंगी जालिंदराने त्या यज्ञकुंडात जन्म घ्यावा.

' अठ्ठ्याऐंशी हजार ऋषी झाले तेव्हा ब्रह्मदेवाच्या वीर्याचा काही भाग नर्मदेच्या काठी पडलेला आहे. तेथे चमस नारायणाने ' रेवणसिद्ध ' या नावाने प्रगट व्हावे. त्याचवीर्यपैकी काही अंश एका सर्पिणीने गिळला. जनमेजय राजाच्या सर्पसत्रात ब्राह्मणांनी सर्व सर्पांची आहुती दिली; परंतु त्या प्रसंगी त्या सर्पिणीच्या पोटात ब्रह्मबीज आहे हे जाणून तिला आस्तिक ऋषीने वडाच्या ढोलीत लपवून ठेवले. नऊ महिने पूर्ण झाल्यावर ती अंडे तेथेच टाकून निघून गेली आणि आता ते अंडे अजून तेथेच आहे. तेव्हा त्यात अविर्होत्र

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नारायणाने संचार करून ' वटसिद्ध नागनाथ ' या नावाने प्रसिद्ध व्हावे. मच्छिंद्रनाथाने सूर्यरतप्राप्तीसाठी मंत्र जपून दिलेले भस्म उकिरड्यावर पडेल. त्यामध्ये सूर्य आपले वीर्य सांडेल. अर्थातच ते उकिरडामय असणार. त्यात हरिनारायणाने ' गोरक्ष ' नावाने प्रगट व्हावे.

दक्षाच्या घरी त्याची कन्या पार्वती हिला लग्नसमारंभाच्या वेळी पाहून ब्रह्मदेवाला अनावर कामवासना झाली आणि त्याचे वीर्य गळले. तेव्हा त्याला फार लाज वाटली, म्हणून त्याने ते वीर्य पायाने दाबून चौफेर केले. त्याचे साठ हजार वालखिल्य ऋषी निर्माण झाले. दुसरे अंग केराबरोबर भागीरथी नदीमध्ये पडले व वहात कुश बेटात गेले. ते अजूनही तेथेच आहे. तेव्हा पिप्पलायन नारायणाने तेथे प्रवेश करून ' चरपटीनाथ ' नावाने प्रसिद्धीस यावे. भर्तरी नावाचे आपले भिक्षापात्र कैलीक ऋषीने अंगणात ठेवले होते, त्यात सूर्याचे वीर्य पडले. ते त्याने तसेच जतन करून ठेवले आहे. त्यात द्रुमिल नारायणाने प्रकट होऊन भर्तृहरी नावाने प्रसिद्ध व्हावे. हिमालयाच्या अरण्यात सरस्वतीच्या उद्देशाने ब्रह्मदेवाचे वीर्य गळले. त्यातले थोडेसे हत्तीच्या कानात पडले. त्यात आता प्रबुद्ध नारायणाने संचार करावा व ' कानिफ ' नावाने प्रगट व्हावे. गोरक्ष चिखलाचा पुतळा करील, त्यात करभंजनाने प्रगटावे.'

अशा तऱ्हेने लक्ष्मीकांताने कोणी, कोठे व कसा अवतार घ्यायचा ते सविस्तरपणे सांगितल्यावर या नवनारायणाचे पूर्ण समाधान झाले. मग ते आज्ञा घेऊन तेथून निघून मंदार पर्वतावर गेले. तेथे शुक्राचार्यांच्या समाधीजवळ समाधिस्थ होऊन राहिले. पुढे हे नऊ व शुक्राचार्य असे दहाजण निघाले.

एके दिवशी शंकर व पार्वती कैलासावर गप्पा मारीत होते. तेव्हा पार्वती शंकराला म्हणाली, ' तुम्ही नेहमी जो मंत्र जपत असता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याचा मला अनुग्रह द्या.'

ते ऐकून शंकर तिला म्हणाला, ' मी तुला तो मंत्र जरूर शिकवीन, पण त्यासाठी एकांत जागा पाहिजे. तेव्हा आपण आता एकांतस्थान शोधून काढू.'

असे म्हणून ती दोघे निघाली. ती फिरत फिरत यमुनेच्या काठी आली. तेथे अगदी शुकशुकाट होता. माणसांची वस्तीही नव्हती, त्यामुळे त्यांनी तीच जागा पसंत केली व तेथे ते दोघे बसले. मग शंकर पार्वतीला मंत्रोपदेश करू लागले. ज्या मच्छीने ब्रह्मवीर्य गिळून यमुनेत प्रवेश केला होता, ती गर्भवती मच्छी तेथे जवळच पाण्यात होती. तिच्या पोटातील गर्भाने तो मंत्र ऐकला. तो दिव्य मंत्रोपदेश ऐकल्यावर त्याला शुद्ध ज्ञानप्राप्ती झाली व द्वैतभाव नष्ट होऊन तो ब्रह्मरूप झाला.

उपदेश सांगितल्यावर शंकराने उपदेशाचे सार पार्वतीला विचारले. इतक्यात मच्छिंद्र गर्भातून म्हणाला, ' सर्व ब्रह्मरूप आहे.'

हे उत्तर ऐकून शंकराने आवाजाच्या दिशेने पाहिले, तेव्हा त्याला मच्छीच्या पोटी कवी नारायणाने संचार केल्याचे समजले. मग शंकराने त्याला सांगितले, ' तुला माझा उपदेश ऐकल्याने पुष्कळ फायदा झाला, परंतु हाच आदेश मी तुला दत्तात्रेयाकडून करवीन. त्यासाठी तू पुढे बद्रिकाश्रमास ये. तेथे मी तुला दर्शन देईन.'

असे सांगून पार्वतीसह शंकर कैलासाला गेले. मच्छिंद्र इकडे मच्छीच्या उदरात तो मंत्र जपू लागला. पूर्ण दिवस भरल्यानंतर त्या मच्छीने अंडे नदीच्या काठावर टाकले आणि ती पाण्यात निघून गेली. पुढे थोडे दिवसांनी बरेच बगळे मासे धरायला म्हणून यमुनेकाठी आले. त्यांनी ते अंडे पाहिले व लगेच आपल्या तीक्ष्ण चोचींनी फोडले. त्यात एक बालक होते. अंडे फुटताच ते बाळ जोरजोरात रडू लागले. त्याचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रडणे ऐकून बगळे पळून गेले.

काही दिवसांनी फुटलेले अंडे कामिक नावाच्या कोळ्याने पाहिले. त्यात सूर्यासारखा तेजस्वी बाळ पाहून त्याला कळवळा आला. कोणी तरी सावज या बालकाला मारील असे त्याच्या मनात आले. इतक्यात आकाशवाणी झाली, ' हा साक्षात कवी नारायणाचा अवतार आहे. ह्या बालकाला तू तुझ्या घरी घेऊन जा. याचे नीट पालनपोषण कर आणि ह्याचे नाव ' मच्छिंद्रनाथ ' ठेव. मनात कोणतीही शंका आणू नकोस.'

ते ऐकून कोळ्याला खूप आनंद झाला व त्याने मोठ्या आनंदाने त्याला घरी नेले; आपल्या शारद्वता नामक पत्नीजवळ दिले. आणि तो तिला म्हणाला, ' ईश्वराने आपल्याला हा मुलगा दिला आहे. त्याचे नीट पालनपोषण कर.'

ती मुलासाठी आसुसलेली होती. ते ऐकून तिलाही खूप आनंद झाला. मग तिने त्याला मोठ्या प्रेमाने जवळ घेतले. तोच तिला पान्हा फुटला. मग मुलाला पाजून, न्हाऊ-माखू घालून पाळण्यात निजवले. आधीच त्या दोघांना मूल होण्याची शक्यता नव्हती. त्यात असा अचानकपणे तेजस्वी पुत्र हाती लागल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

मच्छिंद्रनाथ पाच वर्षांचा झाल्यावर एक दिवस त्याला बरोबर घेऊन त्याचा बाप मासे मारण्यासाठी यमुना नदीवर गेला. तेथे त्याने मासे पकडण्यासाठी जाळे पसरले. पुष्कळ मासे जाळ्यात आल्यावर ते मच्छिंद्रनाथाजवळ ठेवून तो पुन्हा जाळे पसरून बसला. ते पाहून पिता आपल्या मातृकुळाचा नाश करायला निघाले आहेत, असे मच्छिंद्रनाथांच्या मनात आले. ' आपण येथे असताना हे शांत बसून पहाणे योग्य नाही,' असे मच्छिंद्रनाथाला वाटले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आस्तिक ऋषीने ज्याप्रमाणे आपल्या मातृकुळाचे रक्षण केले तसे आपणही करावे म्हणून तो एक-एक मासा पुन्हा पाण्यात टाकू लागला. आपण एवढे कष्टाने पकडलेले मासे हा मूर्ख मुलगा पाण्यात सोडतो आहे हे पाहून त्याच्या बापाला फारच राग आला. त्या रागाच्या भरात तो मुलाला मारू लागला व म्हणाला, ' अरे, तू हे काय करतोस? माझे कष्ट सगळे वायाच गेले ! आता खाशील काय ? भीक मागायची लक्षणं आहेत ही.'

बाप अशा तऱ्हेने रागावल्यावर त्याची नजर चुकवून मच्छिंद्रनाथ तेथून निघून गेला. त्याला फार वाईट वाटले. भिक्षेचे अन्न पवित्र असते, तेच आपण खावे असा विचार करून तो बद्रिकाश्रमात गेला. तेथे त्याने बारा वर्षे कडक तपश्चर्या केली. त्यामुळे त्याच्या हाडांचा केवळ सांगाडा उरला.

इकडे एक दिवस श्री दत्ताची स्वारी शंकराच्या देवळात गेली व तेथे त्याने शंकरांची स्तुती केली. त्यामुळे शंकर प्रसन्न झाले व त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्याला प्रेमभराने आलिंगन दिले. मग उभयतांच्या खूप गप्पा झाल्या; तेव्हा बद्रिकाश्रमाचे अत्यंत रमणीय अरण्य पहाण्याची दत्तात्रेयाला इच्छा झाली. त्याने आपले मनोगत शंकराला सांगितले. मग त्याला बरोबर घेऊन शंकर अरण्यात बद्रिकाश्रमात गेला.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २ रा

(दत्तात्रेय, शंकर यांचे दर्शन. सर्व विद्या सिद्ध)

शंकर व दत्तात्रेय अरण्यांतील शोभा पहात पहात भागीरथीच्या काठाने जात होते. वाटेत त्यांचे लक्ष मच्छिंद्रनाथाकडे गेले. कलियुगात अशी कडक तपश्चर्या केलेली पाहून व त्यामुळे त्याची झालेली विकल अवस्था पाहून त्यांना फारच आश्चर्य वाटले. मग शंकराने दत्तात्रेयाला एकट्यालाच मच्छिंद्रनाथाकडे चौकशी करायला पाठविले.

शंकराच्या सांगण्यावरून दत्तात्रेय मच्छिंद्रनाथाजवळ गेले व एवढ्या कडक तपश्चर्येचे कारण विचारू लागले. तो आवाज ऐकून मच्छिंद्रनाथाने मग नम्रपणे वंदन करून म्हटले, ' महाराज, आज मला तपाला बसून बारा वर्षे झाली, पण इतक्या दिवसांत मी या अरण्यात एकही मनुष्य पाहिला नाही. असे असताना आपण आज मला असे एकाएकी विचारता आहात तेव्हा प्रथम आपण कोण आहात ते मला सांगा. आता ज्याअर्थी आपले दर्शन झाले आहे त्याअर्थी आपण माझी मनोकामना पूर्ण कराल असे मला वाटते.'

ते ऐकून दत्तात्रेय म्हणाले, ' मी अनसूयेचा पुत्र आहे. मला दत्तात्रेय म्हणतात. आता तुझी इच्छा मला सांग.'

दत्तात्रेयाने नाव सांगताच मच्छिंद्राला वाटले की, आज आपली बारा वर्षांची तपश्चर्या फळाला आली--केल्या कर्माचे सार्थक

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

झाले. हा विचार मनात येताच सर्व नेमधर्म सोडून मच्छिंद्राने दत्तात्रेयांच्या पायांवर डोके ठेवले. त्याच्या डोळ्यातूनही अश्रू ओघळू लागले. त्या अश्रूंनीच दत्तात्रेयांचे पादक्षालन झाले. तो म्हणाला, ' महाराज आपण साक्षात भगवान आहात. शंकर, विष्णू व ब्रह्मदेव या तिघांचे रूप घेऊन आपण अवतरला आहात आणि असे असताना तुम्ही मला विसरला कसे ? आता माझे सर्व अपराध पोटात घालून माझा स्वीकार करावा. आपली कृपादृष्टी मजवर असावी.'

भावनेच्या आवेगात मच्छिंद्रनाथ पुन्हा पुन्हा पाया पडू लागला. ते पाहून दत्तात्रेयालाही गहिवर आला. तो त्याला म्हणाला, ' आता तू चिंता करू नकोस. तुझी इच्छा पूर्ण होईल.'

असे त्याला समजावून दत्तात्रेयाने आपलं वरदहस्त त्याच्या डोक्यावर ठेवला व कानात मंत्रोपदेश दिला. त्यामुळे मच्छिंद्राचे सर्व अज्ञान नष्ट झाले व सर्व जग त्याला ब्रह्ममय भासू लागले. मग दत्तात्रेयाने त्याची परीक्षा पहाण्यासाठी त्याला विचारले, ' आता मला शंकर आणि विष्णू कोठे आहेत ते सांग.'

यावर मच्छिंद्रनाथ म्हणाले, ' ईश्वराशिवाय मला दुसरे काही दिसत नाही. सर्वत्र ईश्वरच आहे.'

हे त्याचे उत्तर ऐकून दत्तात्रेयाला समाधान वाटले. मग तो त्याला घेऊन शंकराजवळ गेला. त्याला पहाताच हा पूर्वाश्रमीचा कवी नारायण आहे हे जाणून शंकराने त्याला मिठी मारली; व त्याच्याकडून सर्व सिद्धींचा अभ्यास करवण्याची दत्तात्रेयाला आज्ञा केली. शंकराच्या आज्ञेनुसार दत्तात्रेयाने त्याला सर्व विद्यांचा मंत्रोपदेश केला व कानफाट्यांचा नाथसंप्रदाय निर्माण केला. त्याला शिंगी, शैली इ. भूषणे दिली. आणि दत्तात्रेय व शंकर दोघे स्वस्थानी निघून गेले. मग मच्छिंद्रनाथही तीर्थयात्रेस निघाला.

तीर्थयात्रा करीत करीत तो सप्तशृंगीस आला. तेथे त्याने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मोठ्या भक्तीने अंबेचे दर्शन घेतले व तिची स्तुती केली. त्यावेळी त्याच्या मनात आले की, ' साबरी विद्या आपल्याला पूर्ण अवगत झाल्यावर त्यावर कविता करावी.' ही कविता लोकांना उपयोगी पडेल असे त्याला वाटले, परंतु दैवत अनुकूल असल्याशिवाय कार्यसिद्धी व्हायची नाही, अशीही त्याला शंका आली.

त्यामुळे त्याने अंबेजवळ सात दिवस अनुष्ठान केले; तेव्हा अंबा त्याच्यावर प्रसन्न झाली व तिने त्याला अनुष्ठानाचा हेतू विचारला. मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' मातुश्री, साबरी विद्येवर काव्य करावे असे वाटते, तेव्हा माझी ही इच्छा पूर्ण होण्यासाठी मला उपाय सांगा.'

मच्छिंद्रनाथाची मनोकामना ऐकून ती पूर्ण होईल असा अंबेने आशीर्वाद दिला. मग ती त्याला मार्तंड पर्वतावर घेऊन गेली. तेथे एक मोठा नाग वृक्ष होता. तेथे बीजमंत्रांनी हवन केल्यावर त्याला तोच वृक्ष सुवर्णासारखा देदीप्यमान भासू लागला. तसेच त्या झाडाच्या फांद्यांवर अनेक दैवते बसलेलीही दिसू लागली. देवीने त्याला त्या दैवतांची नावेही सांगितली.

हा चमत्कार पाहून त्याला फार आश्चर्य वाटले. ती सर्व दैवते मच्छिंद्रनाथाकडे पहात होती; पण बोलत नव्हती. नंतर अंबेने त्याला सांगितले, ' तू आता येथून ब्रह्मगिरीच्या जवळच अंजन पर्वत आहे तेथे महाकालीचे स्थान आहे. तेथे जाऊन भगवतीला मनोभावे नमस्कार कर. तेथून दक्षिणवाहिनी असलेल्या नदीवर जा. तेथे तुला पाण्याने भरलेली श्वेतकुंडे दिसतील. त्यातील शुक्लवेल तोड व एक एक कुंडात टाक. ती शंभर कुंडे आहेत, पण ज्या कुंडात ती वेल सजीव झालेली दिसेल त्यात स्नान करून त्यातील पाणी पी, त्यामुळे तुला मूर्च्छा येऊ लागली तर बारा आदित्यांचे स्मरण करून जप कर. म्हणजे पुढचा मार्ग दिसेल. नंतर काचेच्या कुपीत तेथील पाणी घेऊन बा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आदित्यांचे नामस्मरण करून या वृक्षाला ते घाल म्हणजे सर्व दैवते प्रसन्न होऊन तुला वरदान देतील. हे सर्व एका खेपेत झाले नाही तर सहा महिने अशाच खेपा घालून पूर्ण कर. दर वेळेला एक-एक दैवत प्रसन्न होईल.'

अशा तऱ्हेने त्याला साबरी विद्येचा मार्ग सांगून देवी आपल्या जागी परत गेली. मग मच्छिंद्रनाथ अंजन पर्वतावर गेला. तेथे त्याने महाकालीचे दर्शन घेतले. शुक्लवेल घेऊन कुंडे पाहू लागला. तेथे त्याला शंभर कुंडे दिसली. त्यांत त्याने शुक्लवेल टाकला व पुन्हा येऊन पाहू लागला तेव्हा आदित्य नावाच्या कुंडात टाकलेल्या वेलाला पाने फुटलेली त्याला दिसली. तेथे त्याने स्नान केले. नंतर त्यातील पाणी पिताच त्याला मूर्च्छा आली. म्हणून त्याने देवीच्या आदेशाप्रमाणे बारा आदित्यांचे नामस्मरण केले. इतक्यात सूर्याने येऊन त्याला सावध केले. त्याला त्याची इच्छा विचारून, आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवून, इच्छा पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला.

सूर्याने अशा तऱ्हेने वरदान दिल्यावर मच्छिंद्रनाथाने काचेच्या कुपीत पाणी घेतले व तो मार्तंड पर्वतावर गेला. तिथल्या अश्वत्थ वृक्षाला नमस्कार केला. सूर्याचे स्मरण करून त्या कुपीतील पाणी अश्वत्थाला घालताच सूर्य प्रसन्न झाला व हेतू विचारू लागला. तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' कविता करावी असे मला वाटते; तेव्हा तू मला पूर्ण मदत करून माझी मंत्रविद्या सफल करावी.'

सूर्याने लगेच त्याला होकार दिला. मग मच्छिंद्रनाथ सात महिने खेपा घालत होता. अशा तऱ्हेने त्याने सर्व दैवते प्रसन्न करून घेतली. नंतर साबरी विद्येचा एक स्वतंत्र ग्रंथ तयार केला.

मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रा करीत बंगाल्यात चंद्रगिरी गावात गेला. त्या गावात सुराज नावाचा एक ब्राह्मण रहात होता. त्याच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पत्नीचे नाव कृतिदेवी होय. तिच्या पोटी नरसिंहाचा जन्म झाला होता. त्या गावात सर्वोदयेपाळ नावाचा एक वसिष्ठ गोत्री गौड ब्राह्मण रहात होता. तो मोठा कर्मठ होता. त्याच्या पत्नीचे नाव सरस्वती होते. ती फार सुंदर होती. तशीच सद्गुणीही होती, पण पोटी संतान नसल्यामुळे ती नेहमी उदास राही. त्यांच्या घरी मच्छिंद्रनाथ भिक्षेसाठी गेला. तो अंगणात उभा राहून ' अलख ' असे म्हणून भिक्षा मागू लागला. त्याचा आवाज ऐकून सरस्वती बाहेर आली. तिने त्याला नमस्कार केला, आसनावर बसवले आणि भिक्षा घातली. नंतर आपली हकीकत सांगून संतती नसल्याने उदास असल्याचेही सांगितले. तिची अवस्था पाहून मच्छिंद्रनाथाला दया आली. त्याने सूर्यमंत्राने विभूती मंत्रून ते भस्म तिला दिले आणि म्हणाला, ' हे भस्म रात्री झोपायच्या आधी खाऊन मग झोप. हे क्षुद्र भस्म आहे असे तू मनातही आणू नकोस. हा साक्षात हरिनारायण, जो नेहमी उदयास येऊन आपल्याला दर्शन देतो, तो तुझ्या उदरी जन्म घेईल. मग त्याला मी उपदेश करीन. त्यामुळे तो जगात कीर्ती मिळवील. सर्व सिद्धी त्याच्या आज्ञेत राहतील.'

असे तिला सांगून मच्छिंद्रनाथ जायला निघाला तेव्हा तिने परत केव्हा येणार म्हणून विचारले. मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' मी आता बारा वर्षांनी परत येऊन मुलाला उपदेश करीन.'

असे म्हणून तो निघून गेला. सरस्वतीला भस्म मिळाल्यामुळे फारच आनंद झाला. तिने ते भस्म आपल्या पदरात बांधून ठेवले. मग ती त्याच आनंदात शेजारणीकडे बसायला गेली. तेथे दुसऱ्याही पाच-सहा बायका गप्प मारायला जमल्या होत्या. तेव्हा तिने आनंदाने नुकतीच घडलेली सर्व हकीकत सांगितली. नंतर ती म्हणाली, ' त्या गोसाव्याने सांगितल्याप्रमाणे भस्म खाल्ल्यावर मला खरंच मुलगा होईल काय ?'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तिचा प्रश्न ऐकून सगळ्या जणींनी तिला वेड्यातच काढ्ले. एकजण म्हणाली, ‘ अगं, असल्या राखेने का पोरे होतात ? हे लोक जादूटोणा करण्यात पटाईत असतात. लोकांना फसवितात. तू अशी कशी त्याच्या नादी लागलीस. आम्हाला काही हे लक्षण ठीक दिसत नाही.’

अशा तऱ्हेने त्या सर्वजणींनी तिच्या मनात संभ्रम निर्माण केल्यामुळे ती अगदीच चक्रावून गेली व घरी आल्यावर घराजवळ केरकचरा, शेण वगैरे टाकण्याची खाच होती, त्या उकिरड्यात तिने ते भस्म काहीही विचार न करता टाकून दिले.

✻✻✻

अध्याय ३ रा

(मारुतीची भेट, स्त्रीराज्यात गमन)

मच्छिंद्रनाथ पूर्वेकडच्या जगन्नाथ, सेतुबंध इ. तीर्थयात्रा करून रामेश्वरास गेला. तेथे स्नान करून त्याने बसण्याची तयारी केली. तिथे त्याला मारुतीचे दर्शन झाले. तोच पाऊस पडू लागला. म्हणून मारुती रहाण्यासाठी दरडी उकरून गुहा करू लागला. ते पाहून मच्छिंद्रनाथास आश्चर्य वाटले. तो मारुतीला म्हणाला, ‘माकडा, तू अगदीच मूर्ख दिसतोस. शरीराच्या संरक्षणासाठी तू आता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सोय करीत आहेस. अरे पाऊस एकसारखा खूप पडत आहे. आता तुझे घर केव्हा तयार होणार ? चोरांनी लुटून नेल्यावर दिव्यात तेल घालावे किंवा घराला आग लागल्यावर विहीर खणावयास लागावे, त्याप्रमाणे पाऊस पडत असताना तू घराची तजवीज करतो आहेस.'

ते ऐकून मारुती त्याला म्हणाला, ' तू एवढा चतुर दिसतोस तर तू कोण आहेस ?'

तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' मी जती आहे व मला मच्छिंद्र म्हणतात.'

' तुला जती असे लोक कोणत्या अर्थाने म्हणतात ?' मारुतीने मच्छिंद्रास विचारले.

' माझा शक्तिप्रताप पाहून लोक मला जती म्हणतात.' त्याने उत्तर दिले.

त्यावर मारुती म्हणाला, 'आजपर्यंत आम्ही एक हनुमंत जती आहे असे ऐकत होतो. आता तुम्ही एक नवीनच जती निर्माण झालात. पण ते कसंही असो, मी काही दिवस मारुतीच्या शेजारी रहात होतो. त्यामुळे त्याच्या कलेचा हजारावा हिस्सा मला माहीत आहे. तो या वेळी मी तुला दाखवतो, त्याचे निवारण कसे करावे ते तू मला दाखव. नाही तर जती हे नाव टाकून दे.'

याप्रमाणे मारुती मच्छिंद्रनाथास टोचून बोलल्यानंतर त्याने उत्तर दिले, ' तू मला कोणती कला दाखवणार आहेस ती दाखव. त्याचे निवारण श्रीगुरुनाथ करतील.'

ते ऐकून मारुतीला फार राग आला. तो लगेच उड्डाण करून एकीकडे गेला आणि विशाल रूप घेऊन त्याने मच्छिंद्रनाथास कळू न देता त्याच्या अंगावर सात पर्वत उचलून फेकले. ते आकाशमार्गाने ढगाप्रमाणे येत आहे हे पाहून मच्छिंद्रनाथाने लगेच ' स्थिर !

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्थिर !' असे म्हणून वातप्रेरक मंत्रशक्तीच्या सामर्थ्याने ते पर्वत जागच्या जागी खिळवून ठेवले. मारुती एकावर एक असे पर्वत नाथावर टाकीतच होता, पण त्याने त्या एकाच मंत्राच्या शक्तीने ते सर्व पर्वत जागच्या जागी खिळवून टाकले. ते पाहून मारुती रागाने प्रलयकाळच्या अग्नीप्रमाणे क्षोभला व एक मोठा पर्वत उचलून तो फेकून मारण्याच्या बेतात आहे असे मच्छिंद्रनाथाने पाहिले. मग नाथाने समुद्राचे पाणी घेऊन वायुआकर्षण मंत्र म्हणून जोरात ते मारुतीच्या अंगावर शिंपडले आणि त्याला जागच्या जागी खिळवून टाकले. त्याचे चलनवलन बंद झाले. मारुतीने वर हात करून पर्वत धरून ठेवला होता. हातही तो तसाच वर राहिला. पर्वत खाली टाकायला किंवा पायी चालायलादेखील त्याच्या अंगी बळ राहिले नाही. ते पाहून वायूने आपल्या मुलाला (मारुतीस) पोटाशी धरले. आणि संकटातून सोडविण्यासाठी मच्छिंद्रनाथास विनंती केली. ती नाथाने मान्य करून पुन्हा मंतरलेले पाणी शिंपडले. त्यामुळे पर्वत आपल्या मूळ ठिकाणी व मारुतीही पूर्वस्थित्रीत आला. मारुतीने त्याच्याजवळ जाऊन ' धन्य ! धन्य !' म्हटले. वायू मारुतीला म्हणाला, ' बाबा रे, तुझे या सिद्धापुढे काही चालायचे नाही. याने तुला व मला बांधून टाकून अगदी दुर्बल करून टाकले आहे. याची मंत्रशक्ती अफाट आहे. तुला कदाचित वाटेल की, मी आपल्याच तोंडाने त्याच्या मंत्रसामर्थ्याची प्रौढी कशी वर्णन करतो ? पण माझी शक्ती ईश्वराच्या हातात आहे आणि याने आपल्या शक्तीच्या बळाने देवतांना आपले दास केले आहे.'

नंतर मच्छिंद्रनाथ मारुतीच्या व त्याच्या पित्याच्या पाया पडला आणि आपल्याशी मित्रत्वाने वागण्यासाठी त्याने त्यांची प्रार्थना केली. तेव्हा ते दोघे प्रसन्न मनाने म्हणाले, ' तुझ्या कार्यासाठी आम्ही

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

उभयतां तुला सर्व प्रकारे सहाय्य करू व सुख-संपत्ती देऊ. नंतर 'आपण जती आहोत,' असे तू खुशाल सांगत जा.' असे मारुतीने त्याला वरदान दिले. त्यावेळेस मच्छिंद्रनाथाने मारुतीस विचारले की, 'मी जती या नावाने विख्यात होईन हे ठीक आहे, पण माझ्या मनात एक शंका आली आहे. तिचे आपण निवारण करावे.'

कोणती शंका आली आहे, असे मारुतीने विचारले; त्यावर त्याने सांगितले, 'तू सर्वज्ञ आहेस, मग माझ्याशी विनाकारण भांडण कशासाठी केलेस ? तुझी माझी नागाश्वत्थाच्या झाडाखाली पूर्वी भेट झाली होती. त्यावेळेस साबरी विद्येचे माझ्याकडून कवित्व करवून तू मला वरदान दिले होते. असे असताना हा बखेडा का केलास ?'

हे ऐकून मारुती मच्छिंद्रनाथाला म्हणाला, 'तू समुद्रस्नान करत होतास तेव्हा मी तुला ओळखले आणि तुझ्याजवळ आलो. तू कवीनारायणाचा अवतार आहेस व मच्छीच्या पोटी जन्म घेतलास हे मला माहीत होते, परंतु माझ्या मनात अशी कल्पना आली की, नागाश्वत्थाच्या झाडाखाली देवांनी जो वर तुला दिला, त्याचे सामर्थ्य कितपत आहे, हे आपण एकदा पहावे. शिवाय यापुढे तुला आणखी पुष्कळ संकटांतून पार पडायचे आहे; म्हणून तू हिंमत करून पुढे कितपत टिकाव धरशील त्याचाही अदमास मला घ्यायचा होता.'

मारुती त्याला म्हणाला, 'तू आता येथून स्त्री-राज्यात जा आणि तेथे खुशाल आराम कर. तुझी भेट झाली हे फार चांगले झाले. तुझ्या हातून माझ्या मस्तकावरचा बोजा उतरवला जाईल.'

त्यावर मच्छिंद्रनाथाने विचारले, 'असे कोणते ओझे तुझ्यावर पडले आहे ?'

त्यावर मारुती म्हणाला, 'योगेश्वरा ! लंकेच्या रावणास ठार मारून रामचंद्र-सीतेस घेऊन अयोध्येय परत येत असता, तिच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मनात आले की, मारुती रामाचा खरा दास आहे. यासाठी आपल्या हातून त्याचे होईल तितके अधिक कल्याण करावे. त्याचे लग्न करावे. संपत्ती व संतती द्यावी. सुखसंपन्न करावे. स्त्रीवाचून संसारात खरे सुख नाही, परंतु हा ब्रह्मचारी असल्याने माझे ऐकणार नाही असा संशय तिला आला. तेव्हा तिने मला गृहस्थाश्रमी करण्यासाठी व वचनात गोवून टाकण्यासाठी, आपल्याजवळ बोलाविले व प्रेमाने माझ्या तोंडावरून हात फिरविला. सीतामाई मला म्हणाली, ' बा मारुती, तू तिन्ही लोकांमध्ये धन्य आहेस. माझे तुझ्याजवळ एक मागणे आहे, ते तू देशील तर फारच चांगले होईल. मी सांगेन ते तू सहसा नाकबूल करणार नाहीस म्हणा !'

'अशा प्रकारे सीतेचे बोलणे ऐकून मला समाधान वाटले. कोणती इच्छा आहे, असे मी तिला विचारल्यावर वचन दिल्याशिवाय ती आपला हेतू मला सांगेना. तेव्हा मी तिला वचन देऊन तिची आज्ञा मानण्याचे मनापासून कबूल केले. त्याबरोबर मी गृहस्थाश्रमी होऊन सुख भोगावे, अशी इच्छा तिने सांगितली. त्यामुळे मी फार मोठ्या संकटात सापडलो व खिन्न होऊन सीतेला काही उत्तर न देता रामाकडे येऊन बसलो. माझा चेहरा सुकलेला पाहून श्रीरामाने मला जवळ घेऊन विचारले, ' तुझा चेहरा का सुकला आहे ?' मग मी सरळपणे सर्व कथा सांगितली. तेव्हा सर्वसाक्षी राम म्हणाला, ' स्त्रीराज्यातल्या सर्व स्त्रिया तुझ्याच आहेत. परंतु यांतील मर्म असे आहे की, तुला आणि मला चार चौकडीत जन्म घ्यावयाचा होता. मी नव्याण्णव वेळा जन्म घेतला. तूही नव्याण्णावा होय. रावणाला मारून आल्यावर तुला स्त्रीराज्यात जावे लागणार होते, ती वेळ आता आली आहे. तेव्हा वेळेस अनुसरून वाग.'

याप्रमाणे सांगितल्यावर मी प्रभु रामांना विचारले, ' ब्रह्मचर्य व्रत आचरण करण्याचा माझा दृढ निश्चय आहे; मग स्त्रीराज्यात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जाऊन माझा त्या स्त्रियांना व त्यांचा मला काय उपयोग ?'

ते ऐकून रामांनी सांगितले, 'तू उर्ध्वरिता आहेस. तुझ्या नुसत्या भुभुःकाराबरोबरच तेथील स्त्रिया गरोदर राहतील. आता आपल्या मनातले सर्व संशय काढून टाक आणि स्त्रीराज्यात जा. तुझे ब्रह्मचर्य व्रत ढळणार नाही.'

रामचंद्रांनी याप्रमाणे सांगितल्यावर मी स्त्रीराज्यात गेलो त्यावेळी तेथे मेनका नावाची राणी राज्य करीत होती. 'पृथ्वीवर इतर ठिकाणी मनुष्य, पशू, पक्षी वगैरे सर्व जातीतील स्त्रीपुरुष एकत्र आनंदाने रममाण होतात.' असे तिने ऐकले होते. तेव्हा पासून ना विचार मनात आणून तिच्या अंगाची लाही लाही होत होती. प्रत्यक्ष मारुतीचा संग घडावा म्हणून ती अनुष्ठान करू लागली. स्वतःच्या शरीराचे मांस तोडून तिने अग्निकुंडात माझ्या नावाने आहुती दिल्या. अशी बारा वर्षे लोटली. अंगावरचे सर्व मांस संपले, तरीही तिचा निश्चय ढळेना. तिची खडतर तपश्चर्या पाहून मी तिला प्रसन्न झालो. त्यावेळी माझ्या पाया पडून तिने आपले मनोरथ पूर्ण करायला सांगितले. ती मला म्हणाली, 'मारुतीराया, तुझ्या भुभुःकारा येथील सर्व स्त्रिया गरोदर रहातात. त्यामुळे तू येथील सर्व स्त्रियांचा पती ठरतोस. यामुळे सर्वांना खूप सुख होते, परंतु माझ्या मनात तुझ्याशी प्रत्यक्ष संग करावा असे आहे. ही माझी इच्छा तू पूर्ण करावी मैथुनाची पद्धत तिन्ही लोकांत प्रचलित असते, ते सुख आम्हाला स्वप्नातही अनुभवता येऊ नये, अशी आमच्या नशिबाची स्थिती आहे. तर ते सुख मला प्रत्यक्ष दे.'

असे तिने म्हटल्यावर मी तिला सांगितले, 'मी ब्रह्मचर्य कडक पाळतो, अशी माझी प्रसिद्धी आहे. त्यामुळे ही गो माझ्याकडून कधीही घडणार नाही. माझ्या श्वासाने तुमची तृ होते, तेवढे पुरे आहे. आता तुझी इच्छा पूर्ण करण्यासाठी मच्छिंद्रना

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

येथे येईल. तो तुझ्या मर्जीनुरूप वागेल. मच्छिंद्रनाथ साक्षात कवी नारायणाचा अवतार आहे. त्याच्यापासून तुला तुझ्या तपाचे फळ मिळेल.'

'असे सांगून मी तिचे समाधान केले. आता तो योग आजच आला आहे; तेव्हा तू तिकडे जाऊन तिचे पूर्ण समाधान कर.'

मारुतीचे हे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, 'मीही उर्ध्वरिताच आहे; त्यामुळे मला हे काम सांगून काय उपयोग ? माझे ब्रह्मचर्य पूर्णपणे नष्ट होईल व जगात माझी नाचक्की होईल. तेव्हा तू हे असले काम मला सांगू नकोस. शिवाय स्त्रीसंग हे अपकीर्तीचे भांडार आहे, म्हणून ही गोष्ट करावी असे मला बिलकूल वाटत नाही. कारण, नागपंथी योगी मला वाळीत टाकतील.'

मच्छिंद्रनाथाने अशा प्रकारे नकार देताच मारुती त्याला म्हणाला, 'ही गोष्ट अनादिकालापासून चालत आली आहे. जसे नव्याण्णव मारुती तसेच नव्याण्णव मच्छिंद्रनाथ असा क्रम चालत आला आहे. तुझ्यापोटी मौनीनाथ म्हणून पुत्र होईल. त्याची कीर्ती दिगंत पसरेल !' मारुतीने त्याला असे सांगून त्याचे मन वळवले. मारुतीच्या म्हणण्यास मान देऊन मच्छिंद्रनाथ स्त्रीराज्यात जाण्यास तयार झाला व एकमेकांस नमस्कार करून ते दोघेजण आपापल्या मार्गाने गेले.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ४ था

(अष्टभैरव, चामुंडा यांना वश केले.)

मच्छिंद्रनाथ हिंगुळादेवीच्या दर्शनाला जायला निघाला. ती देवी म्हणजे साक्षात ज्वालामुखी भगवती महाप्रदीप्त आदिशक्ती होय. जेव्हा मच्छिंद्रनाथ देवीच्या प्रचंड दरवाजापाशी पोहोचला, तेव्हा दरवाजावर महापराक्रमी अष्टभैरव उभे होते. त्यांनी मच्छिंद्रनाथाला पाहताक्षणीच ओळखले. साबरी मंत्राने नाग -अश्वत्थाच्या झाडाखाली नाथाने सर्व देव अनुकूल करून त्यांच्यापासून वरदाने मागून घेतली; ती ह्याची कितपत सिद्धीस गेली आहे, ती प्रचीती पहावी असे त्याच्या मनात आले; त्याबरोबर ते भैरव आपली रूपे बदलून संन्याशी झाले आणि दाराशी उभे राहिले. तुम्ही कोठे चालला, असे मच्छिंद्रनाथाला विचारल्यावर त्याने सांगितले, ' मला देवीचे दर्शन घ्यावयाचे आहे, म्हणून मी आत जात आहे.'

ते ऐकून संन्याशी म्हणाले, ' आम्ही येथले द्वारपाल आहोत. येथे दाराशी उभे राहून जे कोणी देवीच्या दर्शनाला येतात त्यांच्या पाप-पुण्याची चौकशी करून, जो पुण्यवान व मनापासून दर्शनाची इच्छा करणारा असेल त्यालाच आम्ही आत जाऊ देतो. तुझ्या पाप-पुण्याचाझाडा देऊन तू आत जा. दर्शनाचा आव आणून रतिसुखाच्या मिषाने कोणी आत जाऊ लागले तर आत प्रवेश करताना तो दाराशी अडकतो; कारण त्यावेळेस दार अतिशय लहान होते. खोटे बोलून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अडकला असे दिसताच आम्ही त्याला मागे ओढून शिक्षा करतो. तेव्हा तुमच्या हातून जी जी कर्मे झाली असतील ती ती सर्व सांगा व मग दर्शनास खुशाल जा !'

अष्टभैरवांचे हे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' मी पाप-पुण्य काही जाणत नाही. माझ्याकडून आजपर्यंत जी जी कर्मे घडली ती ती मी ईश्वरासाठी केली आहेत. आम्ही जती, पाप-पुण्यापासून अलिप्त आहोत.'

मच्छिंद्रनाथाचे बोलणे ऐकून अष्टभैरव चकित झाले व म्हणाले, ' जन्माला आल्यापासून तू केलेली कर्मे लपवून ठेवलीस तर येथे तुझा निभाव लागायचा नाही, तुला शिक्षा भोगावी लागेल. म्हणून काही वाईट असेल ते सांगून आत जा म्हणजे अंबाबाई तुझ्यावर कृपा करील व तुला दर्शन देईल.'

हे ऐकून शेवटी मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' प्राण्यांना शासन करण्यासाठी मी अवतार घेतला आहे. माझ्यापुढे तुम्हा क्षुद्रांचा काय प्रताप ?'

ते ऐकून अष्टभैरवांना राग आला. त्रिशूळ, फरस, गांडीव, तलवारी, अंकुश, बरची, गदा, भाले, कऱ्हाडी अशी तीक्ष्ण शस्त्रे घेऊन ते युद्धाला सिद्ध झाले. मच्छिंद्रनाथाने ' जय जय श्रीदत्त गुरुराज' म्हणून हातात भस्म घेतले व मंत्रून म्हटले, ' मित्रा, वरुण देवा ! माझ्या कार्यासाठी सहाय्य करा.. वरुणी, अग्नी, वायू, इंद्रादि देव-गण, गंधर्व यांनी मला मदत करावी.'

अशा तऱ्हेने सर्वांना युद्धाचे आमंत्रण करून मंतरलेले भस्म दाही दिशांना फेकले. नंतर वज्रपंजरप्रयोग म्हणून विभूती कपाळाला लावली. त्याबरोबर त्याचे शरीर वज्राहून कठीण झाले. मग मच्छिंद्रनाथाने भैरवांना सांगितले, ' तुम्ही आता आळस करून वेळ लावू नका. युद्ध करण्यास तय्यार व्हा. युद्ध केले नाहीत तर तुमच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मातापित्यांची शपथ आहे. युद्धाला या, नाहीतर विहिरीत जीव द्या.'

ही कठोर वाणी ऐकून अष्टभैरवांनी रागारागाने शस्त्रे सोडली. परंतु मच्छिंद्रनाथाने ती गवताच्या काडीप्रमाणे मानली. तिन्ही लोकांना मात्र ती प्रलयकाळ वाटली. त्यावेळी वासवशक्ती सोडण्यात आली. त्या आवाजाने ब्रह्मांड दणाणून गेले. शेष दचकला. तो आवाज अंबेने ऐकला व शोध घेण्यासाठी तिने आपल्या लावण्यवती दासी पाठविल्या. त्यांनी हा सर्व प्रकार पाहिल्यानंतर दुसऱ्या पुष्कळ दासी मदतीला आणून शस्त्रास्त्रांचा जोरदार मारा चालू केला. मच्छिंद्रनाथाने त्या सर्वांचे निवारण केले आणि भुलविणारे मोहिनी अस्त्र कामशरामध्ये घालून रोखून टाकले तेव्हा त्या अस्त्राने दासींच्या देहात गुप्त संचार करून पिशाचाप्रमाणे सर्वांना भ्रमविले. अशा प्रकारे चमत्कार चालू असता विद्यागौरअस्त्राच्या मदतीने त्याने सर्वांना नग्न करून त्यांची वस्त्रे आकाशात उडविली. नंतर माया नामक अस्त्राच्या सहाय्याने हजारो पुरुष त्या दासींपुढे निर्माण केले. नंतर स्मरणअस्त्राच्या योगाने त्या सर्व दासींना शुद्धीवर आणले. समोर हजारो पुरुष व आपण मुक्त केसांच्या, वस्त्राशिवाय, असा प्रकार पाहून त्या दासी अत्यंत लाजल्या व सुसाट पळत सुटल्या.

त्या पळत असताना प्राण कंठाशी येऊन अत्यवस्थ पडलेले भैरव त्यांनी पाहिले. मग त्या भगवतीजवळ आल्या. त्यांना नग्न पाहून अंबेला आश्चर्य वाटले. तिने काय झाले म्हणून विचारताच दासी म्हणाल्या, ' पुण्य सरले म्हणून ही दशा आम्हाला प्राप्त झाली. एक जोगी आला आहे. त्याने आमची अशी दुर्दशा केली. त्यानेच भैरवांचा प्राण घेतला. तुम्ही ही जागा सोडून येथून कुठेतरी लांब जा. नाही तर तुमच्यावरही असाच प्रसंग येईल.'

अशा तऱ्हेने घाबरलेल्या त्यांनी धसका घेतला होता. त्यांना डोळ्यांपुढे तो जोगी सारखा दिसत होता. भयाने ' आला, आला !'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे त्या ओरडत होत्या.

हा सर्व प्रकार पाहून भवानीला फार आश्चर्य वाटले. हे सर्व करणारा हा कोण आहे हे ती दिव्य दृष्टीने पाहू लागली; तेव्हा मच्छिंद्रनाथ या नावाने कवी नारायणाने अवतार घेतल्याचे तिच्या लक्षात आले. मग तिने सर्वांना अस्त्रे दिली व त्यांच्यासह अंबा मच्छिंद्रनाथाजवळ गेली. देवीला पहाताच मच्छिंद्राने तिला नमस्कार केला. अंबेने त्याला मांडीवर बसविले व त्याच्या पराक्रमाची स्तुती केली. नंतर तिने त्याला भैरवांना सावध करावयास सांगितले. त्याने वाताकर्षणास्त्र काढले. भैरव सावध होऊन पाहू लागले. तो अंबा मच्छिंद्रनाथाला मांडीवर घेऊन बसली आहे ! मग त्यांनीही मच्छिंद्रनाथाची स्तुती करून त्याला शाबासकी दिली व नागअश्वत्थाखाली संपूर्ण दैवते प्रसन्न होऊन त्यांनी त्याला आशीर्वाद दिल्याची मूळची हकीकत अंबेला सांगितली.

ते ऐकून ' माझ्या मनात तुझा पराक्रम पहायचा आहे,' असे अंबेने नाथास सांगितले. यावर ' तू सांगशील तसे मी तुला करून दाखवितो,' असे नाथाने सांगितले. तिने पर्वत आकाशात उडवून पुन्हा जागच्या जागी ठेवावयास सांगितले. हे ऐकताच त्याने वायुअस्त्र योजून व मंत्र म्हणून भस्म पर्वतावर फेकले. तेव्हा पर्वत आकाशात फिरू लागला. मग तिने त्याची पाठ थोपटून त्याला शाबासकी दिली व पर्वत उतरावयास सांगितले. तेव्हा त्याने वायुअस्त्र काढून घेऊन पर्वत जागच्या जागी आणून ठेवला. ते पाहून अंबेला संतोष वाटला. मग नाथास घेऊन ती आपल्या जागी गेली. मच्छिंद्रनाथ तेथे तीन रात्र राहिले. जायच्या वेळी अंबेने प्रसन्न होऊन त्याला स्पर्शास्त्र व भिन्नास्त्र अशी दोन अस्त्रे प्रसाद म्हणून दिली. त्यांचा स्वीकार करून मच्छिंद्रनाथ अंबेस नमस्कार करून निघाला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ५ वा

(वेताळावर विजय)

मच्छिंद्रनाथाने हिंगुळादेवीचे दर्शन घेतल्यानंतर तो बारामल्हार नावाच्या अरण्यात आला. रात्रीच्या वेळी देवळात स्वस्थपणे निजला असता भर रात्री त्याला मोठा आवाज ऐकू आला व असंख्य दिवट्या दिसल्या. ते पाहून भुतावळ उठली, असे मच्छिंद्रनाथाच्या मनात आले. काहीतरी चमत्कार दाखवून त्या सर्वांस प्रसन्न करून घ्यावे असा त्याने विचार केला आणि लगेच त्याने स्पर्शस्त्राची योजना केली. त्या अस्त्राच्या अद्‌भुत शक्तीच्या प्रभावाने सर्व भुतावळ तिथल्या तिथेच खिळून राहिली. त्यांना हालचाल करता येईना. ती सर्व भुते झाडाप्रमाणे एका जागी खुंटून राहिली. ती सारी नित्याप्रमाणे वेताळाला भेटायला निघाली होती, परंतु मध्येच हे घडल्यामुळे ती त्या दिवशी वेताळाला भेटू शकली नाहीत. इकडे वेताळाने ती का आली नाहीत याची चौकशी करण्यासाठी दुसरी भुते पाठवली. तेव्हा कोणी एक सिद्ध आला असून त्याच्या सामर्थ्याचा हा सर्व खेळ असल्याचे त्याला समजले. मग तो जती कोठे उतरला आहे ह्याचा शोध करीत फिरत असता, मच्छिंद्रनाथास वेताळाकडून आलेल्या भुतांनी पाहिले. तेव्हा ह्याचेच हे अद्‌भुत काम असावे, असे त्यांना वाटले. त्या भुतांनी मच्छिंद्रनाथाजवळ जाऊन त्यांची प्रार्थना केली की, ' स्वामी ही भुते पतित आहेत, म्हणून ह्यांची मुक्तता करावी म्हणजे, ते आपापल्या कामास जातील ' —

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ही सर्व भुते जमिनीला खिळून राहिली असता तुम्ही तेवढे मुक्त कसे राहिलात ?' असे मच्छिंद्रनाथाने त्यांना विचारले. त्यांनी उत्तर दिले, ' ही भुते आज का आली नाहीत हे पाहण्यासाठी वेताळाने आम्हाला येथे पाठविले आहे; तर महाराज, यांची सुटका करावी, म्हणजे ही वेताळाकडे नमस्कार करायला जातील.'

त्यावर मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' मी त्यांना कदापि सोडणार नाही, हा माझा निरोप तुम्ही वेताळाला त्वरित जाऊन सांगा.' त्यावर भूतगण म्हणाले, ' हे योग्य नाही.' मग मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' तो किती प्रबल आहे हे मी प्रत्यक्ष पाहीन.'

मच्छिंद्रनाथाचा हा निरोप घेऊन ती भुते वेताळाकडे गेली आणि त्याच्या पाया पडून म्हणाली, ' तिकडे एक जोगी आला आहे. त्याने शरभतीरावरची भुते मंत्रशक्तीने एका जागी खिळवून ठेवली आहेत व तुमचीही हीच गती करण्याचा विचार आहे.'

हे ऐकताच वेताळ फार रागावला. त्याने सर्व देशांतील भुते आणण्यासाठी जासूद पाठविले. मग सर्व भुते तिथे येऊन पोहोचली. त्यांना वेताळाने सर्व हकीकत थोडक्यात सांगितली. मग सर्वजण आपापल्या फौजेसह शरभतीरी येऊन दाखल झाले व तेथे त्यांनी भयंकर गोंधळ केला.

हे सर्व पाहून मच्छिंद्रनाथाने भस्म मंत्रून ठेवले व त्यांचे सामर्थ्य किती आहे ते पाहण्यासाठी थोडा वेळ तो गप्प राहिला. नंतर त्याने वज्रास्त्रमंत्र जपून सभोवती एक रेघ ओढली व मस्तकावर वज्रशक्ती धरली. यामुळे भुतांना जवळ जाता येईनासे झाले. इकडे भुतांच्या राजांनी झाडे, डोंगर वगैरे नाथावर टाकले, परंतु त्यांचे काही चालले नाही. त्यांनी सर्व शस्त्रांचा, अस्त्रांचा उपयोग करून पाहिला, परंतु मच्छिंद्रनाथापुढे ती दुर्बल ठरली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मच्छिंद्रनाथाने स्पर्शास्त्राने सर्व भुतांना एका जागी बांधून टाकले. त्यावेळी पिशाचांच्या अष्टनायकांपैकी झोटिंग, खेळवा बावरा, म्हंमदा, मुंजा, म्हैशासुर व धुळोवान हे सातजण मच्छिंद्रनाथाचे पाय धरून ओढण्याचा प्रयत्न करू लागले, पण इतक्यात नाथाने चपळाईने वज्रास्त्र सिद्ध करून ते सर्व दिशांकडे संरक्षणासाठी ठेवले व दानवास्त्र सिद्ध करून मृदु, कुमक, मरू; मलीमल, त्रिपुर, बळजेठी हे सात दानव उत्पन्न केले; मग हे सात दानव व सात भूतनायक यांची चढाओढ लागली. एक पुरा दिवस त्यांचे युद्ध झाले. शेवटी दानवांनी त्यांना जेरीस आणताच ते अदृश्य झाले. अखेर मच्छिंद्रनाथाने वासवशक्ती सोडून वेताळास मूर्च्छित केले. अगदी प्राण कंठाशी आल्यावर निरुपायाने वेताळ अभिमान सोडून मच्छिंद्रनाथाला शरण गेला.

वेताळासह सर्व भूतनायकांनी मच्छिंद्रनाथाची प्रार्थना केली की,'तू आमचे प्राण घेऊ नको. आमचे प्राण वाचविलेस तर आम्ही जगात तुझी कीर्ती पसरवू. तू सांगशील ते काम करू. यमाजवळ यमदूत आहेत. विष्णूजवळ विष्णूदूत आहेत. त्याचप्रमाणे आम्ही सर्व आपापल्या पिशाच फौजेसह तुझ्याजवळ राहून तुझी आज्ञा मानू. याप्रमाणे आम्ही वागलो नाही तर आमचे सर्व पूर्वज नरकात जावोत.'

अशा तऱ्हेन भुतांनी दीनवाणीने केलेली प्रार्थना ऐकून मच्छिंद्रनाथाने सांगितले, ' साबरी विद्येवर मी कवित्व केले आहे. जो मंत्र ज्या शक्तीचे असेल त्याप्रमाणे तुम्ही वागा. जपामंत्राबरहुकूम कार्यसिद्धी केली पाहिजे. तुम्ही मंत्रपाठ करायला मदत केली पाहिजे. तसेच मंत्र घोकून त्याची साधना करणारांचाही मंत्र सफल झाला पाहिजे.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हे सर्व म्हणणे सर्वांनी आनंदाने कबूल केले. नंतर अभिक्ष्य कोणते हे सर्व त्यांना नाथाने सांगून ठेवले आणि मंत्राच्या सिद्धतेची ग्रहणामधील वेळ निश्चित केली.

याप्रमाणे मच्छिंद्रनाथाने सर्व भुतांना वश केले व वेताळाकडून सर्व गोष्टी कबूल करून घेतल्या. नंतर विमुक्त अस्त्राच्या सहाय्याने त्यांना मोकळे केले. नंतर सर्वजण मच्छिंद्रनाथाच्या पाया पडले आणि त्यानी त्यांचा जयजयकार करून त्याची स्तुती केली व सर्वजण स्वस्थानी गेले.

✵✵✵

अध्याय ६ वा

(कालिकास्त्रीची प्राप्ती)

बारा मल्हार या पवित्र स्थानी मच्छिंद्रनाथाने अष्टभैरवादिकांशी युद्ध करून त्यांची खच्ची करून देवीचा प्रसाद मिळविला. नंतर कार्तिकस्वामींचे दर्शन करून कोकणात कुडाळ प्रांतात अडुळ गावात येऊन राहिला. त्या गावाबाहेर असलेल्या महाकालिका दैवताच्या दर्शनासाठी मच्छिंद्रनाथ गेला. हे कालिका

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दैवत फार कडक असून शंकराच्या हातातल्या कालिका अस्त्राची तेथे स्थापना केलेली आहे. त्या अस्त्राने पुष्कळ दैत्यांचा वध केला म्हणून शंकर प्रसन्न होऊन त्या अस्त्ररूपी कालिकेस वरदान देण्यास तयार झाला. तेव्हा तिने वर मागून घेतला, ' आजपर्यंत मला सांगितलेली सर्व कामे मी केली. आता मला येथे विश्रांती घेऊ द्यावी.'

तिच्या मर्जीप्रमाणे शंकरांनी देवीची त्या ठिकाणी स्थापना केली. त्या देवताच्या दर्शनासाठी मच्छिंद्रनाथ देवळात गेला व त्याने देवीचे दर्शन घेतले. प्रार्थना केली, ' हे माते, मी मंत्रकाव्य केले आहे, त्याला तुमचे सहाय्य असावे आणि माझ्या हातात राहून माझी कवित्वशक्ती गौरवून, वरदान देऊन तुम्ही तिचे महत्त्व वाढवावे.'

पण मच्छिंद्रनाथाने केलेली प्रार्थना ऐकून देवी रागावली. आधीच त्या अस्त्रास म्हणजे देवीस फार श्रम झाले होते. त्यात मच्छिंद्रनाथाचे असले बोलणे ऐकून ते तिला प्रलयाग्नीसारखे वाटले. तिला अत्यंत राग आला व ती म्हणाली, ' अरे नष्टा, अनिष्टा, पतिता, मला शिवकार्याने फार श्रम झाले आहेत. असे असताना तू मला आणखी त्रास देऊ पहातोस ? तू कवित्व विद्या तयार करून माझ्याजवळ वरदान मागतो आहेस ? पण हा वर माझ्या शांततेत विघ्न होत आहे. हे निवांत स्थान पाहून मी येथे येऊन राहिले. आता तू मला त्रास देण्यास आला आहेस, तर आत्ताच्या आत्ता माझ्या डोळ्यांसमोरून दूर हो. नाही तर तुला मी शासन करीन. अरे, मी शंकराच्या हातातील अस्त्र ! ते मी तुझ्या हातात देईन की काय ? मला बोलावताना तुझ्या मनात शंका तरी कशी आली नाही? आता तू येथून तुझे तोंड काळे कर, नाही तर फुकट मरशील.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथ देवीला म्हणाला, ' मी प्राणास मुकेन ही गोष्ट अगदीच अशक्य आहे: सूर्यबिंब अगदी लहान असते, परंतु ते त्रिभुवन प्रकाशित करते. त्याप्रमाणे मी माझा प्रताप दाखवून तुला एका क्षणात जिंकीन.'

त्यावर अंबा म्हणाली, ' हे भ्रष्टा, तू कान फाडून, हातात कंकण घालून आणि कपाळाला शेंदूर फासून येथे आला आहेस, पण मी या धमकावणीला घाबरणार नाही. अरे, तुझा जन्म मला ठाऊक आहे. बोलून-चालून तू कोळ्याचा मुलगा. मासे मारून पोट भरायचे सोडून तू हे काय करतोस ? तुझ्यासारख्या दरिद्री माणसाला ही अस्त्रविद्या काय करायची ? आंधळ्याला सौंदर्याचा काय उपयोग ? तुला वाटत असेल की, मी मोठा प्रतापी आहे. मी भुतावळ वश केली तशीच ही देवीही वश करून घेईन; पण ते शक्य नाही. मीं शिवअस्त्र आहे. जरा वाकडी नजर केली, तर साऱ्या ब्रह्मांडाचा नाश करीन. तेव्हा माझ्यासमोर तू कसली प्रौढी दाखवतोस ?'

देवीचे हे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' देवी, मी सांगतो ते ऐक. बळी वामनाला असाच क्षुद्र समजत होता, परंतु त्यालाच शेवटी पाताळलोक पहावा लागला.'

मच्छिंद्रनाथाचें हे बोलणे ऐकून देवीला अत्यंत राग आला. ती त्याला म्हणाली, 'तुझ्यामध्ये कोणती शक्ती आहे, त्याचा प्रताप मला दाखव.'

तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' तू शंकराच्या हातामध्ये राहून कोणती कामे केलीस ते दाखव. मला तर आता तुझी शक्ती पाहायची आहे.'

अशा तऱ्हेने ती दोघेही इरेला पेटली. मच्छिंद्रनाथाचे बोलणे ऐकून भद्रकाली सिंहासारखी आरोळी मारून आकाशात प्रकट झाली आणि विजेच्या कडकडाटाप्रमाणे भयंकर आवाज ऐकू आला,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

'जोगाड्या, आता आपला प्राण वाचव. आपल्या गुरूचे स्मरण क
अरे, ही कालिका आज पृथ्वी नष्ट करण्यास निघाली आहे, आता तु
निभाव कसा लागेल ते बघ.'

अशा तऱ्हेची बरीच भाषा ऐकून घेतल्यावर मच्छिंद्रना तिला म्हणाला, 'तू नुसती बडबड करू नको. तू दंश केला तर तु मी मारीन.' असे म्हणून त्याने भस्म हातात घेतले व वासवशक्त मंत्र जपून ते आकाशात फेकले.

त्याबरोबर देदीप्यमान वासवशक्ती तत्काळ प्रकट झाल सूर्याच्या हातचे वासवास्त्र आणि शिवाच्या हातचे कालिका एकमेकांवर प्रहार करीत होते. कालिकेने वासवशक्तीचा पाडाव के आणि मोठ्या आवेशाने ती मच्छिंद्रनाथावर चालून आली. नाथाच्या लक्षात येताच त्याने पुन्हा भस्म घेऊन एकादश रुद्रमंत्र करून फेकताच रुद्र प्रकट झाले. ते भयंकर रुद्र पाहाताच कालिके तेज फिके पडले. ताबडतोब तिने त्याची स्तुती केली. त्यामुळे ते सौम्य झाले. हे पाहताच मच्छिंद्रनाथाने वज्रास्त्र व धूम्रास्त्र ही अ सोडली, परंतु त्यांचा काही प्रभाव पडेना. कारण कालिकेने धूम्र गिळून टाकले व वज्रास्त्र शैल पर्वतावर आपटले; यामुळे तो फुटून गेला. याची साक्ष आजतागायत हिंदुस्थानात आहे. दो अस्त्रांचा पाडाव झालेला पाहून मच्छिंद्रनाथाने वाताकर्षणाची यो केली. त्या वातास्त्राचे इंगित त्याला साधले होते. दत्तात्रेया कृपाप्रसादाने मच्छिंद्रनाथास वाताकर्षणास्त्राचा लाभ झाला हो त्या अस्त्राचे सहाय्य घेऊन त्याने कालिकादेवीवर प्रहार के त्याबरोबर तिच्या देहाचे चलनवलन थांबले आणि देवी विकल झा ती आकाशातून जमिनीवर आदळली आणि बेशुद्ध झाली. हा प्रकार पाहून देवदानवांनासुद्धा मोठे आश्चर्य वाटले.

कालिकेचे प्राण जाऊ लागले तेव्हा तिने शंकराचा धावा के

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तो ऐकताच शंकरांनी हा सर्व खेळ मच्छिंद्रनाथाचा आहे हे ओळखले. लगेच नंदीवर बसून ते त्या ठिकाणी आले. शंकराला पाहून मच्छिंद्रनाथाने त्यांच्या पायावर डोके ठेवले. मग शंकराने त्याला पोटाशी धरून कडकडून मिठी मारली व प्रताप दाखवून अस्त्र जिंकल्याबद्दल त्याची प्रशंसा केली, तेव्हा नाथाने शंकरास सांगितले, 'बद्रिकाश्रमास तुम्ही प्रसन्न होऊन दत्तात्रेयाकडून मला मंत्र व अस्त्रविद्या वगैरे सर्व शिकविले, त्याच कृपेचा हा प्रताप आहे.'

यावर शंकर म्हणाले, ' सध्या ते राहू दे. तू आधी कालिकादेवीला सावध कर.'

नाथ म्हणाले, ' तुम्ही आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवा.' ते ऐकून ' तुझी इच्छा काय आहे ?' असे शंकरांनी त्याला विचारले. त्यावर तो म्हणाला, ' जशी शुक्राचार्यांनी संजीवनी विद्या कचाला दिली, त्याचप्रमाणे साबरी विद्येचे तुम्ही माझ्याकडून कवित्व करविलेत. तसा वर देऊन मला कालिकास्त्र द्यावे. तुमच्या हाती राहून कालिकेने जशी कामे केली, तशीच तिने माझ्या हातात राहून करावी व पुढेही मंत्रकार्यात तिने मला उपयोगी पडावे, असा जर मला आपण वर द्याल तर मी नित्य समाधानी वृत्तीने राहीन.'

मच्छिंद्रनाथाचे हे मागणे ऐकून शंकर म्हणाले, ' तू प्रथम कालिकेस उठव. तिला मी सर्वस्वी तुझ्या स्वाधीन करतो आणि मीही तुला सर्व प्रकारे मदत करीन अशी शपथ घेतो.'

मच्छिंद्रनाथ शंकराच्या पाया पडला. वातास्त्र मंत्र म्हणून भस्म फेकून वाताकर्षण अस्त्र काढून घेतले. त्यामुळे देवी सावध होऊन उठून बसली व चोहीकडे पाहू लागली. तो शंकरांना तिने पाहिले. मग चटकन उठून ती त्यांच्या पाया पडली व तुम्ही मला जीवदान दिले असे म्हणून तिने त्यांची स्तुती केली.

मग शंकर तिला म्हणाला, ' माझे एक तुझ्यापाशी मागणे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहे, तेवढे तू मला दे म्हणजे मी तुला एक नागरत्न देईन.'

देवीने शंकराला त्याचा हेतू विचारला. तेव्हा शंकर म्हणाले ' माझ्या हातात तू बरेच दिवस राहिलीस, पण आता तू जगाच्या कल्याणासाठी मच्छिंद्रनाथाला सहाय्य करावे, एवढे माझे मागणे आहे.'

शंकराचे हे बोलणे ऐकून तिला हसू आले. ती म्हणाली ' मी तुमच्या पायाची दासी आहे. तुमची ही आर्जवाची भाषा कशासाठी ? मला तुमची आज्ञा मान्य आहे. जिकडे पाठवाल तिकडे मी जाईन.'

मग तिने मच्छिंद्रनाथाला बोलावले. तो येताच देवीने प्रेमभराने त्याला आलिंगन दिले व तुला सहाय्य करीन, असे वचन देऊन त्याचे समाधान केले.

मच्छिंद्रनाथ व शंकर यांना देवीने तेथे तीन रात्री ठेवून घेतले.चौथ्या दिवशी देवीला विचारून शंकर कैलासाला व मच्छिंद्रनाथ गदातीर्थाला हरेश्वरला गेले.

✽✽

अध्याय ७ वा

(वीरभद्राची कथा)

मच्छिंद्रनाथ हरेश्वरला गेल्यावर तेथे त्याने गदातीर्थावर स्नान केले. प्रदक्षिणा करू लागला. त्याच वेळी स्नानासाठी ति

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्रिशूळ, डमरू, धनुष्य वगैरे आयुधे घेऊन वीरभद्र आला होता. तेथे त्यांची व मच्छिंद्रनाथाची भेट झाली. उभयतांनी एकमेकांस नमस्कार केला. मग तुम्ही कोण, कुठले, पंथ कोणता अशी वीरभद्र विचारपूस करू लागला. तेव्हा वीरभद्राला मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' ह्या देहाला मच्छिंद्र म्हणतात. आमचा नाथपंथ आहे. शैली, कंथा व मुद्रा ही आमची भूषणे आहेत.'

हे ऐकून वीरभद्र म्हणाला, ' हे एक नवीन बंड माजवून, पाखंडी वृत्तीने जगात मिरविणे हे तुम्हाला योग्य नाही. ह्या मुद्रा टाकून दे. नाहीतर जागोजाग तुला याबद्दल पुष्कळ शिक्षा भोगाव्या लागतील. वेदविधीने ठरवून दिलेल्या धर्माविरुद्ध असलेला हा निराळा पंथ काढणारा तुझा गुरू तरी कोण ?'

वीरभद्राचे हे भलतेच बोलणे ऐकून, मच्छिंद्रनाथ रागाच्या भरात वीरभद्रास म्हणाला, ' अरे अधमा, तुझ्या दर्शनाने मला पुन्हा स्नान करायला पाहिजे. आता उगीच आपल्या कामाला जा; नाही तर मी तुला शिक्षा करीन.'

मच्छिंद्रनाथाचे बोलणे ऐकून वीरभद्रास राग आला. तो म्हणाला, ' अरे मूर्खा, आता मीच तुझा प्राण घेतो पाहा.' असे म्हणून त्याने धनुष्यासह अर्धचंद्र-निर्वाण बाण भात्यातून काढला.

तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' अरे पतिता! उन्मत्तपणे वागून तू लोकांत आपले अहित करून घेत आहेस. अरे, धनुष्यबाण, काढून मला ढोंग कशाला करून दाखवितोस ? मात्र यामुळे तुझेच मरण ओढवेल. अरे, अशा तऱ्हेची बहुरूप्याची ढोंगे करणारे पुष्कळ लोक येऊन गेले. तुझी ही सोंगे माझ्यासमोर क्षणभरसुद्धा टिका-धरू शकणार नाहीत.अरे, शेळीच्या गळ्यातील स्तनातून दूध निघते काय? आता तुझे आयुष्य संपले म्हणूनच तू येथे आलास असे मला वाटते.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अशा तऱ्हेने उभयतांची बरीच बोलचाली झाली. नंतर वीरभद्राने धनुष्यास बाण लावून मच्छिंद्रनाथाला रामाचे स्मरण करावयास सांगितले. ते ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' राममंत्र तुला अपवित्र वाटला; पण पक्के ध्यानात ठेव की,त्याच मंत्राने शंकर दु:खापासून मुक्त झाले व सुखी झाले. या मंत्राने वाल्या (वाल्मीकी) तरला. तोच मंत्र मला पण तारील; आता तू सावध रहा !'

असे म्हणून त्याने झोळीतून भस्म घेतले व वज्रास्त्र सिद्ध करून फेकले, त्यामुळे वीरभद्राने सोडलेला बाण मच्छिंद्रनाथाला गवताच्या काडीसारखा वाटला. तो बाण मच्छिंद्रनाथाचा प्राण घेण्यास येत होता, पण भस्माच्या जोराने तो आकाशातच फिरू लागला आणि मच्छिंद्रनाथाच्या वज्रशक्तीने त्या बाणाचे पीठ झाले. यानंतर वीरभद्राने दुसरा बाण काढून नागास्त्राची योजन करून तोही पाठोपाठ सोडला. नागास्त्रामुळे पृथ्वीवर प्रलय ओढवणार असे वाटले, पण ते पाहून मच्छिंद्रनाथानेही आपल्या संरक्षणासाठी रुद्रास्त्र व गरुडास्त्र योजले. त्यामुळे वीरभद्राची शक्ती क्षीण झाली. अशा प्रकारे त्यांची झटापट चालू असता प्रतापी वीरभद्राने वातास्त्र सोडले. हे पाहून मच्छिंद्रनाथाने पर्वतास्त्र योजले. नंतर वीरभद्राने अग्न्यस्त्र सोडले, तर मच्छिंद्राने जलादास्त्र सोडले. अखेर ब्रह्मा, विष्णू, महेश यांनी युद्धाच्या ठिकाणी येऊन मच्छिंद्रनाथाला शांत केले व वीरभद्राला जवळ बोलावून त्याची मच्छिंद्रनाथाशी मैत्री करून दिली व हा नाथ कवीनारायणाचा अवतार आहे असे सांगितले.

हे ऐकून तोही त्याला वर देण्यास तयार झाला. म्हणाला, ' आजपर्यंत मोठामोठे बलवान असे असंख्य वीर जेरीस आणले आहेत,पण मच्छिंद्रनाथासारखा वीर मला आढळला नाही, त्याचे गुरुजी धन्य होत.'

असे बोलून त्याने मच्छिंद्रनाथास आलिंगन दिले व त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

काय इच्छा आहे, म्हणून विचारले. तेव्हा मच्छिंद्रनाथाने सांगितले, ' मी साबरी विद्या साध्य केली आहे, त्यासाठी तुझे सहाय्य असावे.'

मच्छिंद्रनाथाचे मागणे ऐकून वीरभद्राने मंत्राबरहुकूम कामे करण्याचे वचन दिले. मग सर्व देवांनीही मच्छिंद्रनाथाला सहाय्य करावयाचे कबूल केले. नंतर मच्छिंद्रनाथाने सर्व देवांना नमस्कार केला. तो विष्णूच्या पाया पडला तेव्हा विष्णूने मच्छिंद्रनाथास पोटाशी धरले व सांगितले, ' तुझ्या विद्येस माझे पूर्ण सहाय्य आहे. संकटकाळी माझे स्मरण करताच मी त्या ठिकाणी दृश्य स्वरूपात प्रकट होऊन तुझ्या संकटाचे निवारण करीन.' असे बोलून त्याने त्यास चक्रास्त्र दिले.

नंतर शिवाने प्रसन्न होऊन त्रिशूलास्त्र, ब्रह्मदेवाने शापास्त्र व इंद्राने वज्रास्त्र दिले. कुबेराने सिद्धिमंत्र दिला. वरुणाने वरुणास्त्र दिले. अशा प्रकारे मच्छिंद्रनाथाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर सर्व देवांना प्रसन्न करून घेतले व त्यांच्याकडून एक-एक वर मिळविला. मग आपापल्या विमानात बसून ते सर्व स्वस्थानास जावयास निघाले, तेव्हा मच्छिंद्रनाथाने देवांची प्रार्थना केली, ' मणिकर्णिकेचे स्नान करावे अशी माझी इच्छा आहे. तेवढी मनीषा पूर्ण करावी.'

मच्छिंद्रनाथाची ही इच्छा सर्वांनी कबूल केली. मग लक्ष्मीकांताने त्याला आपल्या विमानातून वैकुंठास नेले व आपल्या आसनावर बसविले. त्याचे जेवण, झोप, उठणे, बसणे वगैरे सर्व गोष्टी विष्णूबरोबर वैकुंठात होत होत्या. वैकुंठात असताना मच्छिंद्रनाथ नेहमी मणिकर्णिकेचे स्नान करीत असे.

एकदा त्याने पूर्वजन्मी मेरुपर्वतावर घेतलेली समाधी बघण्याची त्याला इच्छा झाली. ही इच्छा त्याने विष्णूजवळ बोलून दाखविली. त्याच्या इच्छेनुरूप विष्णू त्याला तेथे घेऊन गेले. वासुदेवाची, ह्या नवनारायणांच्या समाध्या त्याला दाखविल्या. त्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पाहून त्याला आनंद झाला.

मच्छिंद्रनाथ वैकुंठाला एक वर्षभर राहिला. तेथून शंकर त्याला कैलासावर घेऊन गेले. तेथेही तो एक वर्षभर राहिला. शिवाने तिथे त्याचा स्नेह वाढविला. मग मोठ्या सन्मानाने इंद्र त्याला अमरावतीस घेऊन गेला. तेथे तो तीन महिने राहिला.

नंतर ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून नारद त्याला सत्यलोकास घेऊन गेला. तेथे त्याने सहा महिने वास्तव्य केले. पुढे सर्व देवांनी त्याला आपल्याकडे एक-एक दिवस आग्रहाने ठेवून घेतले. अशा प्रकारे एकंदर सात वर्षे मच्छिंद्रनाथाने स्वर्गात राहून पाहुणचार घेतला. नंतर सर्वांची आज्ञा घेऊन तो मृत्युलोकी यायला निघाला. तेव्हा सर्व देवांनी त्याला अत्यंत आदराने, सन्मानाने विमानात बसवून मृत्युलोकी आणून सोडले. नंतर मच्छिंद्रनाथ पुन्हा तीर्थाटनाला निघाला.

मच्छिंद्रनाथ फिरत फिरत केकडा देशातील वज्रवनात गेला. तेथे वज्रभगवतीचे स्थान आहे. तेथे त्याने तीनशेसाठ गरम पाण्याची कुंडे पाहिली. ती पाहून त्याला फार आश्चर्य वाटले. तेथल्या सर्व तीर्थांत स्नान करून तो अंबिकेच्या देवळात गेला व पुजाऱ्यास बोलावून कुंडांबद्दल विचारू लागला. तेव्हा पुजाऱ्याने सांगितले, ' पूर्वी या ठिकाणी वशिष्ठ मुनींनी यज्ञ केला होता. त्या प्रसंगी सर्व देव येथे आले होते. त्यांनी स्नानाकरता गरम पाण्याची कुंडे निर्माण केली व स्नान करून कुंडाला आपापली नावे दिली व ते सर्व देव बारा वर्षे बारा दिवस येथे राहिले होते. यज्ञ संपल्यावर देव स्वस्थानी परत गेले पण त्यांनी निर्माण केलेली ही कुंडे मात्र ठिकठिकाणी आहेत.'

कुंडांबद्दलची ही हकीकत ऐकून आपणही एक कुंड निर्माण करावे असा मच्छिंद्रनाथाने विचार केला आणि लगेच त्याने त्रिशूळाच्या सहाय्याने एक कुंड खणून तयार केले व वरुणमंत्र जपून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भोगावतीचे पाणी निर्माण केले. त्यानंतर अग्निमंत्र जपताच अग्नीने त्या पाण्यात प्रवेश केला व त्या योगाने कुंडातील पाणी गरम झाले. नंतर आपण निर्माण केलेल्या त्या भोगवतीच्या कुंडात मच्छिंद्रनाथाने स्नान केले व तो वज्रदेवीच्या देवळात गेला. नंतर त्याने देवीला त्या कुंडातील गरम पाण्याने स्नान घातले. वज्रदेवीने त्याला शाबासकी दिली व एक महिना आपल्याजवळ ठेवून घेतले. नंतर मच्छिंद्रनाथाने तिला विचारले, ' तुला वज्राबाई का म्हणतात ?' मच्छिंद्रनाथाच्या या प्रश्नावर देवी म्हणाली, ' वशिष्ठाच्या यज्ञात हवनाच्या वेळी इंद्र आला होता, पण सभेत जे ऋषि बसले होते, त्यांच्याकडून त्याला मान मिळाला नाही म्हणून तो चिडला व त्याने वज्राची प्रेरणा केली, हे पाहून श्रीरामचंद्राने ' शक्ती ' मंत्राने दर्भ मंत्रून सोडला. त्यात मी प्रकट होऊन वज्र गिळून टाकले. मग इंद्राने आपले वज्र मिळविण्यासाठी रामाची प्रार्थना केली. तेव्हा रामाने इंद्राला वज्र परत दिले. त्याच वेळेस देवांनी व ऋषींनी मला ' वज्राबाई ' हे नाव दिले. यज्ञ समाप्त झाल्यावर, सर्व देव स्नानास गेले. त्यानंतर रामाने माझी येथे स्थापना केली. त्याने माझी स्थापना करतेवेळी मला भोगावतीचे स्नान घातले. माझी प्राणप्रतिष्ठा केली. ते भोगावतीचे जल पुन्हा आज मला मिळाले, पण श्रीरामांपेक्षा तू एक गोष्ट विशेष केलीस. ती म्हणजे, त्यांनी मला थंड पाण्याने स्नान घातले, पण तू मात्र गरम पाण्याची भोगावती येथे क़ायम ठेवलीस.'

मच्छिंद्रनाथ महिनाभर राहिला व नंतर देवीचा निरोप घेऊन पुढे गेला.

❄ ❄ ❄

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ८ वा

(श्रीरामचंद्राचे दर्शन, सूर्याबरोबर युद्ध)

मच्छिंद्रनाथ यात्रा करीत द्वारकेला गेला. तेथे गोमती नदीव स्नान करून कृष्णाचे दर्शन घेतले व तेथून तो अयोध्येस आला. तें शरयू नदीचे स्नान करून रामचंद्राचे दर्शन घेण्यासाठी देवळा निघाला. त्यावेळी अयोध्येमध्ये पाशुपत नावाचा राजा राज्य करी होता. तो श्रीरामचंद्राचा वंशज होता. तो आपल्या सैन्यास श्रीरामचंद्राचे दर्शन घेण्यास देवळात आला होता. राजा देवळा पूजेला गेला असता देवळाभोवती पाऊल ठेवायलाही जागा नव्हत एवढी गर्दी होती.

परंतु त्या गर्दीतूनही मच्छिंद्रनाथाची स्वारी श्रीरामचंद्रा दर्शन घेण्यासाठी पुढे घुसली, पण तो जेमतेम देवळाच्या प्रवेशद्वारापाशी पोहोचला नसेल तो द्वारपालांनी त्याला अडवले द्वारपाल मच्छिंद्रनाथाशी उद्धटपणाने बोलू लागले. त्यांनी त्या मतिमंदा, मूर्खा इ. शब्दांनी बोलून त्याची मर्यादा ठेवली नाही शेवटी हात धरून मच्छिंद्रनाथाला त्यांनी मागे लोटले. हा झालेल अपमान पाहून मच्छिंद्रनाथास अतिशय संताप आला होता, पण त्याने संयमाने आवरला. सेवकांबरोबर भांडण करणे योग्य नाही विचाराने तो गप्प बसला. राजालाच शिक्षा करण्याचा विचार त्या मनात आला. त्याप्रमाणे मच्छिंद्रनाथाने स्पर्शास्त्र मंत्र म्हटला आ रामाचे नाव घेऊन भस्म मंत्रून ठेवले. राजाने देवाची पूजा करून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जोडून साष्टांग नमस्कार घातला. तेव्हा राजाचे कपाळ भूमीवर टेकले आहे अशी संधी पाहून मच्छिंद्राने स्पर्शास्त्राने मंतरलेले भस्म राजावर फेकले. त्यामुळे राजाला जमिनीवरून उठता येईना. तो जमिनीलाच चिकटून राहिला ! पुष्कळ प्रयत्न केले पण ते सर्व वाया गेले. मग राजाने प्रधानास बोलावून हा प्रकार सांगितला. मंत्रीं मोठा हुषार होता. तो लगेच बाहेर आला व कोणाचा तंटाबखेडा झाला आहे की काय याची चौकशी केली, तो मनात म्हणाला की, नगरात कोणी यती आला असावा आणि राजदूतांनी त्याचा छळ केला असावा, म्हणूनच हा प्रसंग घडला.

देवळाच्या दाराशी येताच त्याला सर्व माहिती मिळाली. त्याने नाथास शोधून काढले व तो त्याच्या पाया पडला आणि हात जोडून म्हणाला, ' आता स्वामींनी कृपादान करावे. तुम्ही संत आहात, शांतिभांडार आहात. तुमच्या उदारपणाला तर सीमाच नाही; म्हणून आपण क्षमा करावी.'

प्रधानाच्या प्रार्थनेने मच्छिंद्रनाथाचा राग शांत होऊन त्याला संतोष वाटला. विभक्तमंत्र म्हणून ते भस्म फुंकताच राजा जमिनीवर उठून बसला.

राजा मुक्त झाल्याचे कळताच प्रधानाने मच्छिंद्रनाथाचा हात धरून त्याला देवळात नेले व राजाला घडलेली सर्व घटना सांगितली. हा वृत्तांत ऐकून राजा त्याच्या पाया पडला व त्याचे नाव विचारू लागला. ' मला मच्छिंद्र म्हणतात ' असे नाथाने राजाला सांगितले. मच्छिंद्रनाथाची कीर्ती राजाला आधीच माहीत होती. त्याचेच आज दर्शन होत आहे हे पाहून राजाला फार आनंद झाला.

राजाने त्याचा हात धरून त्याला आपल्या सभास्थानी नेले व मोठ्या सन्मानाने सुवर्णाच्या सिंहासनावर बसवून त्याची षोडशोपचारांनी पूजा केली. स्वतः त्याच्या सेवेसाठी हात जोडून उभा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राहिला. त्याच्या सेवेशिवाय राजाला काही सुचत नव्हते. राजा
ही निष्ठा पाहून मच्छिंद्रनाथास फार समाधान वाटले. मग प्रस
होऊन त्याने राजाला त्याचा हेतू विचारला तेव्हा राजा म्हणाल
' मी सूर्यवंशी श्रीरामचंद्रांच्या घराण्यातला आहे. माझे नाव पाशुप
माझे एकच मागणे आहे की, सूर्यकुळात उत्पन्न झालेला जो श्रीरा
त्याची मला प्रत्यक्ष भेट घडवा.'

ते ऐकून रामाची व तुझी भेट आत्ताच करून देतो, असे म्हण
राजाला घेऊन मच्छिंद्रनाथ सभेच्या बाहेर राजांगणात येऊन उ
राहिला. नंतर त्याने धूम्रास्त्र मंत्र म्हणून ते भस्म सूर्यावर टाक
त्यामुळे सर्व आकाश धुराने भरून गेले. सूर्य झाकून गेला. धुरामु
त्याचा सारथी अरुण डोळे पुसू लागला. त्याच्या तोंडात धूर गेल्या
तो कासावीस होऊ लागला.

हे पाहून क्षत्रिय कुळातील कोणीतरी राजाने ही धूम्रास्त्र वि
सोडली आहे असे सूर्याने जाणले. मग त्याने वायुअस्त्राची योज
बाणावर करून तो बाण सोडला. त्यामुळे जोरदार वारा सुटला
धूर दूर झाला. नंतर मच्छिंद्रनाथाने पर्वतास्त्राची योजना केली
त्यामुळे सूर्याचा रथच अडला; त्याक्षणीच सूर्याने वज्रास्त्र सोडले
त्यामुळे पर्वतास्त्रापासून निर्माण झालेल्या सर्व पर्वतांचा चूर झाला

सूर्याची ही युक्ती पाहून मच्छिंद्रनाथाने भ्रमास्त्राची योज
केली. तेव्हा घोड्यासकट अरुण भ्रमिष्ट झाला व वाट सोडून र
भलतीकडे जाऊ लागला. हे पाहून सूर्याने ज्ञानास्त्र सोडले. अग्नीव
पाणी टाकल्यावर तो जसा नष्ट होतो किंवा शिष्याचे अज्ञान सद्गु
जसे नाहीसे करतो त्याप्रमाणे ज्ञानास्त्राने भ्रमाचे निरसन केले
त्यानंतर मच्छिंद्रनाथाने वाताकर्षण अस्त्र सोडले. त्याबरोबर सूर्यास
सारथी, घोडे यांचा श्वासोच्छ्वास बंद झाला व रथ जमिनीवर उलट
आदळला. त्यामुळे सूर्यही रथाखाली पडला. सूर्याच्या तेजाने पृ

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जळून जाऊ लागली. तेव्हा मच्छिंद्रनाथाने उदकास्त्राची योजना केली. त्यामुळे अतिशय जलवृष्टी होऊन पृथ्वीचा दाह शांत झाला, परंतु सूर्य खाली पडून निश्चेष्ट झाल्याने देव घाबरून गेले.

ब्रह्मदेव, विष्णू, शिव, वरुण, अश्विनी, कुबेर, गंधर्व वगैरे सर्व देव ताबडतोब मच्छिंद्रनाथाजवळ धावत आले. एका सूर्यासाठी हे सर्व देव पृथ्वीवर मच्छिंद्रनाथाजवळ गेले व सूर्याकडून कोणता अपराध झाला आहे, म्हणून त्यांनी विचारले, तेव्हा मच्छिंद्रनाथाने सर्वांना नमस्कार केला व विष्णूला उत्तर दिले, ' हा पाशुपत राजा सूर्यकुळातला असूनही सूर्य त्याची बिलकुल विचारपूस करीत नाही व त्याच्याकडे ढुंकूनही पहात नाही. पाशुपत राजा सूर्याला आवडत नाही म्हणून त्याला वळणावर आणण्यासाठी मी असे केले. असे करण्यात आणखी दुसराही हेतू आहे. माझ्या ' साबरी ' मंत्रविद्येला सूर्याचे सहाय्य मिळावे व ज्याने सूर्यवंशात अवतरून विजयध्वज लावला त्या श्रीरामचंद्राची या पाशुपत राजाला भेट व्हावी. कारण त्या राजाचा माझ्यावर पूर्ण लोभ आहे. यासाठी हे चक्रपाणी, माझे हे हेतू पूर्ण करावे. '

हे ऐकून विष्णूने सांगितले, कल्पद्रुमाप्रमाणे सर्व गोष्टी घडून येतील,परंतु प्रथम सूर्याला सावध कर. तो तुझ्या मंत्राला सर्व प्रकारे अनुकूल होईल व जेथे त्याचे नाव निघेल तेथे तो स्वत: येऊन तुझे कार्य पार पाडून देईल. सूर्याचे सहज नाव घेतले तरी पातक भस्म होते. मग ते मंत्रयोगाच्या जोडीने घेतले तर फारच उत्तम फल प्राप्त होईल. आम्ही सर्व देव तुझ्या कार्यासाठी उतरलो आहोत, याचे आम्ही वचन देतो, पण आता उशीर न करता याला लवकर सावध कर. वीरभद्राच्या युद्धप्रसंगी आम्ही तुझ्या म्हणण्याप्रमाणे वागण्याचे कबूल केले आहे व नागपत्र अश्वत्थाच्या ठिकाणी तुला वरदाने दिली आहेत. असे असताना तुला अजून आमच्याविषयी संशय का वाटतो ?

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे बोलून सर्व देवांनी सूर्याला दुःखापासून मुक्त करण्यासाठी मच्छिंद्रनाथाला खूप भीड घातली. मच्छिंद्रनाथाने सांगितले. ' पाशुपत राजाला श्रीरामाचे दर्शन घडल्याशिवाय माझ्या मनाला समाधान मिळणार नाही.'

हे ऐकताच श्रीरामचंद्र प्रकट झाले. तेव्हा राजाला अत्यंत आनंद झाला. नंतर मच्छिंद्रनाथ पाशुपत राजासह रामाच्या पाया पडला. रामाने त्याला कडकडून मिठी मारली. त्याच वेळी मच्छिंद्राने रामाची प्रार्थना केली, ' तुझे नाम श्रेष्ठ होय. साबरी विद्येच्या मंत्रयोगामध्ये तुझे नाव येईल तेव्हा तू तेथे हजर राहून ते कार्य सिद्धीस न्यावेस याबद्दल तू मला वचन दे. नाही तर युद्धाला तयार हो.'

हे ऐकून रामाने सांगितले, ' तुला तिन्ही देवांचा वर आहे. तिन्ही देवांचा अवतार असलेला दत्तात्रेय, त्याचा पूर्ण वरदहस्त तुझ्या मस्तकावर आहे. शिवाय पूर्णब्रह्म नरसिंहावतार, तोही तुला वश आहे. मग मी तुला का मदत करणार नाही ? तुला मी सर्वस्वी सहाय्य करीन. मंत्रात माझे नाव निघताच मी ते कार्य करीन.'

असे रामाने त्याच वचन दिले. त्याने पुढे असेही सांगितले की आपण ' दोघेही एकच आहोत.'

असे सांगून सूर्याला उठविण्यासाठी रामाने मच्छिंद्रनाथाला विनवले. त्यामुळे मच्छिंद्रनाथालाही मोठा आनंद झाला. मग मच्छिंद्रनाथाने वातास्त्र जपून मंतरलेले भस्म टाकताच सूर्य सावध झाला व त्याने सर्व देवांना जवळ बोलावले. सर्व देवांनी त्याला नमस्कार केला. नंतर हा कोणत्या वीराचा प्रताप म्हणून सूर्याने विष्णूस विचारले व मला हात दाखविणाऱ्या प्रतापी वीरास एकदा मला दाखवा म्हणून सांगितले.

सूर्यास भेटण्यासाठी देवांनी मच्छिंद्रनाथाला बोलावले. मग सूर्यापासून दाह न व्हावा म्हणून शीतल चंद्रास्त्र मंत्रून नाथ त्याच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भेटायला गेला. नमस्कार केल्यानंतर सूर्याने त्याला त्याची माहिती विचारली असता विष्णूनेच प्रारंभापासूनची सर्व हकीकत सांगितली. तेव्हा सूर्याने मच्छिंद्रनाथास साबरी विद्येस सहाय्य असल्याबद्दलचे वचन दिले. मग पाशुपत राजास त्याच्या पायावर घातले. आपला वंशज पाहून सूर्याला आनंद वाटला. मग त्याचे समाधान करून सूर्यासह सर्व देव स्वस्थानी गेले. मच्छिंद्रनाथानेही राजाचा निरोप घेतला व रामाचे दर्शन घेऊन तो पुढे तीर्थयात्रेस गेला.

❄ ❄ ❄

अध्याय ९ वा

(गोरक्षनाथाची जन्मथा)

अयोध्येहून मच्छिंद्रनाथ निघाल्यानंतर मथुरा, अवंती, काशी, काश्मीर, प्रयाग, गया इ. तीर्थे करीत करीत बंगालमध्ये गेला. तेथे चंद्रगिरी गावात उतरल्यावर भिक्षेला निघाला असताना, त्याला एका ब्राह्मणाचे घर दिसले. ते पाहताच त्याला भस्माचे स्मरण झाले. तो मनात विचार करू लागला की, मागे मी पुत्रासाठीच भस्म मंत्रून दिले होते ते हेच घर. त्या बाईचे नाव सरस्वती होते. तिला मी बारा वर्षांनी परत येईन म्हणून सांगितले होते. तिचा मुलगा कसा आहे तो पहावा, असा विचार मनात येऊन तो त्या घराजवळ गेला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अंगणात उभे राहून त्याने तिच्या नावाने हाक मारली. हा ऐकून ती बाहेर आली व योगी पाहून भिक्षा आणून घालू लागली. तेव्हा खूण पटण्यासाठी त्याने तिला तिचे व तिच्या नवऱ्याचे ना वगैरे विचारले. ती म्हणाली, ' माझे नाव सरस्वती आहे. नवऱ्या नाव दयाळपती. आम्ही गौड जातीचे ब्राह्मण आहोत.'

तिने सांगितलेली माहिती ऐकून त्याला ओळख पटली. म मुलगा कोठे आहे, म्हणून त्याने तिला विचारले. तेव्हा ती म्हणाली ' मला अजूनपर्यंत मुलगा झाला नाही.'

हे ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' तू खोटे का बोलतेस ? तु पुत्र होण्यासाठी मी विभूती मंत्रून दिली होती; ते भस्म नसू पुत्रप्राप्तीची संजीवनी होती. तो तेज:पुंज, न्यूनरहित मुल असलाच पाहिजे.'

मच्छिंद्रनाथाचे बोलणे ऐकून ती घाबरली व आपण विभूती उकिरड्यावर टाकली म्हणून ती भेदरून गेली. ' आता कानफाट्या मला शाप देईल. आत मी काय करू ? ह्याने तर म ओळखले आहेच.' असे विचार मनात येऊन ती भांबावून गेली. एकंदर विचार करून तिने त्याच्या पायावर मस्तक ठेवले आणि त्या सकल वृत्तांत सांगितला, ' योगीराज, माझा विश्वास नव्हता म्हणू तुम्ही दिलेला प्रसाद मी उकिरड्यावर टाकून दिला. माझ्य अपराधाबद्दल मला क्षमा करा.'

हे ऐकून मच्छिंद्रनाथ फार खिन्न झाला. स्त्रिया आप बुडतात आणि बेचाळीस कुळालाही बुडवितात, अशा प्रकारचे अने विचार त्याच्या मनात आले. ह्या बाईच्या नादी लागल्यामुळे आज प्रसंग आला. त्यावेळी आपला मूर्खपणा झाला असे त्याला वाटले पुत्रप्राप्तीसाठी सूर्याच्या वीर्याने मंत्रून दिलेले भस्म वाया गेले या त्याला रुखरुख लागली. ते भस्म फुकट न जाता देह झालाच माहि

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे वाटून ते भस्म कोठे टाकले त्याचा तपास करावा म्हणजे त्याची काय अवस्था झाली आहे ते कळेल, हा विचार मनात आणून तो म्हणाला, ' माते, व्हायचे ते दैवयोगाने घडून गेले. तुझ्यावर जरी मी आता रागावलो तरी माझ्या पदरात काय पडणार आहे ? आता जेथे ते भस्म टाकले होतेस ती जागा मला दाखव म्हणजे झाले.'

मच्छिंद्रनाथाने असे म्हटल्यावर तिची भीती नाहीशी झाली. मग जेथे भस्म टाकले होते, तो मोठा उकिरडा त्यास दाखवून येथेच भस्म टाकले असे ती म्हणाली. तिथे त्याने हाक मारली, ' हे प्रतापवंता हरिनारायणा सूर्यसुता, तू जर राखेत असलास तर लवकर बाहेर ये. तुझा जन्म येथे झाला व आज बारा वर्षे तू ह्यात राहिलास म्हणून तुझे नाव गोरक्ष असे ठेवले आहे. तेव्हा हे गोरक्षा, तू आता वेळ न घालवता बाहेर ये.'

त्याचे शब्द ऐकताच उकिरड्यातून शब्द आले, ' गुरुराया, मी गोरक्ष आत आहे. राखेचा मोठा ढीग असल्यामुळे मला बाहेर येता येत नाही. म्हणून ही राख एका बाजूला करून आपण मला बाहेर काढावे.'

नंतर मच्छिंद्राने राखेचा ढीग बाजूला सारून बालतनु गोरक्षाला बाहेर काढले. तो तेजःपुंज पुत्र बाहेर येताच बाल सूर्यासारखा प्रकाश पडला. त्याचे रूप मदनासारखे होते. त्याला पाहून सरस्वतीस फार पश्चात्ताप झाला. ती रडू लागली. असा पुत्र आपल्या हातून गेला, म्हणून तिला तळमळ लागली, तेव्हा मच्छिंद्रनाथ तिला म्हणाला, ' आता खेद करू नको. तो मुलगा तुझ्या नशिबातच नव्हता. मग तुला कसा प्राप्त होणार ? आता तू येथून जा, नाहीतर माझा कोप प्रत्यक्ष अग्नीप्रमाणे आहे. तो ब्रह्मादिकांनाही सहन होण्यास कठीण आहे. तेव्हा आता उगाच खेद न करता निघून जा.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाहीतर शाप मात्र मिळेल.'

मच्छिंद्रनाथाचे हे बोलणे ऐकून ती भयभीत झाली व न बोलता घरी गेली. मग गोरक्षनाथ गुरूच्या पाया पडला. त्याला मच्छिंद्रनाथाने प्रसन्न होऊन ॐकाराचा उपदेश केला व आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला. त्याला नाथदीक्षा दिली व तो त्याला घेऊन तीर्थयात्रेस निघाला.

मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथासह यात्रा करीत असता जगन्नाथाच्या वाटेवर कनकगिरी नावाचे एक गाव लागले. तेथे येताच तो भूक-तहानेने व्याकुळ झाल्यामुळे त्याने गोरक्षनाथास भिक्षेस पाठविले. तो घरोघर भिक्षा मागत असता एका ब्राह्मणाच्या घरी गेला. त्या दिवशी ब्राह्मणाच्या घरी त्याच्या वडिलांचे श्राद्ध होते. म्हणून तेथे चांगली चांगली पक्वान्ने केलेली होती. तेथे जाऊन गोरक्षनाथाने ' अलख ' असे म्हटले. ते ऐकून घरातील स्त्री बाहेर आली. त्याच्या त्या गंभीर, भव्य, तेजस्वी मुद्रेकडे पाहताच हा कोणीतरी पूर्वजन्मीचा भ्रष्ट योगी असावा, असा विचार तिच्या मनात आला. तिने त्या प्रसंगो त्याला स्वत: सर्व पदार्थ वाढलेले पान दिले. अनेक पक्वान्ने पाहून गोरक्षास समाधान वाटले व तिला आशीर्वाद देऊन तो निघून गेला.

पोटापुरते अन्न मिळाल्यावर घरोघर हिंडून काय करायचे, असे म्हणून तो परत फिरला व ती भिक्षा त्याने गुरूपुढे ठेवली. सुंदर पक्वान्नांनी भरलेले ताट पाहून गुरूला आनंद वाटला. मग तो जेवायला बसला. ते अन्न गोड लागल्यामुळे मच्छिंद्रनाथ मोठ्या आवडीने जेवला. त्यामुळे त्याचे पोट भरले, पण त्याची वड्यावर इच्छा राहिली. तेव्हा त्याने गोरक्षनाथाकडे पाहिले. गोरक्षाने काय इच्छा आहे ती सांगा, अशी विनंती केली. त्यावर तो म्हणाला,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वड्यावर माझे मन गेले आहे. तो जर आणखी एक असता तर इच्छा तृप्त झाली असती.'

गुरूने आपली इच्छा सांगताच मी आत्ता जाऊन वडे घेऊन येतो, असे म्हणून गोरक्षनाथ पुन्हा त्याच घरी गेला व गुरूसाठी त्या बाईजवळ आणखी वडे मागू लागला. तेव्हा ती म्हणाली, ' गुरूचे नाव कशाला घेतोस ? तुलाच पाहिजेत असे का म्हणत नाहीस ?'

हे ऐकून गोरक्षाने तिला सांगितले, ' खरोखरच मला नकोत. गुरूची इच्छा पूर्ण करण्यासाठीच मला वडे पाहिजे आहेत.'

तेव्हा ती म्हणाली, ' अरे, मी तुला भक्तिभावाने पुष्कळ पदार्थ घालून पान वाढून दिले होते, पण तू परत आलास ! असे उत्तम अन्न फुकट मिळत नाही.'

तिचे हे बोलणे ऐकून गोरक्षनाथ म्हणाला, ' वड्यासाठी काय लागते ते मी तुला देतो; पण गुरूची इच्छा पूर्ण करण्यासाठी मला वडे दे.'

त्याची ही गुरुभक्ती पाहून त्याची परीक्षा पाहण्यासाठी तिने त्याचा एक डोळा मागितला. तेव्हा गोरक्षनाथाने लगेच डोळ्यात बोट घालून आतले बुबुळ काढले व ते तिच्या हवाली करू लागला. तेव्हा त्याच्या डोळ्यातून रक्ताची धार वाहू लागली. ते पाहून ती लज्जित झाली. तिची छाती दडपून गेली. तिला आपल्या बोलण्याचा विपर्यास झाला असे वाटले. ती पाचसात वडे घेऊन बाहेर आली व ते त्याच्यापुढे ठेवून हात जोडून म्हणाली, ' महाराज ! मी सहज बोलले. माझ्या अन्यायाची मला क्षमा करा. दुसऱ्यासाठी तुम्ही साधूलोक अनेक प्रकारचे क्लेश आपल्या जीवास करून घेता याची मला कल्पना नव्हती.'

बाईचे हे बोलणे ऐकून गोरक्ष म्हणाला, ' तू वाईट वाटून घेऊ नकोस. वड्याच्या मोबदल्यात मी तुला डोळा दिला.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तेव्हा ती म्हणाली, ' माझ्यावर कृपा करून बुबुळासह अन्न घेऊन जा व मला क्षमा करा.'

मग गोरक्षनाथ तिची समजूत घालून बुबुळ व वडे घेऊन निघाला व गुरूकडे आला. डोळ्याची जखम दिसू नये म्हणून त्याने डोळ्यावर फडके बांधले होते. फडके बांधण्याचे कारण गुरूने विचारले. परंतु ते ऐकून त्यांना दुःख होऊन ते वडे खाणार नाहीत व त्यांची इच्छा तशीच राहून जाईल, या विचाराने त्याने कापड सहज बांधले म्हणून सांगितले. पण गुरूने डोळा पाहण्याचा हट्ट घेतला. तेव्हा गोरक्षनाथाने झालेला सर्व वृत्तांत सांगितला व अपराधाची क्षमा करण्याची विनंती केली. मग मच्छिंद्रनाथाने बुबुळ मागून घेऊन सूर्यमंत्र म्हटला व नाथांच्या डोळ्यात ते बसवून डोळा पूर्ववत् केला. त्याला मांडीवर बसवून त्याच्या तोंडावरून हात फिरविला. नंतर दोघांनी भोजन केले. तेथे महिनाभर राहून मच्छिंद्राने त्याला साबरी विद्या शिकविली आणि दत्तात्रेयाने दिलेल्या अस्त्रविद्येत निपुण केले.

***

अध्याय १० वा

(गहिनीनाथाचा जन्म व संगोपन)

कनकगिरी गावात मच्छिंद्रनाथाने गोरक्षास उपदेश केला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वेदशास्त्रांत पारंगत बनवले. चौदा विद्याही त्याला पढविल्या. सर्व शास्त्रांत प्रवीण केले. किमया शिकविली. साबरी विद्या शिकवली. रसायनविद्या शिकविली. पंचमहाकाव्ये सांगितली. सर्व देवांचा वरदहस्त मिळविला. नरशा, कालिका, म्हमदा, महिषासुर, झोटिंग, वेताळ, मारुती, श्रीराम वगैरे सर्वांची दर्शने करविली. जेव्हा रामाची भेट झाली, तेव्हा रामाने गोरक्षाला मांडीवर बसवले आणि कीर्ती मिळव, असा आशीर्वाद दिला. गणपती, सूर्य, अष्टभैरव, मातृका यांनीही मृत्युभूमीवर उतरून त्याला आशीर्वाद दिले.

बावन्न वीरांसह श्रीराम, सूर्य वगैरे सर्वांनी गोरक्षनाथास वरदाने दिली व त्याला तपास बसविण्याबद्दल मच्छिंद्रनाथाला सांगून ते सर्व आपापल्या स्थानी परत गेले.

एक दिवस गोरक्षनाथ संजीवनी मंत्र पठण करीत बसला होता. मच्छिंद्रनाथ जवळ नव्हता. तो एकटाच तेथे होता. त्यावेळी मुले खेळत त्याच्याजवळ आली. ती मुले चिखल खेळत होती. गोरक्षाला त्यांनी चिखलाची गाडी करायला सांगितली. परंतु त्याने आपल्याला गाडी करताच येत नाही, तुम्हीच करून घ्या, असे सांगितल्यावर ती मुले स्वत:च गाडी बनवू लागली. त्यांनी गाडी तयार केली. पुढे त्या गाडीवर बसण्यासाठी गाडीवान असावा, असा विचार त्या मुलांच्या मनात आला. त्याप्रमाणे ती चिखलाचा पुतळा करू लागली. परंतु काही केल्या ते जमेना, म्हणून ती मुले गोरक्षनाथाला पुतळा करून देण्याविषयी विनवू लागली. गोरक्षनाथाने त्यांची विनवणी कबूल केली व तो चिखल घेऊन पुतळा करावयास बसला.

गोरक्षनाथ जो चिखलाचा पुतळा करील त्यापासून गहिनीनाथ प्रकट व्हावयाचा, असा पूर्वसंकेत होता. त्यामुळेच गोरक्षाला पुतळा करून देण्याची बुद्धी झाली. नवनारायणांपैकी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करभंजन हा गहिनीनाथाचा अवतार घेऊन ह्या मातीच्या पुतळ्यापासून निर्माण व्हायचा होता, म्हणून गोरक्षास तशी बुद्धी झाली आणि त्याने पुतळा करण्यास घेतला. त्यावेळी त्याचा तोंडाने संजीवनी मंत्राचा पाठ चालूच होता.

पुतळा तयार झाल्यावर करभंजनाने त्यात प्रवेश केला तेव्हा अस्थी, त्वचा, मांस, रक्त वगैरे सर्व मिळून मनुष्याचा तेज:पुंज असा पुतळा बनला. मग तो रडू लागला. याच्या रडण्याचा आवाज मुलांनी ऐकला आणि गोरक्षनाथाने भूत आणले असा त्या मुलांनी ओरडा केला व लगेच सर्वजण घाबरून दूर पळून गेले. पुढे वाटेत मच्छिंद्रनाथ भेटताच त्याने त्या मुलांना विचारले, ' मुलांनो, तुम्ही एवढ्या जोराने का धावत आहात ? तुम्हाला घाबरावयाचे कारण काय ? तुम्ही अजिबात भिऊ नका. मला काय ते सांगा.'

मच्छिंद्रनाथाचे शब्द ऐकून मुलांनी त्याला पुतळ्याची सर्व हकीकत सांगितली. मुलांचे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथाला शंका आली व काय प्रकार आहे तो आपण स्वत: डोळ्यांनी पाहावा असा विचार मनात येऊन त्याने मुलांना सर्व खाणाखुणा विचारून घेतल्या.

मुलांनी मच्छिंद्रनाथाला दुरूनच ते ठिकाण दाखवले. तेथून एका मुलाचा टाहो त्याला ऐकू येऊ लागला. तेव्हा हा करभंजन नारायणाचा अवतार आहे हे मच्छिंद्रनाथाने जाणून त्या मुलाला उचलून घेतले व तो चालू लागला. गोरक्षनाथाने पुतळा केला होता परंतु तोही पळून गेला होता. मच्छिंद्र ज्या घरापुढे जाऊन गोरक्षाला हाक मारी त्या घरातली मुले घाबरून पळत असत. शेवटी गुरूची हाक ऐकून गोरक्ष एका घरात लपला होता तेथून बाहेर आला, पण मच्छिंद्रनाथांच्या हातातील मुलाला पहाताच तोही पळाला. त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गुरूजवळ येण्याचा धीर होईना. गोरक्षनाथ घाबरला आहे, हे मच्छिंद्रनाथाने ओळखले. आपल्या डोक्यावरचे फडके काढून त्याने मुलाला त्यात गुंडाळून ठेवले व गोरक्षाजवळ जाऊन म्हणाला, ' हा मनुष्य आहे व तो नवनारायणांपैकी एका नारायणाचा अवतार आहे.'

हे ऐकून मग गोरक्षनाथाने झालेला प्रकार सविस्तरपणे गुरूस सांगितला. ते वर्तमान ऐकून मच्छिंद्रनाथास आनंद झाला. तो आपल्या शिष्यास म्हणाला,' जसा तू राखेतून उत्पन्न झालास तसाच संजीवनी मंत्र म्हणून हा पुतळा सजीव झाला. त्यात आता करभंजन नारायणाने संचार केला आहे. तो भूत नसून मनुष्यरूपात देव अवतरला आहे.'

अशा प्रकारे सर्व वृत्तान्त सांगून मच्छिंद्रनाथाने गोरक्षाला भीती सोडायला सांगितली. मग गोरक्षासह फडक्यातील मुलाला घेऊन मच्छिंद्रनाथ आपल्या आश्रमात गेला. तेथे त्याने गाईचे दूध आणून मोठ्या प्रेमाने त्या मुलाला पाजले व त्याच्यासाठी झोळी बनवली. झोळीत गहिनीनंदनाला घालून, हलवून निजवले.

बातमी सर्व गावात पसरली. तेव्हा गावातील लोक तेथे येऊन मुलाची विचारपूस करू लागले. तेव्हा नाथ जो वृत्तान्त सांगत, तो ऐकून सर्वांना नवल वाटे. मच्छिंद्रनाथाने आपल्या शिष्याकडून मातीचा पुतळा जिवंत करविला हे पाहून ब्रह्मदेवाहून मच्छिंद्रनाथाची योग्यता अधिक आहे, असे सर्वजण म्हणू लागले. अशा तऱ्हेने सर्व गावात मच्छिंद्रनाथाविषयी विशेष आदराची भावना निर्माण झाली. मच्छिंद्राने हे मूल कोणाकडे तरी द्यावे, कारण त्याचे कष्ट मच्छिंद्राकडून होणार नाहीत, असे गावकऱ्यांनी सुचविल्यावर मच्छिंद्रनाथ उत्तरला, ' तसे होईल तर फारच उत्तम !'

अशा तऱ्हेने मच्छिंद्रनाथाची संमती मिळताच मुलाला

LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कोणाच्या तरी घरी ठेवावा म्हणजे त्याची व्यवस्था नीट होईल, असा गावकऱ्यांनी विचार केला. मग मधुनामा नावाचा ब्राह्मण तेथे रहात होता. त्याची गंगा नावाची पत्नी महापतिव्रता म्हणून ओळखली जात होती. उभयता संतती नसल्यामुळे उदास, दु:खी होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच गोष्टीची हौस वाटत नव्हती. ते त्या मुलाचे पालन-पोषण आस्थने, मायेने करतील हे जाणून मच्छिंद्रनाथाजवळ त्यांची शिफारस केली. गावकऱ्यांचे म्हणणे ऐकून अशा चांगल्या स्त्री-पुरुषाच्या हातात गहिनीनाथासारखे रत्न देणे नाथासही योग्य वाटले. मुलाला गंगाबाईच्या ओटीत घातले आणि सांगितले, ' मातु:श्री, हा पुत्र वरदायक आहे. करभंजन म्हणून नवनारायणांपैकी जो आहे याचाच हा अवतार आहे. ह्याचे उत्तम रीतीने संगोपन कर. त्यामुळे तुझे कल्याण होईल. जगाने नावाजण्यासारखा हा निपजेल. हा पुढे कसा होईल, हे मातु:श्री, मी तुला आता काय सांगू ? पण याच्या सेवेसाठी मूर्तिमंत्र कैलासपती येईल. यांचे नाव गहिनी असे ठेव. आम्ही तीर्थयात्रेस निघालो आहोत. बारा वर्षांनी हा आमचा बाळ गोरक्ष येथे येईल तेव्हा तो याच्यावर अनुग्रह करील. म्हणून तू याचे संगोपन कर.' त्यावर ती स्त्री म्हणाली, ' बारा वर्षांनी तुम्ही याला परत न्याल, त्यामुळे माझ्या प्रेमात भाडोत्रीपणा येईल. तेव्हा खरी गोष्ट सांगा.'

मोहनशास्त्र मंत्र म्हणून विभूती तिच्या अंगावर टाकताच तिच्या स्तनांत दूध उत्पन्न झाले. मुलास स्तनपान केल्यावर तिने गावातील सुवासिनी बोलावून मुलाला पाळण्यात घातले व त्याचे नाव गहिनी ठेवले.

पुढे मच्छिंद्रनाथ काही दिवस तेथे राहिला व गावकऱ्यांचा निरोप घेऊन गोरक्षासह तो तीर्थयात्रेस गेला. जाताना गोरक्षाची

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याने परीक्षा घेतली आणि तो अजून कच्चा आहे, असे मच्छिंद्रनाथास दिसून आले. मग त्याला बद्रिकेदार येथे स्वामींच्या हवाली करून तपाला लावावे असे त्याच्या मनात आले.

❋❋❋

अध्याय ११ वा

(जालिंदरनाथाची कथा)

गहिनीस गंगाबाईच्या स्वाधीन केल्यावर गोरक्षनाथास बरोबर घेऊन मच्छिंद्रनाथ निघाला. तो तीर्थयात्रा करीत करीत बद्रिकाश्रमात शिवालयात गेला. तिथे जयजयकार करून दोघांनी शंकराला नमस्कार केला आणि मच्छिंद्राने त्याची स्तुती करण्यास सुरुवात केली. ही स्तुती ऐकून शंकर प्रसन्न झाला व प्रकट होऊन त्यांना दर्शन दिले. मच्छिंद्राला प्रेमभराने आलिंगन देऊन सन्मानाने जवळ बसविले. शिवाने गोरक्षाच्या तोंडावरून हात फिरविला व तू हरिनारायणाचा अवतार आहेस असे म्हटले. नंतर तो मच्छिंद्रास म्हणाला, ' हा तुझा गोरक्षनाथ ब्रह्मांडास तारक ठरेल. कनकगिरीवर तू तप करून सर्व दैवते साध्य करून घेतलीस. श्रीराम, नृसिंह, सूर्य, हनुमंत, कालिका वगैरे सर्व देवांसह भैरवांना बोलाविलेस तेव्हापासून माझी व या गोरक्षनाथाची ओळख आहे. तू त्याच्याकडून विद्याभ्यास करून घेतला आहेस खरा, पण याने तप केले नाही. ते केले पाहिजे,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

यासाठी माझ्या आश्रमात त्याला तू तपासाठी बसव. मग ह्याची विद्या, अस्त्रे ही सर्व फलद्रूप होतील.

मच्छिंद्राने शिवाचा उपदेश मान्य केला आणि गोरक्षनाथास उत्तम मुहूर्तावर त्याने तपश्चर्येस बसविले. तो लोखंडाच्या काट्यावर डाव्या पायाचा अंगठा ठेवून उभा राहिला. तो सूर्याकडे दृष्टी ठेवून फळे, पाला खाऊन तपश्चर्या करू लागला. यावर मच्छिंद्रनाथ आपली पुन्हा बारा वर्षांनी भेट होईल असे गोरक्षनाथास सांगून तो पुढे तीर्थयात्रेस निघाला, पण आदिनाथ गोरक्षाचे रक्षण करीत होता.

काशी, अवंतिका, गया, प्रयाग, इ. तीर्थे हिंडून तो शेवटी सेतुबंध रामेश्वरास गेला. तेथे रामेश्वराचे दर्शन घेऊन समुद्रस्नानाला गेला असता वाटेत मारुती भेटला. मारुतीने त्याला नमस्कार केला. त्यावेळी मारुतीला पाहून त्याला फार आनंद झाला. मारुतीने त्याला प्रेमाने आलिंगन देऊन जवळ बसविले. मग मारुती म्हणाला, ' आज चोवीस वर्षांनी तुझी भेट झाली. आळशावर गंगा लोटली. त्यामुळे खूप आनंद झाला.'

मग मारुतीने नाथाचे आदरातिथ्य उत्तम प्रकारे केले. मारुती मच्छिंद्राला म्हणाला, ' स्त्रीराज्यात जाण्याचे तू मला वचन दिले होतेस आणि असे असतानाही तू अजूनपर्यंत तिकडे गेला नाहीस; तर कृपा करून तिकडे जाऊन मैनाकिनीची इच्छा पूर्ण कर, म्हणजे मी तिच्या वचनातून मुक्त होईन. मच्छिंद्रनाथ येथे येऊन तुझे मनोरथ पुरवील, असे मी तिला वचन दिले आहे. ते तू पूर्ण केले पाहिजे. तूही मला मागे वचन दिले आहेस. ते पाळून मला मुक्त करण्याची आता संधी आली आहे.'

मारुतीचे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथ ठीक आहे, असे म्हणाला व तीन रात्री तेथे मुक्काम करून ते दोघेही बंगालमधून स्त्रीराज्याकडे जाण्यास निघाले. थोड्याच दिवसांत तीर्थे उरकत उरकत ते

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्त्रीराज्यात आले. तेथे पुरुष नव्हता. मुख्य राज्यपदावर एक राणी असून सर्व कारभार पाहणाऱ्या स्त्रियाच होत्या. त्या राज्यकारभार अगदी व्यवस्थित चालवीत असत.

या दोघांनी राजवाड्यात प्रवेश करून राणीची भेट घेतली. त्यांना पाहून राणीला आनंद झाला. दोघांना कनकासनावर बसविले. मग त्यांची षोडशोपचारांनी पूजा केली. ती हात जोडून उभी राहिली. हा दुसरा बरोबर कोण आहे हे सांगण्यासाठी तिने मारुतीला प्रार्थना केली. मारुतीने तिला सांगितले, ' तू तप केलेस त्यावेळी मच्छिंद्रनाथ येऊन तुला विषयविलासाचे पूर्ण सुख देईल, म्हणून वरदान दिले होते, तोच हा आहे; तर आता याच्यापासून तू आपली इच्छा पूर्ण करून घे.' याप्रमाणे तिच्या वचनातून मुक्त झाल्यावर तो वज्रशरीरी मारुती तेथे तीन रात्री राहून पुन्हा सेतुबंध रामेश्वरास आला व रामाच्या चिंतनात रमला.

इकडे मच्छिंद्रनाथ विषयोपभोगाच्या सुखात निमग्न होऊन गेला. विनोदापासून व्याकरणापर्यंत सर्व विषयांवर तो चर्चा करीत असे. यथाकाळी राणी गर्भवती राहिली. नवमास भरल्यावर प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाले. त्याचे नाव ' मीननाथ ' असे ठेवले.

कुरुकुळात जनमेजय राजापासून सातवा पुरुष बृहद्रवा राजा झाला. तो हस्तिनापुरचे राज्य करीत असता त्याने सोमयाग करण्याचे ठरविले. काही दिवसांनी या सोमयागाला आरंभ केला. सोमयाग एक वर्ष चालला होता.

पूर्वी शंकराच्या तृतीय नेत्राच्या प्रलयाग्नीने मदन जाळला होता. तो अग्नीच्या उदरात वाढत होता. त्यात अंतरिक्ष नारायणाने संचार केला होता, तो गर्भ अग्नीने या अग्निकुंडात टाकला. पूर्णाहुती झाल्यानंतर यज्ञकुंडातील राख घेण्यासाठी ब्राह्मणांनी हात घातला, परंतु राखेऐवजी त्यांच्या हाताला तेजःपुंज बालक लागले आणि त्याचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रडणेही ऐकू येऊ लागले ! हे पाहून त्यांनी त्या मुलाला उचलून राजाला दाखविले. तेव्हा कौसल्येच्या कुशीत रामाला पाहिल्यावर दशरथाला जसा आनंद झाला तसा त्या बालकाला पाहून बृहद्रवा राजास फार आनंद झाला. त्याला राजाने हातात घेतले व तो त्या बालकाचे प्रेमभराने मुके घेऊ लागला. त्याचे रूप पाहून हा प्रत्यक्ष मदनाचा पुतळाच आहे असे राजाला वाटले.

नंतर राजा बालकास घेऊन घाईघाईने अंतःपुरात सुलोचना राणीकडे गेला. तिचे रूप देवांगनेसारखे होते. तिच्याकडे पाहिले की, ही कुरुकुळाला तारण्यासाठी साक्षात रमा, सरस्वती किंवा पार्वती अवतरली आहे असे वाटे. तिच्यापुढे गंगोदकही मलीन वाटत होते. मुलाला पाहून राणीने राजाजवळ त्याची चौकशी केली. तेव्हा राजाने सांगितले, ' अग्निनारायणाने हा आपल्यासाठी प्रसाद दिला आहे. मीनकेत हा एक पुत्र तुला आहे, तसाच हा दुसरा होईल.'

हे ऐकून राणीने त्या बालकास प्रेमाने हृदयाशी धरले; त्यावेळी तिला पान्हा फुटला. मग मोठा उत्सव सुरू झाला. बाराव्या दिवशी गावात साखर वाटली व पुष्कळ दानधर्मे केली. सर्वांनी त्या बालकाचे नाव ' जालिंदर ' असे ठेवले. पुढे बृहद्रवा राजाने जालिंदराची मुंज केली. पुढे तो मोठा झाल्यावर त्याचे लग्न करावे असे एके दिवशी राजाच्या मनात आले. लगेच त्याने धूर्मीण प्रधानाबरोबर पुरोहितास देऊन उत्तम मुलगी पहाण्यास पाठविले.

बरेच दिवस धूर्मीण न दिसल्यामुळे तो कोठे गेला आहे, म्हणून जालिंदराने आईला विचारले; तेव्हा ती म्हणाली, ' तुझ्या वडिलांनी तुला पत्नी शोधण्यासाठी त्याला व पुरोहिताला पाठविले आहे.'

हे ऐकून जालिंदराने आईला बायको कशी असते, म्हणून विचारले. त्यावर तिने माझ्यासारखी बायको असते असे सांगितले

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ही गोष्ट लक्षात ठेवून त्याने खेळायला गेल्यावर आपल्या मित्रांना विचारले, ' अरे, माझे आई, बाबा मला बायको करून देणार आहेत. पण ती कशासाठी करतात हे तुम्हाला माहीत असेल तर सांगा. '

त्याचा हा प्रश्न ऐकून त्याच्या मित्रांना त्याच्या अज्ञानाचे फार आश्चर्य वाटले. त्यांनी मिस्किलपणे हसून सर्व स्पष्ट करून सांगितले.

ते ऐकून तो मनात विचार करू लागला की, हे जग फार अधम आहे. जेथून उत्पन्न व्हायचे तिथेच हे रमतात. मग आपण ही गोष्ट वर्ज्य करावी व मातेला कांतेसमान मानणे योग्य नाही, असे मनात येऊन तो अरण्यात निघाला. गावाच्या सीमेवर रक्षक होते. त्यांनी त्याला पाहिले, पण तो राजपुत्र असल्यामुळे त्यांनी त्याला कोठे जातोस, म्हणून हटकले नाही; पण समयसूचकता म्हणून एक जासूद पाठवून त्यांनी ही गोष्ट राजाच्या कानावर घातली. ते ऐकताच राजा घाबरून धावत आला व अरण्यात शोध करू लागला. जालिंदर फार चपळ होता. एका पर्वताच्या कडेकडेने तो उत्तरेकडे गेला. अंधार पडेपर्यंत पुष्कळ लोक राजपुत्राच्या शोधात फिरत होते, परंतु त्या सर्वांची निराशा झाली. सर्व मंडळी परत आली. मुलाच्या वियोगाने राजा-राणीला अतिशय दुःख झाले. ती उभयता मुलाच्या बाललीलांच्या आठवणीने एकसारखी व्याकुळ होऊन शोक करू लागली.

इकडे जालिंदर अरण्यात झोपला असता रात्री वणवा पेटला. तो अग्नी अगदी जालिंदरच्या जवळ आला. अग्नीने आपल्या मुलाला ओळखले. त्याला चांगल्या योग्य ठिकाणी सोडले व हा अशा स्थितीत येथे कसा आला म्हणून तो विचारात पडला. मग अग्नीने प्रकट होऊन त्याला जागे केले आणि प्रेमाने मांडीवर बसवून तेथे येण्याचे कारण विचारले; तेव्हा तू कोण आहेस, असे जालिंदरने अग्नीला विचारले त्यावर अग्नी म्हणाला, ' मी वैश्वानर. मी तुझी आई व बाप आहे;

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मला अग्नी म्हणतात.'

हे ऐकून तू माझी आई व बाप कसा म्हणून त्याने अग्नीस विचारल्यावर अग्नीने सगळी जन्मकथा त्याला सांगितली.

❄❄❄

अध्याय १२ वा

(कानिफनाथाची कथा)

अग्नीने जालिंदरास त्याच्या जन्माची सर्व कथा सांगितल्यावर अग्नीने त्याला विचारले, ' तुझ्या मनात कोणती इच्छा आहे ती मला सांग.'

हे ऐकून जालिंदरनाथ म्हणाला, ' माझे मन इच्छारहित आहे. पण एक गुह्य आहे आणि ते तू सर्व जाणतो आहेसच. हा नरदेह प्राप्त झाला आहे, याचे काहीतरी सार्थक होईल असे कर. नाही तर जन्मास आले आणि गेले असे मात्र होऊ देऊ नको. माझी कीर्ती त्रिभुवनात अखंड राहील व मी चिरंजीव होईन असे कर.'

जालिंदराचा हा मानस पाहून अग्नीला धन्य वाटले व त्याने त्याची वाहवा केली. मग जालिंदराची इच्छा पूर्ण व्हावी व तो सर्वापेक्षा प्रबल व्हावा म्हणून अग्नी त्याला खांद्यावर घेऊन दत्तात्रेयाकडे गेला. अग्नीला पाहून दत्तात्रेयाला आनंद झाला. त्याने त्याला आलिंगन दिले. मग दत्तात्रेयाने अग्नीला विचारले, ' आज कोणती इच्छा धरून येथे आलास ? हा मुलगा कोण ?'

हे ऐकून अग्नीने दत्तात्रेयास सांगितले, ' शंकराच्या देहातला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

काम मी जाळला, असे सर्वजण बोलतात; पण तो मी आजपर्यंत उदरात रक्षण करून ठेवला होता. मग बृहद्रवा राजाच्या यज्ञकुंडात या जालिंदरनाथाच्या देहाला निर्माण केले. अतएव हा तुमचाच मुलगा आहे. तुम्ही याचे संगोपन करा. याला अनुग्रह देऊन, सनाथ करून चिरंजीव करावे.'

मग दत्तात्रेयाने सांगितले, ' मी तुझी इच्छा पुरी करीन, परंतु माझ्यापाशी याला येथे बारा वर्षेपर्यंत ठेवले पाहिजे.'

हे ऐकून जालिंदराला दत्तात्रेयाजवळ ठेवण्यास अग्नी कबूल झाला. पण तो म्हणाला, ' मजसमक्ष याला वर द्या.' मग दत्ताने जालिंदरास मांडीवर बसवून त्याच्या मनातील विकल्प नष्ट केला. त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवताच त्याचे अज्ञान एका क्षणात नाहीसे झाले व त्याला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाली. नंतर अग्नी दत्तात्रेयास वंदन करून अदृश्य झाला.

मग जालिंदरास बरोबर घेऊन दत्तात्रेय रोज फिरू लागला. भागीरथीवर स्नान करून विश्वेश्वराचे दर्शन घेई. नंतर कोल्हापुरला भिक्षा मागे व पांचाळेश्वरी भोजन करी. माहूरगडावर निद्रा घेई. अशा प्रकारे बारा वर्षे दत्तात्रेयाच्या सहवासात राहिल्यावर सर्व तऱ्हेच्या शस्त्रविद्यांत जालिंदर निष्णात झाला. त्याचप्रमाणे तो शास्त्रे, वेद पुराणे, व्याकरण वगैरे सर्व विद्यांमध्ये प्रवीण झाला. अशा तऱ्हेने परिपूर्ण झाल्यावर दत्तात्रेयाने देवतांची आराधना केली व ती सर्व दैवते जालिंदरास वर देण्यासाठी भूतलावर उतरली. मग अग्नीला बोलावून त्याचा पुत्र त्याच्या पुढे केला. परिपूर्ण जालिंदराला पाहून त्याला फार आनंद झाला. तेव्हा दत्तात्रेय अग्नीस म्हणाला, ' हा सर्व विद्यांमध्ये निपुण झाला आहे. आता सर्व देवांनी वर देण्यासाठी त्याला दर्शन घडवावे.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हे ऐकून अग्नीने त्याला खांद्यावर बसवून त्रिभुवनातील दैवते दाखवली. पूर्वी मच्छिंद्रनाथाने ज्या दैवतांना अनुकूल करून वर मागून घेतले होते, त्या सर्व दैवतांनी जालिंदरासही वर दिले, पण सर्व देवतांनी त्याला तप करायला सांगितले. मग जालिंदराने बद्रिकाश्रमात जाऊन तेथे बारा वर्षे तप केले. त्याने लोहाच्या कांट्यावर पायाचा अंगठा ठेवून केलेल्या तपाने देवांनी संतोषाने माना डोलावल्या. नंतर आशीर्वाद देऊन ब्रह्मा, विष्णु, महेश वगैरेंसह तेथे आलेले सर्व देव आपापल्या स्थानी परत गेले.

पुढे बद्रिकाश्रमात शंकराने अग्नीला व जालिंदरनाथाला आपल्याजवळ आग्रहाने तीन रात्री ठेवून घेतले. त्यावेळी सत्यलोकात घडलेली एक विचित्र कथा शंकराने त्यांना सांगितली; ती अशी, ' ब्रह्मदेवाची मुलगी सरस्वती ही बारा वर्षांची असताना तिचे सौंदर्य पाहून ब्रह्मदेवाच्या मनात कामवासना उत्पन्न झाली. तो तिच्यामागे लागला. त्याचा वीर्यपात झाला तेव्हा वाऱ्याच्या झोताने वीर्यबिंदू हिमालय पर्वतावरील वनात एक हत्ती झोपला असताना त्याच्या कानात पडला. त्यात प्रबुद्धनारायणाने संचार केला. ही गोष्ट घडून युगेच्या युगे लोटली. त्याच्या कानातून प्रबुद्धनारायणाचा अवतार प्रगट होईल, त्याला जालिंदराने आपला शिष्य करावा; आणि या प्रबुद्धनारायणाचा जन्म कानापासून आहे म्हणून त्याचे नांव ' कानिफा ' ठेवावे,' असे शिव अग्नीला म्हणाला.

शंकराने सांगितलेली ही गोष्ट ऐकून अग्नी म्हणाला, ' तुम्ही ही फारच विचित्र गोष्ट सांगत आहात. पण हत्ती कोठे आहे हे फक्त मला कृपा करून सांगा. बाकी ही गोष्ट फार चांगली झाली, की माझ्या मुलाला आणखी रक्षक निर्माण झाले.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते ऐकून शंकर जालिंदर व अग्नी यांना घेऊन हिमालयाच्या अरण्यात गेला. त्यांच्या तेजाने साऱ्या दिशा व्यापून गेल्या होत्या. तेथे एका पर्वतावर एक विशाल अक्राळ-विक्राळ हत्ती दिसला. शंकर म्हणाले, ' हाच तो पर्वतासारखा बलाढ्य हत्ती ! आता हा आपल्याशी मोठे रण माजवील. तेव्हा याला आवरण्यासाठी कोणती युक्ती करावी ?'

शंकराचे अशा तऱ्हेचे बोलणे ऐकून जालिंदराने एक युक्ती सांगितली, ' महाराज, माझ्या मस्तकावर दत्तात्रेयाने वरदहस्त ठेवला आहे. त्याचा चमत्कार आपण आता पाहा. प्रलयकाळाचा काळही जेरीस येऊन गप्प राहील. मग या हत्तीची काय कथा ?'

असे सांगून त्याने झोळीतून चिमूटभर भस्म काढले आणि मोहनास्त्र जपून व स्पर्शास्त्र मंत्रून ते भस्म हत्तीवर टाकले, त्याबरोबर एवढा मोठा बलाढ्य हत्ती, पण लगेच अगदी शांत झाला. मग जालिंदर एक पाऊल त्या हत्तीजवळ कानिफास आणावयास गेला. तो धीटपणे हत्तीच्या अगदी जवळ गेला आणि हत्तीला म्हणाला, 'तुझ्यासारखा धैर्यवान दुसरा कोणी नाही. तुझ्या कानात दिव्य रत्न निर्माण केले आहे. हे समर्थ प्रबुद्धनारायणा, आत तू हत्तीच्या कानात प्रकट झाला आहेस; म्हणून तुझे नाव ' कानिफा ' असे ठेवले आहे. आता उशीर न करता लवकर बाहेर ये.'

जालिंदराचे हे बोलणे ऐकताच हत्तीच्या कानाच्या भोकाशी येऊन कानिफाने आपल्या पूज्य गुरूस, जालिंदरास नमस्कार केला तेव्हा तो सोळा वर्षांचा होता. तेजःपुंज होता. अशी मूर्ती जालिंदराने हाताचा आधार देऊन कानातून खाली जमिनीवर घेतली. मग त्याला खांद्यावर घेऊन जालिंदराने शंकरापाशी आणला. त्याला खाली उतरवून शंकराला व अग्नीला नमस्कार करायला सांगितले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कानिफाने जालिंदरासही नमस्कार केला. तेव्हा कानिफास शंकरा प्रेमाने मांडीवर बसविले व त्याचे मुके घेतले. मग त्या बाळाला अनु देण्यास जालिंदरास सांगितले.

अनुग्रह झाल्याशिवाय याचे अज्ञान दूर व्हायचे नाही मनात आणून शंकराच्या सांगण्यानुसार जालिंदरनाथाने गुरूचे स्म करून कानिफाच्या मस्तकावर हात ठेवला व कानात मंत्राचा उप केला. त्यामुळे कानिफाचे अज्ञान त्या क्षणीच नाहीसे झाले. चौघेजण बद्रिकाश्रमास गेले. तेव्हा दत्ताने तुला जे काय दिले ते कानिफास द्यावे, असे जालिंदरास सांगून अग्नी गुप्त झाला. तेथे शं सहा महिनेपर्यंत त्यांना भेटत होते. या सहा महिन्यांत कानिफा विद्यांमध्ये अधिकारी झाली, पण संजीवनी व वाताकर्षण ही दोन अ मात्र जालिंदराने त्याला दिली नाहीत.

कानिफाला अस्त्रे, दैवते प्रसन्न करून द्यावी म्हणून शंकर जालिंदरास सांगितले. मग जालिंदराने हात जोडून दैवतांची प्रार्थ केली, ' कानिफा सर्व विद्यांत प्रवीण झाला आहे, तेव्हा त्यास द्यावेत.'

जालिंदराची ही प्रार्थना ऐकून सर्व दैवते म्हणाली, ' तु आम्ही वरदान दिले, कारण दत्तात्रेयाने तुला विद्या शिकविली अग्नीचीही भीड पडली, पण असे वर वारंवार दुसऱ्यांना देता नाहीत. यापुढे तुमचे अनेक शिष्य होतील. तेवढ्यात सर्वांना कि वर देत बसणार ?

' आम्ही वर देणार नाही,' असे स्पष्ट सांगून देव विमाना बसून जाऊ लागले. ते पाहून जालिंदरास फार राग आला. म्हणाला, ' माझा अपमान करून तुम्ही चालला आहात. आ तुम्हाला माझा चमत्कार दाखवतो.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे म्हणून त्याने वातास्त्र सोडले. त्यामुळे एकाएकी प्रचंड वारा सुटला व देवांची विमाने आकाशात इतस्तत: जाऊ लागली. मग प्रत्येक दैवताने आपापली शस्त्रे सोडली, परंतु त्या सर्वांचे जालिंदराने निवारण केले. हरिहर लांबून हा प्रकार पाहात होते. जालिंदरनाथापुढे आपल्या शस्त्रांचे काही चालत नाही असे पाहून शस्त्रे घेऊन खाली उतरण्याचा सर्व देवतांनी निश्चय केला. प्रथम अग्नीचा प्राण घेण्याचा बेत करून ते सर्व शस्त्रे घेऊन पृथ्वीवर उतरले. ते पाहून जालिंदराने कामिनीअस्त्र सोडले. त्यामुळे अगणित सुंदर स्त्रिया निर्माण झाल्या. नंतर त्याने कामास्त्राची योजना केली, त्याबरोबर लगेच सर्व देव कामातुर होऊन त्या स्त्रियांच्या मागे लागले. त्यात त्या स्त्रिया हरतऱ्हेच्या हावभावांनी त्यांना मोहित करीत होत्याच. त्या पुढे पळत व देव त्यांची विनवणी करीत त्यांच्या पाठीमागून जात होते. त्या बोरीच्या वनात शिरल्या व झाडावर चढल्या. त्यांनी स्त्रियांना वश होण्याची विनंती केली. परंतु इतक्यात, स्पर्शास्त्र मंत्र म्हणून भस्म फेकताच ते सर्वजण झाडाला चिकटले. कित्येक खाली डोके, वर पाय अशी अवस्था होऊन झाडाला लोंबकळू लागले.

ती सर्व गंमत पाहून हरिहर गदगदा हसू लागले. मग स्त्रियांनी सर्वांची वस्त्रे काढून त्या सर्वांना नग्न केले व जालिंदरनाथाजवळ त्या वस्त्रांचा मोठा ढीग केला.

जालिंदराने हळूच सर्व देवांना वस्त्रे नेसविण्याची खूण कानिफाला केली. त्यानुसार कानिफ त्यांना वस्त्र नेसवू लागला. त्यांना कानिफ म्हणाला, ' मी गुरूच्या नकळत तुम्हाला वस्त्रे नेसवीत आहे. पण ही गोष्ट गुरूला सांगू नका.'

अशा तऱ्हेने तो प्रत्येक देवास वस्त्र नेसवून त्याच्या पाया पडे. याप्रमाणे कानिफाची भक्ती पाहून देवांना समाधान वाटले. जालिंदर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आपल्याकडून वर घेतल्याशिवाय राहणार नाही, हे जाणून त्यां प्रसन्न चित्ताने वर दिले. अस्त्रविद्येत आम्ही त्याला सहाय्य करू सर्व प्रकारे कबूल केले.

मग जालिंदरनाथाने विभक्तास्त्र सोडले आणि झाडा चिकटलेले देव तेथून मुक्त झाले व आपापली वस्त्रे, भूषणे साव जालिंदरनाथाजवळ गेले. त्याला त्यांनी नमस्कार केला व अस्त्रांम आम्ही स्वतः प्रकट होऊन साक्षात्कार दाखवू असा कानिफाला व दिल्याचे सांगितले. तेव्हा जालिंदराने सर्वांना सांगितले, ' पुढे साबरी कवित्व करणार आहे. त्यास कृपा करून तुम्ही सर्वांनी सहका करावे.'

जालिंदराच्या या विनंतीस सर्व देवांनी मोठ्या आनंदा मान्यता दिली व ते सर्व आपल्या स्थानी गेले. नंतर हरिहर जालिंदरनाथ व कानिफनाथ तीन दिवस बद्रिकाश्रमात राहिले.

✻✻✻

अध्याय १३ वा

(जालिंदर-मैनावती आख्यान)

शंकर, विष्णु, जालिंदरनाथ व कानिफा हे सर्वज बद्रिकाश्रमास गेले. ते सर्वजण जालिंदरनाथाची अस्त्रशक्ती पाहू त्याची वाहवा करू लागले. सामर्थ्याने सर्व दैवतांची दुर्दशा केल्या ते त्याची स्तुती करू लागले. देवांना असा धाक दाखविणारा को

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वस्ताद मिळाला नव्हता असेही ते म्हणू लागले. नंतर शंकराने जालिंदरास सांगितले, ' तू नागपत्र अश्वत्थाच्या ठिकाणी जाऊन यज्ञ कर व तेथेच कवित्व करून दैवतांपासून वर प्राप्त कर. वेदविद्येचे मंत्र पुष्कळ आहेत. अस्त्रविद्या ही पण महान प्रतापी आहे. तरीपण कलियुगात तिचा प्रभाव पडणार नाही. मंत्रविद्येचा लोकांना अजिबात फायदा व्हायचा नाही. ते दु:खी होतील. म्हणून ही साबरीतून कविता सिद्ध करून ठेव आणि ती सर्व विद्या कानिफाला शिकव. हा पुढे असंख्य शिष्य निर्माण करील. ह्याला सर्व विद्या अवगत असतील. त्यामुळे याचे वर्चस्व सर्व जगात राहील. साबरी ऋषीने हा कलियुगात उपयोगी पडणारा मंत्रविद्येचा मार्ग शोधून काढला. परंतु ती विद्या चांगली, पण थोडी असल्यामुळे त्यापासून लोकांना म्हणावा तितका लाभ होईल असे मला वाटत नाही. शंभर कोटी कविता पाहिजेत, त्या नऊ नाथांनी कराव्यात. ही सर्व धडपड लोकोपचारासाठी करायची आहे, तेव्हा तुम्ही सर्वज्ञ आहात; तुम्हाला आणखी काही सांगायची गरज नाही. जारणं, मरण, उच्चाटन वगैरे विषयांवरही कविता करावी.'

अशा प्रकारे शंकराने जालिंदरास उपदेश केला व कानिफास तपाला बसवून समर्थ कर, असे सुचविले. शंकराचे हे सर्व म्हणणे जालिंदरनाथाने आनंदाने मान्य केले. मग जालिंदर व कानिफा या दोघांनी बारा वर्षे तेथे राहून चाळीस कोटी वीस लक्ष कविता तयार केल्या. त्या दोघांचे हे काव्य पाहून शंकर प्रसन्न झाला. त्यांना नागअश्वत्थाखाली ते प्रयोग सिद्ध करण्याचा उपदेश केला. शंकराच्या आदेशानुसार ते उभयता तेथे गेले, आणि हवन करून प्रयोग सिद्ध करून घेतले. सूर्यकुंडाचे पाणी आणून बावन्न वीरांवर शिंपडून त्यांना प्रसन्न करून घेतले. हे सर्व पार पाडून ते दोघे बद्रिकाश्रमी परत आले. तेथे जालिंदराने कानिफास तपश्चर्येस बसवले आणि तो स्वत:

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तीर्थयात्रेस गेला. तेथे घनदाट अरण्यात गोरक्षनाथही तपास बसले होता, पण ते परस्परांना ओळखत नव्हते.

इकडे जालिंदरनाथ तीर्थयात्रा करीत फिरत होता. ते आपल्या डोक्यावर गवताचा भारा घेऊन अरण्यातून गावात जाई ते गायींना घालत असे. अशा तऱ्हेने त्याने डोक्यावर गवताचा भा घेतला असता, त्याला त्याचा त्रास होऊन नये म्हणून वायू तो भा डोक्यावर अलगद वरच्या वर झेलून धरून ठेवी.

अशा तऱ्हेने गवताचा भारा डोक्यावर घेऊन फिरत फि गौडबंगाल देशातील हेलपट्टण नावाच्या गावी पोहोचला. गाव भारा डोक्यावर आधाराशिवाय राहिलेला पाहून तेथील बुद्धिवा लोकांनाही फार आश्चर्य वाटले. त्यामुळे हा कोणी सिद्ध पुरुष असा असे वाटून ते त्यांच्या दर्शनालाही जाऊ लागले. त्यामुळे लोकां त्याला त्रास होऊ लागला. तो आपला उदरनिर्वाह भिक्षा मा चालवीत असे. त्यावेळी तेथे त्रिलोचन राजाचा मुलगा गोपीचंद राज्य करीत होता. त्याचे रूप मदनासारखे होते. श्रीमंती कुबेरा लाजविणारी होती. गोपीचंद राजाची आई मैनावती ही मो सद्‌गुणी होती. ती एके दिवशी राजमहालाच्या गच्चीवरून शहरा देखावा पहात होती. तेव्हा तिने जालिंदरास पाहिले. आधाराशिव डोक्याच्या वर भारा घेऊन जाणारा तो जोगी पाहून तिला आश्च वाटले आणि हा कोणी प्रतापी पृथ्वीवर उतरला आहे, असे ति मनात आले. त्याला गुरू करून आपल्या देहाचे सार्थक करून घ्य असे तिने मनाशी घेतले. तिने दासीला बोलावले. ती दासी फार व होती. ती येताच हात जोडून उभी राहिली आणि मोठ्या अद का बोलावले म्हणून तिने विचारले, तेव्हा मैनावती म्हणाली,

माझे एक फार नाजूक व खासगी काम आहे. पण हे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कोणालाही कळता कामा नये. कमालीची गुह्यता हवी; कारण प्रसंगवशात जिवावर बेतायचे म्हणून सावध राहिले पाहिजे.'

असे बोलून तिने हा महाज्ञानी जोगी कोठे जात आहे, त्याची वस्ती कोठे आहे, त्याचा गुप्तपणे नक्की शोध करून येण्यास सांगितले. जालिंदरनाथास पाहून दासीही चकित झाली व आपण त्याच्याकडे जाऊन त्याचा अनुग्रह घ्यावा व जन्ममृत्यूच्या दृढ· बंधनातून मुक्त व्हावे असे मैनावतीसं तिने सांगितले.

नंतर मैनावतीच्या सांगण्यानुसार दासी त्या जोग्याच्या पाठोपाठ गेली. सूर्यास्त झाल्यावर एका घाणेरड्या ठिकाणी एकांत जागा पाहून जालिंदर तेथे वस्तीस राहिला. ते ठिकाण दासीने मैनावतीस सांगितले. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री मैनावती एका ताटात फळफळावळ व पक्वान्ने घेऊन दासीसह जालिंदरनाथाजवळ गेली. तेव्हा तो ध्यानाला बसलेला होता. त्या दोघीजणी त्याच्या पाया पडल्या आणि नम्रपणे हात जोडून उभ्या राहिल्या. नंतर मैनावतीने त्याची खूप स्तुती केली.

मैनावतीची कसोटी बघण्यासाठी त्याने तिचा पुष्कळ छळ केला. तो रागाने तिच्यावर दगड फेकी, शिव्याही देई. पण मैनावतीने धैर्य खचू दिले नाही. ती धीराने व संयमाने राहिली. याच्या हातून आपल्याला मरण आले तरी आपण मोक्षास जाऊ याबद्दल तिला पूर्ण खात्री वाटत होती. तिच्या भक्तीवर प्रसन्न होऊन त्याने तू कोण, कुठली व येथे येण्याचे कारण काय म्हणून विचारले. तेव्हा ती नम्रपणे म्हणाली, ' योगीराज, त्रिलोचन राजाची मी पत्नी आहे, परंतु काळाने त्याला खाऊन टाकल्याने मला वैधव्य आले. ही जन्ममरणाची रहाटी पाहून मी घाबरून गेले आहे व माझ्या पतीलाच त्याचा फटका बसला; त्यामुळे मला पश्चात्ताप झाला आहे. काळाने माझ्या पतीची जी अवस्था केली तशीच माझीही आहुती पडेल.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मैनावतीचे हे बोलणे ऐकून जालिंदर म्हणाला, ' जर तुझा पती स्वर्गवासी झाला आहे, तर हल्ली तू कुठे रहातेस ?'

जालिंदरनाथाचा हा प्रश्न ऐकून ती म्हणाली, ' हल्ली मी माझा मुलगा गोपीचंद राजा याच्याजवळ असते. पण आता ह्या गोष्टीचा विचार करण्याचे कारण नाही. कृपा करून तुम्ही मला या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त करावे, अशी माझी हात जोडून आपल्या चरणी विनंती आहे.'

मग जालिंदराने तिला सांगितले, ' तू क्षणभरही इथे न थांबता परत जा. मृत्यूच्या पाशाचे बंधन मोठे बिकट आहे. ते माझ्यासारख्या पिशाचाकडून तुटायचे नाही. जर ही गोष्ट तुझ्या पुत्राला कळली तर मोठा अनर्थ घडेल.'

एवढे बोलणे होईपर्यंत इकडे उजाडले. तेव्हा ती त्याला नमस्कार करून आपल्या घरी निघून गेली. पण संपूर्ण दिवस ती तळमळत होती. मग रात्र झाल्यावर दासीला बरोबर घेऊन ती पुन्हा जालिंदरनाथाकडे गेली व पाया पडून, हात जोडून उभी राहिली; पण नुसते उभे रहाण्यात काही तथ्य नाही असे तिला वाटले. मग आपल्या हातून थोडी सेवा घडावी म्हणून ती त्याचे पाय चेपीत बसली. दोन प्रहर सेवा झाल्यावर पहाट होण्याची वेळ झालेली पाहून त्याला नमस्कार करून ती घरी आली. अशा प्रकारे सहा महिने तिने जालिंदरनाथाची सेवा केली.

यानंतर एके दिवशी काळोख पडला आहे, अशी संधी साधून मैनावती त्याच्याकडे गेली. ती आलेली पाहून जालिंदराने मायेने एक भुंगा निर्माण केला व आपण गाढ झोपेचे सोंग घेऊन स्वस्थ घोरत पडला. नंतर तो मायावी भुंगा तिच्या मांडीखाली शिरला व त्याने तिची मांडी फोडून रक्तबंबाळ करून टाकली. तरीही तिने आपला धीर सोडला नाही. तिचे ते धैर्यबळ ओळखून जालिंदर संतुष्ट

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

झाला. त्याने प्रसन्न होऊन तिला मंत्रोपदेश केला. तिने त्याच्या पायावर डोके ठेवले व जन्मास आल्याचे आज सार्थक झाले, असे ती म्हणाली.

नंतर त्याने संजीवनी मंत्राची तिच्या देहात प्रेरणा केली. ज्याप्रमाणे रामचंद्राने दानव कुळातील बिभीषणाला अमर केले, त्याचप्रमाणे जालिंदराने मैनावतीस अमर केले. पुढे दिवसेंदिवस तिची भक्ती वाढतच गेली.

❄ ❄ ❄

अध्याय १४ वा

(गोपीचंदाची कथा)

जालिंदरनाथाने मैनावतीला मंत्रोपदेश केला. त्यामुळे ती परमेश्वराशी एकरूप झाली. परंतु आपल्या पतीची स्मशानात जी गत झाली तशीच आपला पुत्र गोपीचंद याचीही होणार, या विचाराने तिला फार दुःख झाले. चांगल्या घराला आग लागावी किंवा लाकडाला अग्नी लागावा तसा माझा मुलगा वाया जाईल म्हणून त्याला दोन बोधाच्या गोष्टी सांगण्यासाठी पुष्कळ दिवस ती संधी पाहात होती.

माघ महिन्यात एक दिवस मैनावती महालाच्या गच्चीवर ऊन घेत बसली होती. त्याचवेळी गोपीचंद राजा खालच्या रत्नखचित

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चंदनाच्या चौरंगावर विलासात स्नान करण्याच्या बेतात होता. परिचारिका गरम पाणी आणून देत होत्या. राजसेवकांचा भोवती गराडा होता. यावेळी वर मैनावतीला गोपीचंदाचे हे सुंदर शरीर नष्ट होणार म्हणून फार वाईट वाटत होते. तिला इतके दु:ख झाले, की तिला रडूच आले. तिचे ते गरम अश्रू नेमके राजाच्या अंगावर पडले. तेव्हा गरम पाणी कुठून पडले म्हणून राजा पाहू लागला. मग त्याला गच्चीवर आई रडत असल्याचे दिसले. राजा तसाच आईजवळ गेला आणि तिच्या पाया पडून तो म्हणाला, 'आई, तुला रडायला काय झाले, ते कृपा करून मला सांग. तुला कोणी छळले का ते सांग. लगेच त्याचा मी बंदोबस्त करतो. माझा कोप कोणीही सहन करणार नाही. जर मी तुझे दु:ख निवारण करू शकलो नाही तर माझा धिक्कार असो. तुला समाधान लाभण्यासाठी मी काहीही करीन, ते करताना देह गमवावा लागला तरी हरकत नाही. तू काही काळजी करू नको.'

मुलाचे हे बोलणे ऐकून मैनावती म्हणाली, 'प्रतापी अशा गोपीचंद राजाची मी माता असताना मला गांजणारा असा कोण आहे? परंतु माझे दु:ख निराळेच आहे. तुझे वडील तुझ्यासारखेच स्वरूपवान होते; पण काळाचे पाश पडताच त्यांचा देह क्षणात भस्म झाला. आता तुझीही अशीच गत होणार म्हणून मला फार वाईट वाटते. शरीराची व्यर्थ माती होऊ न देता, नरदेहाचे सार्थक करण्याची युक्ती काढावी, असे मला वाटते. आपले हित होईल तितके करून घ्यावे. अरे गोपीचंदा, ह्या क्षणभंगुर ऐश्वर्यास न भुलता देहाचे सार्थक करून घे आणि अमर हो.'

आईच्या मनातील हे दु:ख ऐकल्यावर राजा तिला म्हणाला, 'आई, तुझे म्हणणे खरे आहे. पण आता असा गुरू कोठे मिळणार? तो अमर असला पाहिजे, तरच तो मला दिव्यवाणी सांगेल.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मुलाचा हा प्रश्न ऐकून मैनावती म्हणाली, 'बाळा, जालिंदरनाथ हा त्या योग्यतेचा आहे. सध्या तो आपल्या गावात आला आहे. तू त्याला शरण जा आणि ह्या नाशवंत ऐश्वर्याचा लोभ सोडून त्याच्याकडून आपले शरीर अमर करून घे.'

हे ऐकून गोपीचंद म्हणाला, 'पण मला माझी बायकामुले, आप्त, सोयरे, सुखसंपत्ती, राजवैभव सर्वांना सोडून द्यावे लागेल, आणि आज हे शक्य नाही. तर मला आणखी बारा वर्षे सर्व वैभव भोगू दे. मग मी गुरूस शरण जाऊन योगमार्गाचा स्वीकार करीन व उत्तानपाद राजाच्या पुत्राप्रमाणे ब्रह्मांडात कीर्ती मिळवीन.'

यावर मैनावती म्हणाली, 'मला, या देहाचा एक क्षणभर सुद्धा भरवसा नाही आणि तू तर बारा वर्षांची गोष्ट बोलतोस ! अरे, बारा वर्षे कोणी पाहिली आहेत? चित्त, वित्त आणि जीवित हे अशाश्वत आहे. कोणत्या वेळेस काय प्रसंग ओढवेल, त्याचा काय नेम !'

मैनावतीचा हा उपदेश गोपीचंदाची राणी लुमावती लपून ऐकत होती. ते सर्व ऐकून तिला अतिशय दुःख झाले. ती मनात विचार करू लागली, 'ही आई नव्हे, वैरीणच आहे. वैभव भोगायचे सोडून ही त्याला जोगी व्हायला सांगत आहे. आता याला काय उपाय करावा ?' हा विचार तिच्या मनात येऊन ती आपल्या सदनात गेली.

मैनावतीचा उपदेश ऐकून गोपीचंद म्हणाला,' मातुःश्री,जर तुमची अशी इच्छा आहे तर मीही तुमच्या मर्जीविरुद्ध वागत नाही. पण जालिंदरनाथाचा प्रताप कसा आहे तो मी माझ्या डोळ्यांनी पाहीन आणि त्याच्यापासून माझे हित होईल अशी माझी खात्री झाली की मग मी माझे सर्वच त्यांना देईन.'

अंतःपुरात राणी लुमावती निराळेच प्रयत्न करू लागली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तिने आपल्या सर्व सवतींना बोलावले. त्यांचा आदरसत्कार केला व त्यांना ती म्हणाली, ' सासूबाईंच्या मनात विपरीत करणी आली आहे. जालिंदर नावाचा कोणी एक ढोंगी गावात आला आहे. त्याचा अनुग्रह देऊन राजाला जोगी बनवण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांचे बोलणे प्रत्यक्ष मी आपल्या कानांनी ऐकले आहे, राजाचेही मन वळले आहे. खांब कोसळला की घरही कोसळते. राजाला या विचारापासून परावृत्त करण्याची युक्ती तुम्ही शोधा.'

लुमावतीने सवतींच्या मनात अशा तऱ्हेने संशय भरवून त्यांची मने दूषित केली. परंतु चांगली युक्ती कुणालाचा सुचेना. त्या सर्वजणी नुसत्या काळजीत पडल्या व रडू लागल्या. ते पाहून लुमावती म्हणाली, ' मैनावतीवर आपण कुभांड घेतल्याशिवाय या पेचातून सुटका होणे शक्य नाही. आपण राजाला असे सांगू की, जालिंदर नावाचा कोणी बैरागी गावात आला आहे. मैनावतीला कामविकार सहन होत नसल्याने ती त्याच्याकडे जाते. तसेच राजाला बैरागी बनवून तीर्थयात्रेस पाठवावे आणि जालिंदरास राज्यावर बसवून निर्धास्तपणे जालिंदराबरोबर विषयविलासाचा उपभोग घ्यावा, असा त्यांचा हेतू आहे, असे आपण सांगितले की, साहजिकच राजाचा कोप वाढेल आणि तो जालिंदराचा नाश करील.'

दुसरे दिवशी राजा दिवसभर राज्यकारभार पाहून रात्री लुमावतीकडे गेला, तेव्हा तिने त्याला कनकासनावर बसविले व गोड गोड बोलून वश करून घेतले. मग हात जोडून ती म्हणाली, ' माझ्या कानी एक वार्ता आली आहे. पण ती तुम्हाला सांगायला मला भीती वाटते आणि न बोलता ती तशीच ठेवली तर महाअनर्थ घडेल असे वाटते. अशा तऱ्हेने दोन्ही बाजूंनी मी पेचात सापडले आहे.'

यावर राजा तिला म्हणाला, ' तू मनात काही न ठेवता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

निर्भयपणे सर्व मला सांग.'

मग तिने त्याच्याकडून अभय वचन घेतले व नंतर सर्व गोष्ट त्याला समजावून सांगितली आणि ती म्हणाली, ' आता आपण, बारकाईने विचार करून जे बरे-वाईट असेल ते करा.'

लुमावतीने सांगितलेली सर्व हकीकत राजाला खरी वाटली व तो रागाने लाल झाला. त्याने ताबडतोब प्रधानास सांगून दुसऱ्या रात्री जालिंदरास आणवले व एक मोठा खड्डा बनवून त्यात त्याला पुरले. नंतर त्यावर घोड्याची लीद टाकून खड्डा बुजवून टाकला. राजाने हे काम गुप्तपणे उरकले आणि ही गोष्ट बाहेर फोडायची नाही म्हणून सर्वांस ताकीद दिली. राजा प्राण घेईल या भीतीने ही गोष्ट कोणी उघड केली नाही व मध्यरात्रीच्या सुमारास हे काम उरकल्याने लोकांनाही समजले नाही. सकाळी जालिंदर कोठे दुसरीकडे निघून गेल्याचे गावभर पसरले. तो बैरागी असल्याने लोक त्याच्याविषयी अनेक तर्क करू लागले. गुरू निघून गेल्याची बातमी परिचारिकांनी मैनावतीस सांगितली, तेव्हा तिला फार दुःख झाले. पुत्राला अमर करून घेण्याचा बेत तसाच राहून गेला. त्यामुळे मैनावती फार दुःखी झाली.

जालिंदरनाथ त्या खड्ड्यात वज्रासन घालून आकाशास्त्राची योजना करून स्वस्थ राहिला. आकाशास्त्र सभोवती असल्याने लीद वरच्यावर राहून गेली. त्यामुळे खड्ड्यातही तो अगदी सुरक्षित राहिला होता.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १५ वा

(कानिफा-मारुतीचे युद्ध)

इकडे गोरक्षनाथ व कानिफनाथ या दोघांनी बद्रिकाश्रमात बारा वर्षे तपश्चर्या केली. तपश्चर्या पूर्ण झाल्यावर दोघे निरनिराळ्या दिशेने आपापल्या गुरूचा शोध करण्यासाठी निघाले, पण गुरूचा शोध कोठेही न लागल्यामुळे ते दोघे अस्वस्थ झाले. त्यांचे प्राण कंठाशी आले. गुरूच्या वियोगामुळे त्यांच्या डोळ्यातून घळघळा अरू ओघळू लागले. अशा स्थितीत ते देशोदेशी निरनिराळ्या ठिकाणी फिरत होते.

गोरक्षनाथ फिरत फिरत गौडबंगाल देशातील हेलापट्टणास आला. त्या गावच्या वेशीजवळ त्याने मुक्काम केला. तेथल्या गावच्या रक्षकांनी अलख म्हणून त्याला नमस्कार केला. तेव्हा गोरक्षाने त्यांना मच्छिंद्रनाथाबद्दल विचारले. तेंव्हा ते म्हणाले, ' तुम्ही म्हणता तो गोसावी येथे आला नव्हता, पण जालिंदर नावाचा एक गोसावी आला होता. तो सूर्यासारखा तेजस्वी होता. आधाराशिवाय त्याच्या डोक्यावर गवताचा भारा रहात असे. तो रानांतून गवत आणून गावातील गायींना घालत असे. तो येथे सुमारे एक वर्ष राहिला होता. पण पुढे तो केव्हा व कुठे गेला हे आम्हाला कळले नाही, परंतु आता या गावात सहा वर्षे झाली तो नाही.

त्या रक्षकांनी सांगितलेली हकीकत ऐकून ते वेष पालटून येथे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आले होते की काय अशी कल्पना त्यांच्या मनात येऊन गेली. नंतर तो गावात भिक्षेला गेला. तो घरोघर भिक्षा मागत फिरत असता जेथे जालिंदरास पुरले होते तेथे गेला व त्याच्या तोंडून ' अलख ' असा शब्द येताच आतून जालिंदरनाथाने ' आदेश ' केला. तेव्हा गोरक्षनाथाने ' आदेश ' म्हणून त्याचे नाव विचारले. तेव्हा तो आतून म्हणाला, ' मला जालिंदर म्हणतात. तुझे नाव काय ? आणि तुझा गुरू कोण ?'

तेव्हा गोरक्षनाथाने सांगितले, ' माझा गुरू मच्छिंद्रनाथ व मला गोरक्ष म्हणतात.'

' मग तमची ही अशी अवस्था कशी झाली ?' असे गोरक्षाने विचारल्यावर जालिंदराने त्याला घडलेली हकीगत सविस्तर सांगितली.

ती ऐकून गोरक्षनाथ रागावून गोपीचंद राजाचा समूळ नाश करून टाकण्यासाठी जालिंदरनाथाजवळ आज्ञा मागू लागला. पण पुढील भविष्य जाणून जालिंदरने त्याला असे करण्यास मनाई केली. तो म्हणाला. तो म्हणाला, ' सध्या तू त्या भरीस पडू नको. पण तुझी व माझा शिष्य कानिफ यांची जेव्हा भेट होईल तेव्हा त्याला मात्र तू हे सर्व वृत्त सांग. तो येथे येऊन हरप्रयत्नाने नाथपंथाच्या उत्कर्षासाठी राजाला आपलेसे करून मला येथून बाहेर काढील व हा पंथ वाढवील. तेव्हा हे सर्व नीट लक्षात ठेवून आता तू तीर्थयात्रेस जा.' मग गोरक्षनाथ फिरत फिरत जगन्नाथास गेला.

इकडे कानिफनाथ गावोगाव उपदेश करीत चालला होता. अनेक लोकही त्याचे शिष्य होत होते. गावोगावचे सातशे शिष्य जमा झाले. मग ते फिरत फिरत स्त्रीराज्याच्या जवळ जाऊन पोहोचले. स्त्रीराज्यात कोणी पुरुष सहसा वाचू शकत नाही हे सर्वांना ऐकून माहीत होते. त्यामुळे कोणीच पुढे जायला धजेना; पण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कानिफनाथाचा रोख स्त्रीराज्यात प्रवेश करण्याचा दिसल्यावर सर्व शिष्यमंडळी घाबरून गेली, पण पुष्कळांची अशी श्रद्धा होती की, गुरूचे पाय धरल्यावर जिवाचे भय कशासाठी ? तन-मन-धन सर्व आपण पूर्वीच ह्याला अर्पण केले आहे, मग आता जिवाच्या आशेने व्रतभंग करणे योग्य नव्हे.

सर्व लोक घाबरल्याचे कानिफाच्या लक्षात आले. मग त्याने स्पर्शास्त्रमंत्र म्हणून भस्म तिन्ही दिशांकडे फेकून दिशा-बंधन केले. त्यामुळे स्त्रीराज्याचा मार्ग मोकळा झाला. शिवाय बाकीच्याही सर्व दिशा भारून टाकल्या. त्याला असे करण्याची दोन कारणे होती. पहिले म्हणजे शिष्य पळून जाऊ नयेत व दुसरे म्हणजे मारुतीचा भुभु:कार तेथपर्यंत पोहोचू नये. याप्रमाणे सर्व व्यवस्था करून त्याने आपल्या शिष्यांना जवळ बोलावून सांगितले, 'मला आता स्त्रीराज्यात जायचे आहे. पण तो देश फार कठीण आहे. तेथे मारुती नेहमी भुभु:कार करीत असतो; त्यामुळे कोणीही पुरुष तेथे वाचू शकत नाही. पुढचे सर्वच देश कठीण आहेत. तरीही त्या देशात यात्रा करून याव्या, अशी माझी फार इच्छा आहे. जालिंदरनाथ गुरूंच्या चरणी माझा खरा विश्वास आहे. धोका न होता सर्व अडचणी पार पाडून मी सुरक्षित परत येईन. तर याबाबतीत तुमचा काय विचार आहे ? ज्यांची गुरूच्या चरणी पूर्ण निष्ठा असेल, त्यांनी माझ्याबरोबर नि:संशय मनाने यावे. ज्यांचा आपल्या जिवावर विश्वास नाही आणि ज्यांना जीवलोभ असेल त्यांनी खुशाल घरी परत जावे.'

कानिफनाथाने असे सांगितल्यावर त्याच्या सातशे शिष्यांपैकी फक्त सात जण त्याच्याबरोबर राहिले व बाकीचे सर्व परत जाण्यास निघाले. ते गुपचूप परत जाणार होते; पण त्यामुळे मूर्खपणा माथी पदरी आला असता. गुरुजींनी अंतर ओळखून आपणहोऊन स्वखुशीने जायची परवानगी दिली, हे पाहून त्यांना फार समाधान वाटले. ते

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आनंदाने परत निघाले, परंतु ते गावच्या सीमेपर्यंत सुमारे एक कोस गेले असतील-नसतील तो तेथे स्पर्शास्त्राने ते जमिनीला चिकटून बसले. मग हाताने पाय सोडवण्याचा ते प्रयत्न करू लागले. पण त्यामुळे त्यांचे हातही जमिनीला चिकटले.

इकडे कानिफनाथाने सात शिष्यांना बोलावून सांगितले, 'तुम्ही तिकडे जाऊन जे ओणवे होऊन चिकटले आहेत, त्यांच्या पाठीवर एक-एक दगड ठेवा.'

गुरूची आज्ञा होताच ते सातजण बाकीच्यांचा शोध घेत तेथे गेले. या सातांना पाहताच बाकीच्या सर्वांना लाज वाटली. त्यांनी आपल्या माना खाली घातल्या. मग त्यांनी त्यांची खरडपट्टी काढून गुरूने सांगितल्याप्रमाणे त्यांच्या पाठीवर दगड ठेवले. तेव्हा ते दगडही त्यांच्या पाठीला चिकटले. ते मुक्त होण्यासाठी रडतच प्रार्थना करू लागले. ते पाहून सात शिष्य म्हणाले, ' जिवाची आशा धरून येथे खुशाल रहा. गुरुजी देश पाहून आल्यावर तुम्हाला सोडवून नेऊ. संकट आल्यावर जर पळ काढायचा तर मग गुरू कशाला करायचा ? जशी क्रिया तसे फळ असते.'

सर्वांनी त्या सातांजवळ क्षमायाचना केली. आम्हाला गुरूची प्रतापशक्ती कळली. आता आम्ही प्राण गेला तरी गुरुचरण सोडणार नाही असे सांगितले. त्यांची ही विनवणी शिष्यांनी कानिफाच्या कानी घातली. ती ऐकून कानिफाचे अंत:करण द्रवले. त्याने लगेच विभक्तास्त्र म्हणून भस्म दिले. ते एका शिष्याने सर्वांना लावताच त्यांची सुटका झाली. मग त्या सर्वांनी गुरूचे पाय धरले. पुढे सर्व शिष्यांसह कानिफा स्त्रीराज्याच्या वेशीवर जाऊन तळ देऊन राहिला.

इतक्यात एक चमत्कार घडला. मारुती भुभु:कार करण्यासाठी सेतुबंध रामेश्वराहून रात्री स्त्री-राज्यात जात असता तो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कानिफाच्या स्पर्शास्त्राच्या सीमेत सापडला. पण महाबलाढ्य मारुतीने त्या अस्त्राला दाद दिली नाही. तो त्यांच्या वस्तीपर्यंत येऊन पोहोचला. तेव्हा स्पर्शास्त्राची योजना पाहताच येथे कोणी तरी प्रतापी वीर असला पाहिजे असे त्याच्या मनात आले. सीमेजवळ येताच त्याला नाथपंथाचे लोक दिसले.

त्यांना पाहून मारुतीला वाटले की, आपण मोठ्या कष्टाने स्त्रीराज्यात पाठवलेल्या मच्छिंद्रनाथाला हे लोक उपदेश करून त्याचे मन वळवतील. मग तोही त्यांच्याबरोबर परत येईल. मग राणीला वाईट वाटले व तिच्या मनातील इच्छा मनातच रहातील. म्हणून त्यांना निर्बल करून परत पाठविण्यासाठी मारुतीने अतिविशाल असे भीमरूप घेतले आणि भुभु:कार केला.

तो प्रचंड भुभु:कार ऐकून सर्व शिष्य घाबरून स्वामींच्या आड लपून बसले आणि रक्षण करण्याकरता गुरूला विनंती करू लागले. आपल्या शिष्याचे अवसान गळालेले बघून कानिफनाथाने त्यांना पुष्कळ धीर दिला व सांगितले, ' की हा तुमचे काही करू शकणार नाही. पुढे काय चमत्कार होतो ते धीर धरून पाहा. तुम्ही अजिबात घाबरू नका.'

नंतर कानिफाने वज्रास्त्र मंत्रून फेकले. मारुतीने ते पाहिल्यावर त्याने लगेच आवेशाने मोठमोठे प्रचंड पर्वत कानिफाच्या अंगावर फेकायला प्रारंभ केला. परंतु वज्रास्त्राच्या सहाय्याने पर्वताचे चूर्ण होऊन जाई. मग मारुतीने वज्रमुष्टीचा प्रहार करताच वज्रास्त्र निश्चेष्ट पडले. मग कानिफनाथाने कालिकास्त्र, अग्न्यस्त्र, वासवास्त्र, वाय्वास्त्र अशा एकापेक्षा एक वरचढ अस्त्रांची योजना केली. अग्न्यस्त्राला वाय्वास्त्राचे चांगले पाठबळ मिळाल्याने सगळीकडे गोंधळ उडवून दिला. कृतान्त सर्वांना गिळायला आला असे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

परिस्थिती उत्पन्न झाली. मग मारुतीने खूप प्रयत्न केले, पण व्यर्थ! त्याचें कानिफापुढे काहीच चालेना. तो जेरीस येऊन वायूला उद्देशून म्हणाला, ' मी तुझा मुलगा असता, माझा तू प्राण घेऊ पाहात आहेस? हा अनर्थ पाहून कोणत्या बापास सुख वाटेल ?'

मारुतीची विनवणी ऐकली आणि पुत्राच्या प्रेमासाठी वातास्त्र क्षीण झाले. मग कानिफाने मोहिनी अस्त्राची योजना केली. त्यामुळे मारुती काहीसा भ्रांत झाला; तरीही त्याने अग्न्यस्त्र समुद्रात झुगारून दिले; त्यामुळे समुद्राचे पाणी मात्र उकळू लागले आणि जलचर घाबरून गेले. मूर्तिमंत समुद्र येऊन पाहू लागला; तेव्हा कानिफा व मारुती ह्यांचे जोरात युद्ध चाललेले त्याला दिसले.

मारुती सर्व उपाय योजून कानिफाचा पराभव करू पाहात होता. परंतु कानिफाची शक्ती कमी झाली नाही. उलट मारुतीच मूर्च्छा येऊन जमिनीवर कोसळला. तेव्हा स्वत: वायू पुत्रमोहामुळे मारुतीजवळ गेला. इतक्यात मारुती सावध झाला आणि तो पुन्हा युद्धाच्या तयारीला लागला. हे पाहून वायूने त्याचा हात धरला व त्याला सांगितले, हे नाथ मोठे सबळ आहेत. त्यांच्याशी तू युद्ध करू नको. पूर्वी मच्छिंद्रनाथाने तुझी कशी दुर्दशा करून सोडली ते आठव. वाताकर्षण विद्या यांच्या हातात आहे. म्हणून यांच्याशी सख्य करून तुझे कार्य साधून घे. मैत्रीसारखी दुसरी युक्ती तरी मला दिसत नाही. मग समुद्राने व वायूने मारुतीला कानिफाजवळ नेले व मोठ्या प्रेमाने त्याला भेटले. कानिफानेही प्रेमाने तिघांना नमस्कार केला; आणि युद्ध करण्याचे कारण मारुतीला विचारले.

त्यावर मारुती म्हणाला, ' मी मोठ्या प्रयत्नाने मच्छिंद्रनाथास स्त्रीराज्यात पाठवले. पण हे लोक त्याला उपदेश करतील आणि येथून आपल्या देशाला घेऊन जातील, म्हणून मी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

युद्धास आरंभ केला. दुसरा कोणताही हेतू नव्हता. मच्छिंद्रनाथास त्रास देणार नाही असे मला वचन देऊन त्यांनी खुशाल स्त्रीराज्यात जावे.'

मारुतीचा शब्द कानिफाने मान्य केला. त्याला हवे ते वचन दिले. मग अग्नी, वायू व मारुती समाधानाने आपापल्या स्थानी गेले. रात्री तेथेच मुक्काम करून पहाटे कानिफा आपल्या शिष्यांसह राजद्वारी गेला. तेव्हा रक्षकांनी चौकशी करून सातशे शिष्यांसह कानिफनाथ नावाचा जती आल्याची गोष्ट राज्यसभेत कळविली. मच्छिंद्रनाथ लगेच दचकले. गोरक्षनाथ आपले नाव बदलून मला न्यायला आला असला पाहिजे, असे वाटून मच्छिंद्रनाथाला वाईट वाटले. आता तो आपणाला इथे राहू देणार नाही आणि आपण या विषयविलासाच्या सुखाला अंतरणार, असा विचार त्याच्या मनात येऊन तो उदास झाला.

मग त्यांना गावात न्यावे असा विचार करून मच्छिंद्रनाथ पालखीत बसला आणि त्यांना भेटायला गेला. दोघांच्या भेटी झाल्या. मोठ्या थाटात त्या सर्वांचे स्वागत केले गेले. भरजरी गालिच्यावर सर्वांना बसविले. मग एकमेकांची विचारपूस झाली. दोघांचे पुष्कळ बोलणे झाले. मच्छिंद्रनाथाने त्यास हत्तीवर बसवून मोठ्या आदराने गावात आणले व एक महिनाभर आग्रहाने ठेवून घेतले.

✱✱✱

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १६ वा

(कानिफाची व गोपीचंदाची भेट)

स्त्रीराज्याच्या राजधानीत मच्छिंद्रनाथाने कानिफास ठेवून घेतल्यानंतर त्याची उत्तम व्यवस्था ठेवली. त्यात एक हेतू होता. कानिफनाथ इथून गेल्यावर तो माझी वार्ता गोरक्षाला सांगेल आणि मग तो मला न्यायला येईल. यासाठी कानिफाने इथून जाऊ नये म्हणून त्याने कानिफाची उत्तम व्यवस्था केली. मच्छिंद्रनाथ कानिफाच्या शिबिरात देवांनाही भुलविणाऱ्या स्त्रिया पाठवू लागला. पण त्याचे श्रम वाया गेले. कानिफनाथाचे शिष्यही स्त्रियांच्या हाती सापडेनात. त्या सर्व प्रयत्न करून थकल्या, पण त्यांचा हेतू सफल झाला नाही. अशा तऱ्हेने महिनाभर राहिल्यावर कानिफाने मच्छिंद्राजवळ जाण्यासाठी परवानगी मागितली आणि ती त्याने दिली; तेव्हा हत्ती, घोडे, उंट, पालख्या, उंची वस्त्रे, हिरे, माणके व विपुल द्रव्य अशा मोठ्या लवाजम्यासह मच्छिंद्रनाथाने कानिफाची रवानगी केली.

कानिफनाथ स्त्रीराज्यांतून निघून गौडबंगाल इ. तीर्थयात्रा करीत हिंडत राहिला. तो ज्या गावी जात असे, तिथले लोक त्याचा उत्तम आदरसत्कार करीत. अनेकांनी त्याचे शिष्यत्व पत्करले. प्रत्येकजण त्याची तोंडभरून स्तुती करी व मोठ्या हौसेने दूरदूरचे लोक येऊन त्याला आपल्या गावास घेऊन जात. याशिवाय लोकांच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मनात याच्याविषयी आदरभाव निर्माण होऊ लागला.

इकडे गोरक्षनाथ जगन्नाथहून तीर्थयात्रा करीत येत असताना त्याची व कानिफाची एका अरण्यात भेट झाली. उभयतांनी विचारपूस केली. मग कानिफाने भरजरीचा गालीचा पसरून त्यावर गोरक्षास आपल्याजवळ बसवून घेतले. त्याच्या गुरुपरंपरेची चौकशी केली. त्यावेळी गोरक्षनाथाची विद्या कशी काय आहे ते पाहावे असे कानिफाच्या मनात आले. तो म्हणाला, ' त्या पलीकडच्या आंब्याच्या झाडावर जी पाडाची मधुर फळे तयार झालेली दिसत आहेत, त्यातून थोडीशी आणावीस असे माझ्या मनात आहे.'

यावर गोरक्षनाथ म्हणाला, ' इतका खटाटोप कशासाठी ? आपल्याला काही त्याची गरज नाही.'

' त्यात कसला आला आहे खटाटोप ? आत्ता शिष्यांना पाठवून ते आंबे तोडून आणवतो.' कानिफनाथ म्हणाला.

यावर गोरक्षनाथ म्हणाला, ' आता शिष्य जवळ नसेल तर आपण काय करावे ? आपल्या विद्येच्या प्रभावाने फळे तोडून विद्येचा प्रताप व गुरूचा प्रसाद उजेडात आणावा व ती फळे खाऊन संतुष्ट राहावे.'

तेव्हा कानिफाने सांगितले, ' तुमची जर अशी इच्छा असेल तर मी गुरूच्या कृपेने आत्ता फळे आणतो.

असे म्हणून त्याने विभक्तास्त्राने भस्म मंत्रून त्याबरोबर आकर्षणास्त्राची योजना केली व भस्म फेकले. त्याबरोबर पिकलेले सर्व आंबे झाडावरून त्याच्याजवळ आले. मग सर्वांनी ते आंबे खाल्ले व तृप्त झाले. नंतर गोरक्षनाथाच्या मनात विचार आला की, ' कानिफनाथाने तर आपले कर्तृत्व मला दाखवले. तेव्हा आपणही त्याला आपली विद्या दाखवावी.' या विचारासरशी तो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कानिफनाथाला म्हणाला, ' तुम्ही माझा पाहुणचार केलात. आता मी काही फळे आणतो. ती चवीने आपण खावी.'

मग त्याने आकर्षणशक्ती व विभक्तास्त्र जपून भस्म फेकताच एका लवंगवनातील विविध फळे जवळ येऊन पडली. ती मधुर फळे खाऊन सर्वांचे समाधान झाले. मग गोरक्षनाथ म्हणाला, ' ही उरलेली फळे पुन्हा परत झाडावर होती तशी करावी.'

तेव्हा कानिफाने हे अशक्य असल्याचे सांगितले. यावर गोरक्ष म्हणाला, ' निस्सीम गुरुभक्ताला काहीच अवघड नाही. तो दुसरा ब्रह्मदेवही निर्माण करू शकेल. मग यात अडचण काय आहे? मी माझ्या सद्‌गुरूच्या कृपेने पाहिजे ते करू शकेन.'

गोरक्षनाथाचे हे गर्वाचे बोलणे ऐकून कानिफनाथास राग आला. तो म्हणाला, ' मी तुला व तुझ्या गुरूला चांगला जाणतो. तो नरकात पिचत पडला आहे. तो स्वतःला योगी म्हणवितो आणि स्त्रीराज्यात रमतो आहे. तो मेनिकानाथ झाला आहे. ब्रह्मदेवाला शक्तिहीन समजून मोठमोठ्या चढाओढीच्या गोष्टी मात्र तू करतो आहेस.'

अशा प्रकारचे भाषण ऐकून घेतल्यावर गोरक्षनाथ म्हणाला, ' तू हे चावटपणाचे बोलणे सोडून दे. तुझ्या तरी गुरूची तुला वार्ता आहे का ? तो जालिंदरनाथ हीनदीन होऊन आज दहा वर्षे घोड्याच्या लिदीत पिचत आहे. स्वतःहून सुटण्याची त्याच्या अंगात धमक नाही; म्हणून तिथे कुजतो आहे. गौडबंगाल देशात हेलापट्टणाच्या गोपीचंद राजाने वस्तादपणा करून त्याला लिदीच्या खड्ड्यात पुरले आहे. शाबास त्या राजाची ! माझा गुरू तर अशा प्रतीचा नाही. हे ब्रह्मांड हलवून टाकील अशी त्याची शक्ती आहे. त्याच्या कृपेचा चमत्कार दाखवतो पाहा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे म्हणून संजीवनी मंत्र जपून भस्म फेकताच ती उरलेली फळे झाडावर लटकू लागली, ते पाहून कानिफा चकित झाला. त्याने गोरक्षाची वाहवा केली. मग प्रेमाने त्याला आलिंगन दिले व म्हणाला, ' माझ्या जालिंदर गुरूचा मला शोध लागला, हा मला मोठा लाभ झाला आहे.'

मग गोरक्षनाथ म्हणाला, ' हे खरे आहे, की माझ्या योगाने जसा तुला तुझ्या गुरूचा शोध लागला, तसा तुझ्या योगाने मला माझ्याही गुरूचा शोध लागला. आजचा योग खरोखरच उत्तम म्हटला पाहिजे.'

मग त्यांनी एकमेकांस नमस्कार केला आणि गोरक्षनाथ स्त्रीराज्याकडे व कानिफनाथ हेलापट्टणास निघाले.

आपला गुरू जालिंदरनाथ ह्यास गोपीचंद राजाने पुरून टाकल्याची वार्ता कळताच कानिफाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. केव्हा एकदा त्याचा सूड उगवीन असे त्याला झाले. तो सर्व शिष्यांसह हेलापट्टणाच्या अरण्यात येऊन राहिला. कानिफा आल्याची बातमी लागताच गोपीचंद राजा परिवारासह त्याच्या स्वागताला सामोरा गेला. त्याला मनापासून गुरू करण्याची राजाची इच्छा होती. हत्ती, घोडे, उंट, पालख्या, तंबू, डेरे, राहुट्या येऊन मोठ्या वैभवाने सातशे शिष्यांसह कानिफनाथ देशपर्यटन करीत होता.

कानिफनाथास नगरात आणायला राजा आपल्या एक सहस्र सातशे सरदारांसह व असंख्य फौजेनिशी जात असता वाटेत तो प्रधानाला म्हणाला, ' दैवयोगाने या नगरात आज सिद्धपुरुषाचे पाय लागले आहेत; त्याला गुरू करावा असे माझ्या मनात आहे. हा गुरू मला योग्य असाच आहे. माझ्या वैभवाप्रमाणे ह्याचेही वैभव आहे. आमच्या मातु:श्रींनी जो गुरू केला तो अगदी कंगाल, घाणेरडा असा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होता. मी राजा आहे; तेव्हा माझ्या पंक्तीस बसण्यास राजेलोकच योग्य. जालिंदर पिशाचासमान भटकणारा, घाणेरड्या जागेत रहाणारा व दरिद्री असा गुरू माझ्या आईने केला. माझ्यासारख्या वैभवसंपन्न राजाला गुरू करायचा म्हणजे तो असाच ऐश्वर्यवान असायला पाहिजे. हा कानिफनाथ मला सर्व दृष्टीने योग्य असाच गुरु आहे.'

असे बोलून राजा मोठ्या संभारासह कानिफनाथास आणावयाला गेला. कानिफनाथाने गोपीचंद राजाला पाहिले मात्र ! त्याचा क्रोध उफाळून वर आला, परंतु संयमाने त्याने राग आवरला. कारण जर ह्याला आत्ताच शाप देऊन भस्म केला तर, ह्याच्याकडून मोठा कार्यभाग साधायचा आहे तो तसाच राहून जाईल. शिवाय आपल्या गुरूची अवस्था काय आहे तेही आपल्याला पूर्ण माहीत नाही. तेव्हा आधी गुरुचरण पाहू. ह्याच्याकडून सर्व माहिती काढून घेऊन, नंतर ह्याला शिक्षा करू, असा विचार करून तो स्तब्ध राहिला.

गोपीचंद राजा अगदी जवळ येऊन कानिफनाथाच्या पाया पडला व विनंती करू लागला, ' महाराज, दैवयोगाने मल अनाथाला सनाथ करा. गंगेचा ओघ आज माझ्याकडे वळू द्या.'

राजाचे हे लीनपणाचे बोलणे ऐकून कानिफनाथास आनंद झाला. त्याच्या हृदयात क्रोध होता, तरी त्याने शांती धारण केली होती. त्याने राजाचा हात धरून त्याला आपल्या शेजारी बसवून घेतले. मग क्षेमकुशल विचारल्यावर तो राजाला म्हणाला ' राजा, तुझ्या हातून एक मोठे अनुचित कर्म घडले आहे. परंतु तुझे भाग्य सबळ आहे, म्हणून मी शांत आहे. नाही तर ह्या वेळेस मोठा अनर्थ होऊन तुझ्या प्राणावर बेतले असते. आता गावात चल, तेथे सर्व वृत्तांत मी निवेदन करीन.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मग राजाने त्याला पालखीत बसवून राजवाड्यात आणून सुवर्णाच्या आसनावर बसविले. षोडश उपचारांनी त्याची यथासांग पूजा केली. वस्त्रे-भूषणे दिली व अनुग्रह घेऊन शिष्य होण्यास उत्सुक असलेला पाहून कानिफनाथ राजाला म्हणाला, ' तू माझा अनुग्रह घ्यावयास पाहतो आहेस, पण दुधात मीठ घातल्याप्रमाणे तुझ्या हातून एक वाईट गोष्ट घडली आहे. अरे, ज्याच्यापासून मी अनुग्रह घेतला आहे, तो माझा गुरू जालिंदरनाथ याला तू घोड्याच्या लिदीत पुरून टाकले आहेस. परंतु तुझे आयुष्य पुष्कळ व तुझ्या आईची पूर्व-पुण्याई जोरदार म्हणून माझा राग शांत झाला, नाही तर जालिंदरनाथाने तुला तुझ्या वैभवासकट एका क्षणात भस्म करून टाकले असता.'

हे ऐकून राजा घाबरला. त्याला कापरे भरले. तो कानिफाच्या पायावर मस्तक ठेवून म्हणाला, ' महाराज, माझ्याकडून घडलेल्या अन्यायाची मला क्षमा करावी आणि शरण आलेल्या या दासावर कृपा करावी. तुम्ही संत जगाचे मायबाप आहात.' मग तो कानिफाला घेऊन आपल्या शिबिरात गेला. हा सर्व वृत्तान्त दासींनी मैनावतीस जाऊन सांगितला. मैनावतीच्या दासी पुढे असेही म्हणाल्या की, ' कानिफा या नावाचा जालिंदराचा शिष्य आला असून त्याच्याबरोबर गोपीचंद राजा शिबिरात गेला आहे, तेथे जे घडले ते नंतर कळवू.'

गोपीचंद राजाने जालिंदरास लिदीत पुरल्याचे ऐकून मैनावतीला फार राग आला व वाईटही वाटले. पण पुत्रप्रेमामुळे त्याला शासन होऊ नये असे तिला वाटले.

एके दिवशी संध्याकाळी कानिफनाथाने राजाला राजवाड्यात जाण्याची आज्ञा दिली. राजा राजवाड्यात येऊन प्रथम मैनावतीच्या पाया पडला व घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली आणि आपल्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अपराधाबद्दल कानिफाने आपणास क्षमा करावी म्हणून त्याची विनवणी करायला मातेला विनंती केली. त्या कामासाठी मैनावती कानिफनाथाजवळ शिबिरात गेली व त्याच्या पाया पडून त्याच्या जवळ बसली. मग विचारपूस झाल्यावर, ' मी जालिंदरनाथास गुरू केलेला आहे व आपणही तोच गुरू केला आहे.' असे कानिफनाथाला तिने सांगितले. त्यावर कानिफा म्हणाला, ' मग आपण आपल्या गुरूची अवस्था अशी कशी होऊ दिलीत ?'

तेव्हा तिने सांगितले, ' गुरूच्या पुत्राने अशी अवस्था केल्याची बातमी मला आजच कळली.'

मग तिने आपली प्रारंभापासूनची सर्व हकीगत त्याला सांगितली. शेवटी गोपीचंदाचे अपराध पोटात घालून त्याला पदरात घ्यावे आणि जालिंदरनाथाच्या कोपाग्नीत न होरपळू देता आपल्या पुत्रास निर्भय करावे म्हणून तिने विनंती केली. पुढे ती म्हणाली, ' गुरूला कुपातून काढून या ब्रह्मांडात आपला कीर्तिध्वज फडकेल असे करावे.'

तेव्हा जालिंदरनाथापासून गोपीचंदाला अनुग्रह मिळूवन देण्याचे व त्याला निर्भय करण्याचे वचन कानिफनाथाने तिला दिले. मग तिने घरी येऊन घडलेली सर्व हकीकत मुलाला सांगितली. त्यामुळे त्याच्या मनातली भीती नष्ट झाली.

❄❄❄

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १७ वा

(कानिफाने गुरूस बाहेर काढले व गोपीचंदालाही वाचवले)

दुसऱ्या दिवशी सकाळी गोपीचंद राजा नाथाच्या शिबिरात गेला व त्याच्या पाया पडला तेव्हा कानिफाने राजाला विचारले, ' तू जालिंदरनाथाला कोणत्या जागी पुरले ते मला दाखव.'

मग राजाने लगेच ती जागा दाखविली. नाथाने आपल्या एका शिष्याला त्याच्याबरोबर पाठविले. त्या शिष्यास ते ठिकाण दाखवून राजा परत आल्यावर कानिफनाथाने राजाला विचारले, ' आता कोणत्या युक्तीने जालिंदर महाराजांना बाहेर काढू, ते सांग.'

हे ऐकून गोपीचंद म्हणाला, ' महाराज, या बाबतीत मला काहीच समजत नाही; मी सर्वस्वी तुम्हाला शरण आलो आहे. आता माझे माता-पिता, गुरू, त्राता सर्व काही तुम्ही आहात. आपणास जे योग्य दिसेल तसे करावे.'

अशा तऱ्हेने राजाचे अतिशय दीनवाणे बोलणे ऐकून कानिफाने त्याला सुचविले, ' राजा, तुझ्या प्राणाचे रक्षण होण्यासाठी मी तुला एक युक्ती सांगतो. प्रथम तू तुझ्यासारखे सोने, रुपे, तांबे, पितळ व लोखंड असे धातूंचे पाच पुतळे तयार कर.'

हे ऐकून राजाने शिपाई पाठवून उत्तम अशा सोनार, तांबट, लोहार इ. कारागिरांना बोलावून आणले व त्यांना पाचही धातू देऊन हुबेहुब आपल्यासारख्या प्रतिमा करावयास सांगितल्या. त्या कारागिरांनी आपली सर्व अक्कल व कला खर्ची घालून सोन्याचे,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रुप्याचे, तांब्याचे, पितळेचे व लोखंडाचे असे गोपीचंद राजाचे पाच पुतळे तयार करून आणले.

नंतर एक चांगला दिवस पाहून सर्व पुतळे घेऊन कानिफनाथ राजाबरोबर गुरूला पुरले होते त्या जागी गेला. स्वत: काठावर बसून गोपीचंदाला प्रथम त्या खड्ड्यावर सोन्याचा पुतळा ठेवायला सांगितले व राजाला तो म्हणाला, ' तू कुदळ घेऊन खणायला लाग आणि जालिंदर गुरूने तुला नाव विचारताच तू नाव सांगून वेगाने बाहेर ये. '

हे ऐकून राजाने कुदळ घेतली व कानिफनाथाने चिरंजीव प्रयोग मंत्रून त्याची विभूती राजाच्या कपाळाला लावली. मग राजा मध्यभागी पुतळा ठेवून खड्डा खणू लागला. त्याबरोबर आतून आवाज आला, ' खड्ड्यावर जो कोण घाव घालीत आहे त्याने आपले नाव सांगावे. '

हे ऐकून राजा म्हणाला, ' मी गोपीचंद राजा आहे महाराज' असे म्हणून तो ताबडतोब बाहेर पडला. गोपीचंद हे नाव ऐकताच, जालिंदरनाथाचा क्रोधाग्नी प्रज्वलित झाला. तो म्हणाला, ' गोपीचंद राजा असेल तर जळून भस्म होऊन जावो. '

जालिंदराच्या शापाने सुवर्णाचा पुतळा ताबडतोब जळून भस्म झाला. याच पद्धतीने बाकीचे चारही पुतळे शापाने जळून गेले.

शेवटी कानिफनाथाच्या आज्ञेवरून गोपीचंद राजा पुन्हा खणायला लागला. तो आवाज ऐकून जालिंदरनाथाने विचार केला, ' माझा क्रोध संपूर्ण ब्रह्मांड जाळून टाकणारा आहे. पण त्रिलोचन राजाचा पुत्र गोपीचंद यातून वाचला हे मोठे आश्चर्य आहे. यावरून भगवंत राजाचे रक्षण करीत आहे, यात संशय नाही. म्हणून आता राजाला अमर करून टाकू. ' असा निर्णय घेतल्यावर जालिंदरनाथाने राजाला विचारले, ' अजूनपर्यंत तू खणीत आहेस, तेव्हा तू आहेस तरी कोण ते मला सांग. '

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

यावर कानिफाने प्रथम आपले नाव सांगून मग राजाचे नाव सांगितले आणि तो म्हणाला, ' गुरुजी, मी आपला शिष्य कानिफा आहे. आपला शोध करीत मी आलो आहे. माझे डोळे आपल्या चरणाकडे लागले असून ते माझ्या दृष्टीस केव्हा पडतील असे मला झाले आहे म्हणून गोपीचंद राजा खड्डा उकरून आपल्याला बाहेर काढण्याची व्यवस्था करीत आहे.'

आपल्या शिष्याचे हे बोलणे ऐकून आतून जालिंदरनाथ म्हणाला, 'गोपीचंद राजा अजूनपर्यंत जिवंत राहिला आहे; तर तो अमर होऊन जगामध्ये राहो.' असा आशीर्वाद देऊन जमीन खणण्याची आज्ञा केली.

खड्ड्यास बरेच दिवस झाल्यामुळे जमीन घट्ट होऊन गेली होती. राजाने मजूर आणून उकरायला प्रारंभ केला. मजुरांच्या घावांमुळे मोठे आवाज झाले. तेव्हा आतून शब्द आले, ' तुम्ही आता खणू नका. स्वस्थ रहा.'

मग जालिंदरनाथाने शक्रास्त्र जपून, वज्रास्त्र काढून घेतले; त्याबरोबर माती बाजूला होऊन जालिंदरनाथ वर आले.

नंतर गुरु-शिष्यांची भेट झाली, तेव्हा कानिफाचा कंठ भरून आला व त्याच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले. मग जालिंदरनाथ बाहेर आला व उभयता गुरु-शिष्य कडकडून भेटले. जालिंदरनाथ आपल्या शिष्याला पोटाशी धरून म्हणाला, ' या प्रसंगी तू येथे होतास म्हणून राजा वाचला.'

गोपीचंद राजाने जालिंदरनाथाच्या पायावर मस्तक ठेवले. तेव्हा त्याने त्याला उठवून त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला आणि आशीर्वाद दिला, ' प्रलयाग्नीतून तू वाचला आहेस, आता चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत या पृथ्वीवर राहा.'

नंतर मैनावती मोठ्या भक्तिभावाने आपल्या गुरूच्या पाया

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पडली व म्हणाली, ' महाराज, बालकाची आई नाहीशी व्हावी किंवा लोभ्याचा द्रव्यठेवा हरवल्यावर किंवा आंधळ्याची काठी नाहीशी झाल्यावर त्याला जशी हुरहूर लागते त्याप्रमाणे गेली अकरा वर्षे माझी दशा झाली होती.'

याप्रमाणे ती बोलत असता एकीकडे तिच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. हे पाहून जालिंदरनाथाने आपल्या हाताने तिचे डोळे पुसून तिचे समाधान केले.

नंतर गोपीचंदाला प्रेमाने जवळ घेऊन जालिंदर त्याला म्हणाला, ' तुझ्या मनात जी इच्छा असेल ती माग, मी देण्यास तयार आहे. तुला राजवैभव उपभोगायचे आहे, की योगमार्ग पत्करावयाचा आहे ते सांग. मी तुझ्या इच्छेनुसार मागशील ते देण्यास तयार आहे. मी तुला अमर केले आहे. पण लक्षात ठेव, राजवैभव चिरंतन नसते, मृगजळाप्रमाणे असते. हे जेवढे वैभव दिसत आहे तेवढे नाशिवंत आहे.' अशा तऱ्हेने उपदेश करून गोपीचंदास विचार करण्यास सांगितले.

तेव्हा गोपीचंद राजाने विचार केला, की राजवैभव अशाश्वत आहे. जालिंदरनाथाची योग्यता विलक्षण मोठी आहे आणि तो चिरंजीव आहे. आज अकरा वर्षे तो खड्ड्यात होता, तरी जसाच्या तसा कायम आहे. यमही त्याच्या पायाशी लोळण घेईल. मग राजाची काय प्रौढी ! तर आता आपणही असे अप्रतिम वैराग्यवैभव साध्य करून घ्यावे, हाच मार्ग खरोखरच उत्कृष्ट होय.

अशा तऱ्हेने मनाचा पूर्ण निग्रह करून तो जालिंदरनाथास म्हणाला, ' पदार्थ जसा अग्नीचा स्पर्श झाल्याने झगझगीत होतो तसे आता मला तुमच्यासारखे करा.'

त्याचा निश्चय पाहून जालिंदराने त्याची पाठ थोपटून त्याला शाबासकी दिली. मग आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कृपादृष्टीने त्याचा सर्व देह अवलोकन केला आणि कानात मंत्रोपदेश करून त्याचे समाधान केले.

आता राजाला संसारातील सर्व गोष्टी अशाश्वत व नाशवंत दिसू लागल्या. मग राजाने वडाचा चीक काढून, केसांच्या जटा केल्या. कौपीन परिधान केली. कानात मुद्रा घातल्या. शैलीकंथा अंगावर घेतली. शिंगी वाजवली. कुबडी, फावडी, सर्व हातात घेऊन तो पूर्ण नाथपंथी झाला. तसेच भस्माची झोळी काखेत व भिक्षेची झोळी हातात घेतली.

इकडे गोपीचंद राजा बैरागी झाल्याची बातमी गावातील लोकांना आणि अंत:पुरातील राजस्त्रियांना समजल्यावर सगळीकडे रडारड सुरू झाली.

जालिंदरनाथाने राजाला तपश्चर्येला जायला सांगितले, त्यावेळी त्याने राजाला उपदेश केला की, 'आपल्या अठराशे स्त्रियांकडे भिक्षा मागायला जा. भिक्षा मागताना शिंगी वाजवावी. माई, भिक्षा घाल, असे म्हणावे. अशा तऱ्हेने भिक्षेच्या निमित्ताने स्त्रियांची भेट घेऊन तपासाठी जा.'

मग गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून गोपीचंद राजा स्त्रियांकडे भिक्षा मागायला निघाला. राजाला त्या स्थितीत पाहून त्याच्या स्त्रियांच्या दु:खाला आणखीनच भरते आले. त्यावेळी त्यांना इतके रडू आले की, त्या कल्लोळाचा आवाज ब्रह्मांडावर आदळला. राजाचे गुण व स्वरूप आठवून त्या पुन्हा शोक करू लागल्या. मुख्य राणी लुमावती व दुसऱ्या चंपिका, कारंती अशा सर्व स्त्रियांनी एकीमागून एक जवळ येऊन राजाला वेढा घातला.

त्या सर्वजणी राजाची प्रार्थना करू लागल्या, 'ईश्वरेच्छेने जे व्हायचे होते ते झाले, पण आता तुम्ही येथेच राहून योगमार्ग चालवा. कोठे लांब जाऊ नका. आम्ही विषयसुखासाठी आपल्याला त्रास देणार

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाही. केवळ तुमच्याकडे पाहून आनंद मानू. तुम्हाला तेथे झोपडी बांधून देऊ; तेथे खुशाल राहावे. आम्ही सर्वजणी सेवाचाकरी करून दिवस सुखाने काढू.'

राजाला स्त्रियांनी तेथे राहण्याबद्दल फारच आग्रह केला, पण राजाला या गोष्टीचा राग आला. त्याने त्यांच्या म्हणण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. उलट, त्यांचा धिक्कार करून त्यांना दूर निघून जायला सांगितले. परंतु मोहाने गोवून टाकल्यामुळे त्या स्त्रियांना राजापासून दूर जाववेना. त्या म्हणाल्या, 'पतिराज, अरण्यात आपणास एकटे राहावे लागेल, तेव्हा तेथे तुमच्याशी बातचीत कोण करील?'

यावर राजा म्हणाला, 'तेथे शिंगी, कुबडी ह्या माझ्याशी गप्पा करतील.'

राण्यांनी असेच अनेक प्रश्न विचारून राजाला भंडावून सोडले. तेव्हा राजा म्हणाला, ' जमिनीचे आसन व आकाशाचे पांघरूण मला पुरेल. कुबडी व फावडी या माझ्या दोन्ही बाजूला निजतील. धुनी पेटवून थंडीचे निवारण करीन. व्याघ्रासनावर वज्रासन घालून बसल्यावर अनंत पुरुष, बायका व मुले तेथे सेवा करायला असतील. कौपीन फाटल्यावर इंद्रियदमनाचा कासोटा घालीन. जर अंगावरची कंथा फाटली तर योग आचरून दिव्य कंथा परिधान करीन. सगुण, निर्गुण या दोन्ही शिंगी व कुबडी कधीच फुटायच्या नाहीत. आगम, निगम यांच्या तारा त्यांना पक्क्या आहेत; त्या कधीही तुटायच्या नाहीत. कुबडी, फावडी जीर्ण झाल्यावर खेचरी, भूचरी या दोन आदेश विदेय दोन्हींकडे प्रकाशित रहातील व मीही तन्मय होऊन निरंजनी लक्ष ठेवून स्वस्थ निजेन. शेवटी मोक्ष, मुक्ती ह्या शैलींचे मी भूषण मिरवीन.'

अशा तऱ्हेने बराच संवाद झाल्यावर राजाने माई, भिक्षा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

घाल, असे म्हटले तेव्हा मोहामुळे त्या मिठी घालायला जवळ येऊ लागल्या. हे पाहून राजाने त्यांच्यावर कुबडी उगारली. हे पाहून, मैनावती लगेच शिजवलेले अन्न घेऊन आली आणि म्हणाली, ' नाथा, ही भिक्षा घे.'

मग गोपीचंद झोळीत भिक्षा घेऊन, मातु:श्रीच्या पायावर डोके ठेवून जालिंदरनाथाकडे आला व झालेला सर्व वृत्तान्त त्याने त्याला सांगितला. मागून ताबडतोब मैनावती आली. तिनेही तसेच सांगितले. मग तीन दिवस राजाला जवळ ठेवून गुरूने त्याला खूप उपदेश केला. शेवटी राजाला तप करण्यासाठी बद्रिकाश्रमाला जाऊन, तेथे लोखंडाच्या काट्यावर अंगठा ठेवून बारा वर्षे तप करण्याची आज्ञा दिली.

गोपीचंद राजा आज्ञेनुसार तपाला निघाला. त्यावेळी राजाला पोहोचवायला कानिफा, जालिंदर व प्रधान वगैरे लहान-थोर पुष्कळ मंडळी कोसभर गेली होती. राजा गेल्यावर सर्व नगर शोकसागरात बुडून गेले होते.

राजाला लुमावतीपासून एक मुलगा होता. त्याचें नाव मुक्तचंद. त्याला गोपीचंदाच्या राजसिंहासनावर लोकांनी बसविले. जालिंदरनाथाने स्वत: त्याला राज्याभिषेक केला आणि प्रधान, सरदार वगैरे सर्वांना वस्त्रे-अलंकार देऊन त्यांच्या योग्यतेनुरूप सत्कार केला व त्यांचे समाधान केले. मग अंत:पुरात जाऊन सर्व स्त्रियांना मैनावतीजवळ समाधानाने रहायला सांगितले. नंतर कानिफा व त्याचे शिष्य यांच्यासह जालिंदरनाथ सहा महिने तेथे राहिला. त्याने आपल्या देखरेखीखाली त्या सर्व राज्याची नीट व्यवस्था लावून दिली.

***

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय १८ वा

(गोपीचंदाच्या बहिणीची कथा)

गोपीचंद राजा जालिंदरनाथ गुरूच्या आज्ञेनुसार बद्रिकाश्रमास तपश्चर्या करण्यासाठी निघाला. तो वाटेने जाताना भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करी. राजा जोगी झाल्याची बातमी ज्याने ऐकावी त्याने ' असा राजा पुन्हा होणार नाही. ' असे म्हणून हळहळावे. तो जेथे जाई तेथे लोक त्याला राहण्यासंबंधी आग्रह करीत. अनेक पदार्थ त्याच्यापुढे ठेवत. परंतु तो त्यांचे म्हणणे मनावर न घेता पुढे मार्गस्थ होई.

हिंडत हिंडत राजा गौडबंगाल सोडून कौलबंगाल्यास गेला. तेथे पौलपट्टणनगरात त्याची चंपावती बहीण राहात होती. तेथील तिलकचंद राजा तिचा सासरा होता. तो गोपीचंदाप्रमाणेच वैभवसंपन्न होता. अशा बड्या राजघराण्यामधली चंपावती सून होती. ती नणंद, जावा, दीर यांना देवाप्रमाणे मान देत असे. तिचे सासूसासरेही मोठे प्रबळ होते.

तेथे त्यांना गोपीचंदाची हकीकत समजली, तेव्हा ते सर्वजण गोपीचंदाला नावे ठेवू लागले. ते म्हणू लागेल, ' गोपीचंद भ्याड आहे. राज्याचा त्याग करून भीक मागणे बरे नाही. क्षत्रिय कुळात जन्म घेऊन भीक मागण्यापेक्षा मरण उत्तम. याने जन्माला येऊन कोणते शौर्याचे कृत्य केले? कुळाला काळिमा मात्र लावला. याने आमच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तोंडालाही काळे फासले. लोकांमध्ये आमची फटफजिती केली. आता स्वत: काळे तोंड दाखवीत फिरत आहे. त्यापेक्षा हा वेडा जन्मत:च मेला असता तरी चांगले झाले असते.'

अशा प्रकारची पुष्कळ वाईट बोलणी ऐकून चंपावतीला फार वाईट वाटू लागले. नणंद, जावा तिला असे बोलू लागल्या.

इकडे गोपीचंद फिरत फिरत त्याच नगरात येऊन पोहोचला. पाणी पाहून तो बसला आणि हरिगोविंदाचे गुण गाऊ लागला. तो गोसावी झाला होता, तरीही मोठा तेजस्वी दिसे. चंपावतीच्या काही दासी अकस्मात तेथे गेल्या होत्या. त्यांनी त्याला ओळखले. त्यांनी घरी येऊन ही बातमी प्रथम चंपावतीला सांगितली. तिलकचंद राजा व इतरही सर्व जण हवे ते बोलू लागले. तिलकचंद राजा घरात येऊन म्हणाला, ' आता गडबड करून काय उपयोग ? कारण तो घरोघर भीक मागेल व हा अमक्याचा अमुक म्हणून लोक म्हणतील. त्यामुळे आपला मात्र दुर्लौकिक होईल. आता त्याला गावातून आणून अश्वशाळेत ठेवावा. तेथे त्याला जेवायला घालून गावातून बोळवावा. म्हणजे आपण सुटलो.'

राजाने असे सांगितल्यावर दासींनी जाऊन गोपीचंदाला सांगितले, ' चंपावतीला भेटण्यासाठी तुम्हांला राजाने बोलावले आहे.'

हे ऐकून राजा प्रथम म्हणाला, 'आम्ही गोसावी झालो. आम्हाला जगातील लोक हेच आई-बाप, बहीणभाऊ होत. पण नंतर बहिणीला भेटण्यासाठी म्हणून तो त्यांच्याबरोबर गेला. त्यांनी त्याला राजाज्ञेनुसार अश्वशाळेत नेऊन बसविले. गोपीचंदाला आणल्याचे राजाला व राणीला जाऊन सांगितले. मग राणीने जेवणाचे पान वाढून दिले. ते घेऊन दासीने त्याला अश्वशाळेत नेऊन दिले आणि

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चंपावती नंतर भेटायला येईल म्हणून सांगितले.

हे ऐकून खरे म्हणजे गोपीचंदास अपमान वाटला असता; पण त्याने मनात इतकेच आणले की, ' मानपान पैशाला असतो. आपण तर बैरागी झालो. आपल्याला शत्रुमित्र सारखेच आहेत. आपल्यापुढे आलेल्या अन्नाला पाठ दाखवू नये.'. असा विचार मनात आणून अन्नब्रह्माला न डावलता तो आनंदाने भोजन करू लागला.

गोपीचंद राजा जेवायला बसल्यावर त्याला राजवाड्यातील स्त्रियांनी पाहिले व चंपावतीस आणून दाखविले. हा निर्लज्जपणे सोयऱ्याकडे येऊन अश्वशाळेत भोजन करीत बसला, म्हणून ' चंपावतीच्या तोंडावर त्याची खूपच निंदा केली. त्यामुळे ती फार दुःखी झाली. ती त्यांच्यातून उठून घरात गेली व जिवावर उदार होऊन तिने पोटात खंजीर खुपसून घेऊन आत्महत्या केली.

गोपीचंदाने दासींना चंपावतीला भेटायला आणायला सांगितले; पण त्या म्हणाल्या, ' ती सासुरवाशीण आहे. ती आता या वेळेस येथे यायची नाही. आम्ही तिला रात्री घेऊन येऊ व तुम्हांस भेटवू. आता तुम्ही जाऊ नका. उद्या जावे.'

ते त्यांचे म्हणणे ऐकून रात्री चंपावती भेटेल या आशेवर त्याने राहाण्याचे कबूल केले. मग दासी तेथून राजवाड्यात गेल्या व चंपावतीला पाहू लागल्या. तेव्हा तिचा मृत देह पाहून त्या हतबुद्ध झाल्या. त्यांनी ही गोष्ट लगेच सर्वांना सांगितली. तेव्हा घरची सगळी मंडळी घाबरून गेली. तिला पाहून सर्वांनी रडून एकच गोंधळ केला. तिचे गुण आठवून ते रडू लागले व तिच्या भावास शिव्या देऊ लागले. भावासाठी चंपावतीने प्राण दिला, अशी बातमी थोड्याच वेळात सर्व नगरात पसरली.

राजवाड्यात चाललेला हा गोंधळ, रडारड ऐकून गोपीचंदाने अश्वरक्षकांना त्याचे कारण विचारले, तेव्हा ते म्हणाले,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

' गौडबंगालाचा गोपीचंद राजा चंपावतीचा बंधू आहे. तो राज्य सोडून बैरागी झाला व गावोगाव भीक मागत फिरत आहे, हे दुःख तिला सहन न होऊन तिने पोटात खंजीर खुपसून जीव दिला.'

अश्वरक्षकांनी सांगितलेली ही बातमी ऐकून गोपीचंद राजासही वाईट वाटले. माझ्या येथे येण्यामुळेच हा सर्व अनर्थ घडून आला, असे वाटून तो रडू लागला.

मग चंपावतीचे प्रेत दहनासाठी घेऊन चालले, तेव्हा गोपीचंदही प्रेताबरोबर चालू लागला. जाताना त्याच्या मनात आले, ' जर ही गोष्ट अशीच राहू दिली, तर जगात माझी अपकीर्ती होईल. म्हणून बहिणीचे प्रेत उठवावे व सोयऱ्यासही थोडासा आपल्या सामर्थ्याचा प्रताप प्रत्यक्षच दाखवावा. आमच्यात अजिबात सामर्थ्य नाही, असा ग्रह करून त्यांनी मानहानी केली. तेव्हा त्यांना नाथपंथाचा तडाखा दाखविल्याशिवाय राहायचे नाही.

अशा तऱ्हेचा विचार मनात येताच तो स्मशानात गेला, प्रेताजवळ उभा राहिला आणि म्हणाला, ' मी सांगतो ते कृपा करून ऐका. तुम्ही प्रेत दहन करू नका. मी माझ्या गुरूला, जालिंदरनाथाला आणून प्रेत उठवतो. मी येथे असता बहिणीचे प्राण वाया जाऊ दिले तर नाथपंथाचे सामर्थ्य काय ?'

परंतु त्याच्या ह्या बोलण्याकडे कोणीच लक्ष दिले नाही, उलट त्याची ते कुचेष्टाच करू लागले, ' मेल्यावर कोणी जिवंत होत नाही. वठलेल्या झाडाला पालवी फुटत नाही.' तेव्हा गोपीचंद म्हणाला, ' तुम्ही म्हणता ते खरे आहे; पण माझ्या गुरूचा प्रताप असा आहे की, त्याची कीर्ति वर्णन करताना सरस्वती दमेल. त्याने कानिफासाठी सर्व देव पृथ्वीवर आणले. मी त्याला घोड्याच्या लिदीत पुरून टाकले व अकरा वर्षांनंतर बाहेर काढले. पण तो जसाच्या तसाच कायम होता. म्हणून तुम्ही चार दिवस प्रेताचे रक्षण करा.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मी गुरूला आणून बहिणीला उठवितो.'

पण त्याचे कोणी ऐकेना. लोकांनी प्रेत चितेवर ठेवले व ती ते पेटविणार, इतक्यात गोपीचंद चितेवर बसून म्हणू लागला, 'मलाही भस्म करून टाका. माझे भस्म झाल्याशिवाय जालिंदर गुरूचा कोपानळ शांत व्हायचा नाही. तो हे समग्र नगर पालथे घालून तुम्हां सर्वांची राखरांगोळी करून टाकील.'

गोपीचंदाचे हे बोलणे ऐकून तिलकचंद रागाने म्हणाला 'गुरूच्या प्रतापाची एवढी प्रौढी गातो आहेस, तर आम्हाला चमत्कार दाखव. आम्ही चार दिवस प्रेत जतन करून ठेवतो.'

मग प्रेत खात्रीने उठविण्यासाठी प्रेताचा डावा हात तिच्या सासऱ्याच्या सांगण्यावरून नवऱ्याने काढून दिला. तो घेऊन गोपीचंद गुरूला आणण्यासाठी गौडबंगाल्यास जायला निघाला. तो बराच लांब गेल्यावर इकडे लोकांनी प्रेत दहन केले.

गोपीचंद सुमारे पांच कोस गेला असेल नसेल, इतक्यात हा सर्व प्रकार जालिंदराच्या लक्षात आला व गोपीचंद आला तर घोटाळा होईल, म्हणून तो स्वतः तिकडे जायला निघाला. निघताना त्याने प्रयाणास्त्राची विभूती कपाळाला लावली. पृथ्वीवर नैषध राजपुत्रावाचून त्या अस्त्राची कोणाला माहिती नव्हती. हे अस्त्र जालिंदरास मिळाले होते. ते म्हणून त्याची विभूती कपाळास लावल्याबरोबर क्षणार्धात तो शंभर कोस पोहोचला व गोपीचंदाला भेटला. तेव्हा गोपीचंदाने जालिंदराच्या पाया पडून सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून चंपावतीस उठविण्याचे गुरूने आश्वासन दिले आणि त्याच्यासह पौलपट्टणातील राजवाड्यात तो आला. तिथे सर्व लोक शोक करीत होते.

नाथद्वयांना पाहाताच तिलकचंद पुढे झाला. त्याने जालिंदरनाथाच्या पाया पडून त्याला कनकासनावर बसविले व आपण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पुढे नम्रपणे उभा राहिला. त्याने केलेला आदरसत्कार ढोंगीपणाचा होता. अर्थात त्याची मानभावी वागणूक जालिंदरनाथाच्या लक्षात आली. मग तो म्हणाला, 'राजा, चंपावतीचे तेज या घरात लोपून गेले. ह्या घरात मी शोभत नाही.'

असे म्हणून त्याने गोपीचंदाकडून तिचा हात मागून घेतला. मग संजीवनी मंत्र म्हणून भस्म भुजाला लावले आणि चंपावतीला हाक मारली. तो चंपावती लगेच आली व जालिंदर नाथाच्या पाया पडली. शुक्राचार्यांनी ज्याप्रमाणे कचाला संजीवनी मंत्राने उठविले, त्याचप्रमाणे जालिंदरनाथाने चंपावतीला जिवंत केले.

ते पाहून सर्व मंडळी नम्रतेने नाथाच्या पाया पडली, पण ते सर्व स्मशान-वैराग्याप्रमाणे क्षणिक होते.

मग जालिंदरनाथ उठून जायला निघाला; तेव्हा तिलकचंद राजा त्याच्या पाया पडला व प्रार्थना करू लागला, 'महाराज, मी पतित आहे. राज्यवैभवाने उन्मत्त होऊन मी गोपीचंदाला क्षुद्र मानले, पण आता माझ्या अन्यायाची आपण मला क्षमा करावी. या बालकाचे अपराध पोटात घालावे.'

असे बोलून त्याने नाथाच्या पायावर वारंवार मस्तक ठेविले. नाथाला राहण्याविषयी तो प्रार्थना करू लागला. मग तिलकचंदाचा आग्रह पाहून जालिंदरनाथाने तेथे एक रात्र राहाण्याचे ठरविले. जालिंदराच्या आज्ञेप्रमाणे तिलकचंदाने चंपावतीकडून स्वयंपाक करविला. तिला तिच्या भ्रतारासह आपल्या पंक्तीस जेवायला बसविले व तिला अनुग्रह देऊन नाथपंथी केले व आपला उच्छिष्ट ग्रास देऊन तिला अमर केले.

मग जेवण उरकल्यावर विडे खाऊन जालिंदरनाथाने राजाला सांगितले, 'गोपीचंद राज्य सोडून तपासाठी जात आहे. ह्याचा मुलगा मुक्तचंद हा अजनू लहान आहे, तेव्हा त्याच्या राज्यावर तुम्ही

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

देखरेख असू दे. तुमचा प्रताप जगाला ठाऊक आहे, म्हणून कोणी शत्रू उठणार नाही. मीही तेथे सहा महिने राहून सर्व बंदोबस्त करून देणार आहे. परंतु त्यापेक्षा जास्त मला राहाता येणार नाही; म्हणून तुम्ही त्याला लागेल ती मदत देऊन त्याचे संरक्षण करा.'

जालिंदरनाथाने केलेली ती आज्ञा राजाने मनापासून मान्य केली. मग ती रात्र तेथे राहून दुसऱ्या दिवशी दोघेही आपापल्या मार्गाने निघाले.

गोपीचंद राजा जालिंदरनाथाच्या हेलापट्टणास गेला. गोपीचंद राजा बद्रिकाश्रमास जाऊन खडतर तपाला बसला. इकडे जालिंदरनाथ गौडबंगालास ठरल्याप्रमाणे सहा महिने राहून मुक्तचंदाला अनुग्रह देऊन कानिफासह फिरू लागला. नंतर बारा वर्षांनी बद्रिकाश्रमास आला व गोपीचंदाला भेटला. गोपीचंदाच्या तपाचे उद्यापन करण्यासाठी सर्व देव आणले होते. तेथे त्याने त्याला सर्व विद्या शिकविल्या व दैवते आणून त्यांच्याकडून गोपीचंदाला वर देवविले. अशा तऱ्हेने गोपीचंद जालिंदरनाथाच्या कृपेने सर्व विद्यांत निष्णात झाला.

❋ ❋ ❋

अध्याय १९ वा

कानिफाकडून मच्छिंद्रनाथ स्त्रीराज्यात रमला असे गोरक्षनाथाला समजले होते. ते ऐकून गोरक्ष स्त्रीराज्यात जायला निघाला व त्या सीमेपर्यंत येऊन पोहोचला. त्याच्या मनांत अनेक

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रकारचे विचार येत होते. त्याला वाटले की, ज्या ठिकाणी गुरु आहेत, तेथे वैभव तर भरपूर असणारच, परंतु ख्यालीखुशालीत गुरु रममाण असल्याने ते मला ओळखतील किंवा नाही याची शंका आहे.

त्यावेळी कलिंगा नावाची एक वेश्या आपल्या परिवारासह स्त्रीराज्यात जात होती. ती रूपवान असून गायनात अप्सरा व गंधर्व यांनाही लाजवील अशी होती. अशा या कलिंगेची व गोरक्षनाथाची वाटेत गाठ पडली. गोरक्षाने तिची चौकशी केली, तेव्हा ती म्हणाली, ' मला कलिंगा म्हणतात. मी आता स्त्रीराज्यात निघाले आहे. तेथे मैनाकिनी नावाची स्त्रीच सर्व राज्यकारभार बघते. माझी नृत्यगायनकला दाखवून मी तिला वश करून घेणार आहे. ती वश झाली की मग ती मला पुष्कळ धन देईल.'

कलिंगेचा बेत ऐकून गोरक्षनाथाने तिच्याबरोबर स्त्रीराज्यात जायचे ठरविले. कारण तिच्याबरोबर त्याला राजगृहात जाता आले असते व मच्छिंद्रनाथांचा तपास लावता आला असता. अशा तऱ्हेचा विचार मनात येताच तो तिला तिच्याबरोबर स्त्रीराज्यात त्याला नेण्याबद्दल विनंती करू लागला. तेव्हा ती म्हणाली, 'तुमच्याजवळ कोणता गुण आहे तो मला सांगा.' यावर गोरक्षनाथ म्हणाला, 'मला गाता येते व मृदंगही चांगला वाजवता येतो.'

मग तिने त्याला त्याची कला दाखविण्यास सांगितले. तिने सारंगी, मृदंग इ. सर्व साहित्य त्याच्यापुढे आणून ठेवले. मग गोरक्षनाथाने गंधर्वप्रयोगमंत्र म्हणून भस्म कपाळाला लावले व ते सर्व दिशांना फेकले आणि वाद्यांनाही लावून तो गायला बसला. तेव्हा झाडे, दगड, हीसुद्धा सुश्राव्य गायन करू लागली व सुस्वर वाद्ये वाजू लागली. हा चमत्कार पाहून कलिंगेने तोंडात बोट घातले. तिच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्यावेळी गोरक्ष तिला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शंकरासारखा दिसू लागला. तिच्या मनात आले की, जो झाडे, दगड यांच्यापासून गंधर्वाप्रमाणे सुरेख गायन करवितो,त्याला स्वत:ला उत्तम गाता, वाजविता येत असेल यात आश्चर्य काय ! त्याच्या अंगच्या या आश्चर्यजनक गुणामुळे तिला आनंद झाला व आपण त्याच्याच संगतीत राहाण्याचा निश्चय करून ती त्याला म्हणाली; ' महाराज, आपल्यापुढे माझी काहीच किंमत नाही.'

असे म्हणून ती त्याची विचारपूस करू लागली, तेव्हा गोरक्षनाथाला मोठा प्रश्न पडला. पण त्याने तिला नाव न सांगण्याचे ठरविले. कारण त्याचा पुढील कार्यभाग साधण्यासाठी नाव गुप्त ठेवणे जरुरीचे होते. म्हणून त्याने तिला आपले नाव पूर्वड असे सांगितले. मग तिने त्याला त्याचा हेतू विचारला.

यावर तो म्हणाला,' विषयसुखाबद्दल मला काही माहिती नाही आणि मला ते नकोही. एक वेळेस पुरेल एवढे जेवायला घालीत जा. त्याशिवाय माझी दुसरी कोणतीही इच्छा नाही.'

गोरखनाथाचे बोलणे ऐकून ती म्हणाली, ' महाराज, आपण म्हणता त्याप्रमाणे मी तुमच्या पोटाची तजवीज करीन, पण मुख्य अडचण अशी आहे की, तुमच्या मनात स्त्रीराज्यात जायचे आहे; पण तिथे पुरुषाला जाता येत नाही.' त्याचे कारण गोरक्षाने तिला विचारले.

तेव्हा ती म्हणाली,' मारुतीच्या भुभु:काराने सर्व स्त्रिया गरोदर राहातात, त्यात पुरुषाचा गर्भ मरतो व स्त्रियांचा जगतो. म्हणून तुमचा येथे कसा निभाव लागेल याबद्दल मला शंका आहे.'

तेव्हा गोरक्षनाथ म्हणाला, ' मारुती मला काही करू शकणार नाही. म्हणून अशा प्रकारची शंका तू मनात आणू नको.'

मग कलिंगा रथात बसल्यावर गोरक्षनाथ तिचा सारथी झाला. त्याने घोड्याचा लगाम हाती घेतला. मग त्याने वज्रास्त्र,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्पर्शास्त्र, मोहनास्त्र व नागास्त्र यांची पेरणी केली. त्यामुळे ते विनासायास स्त्रीराज्यात पोहोचले. पुढे रात्र झाल्यामुळे ते चित्रपट्टण गावात वस्तीला राहिले. तेथे जेवण करून सर्व झोपी गेले.

इकडे मारुती सेतुबंधरामेश्वराहून स्त्रीराज्यात जायला निघाला. तो सीमेपर्यन्त आला नाही, तोच गोरक्षनाथाने योजलेले वज्रास्त्र त्याच्या हृदयावर आदळले. एवढा कणखर वज्रदेही मारुती, पण त्या अस्त्राच्या जोराने मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळला. तेव्हा स्पर्शास्त्राने त्याला जमिनीवर खिळवून ठेवले. त्यामुळे त्याला जागेवरून हालता येईना. एवढे होते आहे, तोच मोहिनीअस्त्राचा अंमल त्याच्यावर बसला. शेवटी नागास्त्राच्या वेढ्यामुळे मारुती फारच बेजार होऊन गेला. अशा तऱ्हेने पाठोपाठ चारी अस्त्रांचा त्याच्यावर मारा झाल्याने त्याचे काहीच चालेना. काही वेळाने तो मरणोन्मुख झाला. त्याने डोळे पांढरे केले. तो शुद्धीवर येई व पुन्हा बेशुद्ध पडे. त्याने या अंत:काळी श्रीरामाचे स्मरण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे श्रीराम ताबडतोब धावून गेले व मारुतीवरचे संकट पाहून त्यांना फार वाईट वाटले.

मग रामाने पाकशासनाच्या सहाय्याने वज्रास्त्र काढून घेतले. विभक्तास्त्राच्या योगाने स्पर्शास्त्रही निकामी केले, शेषाला काढून घेऊन नागास्त्र निकामी केले व मोहिनी अस्त्राचेही निवारण केले. अशा तऱ्हेने रामाने भक्ताच्या हाकेला ओ दिली व त्याला संकटातून मुक्त केले.

जेव्हा मारुती सावध झाला, तेव्हा तो लगेच रामाच्या पाया पडला व हात जोडून नम्रतेने म्हणाला, ' हे रामा, अशी जिवावर उठणारी ही भयंकर अस्त्रे आहेत. आज माझा अंतकाळ आलाच होता, पण ऐनवेळी तू धावत येऊन मला जीवदान दिलेस, म्हणूनच मी वाचू शकलो. हे प्रभो ! तुझे उपकार माझ्याने कदापि फिटायचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाहीत.'

असे म्हणून मारुती पुन्हा रामाच्या पाया पडला. रामाने त्याला हृदयाशी धरले व अशा तऱ्हेने तुला संकटात आणणारा शत्रू कोण आहे म्हणून विचारले.

तेव्हा मारुती म्हणाला, 'आजं तरी माझ्यावर कुरघोडी करणारा असा क्षत्रिय कोणी राहिलेला नाही. परंतु नाथपंथाचे लोक सध्या प्रबळ झालेले आहेत. त्या नऊ नाथांपैकी कोणीतरी एकजण येथे आला असावा. आजकाल हे नाथपंथी सर्वांना अजिंक्य झाले आहेत.'

हे मारुतीचे बोलणे ऐकून राम त्याला म्हणाला, 'नाथपंथीय लोक हल्ली प्रबळ झाले असून ते अजिंक्य आहेत, परंतु ते माझे भक्त आहेत व माझीही त्यांच्यावर पूर्ण कृपादृष्टी आहे, म्हणून तू त्यांच्याशी वैर मांडू नकोस.'

हे सांगितल्यावर हे कृत्य गोरक्षनाथाचे आहे, हे रामाने आपल्या आंतरदृष्टीने जाणले. मग मारुतीला तो म्हणाला, 'गोरक्षनाथ म्हणजे हरिनारायणाचा अवतार आहे व हा सर्व प्रताप त्याचाच आहे.'

मग मारुतीने रामाला सांगितले की, त्याने अशा हिकमतीने स्त्रीराज्यात प्रवेश केला आहे. त्याच्या दर्शनाला चालावे. त्याची भेट घेऊन मला त्याच्यापासून एक मोठे कार्य करून घ्यावयाचे आहे.'

हे ऐकल्यावर रामाने मारुतीला तुझे कोणते काम आहे, असे विचारले. तेव्हा मारुतीने मच्छिंद्रनाथाची आरंभापासूनची सर्व हकीगत सविस्तर सांगितली. नंतर तो म्हणाला त्या मच्छिंद्रनाथाला हा गोरक्षनाथ आपल्याबरोबर घेऊन जाईल; म्हणून त्याच्याशी गोड बोलून त्याला वश करावे, म्हणजे तो त्याला नेणार नाही.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मारुतीचा हा विचार ऐकून राम म्हणाला, ' मीही युक्तीने त्याला दोन गोष्टी सांगीन. माझ्याच्याने होईल तेवढी खटपट मी करीन.'

असे बोलून दोघेजण निघाले. ते मध्यरात्रीच्या सुमारास चिनापट्टणास पोहोचले. त्यावेळी चोहोकडे शांतता होती. ते दोघे ब्राह्मणाचे रूप घेऊन गोरक्षनाथाजवळ गेले. त्यावेळी गोरक्षनाथ शांतपणे ध्यान करीत बसलेला त्यांनी पाहिला. त्याला नमस्कार करून ते दोघे त्याच्याजवळ बसले. मग आम्ही शास्त्राध्ययन केलेले ब्राह्मण आहोत असे सांगून ते गोरक्षनाथाची स्तुती करू लागले. नंतर ते म्हणाले, आमची एक इच्छा आहे, ती पूर्ण करावी. असे मारुतीचे बोलणे ऐकून गोरक्षनाथाने त्यांना काय इच्छा आहे म्हणून विचारले.

तेव्हा ते म्हणाले, ' मी इच्छा पूर्ण करतो, असे प्रथम वचन द्या. म्हणजे मग आमचा हेतू सांगू.'

ते ऐकून गोरक्षनाथाच्या मनात विचार आला की, ' हे माझ्यासारख्या-जवळ काय मागणार ? शिंगी, कंथा, कुबडी, फावडी, शैली व भोपळा हीच काय ती माझी संपत्ती.याशिवाय आमच्याजवळ काही नाही. मग यांच्या मनात काय आहे ? असा विचार मनात येतो न येतो,दुसरीही कल्पना त्याच्या मनात चमकून गेली. त्याला वाटले की, ' आता मध्यरात्र झाली आहे. शिवाय स्त्रीराज्यात पुरुष येणे कसे शक्य आहे ? म्हणजे हे साधुपुरुष नसून कोणीतरी स्वर्गात राहणारे देव असावेत, असा संशय त्याच्या मनात पक्का झाला. कारण ज्या कामासाठी आलो, त्याशिवाय असलेले याचे काम कबूल करायला हरकत नाही; असा विचार करून तो त्यांना म्हणाला, ' महाराज, आपण स्वतःला ब्राह्मण म्हणविता, पण येथे येण्याची त्यांची छाती नाही. तेव्हा आपण खरोखरच कोण आहात ते मला प्रथम सांगा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे बोलून तो नम्रपणे त्यांच्या पाया पडला. तेव्हा याला ओळख न देणे हे बरे नाही, असा रामाने विचार केला व त्याला मारुतीचीही संमती मिळविली. मग रामाने आपले खरे स्वरूप धारण करून त्याला पोटाशी धरले आणि मच्छिंद्रनाथाला न नेण्याची मारुतीची इच्छा सांगितली. मग तो गोरक्षाला म्हणाला, ' मारुतीने मैनाकिनीला अशा प्रकारचे वचन दिले आहे म्हणून तू त्याला नेऊ नकोस. एवढी मारुतीची इच्छा तू पूर्ण करावीस.'

त्यावर गोरक्षनाथ म्हणाला, ' हे प्रभो, आम्ही योगाभ्यासी आहो. तेव्हा आम्हाला हे असले काम करणे अनुचित होय. म्हणून एवढे सोडून अन्य काय पाहिजे ते मागा, मी ते ताबडतोब देतो; पण यापुढे मच्छिंद्रनाथास पितर आले तरी येथे ठेवणार नाही, हे निश्चितच. आपण याबाबतीत मला गळ घालू नका.'

गोरक्षाच्या बोलण्याने मारुतीला राग आला व तो ताबडतोब युद्ध करण्यास तयार झाला. ते पाहून रामाने मारुतीची युक्तिप्रयुक्तीने समजूत काढली. त्याचे सांत्वन करून, त्या दोघांमध्ये होणारे युद्ध टाळून, गोरक्षनाथास हृदयाशी धरले. गोरक्षनाथ रामाच्या पाया पडला. नंतर राम व मारुती आपापल्या स्थानी परत गेले.

✻ ✻ ✻

अध्याय २० वा

पुढे मारुतीने लघुरूप धारण केले व तो शृनमुरूडास जाऊन

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गुप्तपणे राजवाड्यात गेला. तेव्हा राणी पद्‌मिनी (मैनाकिनी) आपल्या आसनावर स्वस्थपणे पहुडली होती. तिच्याजवळ दासी वगैरे दुसरे कोणीही नाही. अशी संधी साधून मारुती तिच्या महालात जाऊन आसनावर बसला. त्याने राणींचा हात धरला. त्याबरोबर ती जागी झाली. उठताक्षणी तिला मारुती दिसला. मग ताबडतोब त्याच्या पाया पडली.

त्या राणीला तिलोत्तमा, मैनाकिनी व पद्‌मिनी अशी तीन नावे होती. तिला अशी तीन नावे पडण्याचे कारण असे की, सिंहलद्वीपामध्ये ही मैनाकिनी फारच सुंदर स्त्री म्हणून प्रसिद्ध होती. एकदा स्नान करून ती गच्चीवर उभी होती. तिने आकाशाकडे पाहिले असता, विमानात असावधपणे बसलेल्या वसूचे लिंगदर्शन तिला झाले. ते पाहून तिला हसू आले. ती आपल्याला हसत आहे हे पाहून तो म्हणाला, ' माझ्याबद्दल तुझ्या मनात प्रेमभावना उत्पन्न झाली, म्हणून तुला हसू आले. खरोखरच तू जारिणी आहेस आणि मी भ्रष्ट नाही. सर्व वसूंमध्ये मी श्रेष्ठ व तपस्वी वसू आहे आणि असे असतानाही माझ्या अभिलाषेची इच्छा करून तू हसतेस; तर तू स्त्रीराज्यात जाऊन पडशील. तेथे तुला नावालासुद्धा पुरुष दिसावयाचा नाही.'

त्याने दिलेला शाप ऐकताच ती त्याची स्तुती करू लागली. ती म्हणाली, ' महाराज, चुकून अपराध घडला. प्रारब्धात असेल ते बिनतक्रार भोगलेच पाहिजे; परंतु आता एवढे तरी माझ्यासाठी करा की, मला उःशाप देऊन आपल्या चरणाजवळ जागा द्यावी.'

तिने ती मनोभावे केलेली प्रार्थना ऐकून वसू म्हणाला, ' हे पद्‌मिनी, हल्ली स्त्रीराज्यात राज्यपदावर राणी तिलोत्तमा बसलेली आहे. तिच्या मरणानंतर तू राज्यपदावर बसशील. आता माझ्या ठिकाणी तुझें मन गुंतले आहे, तर माझा पुत्र मच्छिंद्रनाथ हा तुझ्याशी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रममाण होईल. त्याच्यापासून तुला ' मीननाथ ' नावाचा एक पुत्र झाल्यावर मच्छिंद्रनाथ तुझ्यापासून दूर जाईल. मग तू स्वर्गात येऊन इथले भोग भोगशील.'

हे ऐकताच मैनाकिनीने त्याला विचारले, ' त्या ठिकाणी एकही पुरुष नसून साऱ्या स्त्रियाच आहेत, मग त्यांना संतती कशी होणार ?'

ते ऐकून वसू म्हणाला,' वायूचा पुत्र मारुती हा उर्ध्वरेता आहे. त्याच्या भुभु:काराच्या योगाने स्त्रियांना गर्भधारणा होते; पण पुरुषगर्भ मात्र गळून जातो आणि स्त्रीगर्भ वाढतो.'

अशा तऱ्हेने त्या वसूने ही माहिती मैनाकिनीला सांगितल्यावर तिने त्याला विचारले, ' मग आता माझी व मच्छिंद्रनाथाची भेट केव्हा होणार ? तसेच तेथे पुरुष मरण पावतात असे तू म्हणतोस, तेथे मच्छिंद्रनाथ सुखरूपपणे माझ्या योगासाठी कसा काय येऊ शकेल ?

ही मैनाकिनीची शंका ऐकून तो म्हणाला, ' तू मारुतीसाठी तप कर, म्हणजे तो तुला प्रसन्न होऊन हवे ते देईल, पण जेव्हा मारुती प्रसन्न होऊन तुला वर मागण्यास सांगेल, तेव्हा तू त्याच्याशी प्रत्यक्ष समागमाचे मागणे माग. हे मात्र नीट लक्षात ठेव, तू असा वर मागितल्यावर तो संकटात पडून मच्छिंद्रनाथास घेऊन येईल. तेव्हा अशा तऱ्हेने तू तुझा कार्यभाग साधून घे. मारुतीविषयी तू शंका मनात आणू नकोस. असे केल्यावर तो तुझी व मच्छिंद्रनाथाची नक्कीच भेट घडवून देईल.' एवढे बोलून वसू आपल्या स्थानी गेला.

यानंतर मैनाकिनी स्त्रीराज्यात शृंगमुरूड नावाच्या शहरात आली. तेथे ती एका चांभाराच्या घरी जाऊन ओसरीवर बसली. तिला अशी बसलेली पाहून घरधनीण तिची चौकशी करू लागली. तेव्हा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मैनाकिनीने तिला आपली मूळकथा सांगितली. मग ती म्हणाली, ' मी सिंहलद्वीपात राहात होते; पण उपरिचरवसूच्या शापामुळे या शहरात आले. आता माझे येथे कसे होणार हे मला समजेनासे झाले आहे.'

हे ऐकून चांभारीण म्हणाली, ' तू काळजी करू नकोस. तू मला माझ्या मुलीसारखीच आहेस. तू येथे खुशाल राहा व आपल्या हाताने स्वयंपाक करून जेवत जा.'

चांभारणीचे हे बोलणे ऐकून मैनाकिनीला खूप बरे वाटले. मग ती समाधानाने तेथे राहू लागली. ती दोघींचा स्वयंपाक करीत असे. चांभारणीचे काम वाचले. अशा तऱ्हेने मैनाकिनी आनंदाने तेथे आपले दिवस घालवीत होती.

एके दिवशी तिलोत्तमा राणीने प्रधान वगैरे दरबारातील स्त्रियांना सांगितले की, ' आता माझे आयुष्य संपत आले आहे. म्हणून या स्त्रीराज्यपदावर माझ्यानंतर कोणाची स्थापना करायची, याचा विचार केला पाहिजे.'

तेव्हा मंत्रिमंडळाने असा प्रस्ताव मांडला की, ' हत्तीच्या सोंडेत माळ देऊन त्याला नगरात पाठवावे आणि तो जिच्या गळ्यात माळ घालीन, तिला राज्यपदावर बसवावे.'

मंत्रिमंडळाची युक्ती राणीने आनंदाने मान्य केली. मग एक चांगला मुहूर्त पाहून त्या दिवशी हत्तीच्या सोंडेत माळ देऊन त्याला ठरल्याप्रमाणे नगरात पाठविले. हत्तीने मैनाकिनीच्या गळ्यात माळ घातली. तेव्हा तिला राजवाड्यात मोठ्या समारंभाने नेले व सिंहासनावर बसविले. अशा तऱ्हेने मैनाकिनीला राज्यप्राप्ती झाल्यावर तिने मोठे तप केले. तिची निष्ठा पाहून मारुती लगेच प्रसन्न झाला. अशा तऱ्हेने वसूने सांगितल्याप्रमाणे सर्व घडले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ही सिंहलद्वीपात राहात असताना, तिच्या आईवडिलांनी आपल्या आवडीने तिचे ' मैनाकिनी ' नाव ठेवले होते. तसेच ती सिंहलद्वीपातील राणी पद्मिनी होती, म्हणून लोक तिला त्याच नावाने हाक मारीत. तसेच तिला तिलोत्तमेचे राज्य मिळाले म्हणून काही जण तिला ' तिलोत्तमा ' म्हणू लागले. अशा तऱ्हेने तिची ही तीन नावे अस्तित्वात आली व प्रसिद्ध झाली.

मारुती मैनाकिनीच्या समोर आसनावर बसला. तो म्हणाला, ' मी दिलेल्या वचनाप्रमाणे मच्छिंद्रनाथ तुझ्या स्वाधीन केला. मी माझे वचन पाळले, परंतु तो आता येथे जास्त दिवस राहू शकणार नाही. कारण मच्छिंद्रनाथाचा शिष्य गोरक्षनाथ हा त्याला घेऊन जाण्याच्या निश्चयाने येथे येत असून, तो सर्वांना अजिंक्य आहे. तेव्हा आता माझे काही चालत नाही. मी तुझ्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले, रामानेही सांगून पाहिले, परंतु त्याने आमचे ऐकले नाही. तेव्हा आता गोरक्षनाथ इथे आल्यावर युक्तीने त्याला इथेच रमवावे, पण एक लक्षात ठेव की, तो विषयासक्त नाही, पण काहीही करून त्याच्यावर तुझा प्रभाव पडला पाहिजे.' इतके सांगून मारुती निघून गेला. मैनाकिनी मात्र चांगलीच काळजीत पडली.

इकडे गोरक्षनाथ कलिंग वेश्येबरोबर शृंगमुरूडाला येऊन पोहोचला. ती सर्वजण गावाजवळच्या एका धर्मशाळेत उतरली. नंतर ती कलिंगाआपल्या सरंजामासह राजवाड्यात जायला निघाली. तिच्याबरोबर पाच-सात जणी होत्या. तिने आपण आल्याची वर्दी देण्यास द्वारपालाला सांगितले. त्यांनी तो निरोप राणीस सांगताच राणीने तिला आत बोलाविले. कलिंगा सर्वांसह सभेमध्ये आली. तेव्हा मच्छिंद्रनाथ रत्नाने मढविलेल्या सुवर्णाच्या आसनावर बसला होता व शेजारी राणी बसली होती. त्याच्या तैनातीला अनेक स्त्रिया होत्या. दरबारात आल्यावर कलिंगा राणीला म्हणाली, ' आपली कीर्ती

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ऐकून मी येथे आले आहे. आजपर्यंत नुसतेच ऐकत होते, पण आता आपले ऐश्वर्य पाहून मी समाधान पावले.'

असे म्हणून तिने पद्‌मिनीची खूपच स्तुती केली. नंतर त्याच दिवशी रात्री कलिंगेचा नृत्याचा कार्यक्रम करण्याचे राणीने नक्की केले व मग कलिंगा आपल्या बिऱ्हाडी गेली.

या रात्रीच्या कार्यक्रमासाठी मैनाकिनीने सभामंडपात सर्व तयारी केली होती. तिने स्फटिकाच्या पणत्या लावल्या. मग कलिंगेला समारंभाने आणविले. ती येताना गोरक्षनाथही तिच्याबरोबर जाण्यास निघाला. जाण्यापूर्वी तिला एका बाजूला नेऊन त्याने सांगितले,' तू नृत्य कर, मी मृदंग वाजवितो. मृदंगामुळे मच्छिंद्रनाथाबरोबर राणीही एकदम खूष होऊन जाईल. मग त्यावेळी तू लागेल तेवढा पैसा त्यांच्याकडून मागून घे.'

यावर कलिंगा म्हणाली, ' मी तुला बरोबर नेले असते. त्यात माझी हरकत नाही. परंतु तेथे सर्व स्त्रियाच आहेत व पुरुषाला जाण्याची परवानगी नाही. तुला पाहून त्यांना संशय येईल.'

कलिंगेची शंका ऐकून गोरक्षनाथ लगेच म्हणाला, ' मी स्त्रीच्या वेषात येतो. त्यामुळे दोन फायदे होतील. एक म्हणजे माझी इच्छा तृप्त होईल व तुलाही पुष्कळ पैसा मिळेल.'

हे ऐकल्यावर कलिंगेने लगेच कबूल केले. मग छानपैकी लुगडे, चोळी केली. जटा सोडवून वेणीफणी टापटिपीने केली. दागदागिने घालून गोरक्षाने हुबेहुब स्त्रीचा वेष घेतला. त्याला पाहून ती सर्व मंडळी आश्चर्याने थक्क झाली. उर्वशीसारख्या स्त्रियांनी दासी बनावे असे ते अप्रतिम लावण्य होते. ते पाहून राणी व इतर स्त्रियांनी तिची मदनबाळी म्हणून वाखाणणी केली. खरं म्हणजे कलिंगा ही मुख्य नायकीण, पण गोरक्षाच्या लावण्यापुढे तिचेही तेज फिके पडले. यानंतर त्याने ताल, सूर समजून मृदंग वाजविण्यास सुरुवात केली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाचही सुरू झाला. त्या वेळेचे कलिंगेचे गाणे ऐकून सर्वांनी तिची वाहवा केली.

गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला पाहताच मनोमन नमस्कार केला. इतक्या दिवसांनी गुरूचे दर्शन झाल्यामुळे त्याला कृतार्थ झाल्यासारखे वाटले. त्या वेळचा नृत्यगायनाचा कार्यक्रम फारच अपूर्व असा झाला. प्रत्यक्ष मच्छिंदनाथानेही मान डोलावून शाबासकी दिली. परंतु त्यानंतर गोरक्षनाथ मृदंग वाजवीत असता मधूनच ' चलो मच्छिंदर गोरख आया, ' असा आवाज तो वारंवार मृदंगावर काढी. तो ऐकून मच्छिंद्रनाथ एकदम दचकला व गोरक्ष कसा काय आला, या विचारात पडला. गाण्यावरून त्याचे मन उडाले. पद्मिनीने त्याला त्याचे कारण विचारले तेव्हा त्याने तिला गोरक्षनाथाचा सर्व प्रकार आरंभापासून सांगितला.

मारुतीने पद्मिनीला गोरक्ष आल्याविषयी सांगितलेली खूण पटताच तीही एकदम उदास बनली. त्यामुळे त्या गाण्याच्या बैठकीचा रसभंग झाला. तरीही मैनाकिनी तशीच बसून ऐकत राहिली. काही वेळाने तिच्याही कानावर तसाच आवाज पडला; मग तिने कलावंतिणीला सांगितले की, आमच्याजवळ मृदंग आहे, तो वाजवून पाहा. गोरक्षाने तो वाजविला तरीही तसाच आवाज मधून मधून निघू लागला.

मग राणीने आपल्या कलावंतिणीला वाजवायला सांगितले, पण त्यातून ' चलो मच्छिंदर,गोरख आया ' असे स्वर येईनात. मग त्या स्त्रीवेषधारी गोरक्षाला मैनाकिनीने हात वर करून एका बाजूला बोलावले आणि गुरूची शपथ घालून खरा प्रकार सांगण्याबद्दल प्रार्थना केली, तेव्हा आपल्याला प्रकट होण्यास हीच वेळ आहे असा विचार करून तो तिला म्हणाला, ' मी खरोखर कामिण (स्त्री) नाही. मी मच्छिंद्रनाथाचा प्रिय शिष्य गोरक्षनाथ आहे. तुझ्या राज्यातील

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

व्यवस्थेमुळे मला स्त्री-वेष घेऊन येणे भाग पडले.'

ते ऐकून मैनाकिनी त्याच्यापाया पडली. तिने पुरुषाची वस्त्रे गोरक्षनाथाला दिली. त्याने स्त्री-वेष टाकून पुरुषवेष घेतला व तो मच्छिंद्रनाथाजवळ गेला. मैनाकिनी मच्छिंद्राला म्हणाली, ' तुमच्या भेटीसाठी गोरक्षनाथ येथे आला आहे. आपले नशीब चांगले म्हणून हा येथे आला. हा सफळ राज्याचा धैर्यमेरू आहे. आता माझी सर्व काळजी दूर झाली. राज्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन हा व्यवस्थित राज्यकारभार चालवील व आपला धाकटा भाऊ मीननाथ याचेही उत्तम तऱ्हेने संगोपन करील, याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे.'

अशा प्रकारे बोलून मैनाकिनीने त्याला मोहून टाकण्याचा विचार केला. परंतु तो तिचा बेत पाहून गोरक्षनाथाला हसू आले. तो तिला म्हणाला, ' आम्ही वैष्णव लोक. आम्हाला अशा तऱ्हेचे भूषण काय कामाचे ? विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला पाहिजे?'

परंतु असे जरी तो वरकरणी म्हणाला तरी मच्छिंद्रनाथ आपल्या स्वाधीन होईपर्यंत पद्मिनी जसे सांगेल तसे वागण्याचे त्याने ठरवले. नंतर गुरु-शिष्य अगदी कडकडून भेटले व कलिंगा नायकिणीस पुष्कळ द्रव्य देऊन, तिची बोळवण केली. नंतर मच्छिंद्रनाथाने आपल्या शिष्यास कुशल विचारले, तेव्हा त्याने आपली संपूर्ण हकीकत त्याला सांगितली व आता तुमचा वियोग सहन होत नाही, म्हणून तुम्हाला सोडून मी एकटा केव्हाही रहाणार नाही, असे त्याने सांगितले. तेव्हा मच्छिंद्रनाथाने त्याची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, ' तुझ्याविषयी मी एकसारखा विचार करीत आहे, पण काय ? जे घडू नये ते घडले. मला मारुतीने गुंतवून ठेवून येथे आणले; पण मला तुझ्याशिवाय हे वैभव फोल वाटत आहे.'

अशा प्रकारे गुरु शिष्याची समजूत काढू लागला, तेव्हा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गोरक्षनाथ म्हणाला, ' माझी एक गोष्ट ऐका. तुमचे अनेक शिष्य आहेत. आणि पुढेही तुम्ही जेथे जाल तेथेही पुष्कळ शिष्य निर्माण कराल. पण यामुळे तुमच्या मायेचे आवरण वाटले जाईल. मला मात्र गुरू असे तुम्ही एकटेच आहात. म्हणून तुमची आराधना केली. जशी माशांना पाण्याशिवाय गती नाही, त्याप्रमाणेच माझे सर्व काही तुम्हीच !'

असे बोलत असता एकीकडे गोरक्षाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहात होत्या. मग मच्छिंद्रनाथाने त्याला पुष्कळ बोध करून त्याचे समाधान केले. त्यावेळी त्या दोघांनी प्रेमाने पुष्कळ गप्पा मारल्या. नंतर दोघांनी एकाच ताटात जेवण केले. एकाच ठिकाणी झोपले. सकाळी नित्यकर्म झाल्यावर एका मांडीवर गोरक्ष व दुसऱ्या मांडीवर मीननाथ यांना घेऊन मच्छिंद्रनाथ रत्नखचित सिंहासनावर बसून गप्पा मारीत असे.

❋ ❋ ❋

अध्याय २१ वा

गोरक्षनाथ व मच्छिंद्रनाथ मैनाकिनीच्या राजवाड्यात राहात होते. गोरक्षाने इथेच रमावे म्हणून मैनाकिनी त्याला जपत होती. मुलापेक्षा जास्त प्रेम ती दाखवत होती. ती त्याच्या खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची व्यवस्था पाहात असे. त्याला कपडे, दागदागिने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वापरायला देऊ लागली. पण गोरक्षनाथाला ते मानवत नव्हते. तो मच्छिंद्रनाथास म्हणायचा, आपण इथे राहता हे योग्य नाही. स्वर्ग, मृत्यू, पाताळ हे तुमच्या सेवेची इच्छा करीत आहेत पण तुम्ही इथे राहता. तुम्ही कोणाचे अवतार आहात, तुम्हाला कोणते काम करायचे आहे, याचा विचार करायला हवा. नाहीतर तुमच्यावर दोष येईल. म्हणून तुम्ही सर्व सुखाचा त्याग करून सर्वसंगपरित्याग करून या काळजीतून मुक्त व्हावे.'

गोरक्षाच्या उपदेशाने मच्छिंद्रनाथाला विरक्ती उत्पन्न झाली. या मायेत गुंतून न पडता आपल्या स्थानी जाण्याबद्दल त्याने गोरक्षाला वचन दिले, तेव्हा त्याला खूप आनंद झाला. पुढे गोरक्षाबरोबर गेल्यावाचून आता सुटका नाही, असा आपला विचार मच्छिंद्रनाथाने तिलोत्तमेला कळविला. पण तुझ्या ठायी मन घोटाळते असेही सुचविले. त्यावर ती म्हणाली, ' तुम्हाला जायचे नसेल तर तो कसा नेईल ?'

त्यावर मच्छिंद्राने गोरक्षाबरोबर झालेले बोलणे तिला सांगितले आणि म्हटले, ' त्याच्याबरोबर आता जायलाच पाहिजे. पण जीव तुझ्यासाठी कासावीस होत आहे. आता एकच उपाय आहे. तो म्हणजे तू त्याला मोहवून टाक.'

हे ऐकून ती म्हणाली, ' मी पूर्वीच हा उपाय करून पाहिला. पण त्याला यश आले नाही.'

अशा तऱ्हेने तिचे बोलणे ऐकल्यावरही आणखी एकदा प्रयत्न करण्यासाठी मच्छिंद्रनाथाने तिला सुचविले.

' एके दिवशी गोरक्षनाथाने पद्मिनीला सांगितले की, ' आज मच्छिंद्रनाथाला घेऊन तीर्थयात्रेला जायची इच्छा आहे.' तेव्हा ती त्याला समजावण्याच्या सुरात म्हणाली, ' बाळा, मी तुला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

माझा मोठा मुलगा समजते. त्यामुळे आता राज्याचा सर्व कारभार तू आपल्या हातात घे. तुझा धाकटा भाऊ हाती घे. आता आम्ही अन्नवस्त्र घेऊन स्वस्थ बसणार.'

गोरक्षनाथाला दया यावी म्हणून ती अगदी दीन मुद्रेने म्हणाली, ' आम्ही आता वृद्ध झालों आहोत, आमचे संगोपन कोण करणार ? आम्हाला विहिरीत लोट आणि मग जा.' पण तरीही गोरक्षाचा विचार बदलला नाही. त्याला तिची दया आली नाही. उलट त्याने तिला स्पष्टच सांगितले की, ' आम्हाला त्रैलोक्यातील राज्य मिळाले तरी त्याची किंमत नाही. मग तुझ्या स्त्रीराज्याची गोष्ट काय ? ते आम्हाला नको. ते तुझे तू खुशाल भोग. आम्ही योगी लोक. योग ही आमची संपत्ती आहे. आम्हाला या भूषणांमध्ये फारसे महत्त्व वाटत नाही. म्हणून आम्ही तीर्थयात्रेस जातो. तेथे योग्य कर्मे करून सुखसंपत्ती उपभोगू.'

असे तिला सांगून तो तिच्याजवळून जाण्याची आज्ञा मागू लागला. त्याने राहावे म्हणून तिने हरतऱ्हेने सांगून पाहिले, पण त्याला काहीच पटले नाही. शेवटी निदान वर्षभर तरी राहावे म्हणून तिने खूप आग्रह केला. तेव्हा तो म्हणाला, ' मलाच आता येथे येऊन सहा महिने झाले, काही झाले तरी यापेक्षा जास्त दिवस मला येथे राहता येणार नाही.'

मग पद्मिनी म्हणाली, ' आता फक्त सहा महिने राहा. सहा महिन्यांपेक्षा जास्त मी ठेवून घेणार नाही. आता थोड्यासाठी जाण्याची घाई करू नकोस. मग मी मोठ्या आनंदाने मुहूर्त पाहून मच्छिंद्रनाथास तीर्थयात्रा करायला परवानगी देईन.'

अशा प्रकारे ती फारच आग्रह करू लागली. त्यामुळे त्याला तिचे म्हणणे मोडवेना. तो तिला म्हणाला, ' तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी आणखी सहा महिने तुझ्यासाठी येथे राहीन. पण नंतर मात्र !

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आम्हाला जाण्याची तू कधी परवानगी देणार, तो नक्की दिवस आजच मला सांग, म्हणजे बरे पडेल.'

यावर तिने चैत्र शुद्ध प्रतिपदेचा दिवस त्याच्याजवळ कबूल केला. सहा महिने काय आत्ता निघून जातील, असा विचार मनात आणून गोरक्षनाथाने हे कबूल केले.

पुढे थोडे दिवसांनी एके दिवशी मैनाकिनीने गोरक्षाला हाक मारून जवळ बसविले. प्रेमाने त्याच्या तोंडावरून हात फिरवून ती म्हणाली, ' बाळा, माझ्या मनात तुझे लग्न करावे असे आहे. म्हणजे मग सुनेबरोबर आनंदाने माझे दिवस जातील. अत्यंत लावण्यवती अशा स्त्रीशी मी तुझा विवाह करून देणार आहे. लग्नसमारंभही मोठ्या थाटामाटात करीन. तुम्ही तीर्थयात्रा करून लवकर परत या. फार दिवस काढू नका. येथे आल्यावर सर्व राज्यकारभार तू आपल्या ताब्यात घे. बाळा, माझी एवढी हौस तू पूर्ण कर म्हणजे झाले.'

अशा प्रकारच्या अनेक युक्त्याप्रयुक्त्या मैनाकिनी योजू लागली. परंतु तिचे सर्व प्रयत्न फुकट गेले. कसलाही उपयोग झाला नाही. त्याने तिला निक्षून सांगितले, 'मला दोन बायका आहेत. कर्ण-मुद्रिका हीं त्यांची नावे. आता आणखी तिसरी करण्याची काय आवश्यकता नाही. आणि आता लग्न करणे मला शोभतही नाही.'

अशा तऱ्हेने तिला त्याने स्पष्टपणे सांगितल्यावर तिची निराशा झाली. पण नंतर पुन्हा एकदा तिने प्रयत्न केले. एके दिवशी गोरक्षनाथास मोह घालण्यासाठी पद्मिनीने एक सुंदर स्त्री रात्री त्याच्याकडे पाठविली. ती सोंगट्याचा पट बरोबर घेऊन गेली. ती गोरक्षनाथाच्या खोलीत जाऊन म्हणाली, 'आज तुमच्याबरोबर सोंगट्या खेळाव्या, अशी माझी इच्छा आहे.'

हे ऐकून तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी म्हणून तो तिच्याबरोबर सोंगट्या खेळायला बसला. त्यावेळी ती नेत्रकटाक्ष करू

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लागली. तिने पदर ढळविला. हरतऱ्हेचे हावभावही केले, परंतु गोरक्षनाथ कशाकडेही बघेना. शेवटी तिने खेळता खेळता आपल्या मांड्या उघड्या ठेवून ती थोडीशी नग्नावस्थेत आली. पण गोरक्षाला तिचा मोह पडला नाही. शेवटी ती निराश झाली व परत जाऊन राणीला सर्व हकीकत तिने सांगितली. ते ऐकून मैनाकिनी आणखीनच उदास झाली.

सगळे प्रयत्न फुकट जातात असे पाहिल्यावर पुढे पुढे तर मच्छिंद्रनाथाचा वियोग होणार म्हणून मैनाकिनी मीननाथाला पोटाशी घेऊन रडत बसू लागली. तेव्हा शैल्यादी स्त्रिया तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करीत व गोरक्षनाथास आपण वश करू, असा तिला धीर देत. पण तिचा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसत नसे. अशा तऱ्हेने दिवस चालले होते. मग वर्षप्रतिपदेचा दिवस उजाडला. त्या दिवशी जिकडे तिकडे लोक आनंदात असायचे. पण राणी आणि सर्व नगरी हळहळू लागली.

इकडे गोरक्षनाथ शिंगी, फावडी वगैरे घेऊन मच्छिंद्रनाथाजवळ आला. तो मच्छिंद्राच्या पाया पडून त्याला निघण्याची घाई करू लागला, ते पाहून मैनाकिनीच्या डोळ्यात पाणी आले. ती त्यांना जेवून जाण्याचा आग्रह करू लागली. मग गुरु-शिष्यांनी एका पंक्तीस भोजन घेतले. नंतर मैनाकिनी राणीने मच्छिंद्रनथास विचारले, 'आता तुम्ही तर जायलाच निघालात, पण तुमच्याबरोबर मीननाथालाही घेऊन जाणार आहात की काय? काय ते मला सांगा.'

मच्छिंद्रनाथ म्हणाले, 'त्याला नेण्याच्या बाबतीत तुझी काय इच्छा असेल तसे आम्ही करू.'

यावर राणी म्हणाली, 'तुम्ही मीननाथाला तुमच्याबरोबरच घेऊन जावे, कारण आजपर्यंत तुम्ही येथे होतात म्हणून मारुतीच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भुभु:कारापासून त्याचे संरक्षण झाले. तुम्ही गेल्यावर त्याचे रक्षण करणारे येथे कोणी नाही. आणि दुसरे असे की, मला अंतरिक्षवसूचा शाप आहे. शापाची वेळ पूर्ण होत आली आहे. तुम्ही गेल्याबरोबर मला उ:शापाचे फळ मिळेल. तो येऊन मला येथून घेऊन जाईल. मग मीननाथाचे रक्षण येथे कोण करील? त्याला स्वर्गात घेऊन गेले असते पण तेथे मनुष्यदेह जाऊ शकत नाही. त्यामुळे या सर्व अडचणी लक्षात घेऊन तुम्ही मीननाथास बरोबर घेऊन जावे.'

मग राणींच्या म्हणण्याप्रमाणे मीननाथाला घेऊन जायचे ठरले. ते जेवण करून उठले. मैनाकिनीनेही जेवण उरकले. मीननाथाचा विरह होणार या कल्पनेने तिलोत्तमेच्या तोंडून शब्द फुटेना. तिला एकसारखे रडू येऊ लागले. ते पाहून तेथील सर्व स्त्रियांनी गोरक्षनाथाला गराडा घातला. त्याने तेथून जाऊ नये म्हणून त्या त्याची विनवणी करू लागल्या. त्या राज्यवैभवाचे वर्णन करू लागल्या. निरनिराळे कपडे, दागदागिने यांचा ढीग त्याच्यापुढे ठेवला. रत्नखचित अलंकार व भरजरी शेले यांनी भरलेली ताटेच्या ताटे त्याच्यापुढे येऊ लागली. त्या सर्वजणी त्याला म्हणू लागल्या, 'आम्ही सर्वजणी तुझ्या दिमतीला राहू. तू म्हणशील तसे नटून-शृंगारून तुला भरपूर रतिसुख देऊ.'

परंतु गोरक्षाची चित्तवृत्ती ढळली नाही. उलट, त्याने या सर्वांचा धिक्कार केला व तो म्हणाला, 'आम्हाला संपत्तीचे काय करायचे आहे? जमिनीचे अंथरूणच आम्हाला अधिक सुखदायक वाटते.'

असे म्हणून तो लगेच निघाला. जाताना त्याने मैनाकिनीला नमस्कार केला; मीननाथाला खांद्यावर घेतले व मच्छिंद्रासह तो तीर्थयात्रेला निघाला.

मैनाकिनीने गोरक्षनाथाच्या नकळत आपल्या खजिन्यातील

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

एक सोन्याची वीट मच्छिंद्रनाथाला दिली. ती त्याने गोरक्षास नकळत झोळीत ठेवली. गावच्या वेशीपर्यंत सर्व मंडळी निरोप द्यायला आली होती. तेथे गेल्यावर मैनाकिनी मच्छिंद्रनाथाच्या पाया पडली. तिने गोरक्षनाथास पोटाशी धरले व मच्छिंद्रनाथाची काळजी घेण्यास पुन्हा पुन्हा सांगितले. तिचा मोह सुटेना. तिने गोरक्षाच्या गळ्याला मिठी घातली व हंबरडा फोडला, पण गोरक्षनाथ तेथून निसटून मच्छिंद्रनाथाचा हात धरून ताबडतोब चालू लागला.

इकडे राणी ऊर बडवून व डोके आपटून घेऊ लागली व हंबरडा फोडून शोक करू लागली. तिची स्थिती वसूच्या कानी गेली. तो विमान घेऊन तिच्याजवळ आला व तिला तिच्या वाड्यात घेऊन गेला. तो म्हणाला, 'तू असे काय वेड्यासारखे करतेस? तू हे काय चालवले आहेस? तू स्वर्गात राहणारी असून शापामुळे येथे आलीस आणि आता शापातून मुक्त होऊन तू सुखी होणार आहेस.' असे बोलून तो तिची समजूत घालू लागला. तिचे डोळे पुसून तिला युक्तीयुक्तीने बोध करू लागला.

❋ ❋ ❋

अध्याय २२ वा

उपरिक्षवसू तिला म्हणाला, ' या जगात जे सर्व काही दिसते, ते अशाश्वत व नाशिवंत आहे. तू शोक करणे योग्य नाही. तू

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सिंहलद्वीपात चल. बारा वर्षे झाल्यावर मी तुझी व मच्छिंद्रनाथाची भेट घडवून आणीन.त्यावेळी त्याच्याबरोबर गोरक्षनाथ व मीननाथही असतील. ही भेट कोणत्या कारणाने होईल, ते तुला सांगतो. ऐक!

' सिंहलद्वीपात इंद्र एक मोठा यज्ञ करील. त्या वेळेस त्या समारंभाला विष्णू, ब्रह्मदेव, शंकर वगैरे सर्वश्रेष्ठ देव येतील. त्यांच्याबरोबर नवनाथही येतील. तेव्हा आता शोक सोडून विमानात बसून सिंहलद्वीपात चल.'

उपरिक्षवसूने तिचे समाधान केले. नंतर ती म्हणाली, ' इंद्र यज्ञ करो अगर न करो, पण मच्छिंद्रनाथाची भेट करविण्याचे आपण मला वचन द्यावे, म्हणजे माझा जीव शांत होईल.'

हे ऐकून त्याने तिच्या म्हणण्याप्रमाणे तिला वचन दिले. मग त्याच्या आज्ञेप्रमाणे मैनाकिनीने दैर्भामा नावाच्या दासीला राज्यावर बसवून आपण आपल्या स्थानी जायला निघाली. मैनाकिनी जाणार म्हणून सर्व स्त्रियांना फारच दु:ख झाले. जाताना तिने सर्वांची समजूत घातली व दैर्भामेस व्यवस्थित रीतीने राज्य चालवून सर्वांना सांभाळण्याचा उपदेश केला. नंतर तिला सिंहलद्वीपात पोहोचवून उपरिक्षवसू आपल्या स्थानी गेला. अशा तऱ्हेने मैनाकिनी शापमुक्त झाली.

इकडे मच्छिंद्रनाथ हिंडत हिंडत गौडबंगाल्यात आले. तिथे त्यांची कानिफाची भेट झाली. तेव्हा आपल्याला या पुण्यवान माणसामुळे गुरूची भेट झाली, असा विचार मनात येऊन गोरक्ष मीननाथाला खाली उतरवून कानिफनाथाच्या पाया पडला. भेटताना त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. तेव्हा मच्छिंद्रनाथाने त्याला रडण्याचे कारण विचारले.

मग गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला निवेदन केला. जालिंदरास गोपीचंद राजाने पुरल्याची हकीगतही सांगितली. ते ऐकून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मच्छिंद्रनाथ मनातून रागावला. नंतर ते फिरत फिरत गोपीचंदाच्या राजधानीत म्हणजे हेलापट्टणास येऊन पोहोचले. तेव्हा गावातील बरीच मंडळी त्यांना भेटली. कानिफाने जालिंदरास वर काढल्यापासून मुक्तचंद राज्यावर बसेपर्यंतची हकीकत त्यांनी मच्छिंद्रास सांगितली. मग त्याने हल्ली राज्यकारभार कोण चालवतो, म्हणून विचारताच तो मैनावतीच्या मार्फत चालतो असे गावकरी सांगू लागले. गावकऱ्यांनी मैनावतीची खूपच स्तुती केली.

हे ऐकून तिची भेट घेण्याच्या उद्देशाने गोरक्षनाथ व मीननाथ यांच्यासह मच्छिंद्रनाथ राजवाड्यात गेले. तेथे पोहोचताच मैनावतीला आपण आल्याची वर्दी देण्यास द्वारपालाला सांगितले. द्वारपाल लगेच आत गेला व कोणी योगी दोन शिष्यांबरोबर आला आहे, असे त्याने मैनावतीस सांगितले. मैनावतीने त्याचे वर्णन विचारल्यावर ते हुबेहुब जालिंदरनाथासारखे दिसत आहेत, असे द्वारपाल म्हणाले; ते ऐकताच प्रधान व इतर मंडळींसह मैनावती त्यांना सामोरी गेली आणि त्यांना मंदिरात घेऊन आली. त्यांना सुवर्णाच्या आसनावर बसवून त्यांची षोडशोपचारे पूजा करून ती म्हणाली, ' आपले पाय आज येथे लागल्याने मी अगदी धन्य झाले आहे.'

तिच्या आदराच्या बोलण्यानंतर मच्छिंद्रनाथ आपली मूळ कथा सांगू लागले, ' मी उपरिक्षवसूचा मुलगा. मला मच्छिंद्रनाथ म्हणतात. दत्तात्रेयाने मला अनुग्रह दिला. जालिंदरनाथासही त्यांनीच उपदेश केला. जालिंदरनाथ माझा धाकटा गुरूबंधू आहे. त्याला इथे त्रास झाला हे ऐकून मी रागाने येथे येत होतो. परंतु येथला सर्व प्रकार ग्रामस्थांकडून कळला आणि माझा राग शमला. तेव्हा तुझ्या उत्तम गुणांबद्दल तुझी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. मला फार समाधान वाटते, तू धन्यता मिळवलीस. यामुळे बेचाळीस कुळे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

उद्धरलीस ! धन्य आहेस तू !'

अशा प्रकारे नाथ बोलत असताना मैनावती त्याच्या पाया पडली व म्हणाली, ' महाराज, हे सर्व आपल्या कृपादृष्टीनेच झाले आहे. चांगले किंवा वाईट जशी इच्छा करावी तसे फळ मिळते. परिसाने लोखंडाचे सुवर्ण होते, पण यापेक्षा तुमचे औदार्य हे अधिक आहे.'

मग मोठ्या सन्मानाने त्यांना वस्त्रे दिली. त्यांचे भोजन झाले. ती तिघेजण तेथे तीन दिवस राहिली व पुढे निघाली. मैनावतीसह पुष्कळ गावकरी त्यांना एक कोस पोहोचवायला गेले होते.

हेलापट्टणाहून निघाल्यावर गोरक्षनाथ व मीननाथ यांच्यासह मच्छिंद्रनाथ गावोगाव फिरत, जगन्नाथक्षेत्रास गेले. तेथेही ते तीन रात्री राहिले. तीर्थविधी केला व पुढे निघाले. मग ते फिरत फिरत सौराष्ट्रगावी वस्तीला राहिले. दुसऱ्या दिवशी सकाळी गोरक्षनाथ भिक्षेसाठी गावात गेला, तेव्हा मीननाथ अजून निजला होता. तो उठल्यावर मच्छिंद्रनाथाने त्याला शौचास बसविले. इतक्यात गोरक्षनाथ भिक्षा मागून परत आला. तो आलेला पाहताच मच्छिंद्राने त्याला मीननाथास धुऊन आणायला सांगितले. मीननाथ लहान असल्याने त्याचे सगळे हातपाय भरून गेलेले पाहून गोरक्षनाथास घाण वाटली. त्याच्या मनात आले की, आपल्यासारख्या संन्याशाला हा खटाटोप कशाला हवा ?

त्या रागाच्या आवेशात गोरक्षनाथ मीननाथाला घेऊन नदीवर गेला व तेथे एका दगडावर त्याला आपटून त्याने त्याचा प्राण घेतला. नंतर त्याचे प्रेत पाण्यात नेऊन हाडे, मांस मगरी व माशांना खायला टाकले व कातडे मात्र स्वच्छ धुऊन, घरी नेऊन वाळत घातले; त्यावेळी मच्छिंद्रनाथ तेथे नव्हता. तो परत आल्यावर त्याने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मीननाथाची चौकशी केली. तेव्हा त्याला सुकत ठेवला आहे असे गोरक्षाने सांगितले. पण त्याला गोरक्षाचे म्हणणे खरे वाटेना. तेव्हा बाहेर नेऊन वाळत घातलेले मीननाथाचे कातडे गोरक्षनाथाने दाखवले. ते पाहून मच्छिंद्रनाथ धाडकन जमिनीवर कोसळला. गडबडा लोळून, मोठमोठ्याने विलाप करू लागला, डोके आपटू लागला. त्याचे कातडे हाती घेऊन त्याच्या गुणाचे वर्णन करू लागला.

ते पाहून गोरक्षनाथ मनात म्हणाला गुरूची भ्रांती अजून गेली नाही. मग तो त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, ' गुरुराज, तुम्ही अशा तऱ्हेने अज्ञानात का शिरता ? तुम्ही कोण ? मुलगा कोणाचा ? आणि असे रडता काय ? कोण मेला आहे याचा विचार करा. अशाश्वताचा नाश होतो. शाश्वतास मरण नाही. तुमचा मीननाथ कधीही मरायचा नाही. शस्त्राने, अग्नीने, वाऱ्याने, पाण्याने किंवा अशा प्रकारानेही त्याचा नाश होणार नाही. कारण तो शाश्वत आहे.'

गोरक्षाने पुष्कळ सांगून पाहिले, परंतु मच्छिंद्राचा शोक कमी होईना. मग गोरक्षनाथाने संजीवनी मंत्राचा उपयोग करून भस्माची चिमूट मीननाथाच्या कातड्यावर टाकली.लगेच मीननाथ उठून उभा राहिला आणि तो मच्छिंद्राच्या गळ्यात पडला. मच्छिंद्रनाथाने त्याला प्रेमभराने मिठी मारली. त्याचे मुके घेतले व त्याच्याशी लडिवाळपणे बोलू लागला. मग त्या दिवशी ते तेथेच राहिले.

दुसऱ्या दिवशी ते निघाले तेव्हा गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला विचारले,'तुम्ही निर्जीवाला सजीव कराल अशी तुमची शक्ती आहे! असे असतानाही आपण रडण्याचे कारण काय ? तुम्हाला अशा तऱ्हेने रडताना पाहून मला फार आश्चर्य वाटले.'

हे ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' त्याला तू का मारलेस, ते मला सांग.'

तेव्हा तो गुरूला म्हणाला, ' मी तुमचा लोभ पाहण्यासाठी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याला मारले. तुम्ही स्वत:ला विरक्त म्हणवता आणि मीननाथावर इतके प्रेम धरता; तुमचा भाव कितपत खरा आहे ते मला पाहावयाचे होते; पण तुम्ही सुज्ञ असून रडलात हे कसे काय ?'

हे ऐकून मच्छिंद्रनाथ त्याला म्हणाला, ' आशा, तृष्णा, क्रोध वगैरे तुझ्या अंगी कितपत आहेत हे मला पाहायचे होते. म्हणून मुद्दामच मी हे कौतुक केले. शाश्वत, अशाश्वत हे तुला कळले आहे की नाही, याबद्दल मला शंका होती. ती शंका मी या प्रसंगाने फेडून घेतली.'

ते सर्व ऐकताच आपल्या प्रसादाचाच हा सर्व प्रताप असे म्हणून गोरक्षनाथ गुरूच्या पाया पडला.

✻ ✻ ✻

अध्याय २३ वा

सौराष्ट्र गावाहून मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ फिरत फिरत तेलंगणात गेले. तेथे गेल्यावर त्यांनी गोदावरीच्या संगमावर स्नान करून आत्मलिंग शिवाची पूजा केली. तेथून ते औंढ्यानागनाथ, परळीवैजनाथ वगैरे सर्व तीर्थे उरकून गर्भगिरी पर्वतावर वाल्मीकीऋषींचे स्थान आहे तेथे आले. ते अरण्य फार घनदाट होते. अशा त्या घनघोर व भयाण अरण्यातून प्रवास करण्याची वेळ येताच मच्छिंद्रनाथ दचकला. त्याला एवढे घाबरण्याचे कारण म्हणजे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्त्रीराज्यातून निघताना मैनाकिनीने त्याच्या झोळीत कनकवीट टाकली होती, हे होय. ती वीट वाटेत चोर नेतील या भीतीने त्याच्या जिवाची घालमेल झाली होती.

गोरक्षनाथाच्या लोभाची परीक्षा पाहण्यासाठीच ही सर्व भीती होती. मच्छिंद्राला भीती कशाची असणार? तो गोरक्षाला जवळ घेऊन एकसारखा विचारी , ' काय रे, त्या अरण्यात चोरांची भीती नाही ना ?'

हे ऐकून गुरूला चोराचे भय कशासाठी वाटते असा विचार गोरक्षाच्या मनात आला. गुरूजवळ काहीतरी मौल्यवान असले पाहिजे. त्यामुळे अशी भीती त्यांना वाटत असेल असा गोरक्षाने तर्क केला. या भीतीच्या निवारणाचा विचार करीत तो मुकाट्याने चालत होता. इतक्यात एका ठिकाणी पाणी दिसले. तिथे मच्छिंद्रनाथाने गोरक्षाला जरा थांबावयास सांगितले व आपली झोळी त्याच्याजवळ देऊन तो शौचास गेला.

गोरक्षाला झोळी जड लागली. त्यामुळे त्याने झोळीत काय आहे, हे पाहिले. तो त्याला सोन्याची वीट दिली. ती पाहून हेच गुरूच्या भीतीचे कारण आहे, हे समजून त्याने ती वीट फेकून देऊन विटेच्या आकाराचा एक दगड त्यात ठेवला आणि आपण पुढे चालू लागला. मच्छिंद्रनाथही शौचाहून आल्यावर चालू लागला. गुरू मागून येत आहे असे पाहून गोरक्ष त्याची वाट पाहात एका झाडाखाली विश्रांती घेत बसला.

इतक्यात एक विहीर दिसली. तेथे त्याने स्नान उरकले. मीननाथालाही घातले व नित्यकर्म उरकून घेत असतानाच मच्छिंद्रनाथ तेथे येऊन पोहोचला. पुढे काही भीती नाही ना, असे पूर्वीप्रमाणेच विचारू लागला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गोरक्षनाथ म्हणाला, ' भीती सगळी मागेच राहिली. आता अजिबात काळजी न करता स्वस्थ रहावे.'

गोरक्षनाथाचे उत्तर ऐकून मच्छिंद्रनाथाला आश्चर्य वाटले. त्याने त्याला मिळालेल्या विटेची गोष्ट सांगितली व त्यामुळे वाटणारी भीतीही पुन्हा एकदा बोलून दाखविली. ते ऐकून गोरक्षनाथ म्हणाला, ' आता आपल्याला डर नाही.'

हे ऐकून मच्छिंद्रनाथ वीट पाहण्यासाठी तळमळू लागला; परंतु गोरक्षाने मच्छिंद्रनाथाचा हात धरला होता आणि दोघेही आपापल्या झोळ्या घेऊन पर्वतावर जाण्यास निघाले. निघण्यापूर्वी मच्छिंद्राने झोळी तपासली. त्यावेळी झोळीत कनकवीट नाही हे त्याच्या लक्षात आले. तो गोरक्षाला पुष्कळ रागावला व मोहाने त्याने रडून एकच गोंधळ माजवला. त्या दुःखाने तो इतका वेडापिसा झाला, की तो गडबडा लोळू लागला व वेड्यासारखा नाचू लागला. तो गोरक्षावर खूप संतापला.

मच्छिंद्रनाथाचे हे जिव्हारी लागणारे बोलणे ऐकूनही गोरक्षनाथ गप्पच राहिला, शांत राहिला. त्याने गुरूचा हात धरून त्याला पर्वतशिखरावर नेले. जाताना गोरक्षाने पर्वतावर सिद्धयोग मंत्र जपून लघवी केली. त्यामुळे सर्व पर्वत लगेच सुवर्णमय झाला. मग लागेल तेवढे सोने घेण्यास त्याने गुरूला विनंती केली. ते अघटित कृत्य पाहून गुरूने गोरक्षाची वाहवा केली. त्याला आलिंगन देऊन पोटाशी धरून म्हणाला, ' बाळा गोरक्षा, तुझ्यासारखा परीस सोडून सोन्याला घेऊन मी काय करू ?'

अशा तऱ्हेने पुष्कळ उपमा देऊन त्याने शिष्याची पुष्कळच स्तुती केली. गुरूचे बोलणे ऐकून गोरक्षाने आजपर्यंत गुरूने ती वीट का जपून ठेवली होती, ते सांगण्याबद्दल आग्रह धरला; तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' माझ्या मनात असा हेतू होता की, आपल्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

देशात गेल्यावर साधुसंतांची पूजा करावी. भंडारा घालावा.'

गुरूची ही इच्छा पूर्ण करण्याचे आश्वासन गोरक्षाने दिले. मग त्याप्रमाणे गोरक्षनाथाने गंधर्वास्त्र मंत्र योजून भस्माची एक चिमटी स्वर्गाकडे फेकली. त्याबरोबर चित्रसेन गंधर्व येऊन, नाथाला वंदन करून काय आज्ञा आहे म्हणून विचारू लागला. तेव्हा गोरक्षाने सांगितले, ' आणखी काही गंधर्वांस बोलाव आणि त्यांना चारही दिशांना पाठवून बैरागी, संन्याशी, जपी-तपी, साधुसंत, देव, गंधर्व, दानव व किन्नर या सर्वांना येथे आणावे. कारण आम्हांला येथे अन्नदान घालायचे आहे.'

हे ऐकून चित्रसेनाने शंभर गंधर्व आणून सर्वांकडे पाठविले. ते गंधर्व पुष्कळांना आमंत्रण करून त्यांना घेऊन आले. जपी, तपी, योगी याशिवाय शुक्राचार्य, दत्तात्रेय, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, वामदेव, कपिल, व्यास, पराशर, नारद, वाल्मीकी वगैरे सर्व मुनिगण तेथे थोड्याच वेळात येऊन पोहोचले.

हे सर्व झाल्यावर गोरक्षनाथ मच्छिंद्रनाथाला नम्रपणे म्हणाला, ' जेवणावळीस पुष्कळ मंडळी जमली आहेत. तेव्हा मागे वाटेत टाकून दिलेली तुमची सोन्याची वीट मी आणून देतो; ती घेऊनच हा समारंभ साजरा करावा.'

यावर मच्छिंद्रनाथ म्हणाला, ' तुझ्यासारखा उत्तम शिष्य माझ्याजवळ असल्यावर मला सोन्याच्या विटेची चिंता करून काय करायचे आहे?'

यावर गोरक्ष हसून समाधानाने म्हणाला, ' सर्व यथासांग व्यवस्थित पार पडेल, हा सर्व आपल्याच कृपेचा प्रसाद आहे. माझे त्यात काही नाही.'

असे बोलून तो गुरूच्या पाया पडला व ' मी सर्व व्यवस्था

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करतो, आपण काळजी करू नका, स्वस्थ असा.' असे त्याने सांगितले.

नंतर तो एकेका कामाच्या मागे लागला. त्याने अष्टसिद्धींना बोलावून, त्यांच्याकडे स्वयंपाकाचे काम देऊन अनेक चांगली पक्वान्नें तयार करण्याची आज्ञा केली. नंतर त्याने इतरही सर्व व्यवस्था नीट ठेवून काहीही उणे पडू न देण्याची काळजी घेतली. अशा तऱ्हेने गोरक्षाने समारंभाची व्यवस्था केली, तेव्हा सर्वांना अतिशय आनंद झाला.

अशा या सुंदर भोजन-समारंभास गहिनीनाथ मात्र आले नव्हते; म्हणून गोरक्षनाथाने ही गोष्ट मच्छिंद्रास सुचविली, तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाले, ' मधुब्राह्मणाकडे एका गंधर्वास पाठव आणि पुत्रासह त्यांना घेऊन येण्यास सांग; म्हणजे तो त्यांना आणील.'

मच्छिंद्रनाथाच्या सांगण्यावरून गोरक्षनाथाने चित्रसेन गंधर्वाला सर्व वृत्तांत कळविला व त्याच्या अनुमतीने एक पत्र लिहविले. ते त्याने सुरोचन नावाच्या गंधर्वाला दिले. ते घेऊन तो कनकगिरीच्या मधुब्राह्मणाकडे गेला व इकडचा सर्व सविस्तर वृत्तांत सांगितला. मग तो ब्राह्मण मोठ्या आनंदाने मुक्काम करीत करीत मुलास व गहिनीनाथास घेऊन निघाला.

मजल दर मजल करीत तेथे पोहोचले तेव्हा त्याने गहिनीनाथाला मच्छिंद्रनाथाच्या पायावर घातले. गहिनीनाथास मच्छिंद्रनाथाने मोठ्या प्रेमाने जवळ घेतले. त्यानंतर हा गहिनीनाथ म्हणजे करीभंजन नारायणच असल्याचे त्याने सर्वांना सांगितले.

तेव्हा शंकराने मच्छिंद्रनाथाला सांगितले, ' आम्हांला पुढे अवतार घ्यायचा आहे. त्याप्रसंगी मी निवृत्ती या नावाने प्रकट होईन व हा गहिनीनाथ मला अनुग्रह देईल. म्हणून आता याला आपण अनुग्रह देऊन सर्व विद्यांचा अधिकारी करावे '

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते ऐकल्यावर मच्छिंद्रनाथाने गोरक्षनाथाकडून गहिनीनाथाला लगेच अनुग्रह देवविला. मग सर्व देवांच्या समक्ष त्यांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. हा समारंभ सतत एक महिनाभर चालला होता. मग गोरक्षनाथाने कुबेराला विनंती केली, तू हा सुवर्णाचा पर्वत घेऊन जा आणि आम्हाला अमोल अशी वस्त्रे, भूषणे दे; म्हणजे ती या सर्व मंडळींना देऊन निरोप घेता येईल.

हे ऐकून कुबेर म्हणाला, ' तुमचा पर्वत इथेच राहू द्या. मी सर्व वस्त्रे, भूषणे देतो.' त्याप्रमाणे त्याने पुष्कळ वस्त्रे व हरतऱ्हेचे पुष्कळ अलंकार आणून दिले. त्या सर्वांच्या इच्छा तृप्त केल्या व मोठ्या सन्मानाने निरोप घेतला.

हा समारंभ उरकल्यावर उपरिक्षवसूबरोबर मीननाथाला सिंहलद्वीपी त्याच्या आईकडे पाठवून दिले. तिथे त्याने मच्छिंद्रनाथाचा सर्व वृत्तांत तिला सांगितला. तेव्हा मच्छिंद्रनाथाची भेट न झाल्याने तिचा जीव कासावीस झाला. डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते पाहून, ' एकदा तुला मच्छिंद्रनाथ भेटेल, तू काही काळजी करू नको.' असे सांगून उपरिक्षवसू आपल्या स्थानी गेला.

इकडे गर्भगिरी पर्वतावर गहिनीनाथाच्या अभ्यासासाठी गोरक्ष व मच्छिंद्रनाथ राहिले. उमाकांतही तेथेच होते. त्या सुवर्ण पर्वतावर अदृश्यास्त्राची योजना करून कुबेर आपल्या स्थानी परत गेला. अदृश्यास्त्राच्या योजनेमुळे सुवर्णाचा वर्ण लपून गेला; शंकर त्या पर्वतावर राहिले ते अजूनही तेथेच आहेत. त्यांना शंकर ' म्हातारदेव ' असे म्हणतात. त्याच्या पश्चिमेला कानिफनाथ राहिला. त्याने त्या गावाचे नाव ' मढी ' असे ठेवले. त्याच्या दक्षिणेस मच्छिंद्रनाथाने वस्ती केली. त्याच्या पूर्वेस जालिंदरनाथ राहिला. त्याच पर्वताच्या पलीकडे वडवानळ गावी नागनाथ राहिला, तर विटे गावात रेवणसिद्धाने वस्ती केली. गर्भाद्री पर्वतावर डाव्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

बाजूला गोरक्षनाथ राहिला. त्याने तेथेच गहिनीनाथाकडून विद्याभ्यास मोठ्या कसोशीने करून घेतला. एका वर्षात तो सर्व विद्यांत निष्णात झाला. मग गोरक्षाने त्याला मधुब्राह्मणाकडे पाठविले. पुढे या सर्वांनी पुष्कळ दिवस तेथे राहून शके दहाशे या वर्षी तिथे समाध्या घेतल्या. या सर्व समाध्यांच्या मग कबरी झाल्या.

एकदा औरंगजेब बादशहाने या समाध्या कोणाच्या आहेत, म्हणून विचारल्यावर लोकांनी त्याला सांगितले की, ' त्या तुमच्या पूर्वजांच्या आहेत.'

तेव्हा लोकांनी मूळ नावे बदलून दुसरी नावे ठेवली. ती अशी; जानपीर असे नाव जालिंदरास दिले. गैबीपीर हे नाव गहिनीनाथास ठेवले. मच्छिंद्रनाथास मायबाप, तर कानिफाला कान्होबा अशी नावे ठेवून यवन पुजारी ठेवले. कल्याण कलबुर्गीला बाबा चैतन्य यांची समाधी होती. तिचे नाव बदलून राजबागसर असे ठेवले. नंतर गोरक्ष आपल्या आश्रमी सर्वांना ठेवून तीर्थयात्रेला गेला.

✵✵✵

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २४ वा

एकदा सायंकाळी सूर्याची व उर्वशीची नजरानजर झाली. तिला पाहताच सूर्याच्या मनात कामभावना उत्पन्न झाली आणि त्याचा वीर्यपात झाला. ते वीर्य आकाशातून पडताच वाऱ्याने त्याचे दोन भाग झाले; त्यांपैकी एक भाग लोमेशऋषींच्या आश्रमातील घटात पडला. त्यापासून अगस्ती प्रकट झाला. दुसरा भाग कौलिकऋषींच्या आश्रमात आला. त्यावेळी तो भिक्षा मागायला बाहेर चालला होता. भिक्षापात्र अंगणात ठेवून दार लावत असता ते वीर्य येऊन त्यात पडले. हे ऋषींनी पाहिले. तेव्हा हे वीर्य सूर्याचे आहे हे त्यांनी जाणले. तीन हजार एकशे तीन वर्षे गेल्यानंतर धृमीनारायण या पात्रात अवतार घेईल; म्हणून हे नीट जपून ठेवले पाहिजे, असा विचार करून त्याने ते भिक्षापात्र ठेवले.

काही कालाने कलियुग सुरू झाले. नंतर त्या ऋषीने ते पात्र मंदराचळाच्या गुहेच्या तोंडाशी नेऊन ठेवले आणि आपण निघून गेला. पुढे कलीची तीन हजार एकशे तीन वर्षे उलटल्यावर धृमीनारायणाने त्या पात्रात संचार केला. तो गर्भ हळूहळू वाढत गेला. नऊ महिने पूर्ण होताच त्याचा पुतळा तयार झाला. मग तो त्यात मावेनासा झाला. त्यातून एक दगड लागल्याने ते भंगले असता, त्यातून जे मूल बाहेर पडले.ते सूर्यासारखे तेजस्वी होते, बाहेर येताच त्या बालकाने रडून आकांत केला.

त्याचवेळेस काही हरणे तेथे चरावयास आली होती. त्यात एक

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हरिणी गर्भवती होती. ती तिथे प्रसूत झाली. तिला दोन गोंडस बाळे झाली. परंतु ती मागे पाहू लागली, तेव्हा तिला तीन बाळे दिसली. ती तिन्ही मुले आपलीच आहेत, असे तिला वाटले. मग ती त्यांना प्रेमाने चाटू व हुंगू लागली. त्यांपैकी दोन हरणे लगेच प्यायला लागली, पण तिसऱ्याला प्यायला येईना. मग तिने त्याला चारी पायाखाली घेऊन आपले स्तन त्याच्या मुखात घातले.

पुढे काही दिवसांनी ते मूल रांगू लागले. तिन्ही मुले एके ठिकाणी ठेवून ती हरिणी चरायला जात असे. तिचा सर्व जीव मुलांवर होता. ती वारंवार येऊन त्यांना पाहून पुन्हा चरायला जाई. याप्रमाणे तीन वर्षे लोटली. मग ते बालक त्या हरणांबरोबर जाऊन झाडपाला खाऊ लागले. ते नेहमी आपल्या आईसह राहात असे. त्याला पक्ष्यांची भाषा समजू लागली. अशा तऱ्हेने त्याने या हरणांच्या संगतीत पाच-सात वर्षे काढली.

एके दिवशी ती चौघे चरत चरत जात असता वाटेने जयसिंग नामक एक भाट आपल्या रेणुका नामक पत्नीसह जात होता. त्याने हे बालक पाहिले. सूर्यासारखा तेजस्वी मुलगा तेथे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांच्या मनात विचार आला, 'अशा सुकुमार व स्वरूपवान मुलाला आई-बापांनी अरण्यात सोडून कसे काय दिले?'

जयसिंगला पाहून हरणं पळून जाऊ लागली व त्यांच्यामागून तो मुलगाही धावत जाऊ लागला. परंतु जयसिंगने त्याला धरले. नंतर तो त्याला म्हणाला, 'मुला, घाबरू नकोस. तुझे आई-बाप कोठे आहेत ते मला सांग. मी तुला तुझ्या घरी नेऊन त्यांच्या स्वाधीन करतो.'

परंतु हे ऐकून ते बालक ब्यां ब्यां करून रडू लागले व मुलगा मनुष्याच्या हाती सापडल्यामुळे त्या हरिणीसह सर्वांना फार दुःख झाले. मनुष्याच्या भीतीने तिला जवळ येण्यास हिंमत होईना. म्हणून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लांबूनच ती हंबरडा फोडू लागली.

इकडे जयसिंग मुलाला म्हणाला, 'बाळा, तू एवढा रडून आकांत का करतोस? तुझे आई-बाबा कोठे आहेत ते मला सांग. मी तुला त्यांच्याकडे पोहोचवितो.'

एवढे बोलूनही मुलाच्या तोंडून एक शब्दही येत नव्हता. तो ब्यां ब्यां करून रडत होता. मग हा मुलगा मुका आहे असे जयसिंगाला वाटून, त्याने हाताने खुणा करण्यास सुरुवात केली, पण त्या खुणाही त्याला कळत नव्हत्या. शेवटी त्याने त्या मुलास आपल्या घरी घेऊन जाण्याचा निश्चय केला.

मग तो त्याला कडेवर घेऊन जाऊ लागला. तो मुलगा ओरडत होता व हरिणी बाळावर दृष्टी ठेवून पाठीमागून येत होती. काय घडते आहे ते जयसिंगाला कळेना. हिचे पाडस रानात चुकले असेल म्हणून ही रडत आहे, असे त्याला वाटून तो मुलाला घेऊन पुढे चालू लागला.

मुलाला घेऊन जयसिंग जात असता संध्याकाळ झाली. त्या गावात तो वस्तीला राहिला. त्याने तो मुलगा आपल्या बायकोजवळ दिला. थोडे दिवसांनी त्या मुलाला हळूहळू हरिणीचा विसर पडू लागला. त्याला मानवी भाषा समजू लागली.

एकदा फिरत फिरत तो भाट काशीला गेला. तेथे भागीरथीचे स्नान करून विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासाठी देवळात गेला. बरोबर मुलगाही होता. दर्शन घेत असताना लिंगातून शब्द निघाले, 'यावे! भर्तरी अवतारात तुम्ही प्रकट झालात हे फार चांगले झाले.' हे शंकराचे शब्द त्याने ऐकले.

ते ऐकून हा मुलगा सामान्य नसून अवतारी असल्याची कल्पना जयसिंगाच्या मनात आली. आपल्या प्रारब्धाने आपल्याला हा प्राप्त

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

झाला आहे, असे त्याला वाटले. मग घरी गेल्यावर त्याने हा सर्व प्रकार आपल्या पत्नीला सविस्तरपणे सांगितला व तो म्हणाला, 'आजपासून आपण याचे नांव "भर्तरी' ठेवू व त्याचे पुत्राप्रमाणे पालन करू. हा अलभ्य लाभ आपल्याला आज प्रयत्नाशिवाय दैवयोगाने प्राप्त झाला आहे. तेव्हा याचे नीट पालन-पोषण केले पाहिजे.'

'यावे भर्तरी' म्हणून शंकराने का म्हटले असावे अशी शंका येईल; तर त्याचे कारण असे की, त्याचा जन्म भर्तरीमध्ये झाला म्हणून शंकराने त्याच नावाने त्याला हाक मारली.

त्या दिवसापासून ती उभयता त्याला 'भर्तरी' म्हणू लागली. त्या दोघांना पुत्र नसल्यामुळे त्यांचे भर्तरीवर फार मनापासून प्रेम होते. ते त्याचे चांगले पालन-पोषण करीत. मुलालाही आनंद होऊन तो त्यांच्याशी प्रेमाने वागे. या उभयतांना या मुलाच्या योगाने फार आनंद झाला होता.

परंतु त्या मुलाच्या मूळच्या आईबापांना तो चुकल्याने फार दुःख होत असेल, ती त्याचा शोध करीत असतील व आपली भेट झाल्यास त्याला आपल्याजवळून नेटाने घेऊन जातील अशी शंका त्यांच्या मनात एकसारखी डोकावू लागे. मग ते तेथेच राहून, भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करू लागली.

भर्तरीच्या ठायी राजचिन्हे होती. तो गावातील मुले जमवून अनेक प्रकारचे खेळ खेळताना आपण राजा बनून दुसऱ्यांना कामगार बनवी. घोडे, पायदळ, मंत्री वगैरे सर्व मुलांना निरनिराळे वेष देऊन तो राजाच्या स्वारीचा हुबेहुब थाट करीत असे. संस्कारानुसार सर्व कृत्ये त्याच्या हातून घडत.

एके दिवशी मुले काठीचे घोडे करून खेळत असताना ती भरधाव पळत व तोंडाने हो हो म्हणत होती. त्यांची पाठ थोपटत,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते सर्वजण गांव सोडून अरण्यात गेले. तेथे खेळता खेळता अचानक भर्तरीस ठेच लागली व तो उलटा खाली पडला. खाली कोसळल्यावर तो बेशुद्ध झाला. त्याने डोळे पांढरे केले. ते पाहून मुले भिऊन पळून गेली. आता हा मरून भूत होणार आणि आपल्या मागे लागणार व आपल्याला खाऊन टाकणार, या भीतीने ती सर्व मुले तेथून पळाली आणि भागीरथीच्या काठावर जाऊन चर्चा करू लागली. आता हा भूत होऊन आपल्या मानगुटीवर बसेल म्हणून घराच्या बाहेर पडायचे नाही,असे ठरवून ते सर्वजण घरी गेले.

इकडे भर्तरी त्याच बेशुद्धावस्थेत पडला होता. ठेचकळल्याने त्याच्या अंगातून बरेच रक्त गेले होते. तो सर्व प्रकार पाहून सूर्याला पुत्रमोहामुळे कळवळा आला. ताबडतोब तो पृथ्वीवर आला आणि त्याने प्रेमाने मुलाला उचलून पोटाशी धरले. भागीरथीचे पाणी पाजून त्याला सावध केले. मग सूर्याने त्याच्याकडे एक कृपाकटाक्ष टाकताच त्याचे शरीर पुन्हा पूर्वीसारखे झाले.

सूर्याने ब्राह्मणाचा वेष घेतला व भर्तरीला घरी आणून पोहोचवले. येताना वाटेत भर्तरीला त्याच्या मित्रांनी पाहिले आणि भूत आले असे ओरडून ते घरोघर लपले.

इकडे सूर्याने भर्तरीला घरी नेऊन रेणुकेच्या हाती केले. तेव्हा ती त्याची चौकशी करू लागली. तो तेज:पुंज असा ब्राह्मण पाहून तिने त्याला आसनावर बसविले व म्हणाली, 'महाराज, तुम्ही मोठ्या प्रेमाने आला आहात, तेव्हा आता मनात कोणताही संशय न आणता आपण कोठून आलात व आपले नाव काय ते मला सांगावे.'

रेणुकेने एवढ्या आदराने केलेली विचारपूस ऐकताच सूर्य म्हणाला, 'मी या मुलाचा पिता आहे म्हणूनच मी मोठ्या आशेने ह्याला तुझ्याकडे घेऊन आलो. मी तुला या मुलास मनापासून अर्पण केले आहे. म्हणून तू मनात कोणत्याही प्रकारची शंका न आणता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ह्याचे संगोपन कर.'

ते ऐकून रेणुका त्याला म्हणाली, 'तुम्ही या बाळाचे जनक कसे, ते मला सांगा.'

'ब्राह्मणाच्या वेषाने तुझ्याकडे आलेला मी सूर्य आहे' असे म्हणून त्याने आरंभापासून भर्तरीची कथा सांगितली. हरिणीने संगोपन कसे केले, हा वृत्तांत सांगितला. शेवटी तो तिला म्हणाला, 'हा मुलगा आपलाच आहे, असे मानून तू नि:शंकपणे याचे संरक्षण कर. तुझे भाग्य मोठे म्हणून तुला हा मिळाला आहे.'

असे सांगून तो ब्राह्मणवेषधारी सूर्य निघून गेला. मग जयसिंगाला तिने घडलेली हकीकत सांगितली. ते ऐकून त्यालाही फार आनंद झाला व त्याचा संशयही सहज दूर झाला. ती दोघे भर्तरीवर जिवाभावाने प्रेम करू लागले. ते पाच वर्षे काशीतच राहिले. त्यावेळी भर्तरी सोळी वर्षांचा झाला. पुढे मुलाचे लग्न करण्याचा विचार मनात आणून ती आपल्या गावाला जाण्यासाठी काशीहून निघाली. जाताना वाटेत अरण्य लागले. तेथे अरण्यात चोरांनी त्यांना गाठले व जयसिंगाला ठार मारून व त्याच्या जवळचे सर्व द्रव्य लुटून ते निघून गेले. पतीचे दु:ख सहन न होऊन रेणुकाही गतप्राण झाली. मग भर्तरीने दोघांना अग्नी देऊन त्यांचे दहन केले. दोघांच्या मृत्यूने त्याला फार दु:ख झाले.

त्यावेळी लमाण्यांचा एक तांडा धंद्याच्या निमित्ताने त्याच मार्गाने जात होता. भर्तरीला पाहून ते त्याच्याजवळ गेले. त्यांना त्याची शोकावस्था पाहून दया आली व ते चौकशी करू लागले. तेव्हा भर्तरीने त्यांना सर्व प्रकार सांगितला. तो ऐकून त्यांनी त्याला 'नशिबात जे असते तसे घडते; रडून आईबाप परत येणार नाहीत.' असे सांगून समजावले.

अशा तऱ्हेने त्यांनी त्याला पुष्कळ सांगितले. मग ते त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आपल्याबरोबर घेऊन गेले. त्याला अन्नवस्त्र दिले. तो त्यांचे कामही करू लागला. असे काही दिवस गेल्यावर व्यापाऱ्यांच्या सहवासाने त्याला आपल्या दुःखाचा हळूहळू विसर पडत चालला. पुढे ते काही दिवसांनी अवंतीनगरीत येऊन पोहोचले.

✻ ✻ ✻

अध्याय २५ वा

अवंतीला आल्यावर ते एका गावाजवळ उतरले. तेथे जवळचा माल नीट ठेवून ते सारे एके ठिकाणी विस्तव पेटवून शेकत बसले. इतक्यात तेथे काही कोल्हे आले आणि कोलाहल करून त्यांनी सुचवले, 'व्यापारी हो! तुम्ही इथे स्वस्थ बसू नका. चोरटे येऊन धाड घालण्याच्या विचारात आहेत. ते मारहाण करून तुमचे द्रव्य घेऊन जातील.' अशी सूचना देऊन कोल्हे निघून गेले.

भर्तरीला जनावरांची भाषा चांगलीच समजत होती; त्यामुळे कोल्ह्यांनी सांगितलेला संदेश त्याला समजला. आपण त्यांचे अन्न खात आहोत याची जाणीव ठेवून भर्तरीने तो संदेश लमाण्यांना सांगितला. तो व्यापाऱ्यांना म्हणाला, 'कोल्ह्यांची भाषा मला समजते व ते ओरडत असताना जे सांगत होते, ते सर्व मी नीट लक्षपूर्वक ऐकले आहे. तुम्ही नीट सावध राहा.'

भर्तरीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून हातात शस्त्रे घेऊन व

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चांगला उजेड करून सर्वजण पहारा करू लागले. संरक्षणाची तयारी झाली न झाली तोच चोरांची धाड पडली. परंतु व्यापाऱ्यांच्या शस्त्रांच्या माऱ्यांपुढे चोरांचे काहीच चालेना. चोर जेरीस येऊन पळून गेले. पुढे रात्रभर ते जागत राहिले होते.

मग दीड प्रहर रात्र उरली असता, पुन्हा कोल्हेकुई झाली, तेव्हा कोल्हे आता काय बोलले म्हणून व्यापाऱ्यांनी भर्तरीला विचारले. तेव्हा तो म्हणाला, 'शंकराने ज्याला वर दिला आहे असा एक राक्षस उत्तरेकडून दक्षिणेकडे जाण्यासाठी येत आहे. तो फार बलाढ्य आहे. त्याच्याजवळ अत्यंत तेजस्वी, अमोल अशी चार रत्ने आहेत. त्याला जो मारेल त्याला हा लाभ होईल आणि त्याला मारल्यावर त्याच्या रक्ताचा टिळा गावाच्या वेशीला व स्वतःच्या कपाळाला जो लावेल तो अवंतीनगरीचा सार्वभौम राजा बनेल.'

ही सर्व माहिती भर्तरी व्यापाऱ्यांना सांगत असताना त्या वेळी योगायोगाने विक्रम राजा तेथून जात होता. त्याने भर्तरीचे ते बोलणे ऐकले व लगेच तो हातात शस्त्र वगैरे घेऊन तयारी करून त्या राक्षसाला मारायला निघाला.

हा राक्षस पूर्वी चित्रमा नावाचा गंधर्व होता. तो एक दिवस शंकराच्या दर्शनासाठी कैलासाला गेला. तिथे शंकर व पार्वती सोंगट्या खेळत बसली होती. तो तेथे जाऊन त्यांच्या पाया पडला; व शंकराच्या आज्ञेनुसार त्यांच्याजवळ बसला. काही वेळातच पार्वतीने डाव जिंकला व दानाविषयी उभयतांमध्ये वाद झाला. तेव्हा खरे दान काय पडले ते त्या गंधर्वास विचारले. शंकराची मर्जी संपादन करण्यासाठी गंधर्वाने खोटेच सांगितले; त्यामुळे पार्वतीला राग आला. ती त्याला म्हणाली, 'गंधर्वा, तू खोटे बोलत आहेस. तू मृत्युलोकी राक्षस होशील.'

पार्वतीचा शाप मिळताच तो चळचळा कापू लागला. शंकराच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पाया पडून तो म्हणाला, 'देवा, आपली बाजू घेतल्याने माझ्या मुखाला काजळी लागली आणि भयंकर शाप मिळाला. आता माझे कसे होणार?'

असे म्हणून तो असहायपणे रडू लागला. तेव्हा शंकराला त्याची दया आली व ते म्हणाले, 'हे गंधर्वनाथा, तू शापाची काळजी करू नको. सुरोचन गंधर्वास इंद्राने शाप दिलेला आहे, त्यास जो पुत्र होईल तो शस्त्राच्या सहाय्याने तुझा प्राण घेऊन राक्षसयोनीतून तुला मुक्त करील.'

ते ऐकून त्याने विचारले, 'मला मारल्याने त्याला फायदा कोणता होणार? आणि माझी हकीकत त्याला कशी काय कळणार?'

हा त्याचा प्रश्न ऐकून शंकराने सांगितले, 'तुला मारून तुझ्या रक्ताचा टिळा कपाळाला लावल्यावर त्याला सार्वभौमपद प्राप्त होईल व तो निरंतर विजयीच होत जाईल. तुझी सर्व माहिती त्याला भर्तरीनाथाच्या तोंडून समजेल.'

हे ऐकून गंधर्वाला समाधान वाटले.मग त्याने आनंदाने दिव्यदेह आश्रमात ठेवला व राक्षसाचा देह धारण करून भूतलावर आला.

सुरोचन गंधर्वाला इंद्राने कशासाठी शाप दिला, याची कथा अशी आहे की, 'एके दिवशी अमरावतीला इंद्रसभेत असतांना तेथे गंधर्व वगैरे सर्व मंडळी आपल्या स्थानी बसली होती. त्याच सभेत मेनका, तिलोत्तमा इ. अत्यंत लावण्यवती अप्सरा नृत्य करीत होत्या. त्यांना पाहून सुरोचन कामांध झाला. भर सभेतून तो उठला व मेनकेचा हात धरून तिचे स्तनमर्दन करू लागला. हे पाहून इंद्राला फार राग आला. त्याने त्याची पुष्कळच निर्भर्त्सना केली व शेवटी शाप दिला, 'तू अजिबात लाज न बाळगता एकदम असे वाईट कर्म करण्यास प्रवृत्त झालास; तू दुष्ट आहेस म्हणून स्वर्गातून पतन पावून भूलोकी गाढव होऊन राहा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हा अपमानास्पद शाप मिळताच तो पतन पावला. पडता पडता त्याने इंद्राची प्रार्थना केली, की 'महाराज, मला आता निदान उःशाप तरी द्यावा. माझ्याकडून होऊ नये तो अपराध घडला हे खरे. पण मला माझ्या अपराधाची क्षमा करावी.'

त्याच्या प्रार्थनेने इंद्राचे मन द्रवले व त्याने त्यास उःशाप दिला, 'तू बाराव्या वर्षी पुन्हा आपल्या स्थानी येशील, परंतु तुला एक सांगतो, ते ऐक. मिथिलानगरीच्या सत्यवर्मा नावाच्या राजाच्या कन्येशी युक्तीने तू विवाह कर. पुढे विष्णूसारखा तेजस्वी मुलगा विक्रम तुझ्यापोटी येताच तू मुक्त होशील व पुन्हा पूर्ववत गंधर्व होऊन स्वर्गात येशील.'

याप्रमाणे इंद्राने उःशाप दिल्यावर तो मिथलेच्या रानात गाढव होऊन राहिला. त्या गावात कमठ नावाचा एक कुंभार होता. तो गाढवाचा शोध करीत अरण्यात गेला, तेव्हा तेथे त्याला मिळालेली सर्व गाढवे घेऊन तो घरी गेला. त्या गाढवांमध्येच शाप मिळालेले गाढव होते. पुढे काही दिवसांनी तो कुंभार दरिद्री झाला. तेव्हा शाप मिळालेले गाढव ठेवून बाकीची सर्व गाढवे त्याने विकून टाकली.

एके दिवशी दोन प्रहर रात्र झाली असता ते गाढव कुंभाराला उद्देशून म्हणाले, 'सत्यवर्मा राजाची कन्या मला बायको करून दे.'

मनुष्याचा हा आवाज त्या कुंभाराला रोज ऐकू येई. मग तो गोठ्यात जाऊन बघे, पण त्याला कोणी मनुष्य दिसत नसे. अशा प्रकारे तो अनेक वेळा फसला, परंतु गाढवच हे बोलत असेल, अशी कल्पना त्याच्या मनात कधीच आली नाही.

एकदा तो अशीच शंका येऊन काही वेळ उभा राहिला. आपण याची शंका फेडून टाकावी, असा विचार करून गाढवाने कमठास आपल्याजवळ बोलावले आणि तो म्हणाला, 'सत्यवर्मा राजाची कन्या मला बायको करून दे, हेच मी तुला नेहमी सांगत आहे. ग्रात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

संशय येण्याचे काहीच कारण नाही.'

या विचित्र मागणीने कुंभार घाबरून गेला; कारण अशी अघटित गोष्ट त्याला कोणाहीजवळ बोलता येईना. कारण त्यामुळे राजा मला शिक्षा करील.हा स्वत: गाढव आहे आणि राजाचा जावई होऊ पाहात आहे. हे कसे घडणार? याचा परिणाम चांगला होणार नाही. तेव्हा आता येथून निघून दुसऱ्या राज्यात राहायला जावे हे सगळ्यात उत्तम! असा विचार करून त्या कुंभाराने तिथून निघण्याची तयारी केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी हा सर्व प्रकार त्याने आपल्या पत्नीला कळविला, परंतु त्या दोघांच्याही मनात असे आले नाही की, हा गाढव असून मनुष्यवाणीने बोलतो कसा? तेव्हा हा कोणी प्रज्ञावंत असावा.

मग त्यांनी त्याच गाढवावर सर्व सामान लादले आणि ते निघून जाऊ लागले, तेव्हा सीमेवर वेसकऱ्याने त्याला अडविले व नगर सोडून का जातोस म्हणून विचारले. त्याने निघून जाण्याचे कारण सांगावे म्हणून राजसेवकांनी पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो व त्याची पत्नी भयाने काहीच बोलले नाहीत. कारण त्यांना वाटले की, खरे कारण सांगितले तर शिक्षा होणार. त्यामुळे रक्षकांनी कितीही सांगण्याचा आग्रह केला तरी गप्प बसण्याशिवाय दुसरा मार्ग नाही!

इकडे सत्यवर्मा राजाला रक्षकांनी कळविले की, कमठ कुंभार निघून जात आहे म्हणून आम्ही पकडून ठेवले आहे. ते ऐकून राजाने त्याला दरबारात आणण्याचा हुकूम केला. लगेच दूतांनी त्याला राजसभेत उभे केले. त्याला राजा म्हणाला, 'तुला कोणते दु:ख झाले, तू का कष्टी झालास, हे मला सांग. मी त्याचे निवारण करीन. माझे नाव सत्यवर्मा आहे. ते नाम मी सार्थ करीन.'

राजाचे ते आत्मीयतेचे बोलणे ऐकून तो राजाला म्हणाला, 'महाराज, आपण प्रजापालनात दक्ष आहात, हे मला माहीत आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

परंतु मला जे दु:ख आहे ते शब्दाने सांगवत नाही; ते सांगितले तर आपण माझा जीव घ्याल.'

ते ऐकून राजाने त्याला आश्वासन दिले की, 'माझ्याकडून शिक्षा होईल अशी तुला भीती वाटत असेल तर मी तो अन्याय माफ करून तुझ्या प्राणाचे रक्षण करीन. तू याबद्दल मनात कोणताही संशय ठेवू नकोस. मी तुला तसे वचनही देतो.'

असे बोलून राजाने त्याला लगेच वचन दिले. मग कुंभाराने राजाला एकांतात नेले व तो राजाला म्हणाला, 'महाराज, तुमची सत्यवती नावाची कन्या ही आपल्याला बायको करून द्या, असा हट्ट माझ्या गाढवाने धरला आहे आणि तो नेहमी मनुष्यवाणीने हे माझ्याजवळ बोलतो. ही गोष्ट तुम्हाला समजल्यावर तुम्ही रागवाल असे मनात येऊन मी गाव सोडून जात होतो.'

कुंभाराचे ते बोलणे ऐकून राजाने विचार केला की, ज्याअर्थी हे गाढव बोलत आहे त्याअर्थी हे जनावर नसून कोणीतरी दैवत असावे व काहीतरी कारणाने त्याला पशुदेह प्राप्त झाला असावा. असा विचार करून राजाने त्या कमठ कुंभाराला सांगितले की, 'या भीतीने तू गाव सोडून जाण्याची काहीच आवश्यकता नाही. खुशाल आपल्या घरी जाऊन राहा. मी या गोष्टीचा विचार करीन व त्या गाढवाची माझ्या मनाजोगी परीक्षा घेऊन मगच माझी कन्या त्याला अर्पण करीन. आता तू घरी जाऊन गाढवाला सांग की, तू म्हणतोस ते मी राजाला सांगितले, तेव्हा राजा म्हणाला की, 'हे सर्व मिथिलानगर तू तांब्याचे करून दाखव, म्हणजे मग तो आपली कन्या सत्यवती तुला आनंदाने देईल.'

नंतर कुंभार आपल्या घरी आला. रात्री परत गाढवाने कमठास हाक मारून लग्नाची मागणी केली. तेव्हा कमठाने त्याला राजाने सांगितलेला निरोप दिला. नंतर कमठ म्हणाला, 'राजाची इच्छा पूर्ण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करायचे तुझ्या अंगी सामर्थ्य असेल तर सर्व नगर तांब्याचे कर, म्हणजे सत्यवती तुला मिळेल.'

कमठाने राजाची इच्छा सांगितल्यावर तो गाढवरूपी गंधर्व म्हणाला, 'राजा मोठा विशाल मनाचा आहे असे दिसत नाही. अरे, रत्नखचितसुवर्णाची नगरी त्यानं मला मागितली असती तरी मी अमरावतीसारखी दुसरी नगरी त्याला बनवून दिली असती किंवा इंद्राची सर्व संपत्ती त्याला आणून दिली असती. त्याने कल्पतरूचे वन मागायचे सोडून तांब्याचे नगर करून मागितले, असो. आता मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे आज रात्री तांब्याचे नगर करून देतो.' असे गंधर्वाने कबूल केले, ते कमठाने राजाला कळविले तेव्हा राजाने गाढवाचे म्हणणे आपल्याला कबूल असल्याचे कळविले. ते ऐकून गाढवस्वरूपी गंधर्वाने विश्वकर्म्याची प्रार्थना करताच तो प्रत्यक्ष अवतरला व काय आज्ञा आहे, म्हणून विचारू लागला. त्याला गंधर्वाने सांगितले, 'ही सर्व मिथिलानगरी एका रात्रीत तांब्याची करून दे.'

विश्वकर्म्याने ते लगेच कबूल केले व ते सर्व नगर रात्री तांब्याचे करून टाकले. घरे एकसारखी तांब्याची केली असे सांगून व गाढवरूपी गंधर्वाची आज्ञा घेऊन विश्वकर्मा निघून गेला.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी सर्वांना तांब्याचे नगर दिसले. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. तो चमत्कार पाहून प्रत्येकाच्या मनात हरतऱ्हेचे तर्क येऊ लागले. इकडे राजाला मात्र खूण पटली; आता त्याला मुलगी दिली पाहिजे. पण जर दिली तर लोक मला हसतील. आणि माझा नावलौकिक जाईल. मग कन्या कुंभाराच्या स्वाधीन करून त्याला गावातून दुसरीकडे पाठवण्याचा विचार राजाने केला. लगेच त्याने कुंभारास बोलावून आणले व लोकनिंदा टाळण्यासाठी कन्या घेऊन दुसऱ्या गावी जाण्याची प्रार्थना केली. कुंभारानेही राजाचे म्हणणे मान्य केले. सर्व सामान आवरून निघायची तयारी केली. रात्री

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जाऊन राजालाही तसे सांगितले.

मग राजाने कन्येला बोलावून समजावणीच्या सुरात तिला म्हटले, ' मुली, तुला मी देवाला अर्पण केले आहे. तेव्हा त्याचा आनंदाने स्वीकार कर. त्याने सर्व नगरी तांब्याची करून टाकली आहे. हा प्रत्यक्ष देवच असणार याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. त्याचा गाढव म्हणून अव्हेर करशील तर तो कुळाला बट्टा लागेल. आता तो कोण आहे वगैरे सर्व चौकशी तू कर. माझ्या सांगण्याचा अपमान करू नकोस. तो रागावला तर शापहि देईल. तू युक्तीप्रयुक्तीने या गाढवाच्या देहापासून त्याची मुक्तता करून घे. त्याने पूर्वदेह धारण केला की, त्यामुळे दोन्ही कुळांचा उद्धार होईल. आता मनात कोणतीही शंका न बाळगता आनंदाने आपल्या नव्या घरी जा.'

वडिलांचे ते म्हणणे सत्यवतीने मान्य केले. नंतर रात्री कन्येसह राजा कमठाच्या घरी गेला. कमठाने खुणेने जावई दाखवल्यावर राजाने त्या गाढवरूपी गंधर्वास विनंती केली की, 'महाराज, ही माझी कन्या मी तुम्हाला अर्पण केली आहे. आता हिचे पालनपोषण आपण करावे.'

यावर गाढव म्हणाले, 'राजा, तुझे भाग्य उदयाला आले म्हणून आज मी तुझा जावई झालो, पण तू माझ्या देहाकडे पाहा. यामुळे लोक तुला काय म्हणतील? जो तो तुझी निंदा करील; तरी पण तू भाग्यवान आहेस असे मी मानतो.'

मग त्याने आपल्याला कोणत्या कारणाने इंद्राने शाप दिला वगैरे सर्व वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून हा सुरोचन गंधर्व आहे असे समजल्यावर राजाला खूप आनंद झाला; आणि आपली मुलगी त्याच्या स्वाधीन करून राजा घरी निघून गेला. कुंभारही त्याच रात्री ते गाव सोडून अवंतीनगराकडे जायला निघाला.

* * *

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २६ वा

कमठ कुंभार सहकुटुंब सहपरिवार अवंतीनगरास येऊन पोहोचला. तेथे एका कुंभाराकडे जागा पाहून त्याने बिऱ्हाड केले. तो सत्यवतीला आपल्या मुलीप्रमाणे सांभाळीत असे.

एक दिवस सत्यवती म्हणाली, 'मला नवऱ्याला पाहायचे आहे.' तिच्या म्हणण्याप्रमाणे त्याने भेट करून देण्याचे कबूल केले. मग तो रात्री गाढवाजवळ गेला व त्याला म्हणाला, 'गंधर्व महाराज, तुमच्या म्हणण्याप्रमाणे राजाने आपली कन्या तुम्हाला अर्पण केली. ती सत्यवती तुमची वाट पहात आहे. आता तुम्ही दोघांनी आनंदाने वागावे.'

हे ऐकून कमठ म्हणाला, 'महाराज, आपण म्हणता ते खरे आहे. परंतु आपण तर अजून पशूच्या देहात वावरत आहात. मग या अवस्थेत मनुष्याशी संग कसा होणार? ही माझी शंका दूर करून आपण आपल्या स्त्रीचा स्वीकार करावा.'

कमठाची शंका ऐकून गंधर्व म्हणाला, 'तिला ऋतुप्राप्त झाला म्हणजे चौथ्या दिवशी मी माझे मूळ स्वरूप प्रकट करून तिची मनोकामना पूर्ण करीन. तेव्हा तिचा चौथा दिवस मला कळवावा.'

हे ऐकून कमठाला आनंद झाला. त्याने हा सर्व वृत्तांत सत्यवतीला सांगितला, त्यामुळे सत्यवतीलाही समाधान वाटले. काही दिवसांनी सत्यवती ऋतुस्नात झाली. चौथ्या दिवशी कुंभाराने ही वार्ता गंधर्वाला सांगितली. ते ऐकताच त्याने दागिने घातले व भरजरी पोषाखही केला. त्यामुळे तो सूर्यासारखा तेजस्वी दिसू लागला. ते अनपमेय तेजस्वी रूप पाहून कमठाचा आनंद गगनात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मावेना. स्वर्गातील गंधर्वाचे आपल्या घरी दर्शन झाल्याने आपण धन्य झालो, असे त्याला वाटले. सत्यवती भाग्यवान म्हणून हे पुरुषरत्न तिला प्राप्त झाले असे त्याच्या मनात आले.

मग तो अतिनम्रतेने सुरोचनाच्या पाया पडला व विनंती करू लागला, 'महाराज, मी अज्ञानी आहे. मी दुष्टपणे तुमची योग्यता न जाणता तुम्हाला फार कष्ट दिले. तुमच्या पाठीवर मातीची ओझी टाकली, बसलो व निर्दयपणे मारलेही. मला पाप्याला क्षमा करा. अज्ञानामुळे झालेले माझे अपराध पोटात घालून मला पदरात घ्या.'

मग कमठाने सुरोचन गंधर्वास स्वत: हाताला धरून घरात नेले व सत्यवतीला त्यासाच्या स्वाधीन करून तिचा सांभाळ करण्याची प्रार्थना केली. मग ती उभयता एकांतात गेली. तेथे तिने त्याची षोडशोपचारे पूजा केली. नंतर गंधर्वविवाह करून दोघे अत्यंत प्रेमाने रममाण झाले आणि त्याच रात्री सत्यवतीला गर्भसंभव झाला.

गंधर्वाने तिला आपणास शाप दिल्याचा सविस्तर वृत्तांत सांगितला. शेवटी तो म्हणाला, ' सत्यवती, तुला पुत्र झाला की, मी स्वर्गात परत जाईन. तुझा तो पुत्र मोठ्या सन्मानास पोहोचेल. मोठी योग्यता प्राप्त करून घेईल. विक्रम या नावाने सार्वभौम राजा होऊन प्रसिद्धी पावेल. धैर्य, उदारपणा हे गुण त्याच्या अंगी असतील व तो शककर्ता होईल. तू पुत्राला जन्म दिलास की, मी तुझ्या ऋणातून मुक्त होईन. शापमुक्त झाल्यावर मी स्वर्गास जाईन, पण माझ्याविषयी दु:ख करू नकोस. त्या पुत्रापासून तुला हरतऱ्हेची सुखे प्राप्त होतील.'

अशा तऱ्हेने सत्यवतीची समजूत घालून तो पुन्हा गाढव बनून राहिला. सत्यवतीबद्दल लोकांच्या मनात शंका येऊ लागल्या. जो तो विचारी, ही मुलगी कोण आहे? तेव्हा तो 'ही माझी मुलगी असून बाळंतपणासाठी तिला माहेरी आणले आहे.' असे कमठ सर्वांना

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सांगे.

पुढे अशा तऱ्हेने नऊ महिने उलटल्यावर चांगल्या मुहूर्तावर सत्यवती प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाले. बाराव्या दिवशी बारसे करून मुलाला पाळण्यात घालून त्याचे नाव 'विक्रम' ठेवले. रात्र झाल्यावर सुरोचनाने मूळ स्वरूप प्रकट करून तो सत्यवतीला म्हणाला, 'मला मुलाला दाखव. बालकाचा मुखचंद्र पाहताच तो शापमुक्त झाला. त्याच वेळी त्याला आणण्यासाठी इंद्राने विमान घेऊन मातलीला पाठवून दिले. विमान अवंतीस आले तेव्हा सुरोचन अत्यंत प्रेमाने बाळाचे मुके घेत होता. इतक्यात तो त्याच्याजवळ गेला व म्हणाला, 'गंधर्वनाथ, तुम्हाला नेण्यासाठी इंद्राच्या आज्ञेवरून मी विमान घेऊन आलो आहे. तेव्हा आता हा पुत्रमोह सोडून, मायापाश तोडून, वेळ न घालवता विमानात बसावे. अमरनाथ आपली वाट पाहात बसला आहे.'

मग सुरोचन गंधर्वाने मुलाला सत्यवतीजवळ दिले व म्हणाला, 'मी आता निघतो. तू येथे मुलासह समाधानाने राहा.'

त्याने निरोप घेतलेला पाहताच सत्यवती म्हणाली, 'तुमच्याशिवाय मला कोणी नाही. मुलाला टाकून तुम्ही कसे जाता? तुमच्यासाठी मी आईवडिलांना व तेथे मिळणाऱ्या सर्व सुखावर पाणी सोडून या देशात आले.'

असे म्हणून तिने हंबरडा फोडला. तिने त्याच्या गळ्यास मिठी मारली व ती आणखीनच शोक करू लागली. तेव्हा त्याने तिला सांगितले, 'तू आता रडू नको. शोक करू नको. जेव्हा तू माझे स्मरण करशील तेव्हा मी येऊन अवश्य तुला भेटून जाईन.'

असे त्याने तिला वचन देऊन तिचे समाधान केले. मग मुलाला व सत्यवतीला कमठाच्या पदरात घालून, त्यांना सांभाळायला सांगून गंधर्व विमानात बसून आपल्या स्थानी परत गेला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इकडे विक्रम दिवसेंदिवस मोठा होत होता. त्याने लहान वयातच सर्व विद्या संपादन केली. पुढे सोळा वर्षांचा झाल्यावर त्याने राजाची भेट घेतली. दरबारी मंडळींना विक्रम फार प्रिय होता. राजाने त्याला गावाच्या संरक्षणाचे काम दिले होते. त्यामुळे त्याला गावात फिरावे लागे.

आपली कामगिरी करीत असता एके दिवशी काही व्यापारी आपली मालमत्ता राखण्यासाठी जागत बसलेले त्याला दिसले. त्यात भर्तरीनाथ होता. त्याला पूर्वी सांगितल्याप्रमाणे पशूची भाषा समजत होती. त्याने प्रथम कोल्हे ओरडले तेव्हा चोरांपासून व्यापाऱ्यांना सावध केले; दुसऱ्या वेळी कोल्हेकुही झाली. तेव्हा भर्तरी व्यापाऱ्यांना म्हणाला, 'उत्तरेकडून दक्षिणेकडे जायला एक राक्षस मनुष्यवेषाने येत आहे. त्याला मारून त्याच्या रक्ताचा टिळा गावाच्या द्वारी व स्वतःच्या कपाळी जो लावील तो सार्वभौम राजा होईल.'

हे भर्तरी सांगत होता त्याचवेळी विक्रम रस्त्याने जात होता. पूर्वी सांगितल्याप्रमाणे चित्रमा गंधर्व पार्वतीच्या शापाने राक्षस होऊन फिरत होता; त्याला शंकराने उःशाप दिला होता की, सुरोचन गंधर्व शापामुळे पृथ्वीवर फिरेल. त्याच्या वीर्यापासून विक्रम नावाचा पुत्र होईल. विक्रमाच्या हातून तू मारला जाशील व राक्षसयोनीतून मुक्त होशील, तोच हा राक्षस होता.

चित्रमा गंधर्व शापामुळे राक्षस बनला होता तरी या प्रसंगी तो मानवरूप घेऊन उत्तरेकडून दक्षिणेकडे जात होता. इतक्यात विक्रम तेथे आला. त्याने शस्त्रप्रहार करून चित्रमा गंधर्वाला जमिनीवर पाडले. रक्ताचा टिळा रेखला. त्याबरोबर राक्षसरूपी गंधर्व शापमुक्त झाला व त्याला नेण्यासाठी लगेच विमान आले. त्यात बसून तो जाऊ लागला, तेव्हा विक्रमाने त्याला विचारले, 'तू राक्षस आहेस आणि तरीही स्वर्गात निघाला आहेस, हे कसे काय ते मला कळत नाही.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मग त्याने विक्रमाला शिव-पार्वतीच्या खेळापासूनचा सर्व वृत्तांत सांगितला व मी चित्रमा गंधर्व आहे, असे सांगून तो आपल्या स्थानी परत गेला. मग विक्रमाने राक्षसाचे प्रेत चाचपून पाहिले. त्यात त्याला चार अमूल्य रत्ने सापडली. ही साक्ष पटताच त्याने मनात भर्तरीची वाखाणणी केली व हा भर्तरी आपल्याजवळ असावा असे त्याच्या मनांत आले. नंतर गावाच्या वेशीला त्याने रक्ताचा टिळा लावला.

मग विक्रम त्या व्यापाऱ्यांच्या तांड्यात आला. त्यावेळेस ते भर्तरीस मध्ये बसवून जागत बसले होते. व्यापाऱ्यांनी विक्रमाची चौकशी केली तेव्हा विक्रमाने आपले नाव सांगून तुमच्या गुजगोष्टीत रमलो म्हणून येथे आलो असे सांगितले.

तेव्हा तुम्ही आमच्या कोणत्या गोष्टी ऐकल्या, असे व्यापाऱ्यांनी विक्रमाला विचारले. त्यावर विक्रम म्हणाला, 'माझे पहाऱ्याचे ठिकाण जवळच आहे. त्यामुळे तुमच्या सर्व गोष्टी मला ऐकू आल्या. पण तुमच्यावर जी चोरांची धाड पडली त्याचा सुगावा तुम्हाला कसा लागला, ते पाहण्यासाठी मी आलो आहे. चोरांचा माग आधीच काढण्याची युक्ती तुमच्याकडून समजली तर मला बंदोबस्त करण्यास बरे पडेल.'

यावर ते म्हणाले, 'चोरांच्या टोळीत एकंदर किती माणसे होती हे निश्चित सांगता येत नाही, पण सुमारे शंभर जण तरी आम्ही पाहिले. ते चोर येण्यापूर्वी काही वेळ कोल्ह्याची कुई ऐकू आली. ती त्यांची भाषा आमच्याबरोबर जो भर्तरी नावाचा मुलगा बसला आहे त्याला समजते. त्याने आम्हाला आधीच चोरांच्या धाडीची कल्पना दिल्यामुळे आम्ही सावध राहिलो होतो.

हे ऐकून विक्रमाने भर्तरीस नीट पाहून घेतले. मग काही वेळाने तो निघन गेला. नंतर समारे घटिका रात्र राहिल्यावर एक जकातदार

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शौचास जात होता. त्याला बोलावून विक्रमाने एकांती सांगितले, 'गावाबाहेर काही व्यापारी आले आहेत. त्यांच्याजवळ जकातीचा पैसा तुम्ही मागू नका. त्याच्याऐवजी मी पाहिजे तर तुम्हाला तिप्पट रक्कम देईन, पण माझे एक काम करा. ते म्हणजे त्यांच्याजवळ भर्तरी नावाचा मुलगा आहे, त्याला माझ्याकडे घेऊन यायचे. तो माझा भाऊ आहे, तो माझ्या हवाली कराल तर तुम्हाला पुष्कळ पुण्य लाभेल.'

अशा तऱ्हेने विक्रमाने जकातदाराला वश केले व द्रव्यलोभामुळे जकातदाराने विक्रमाचे म्हणणे लगेच कबूल केले.

नंतर कचेरीत आल्यावर जकातदाराने शिपाई पाठवून त्या व्यापाऱ्यांना बोलावून आणले आणि मालाची टीप करून जकातीच्या पैशाचा आकडा सांगितला आणि मग तुमच्यात भर्तरी नाव कोणाचे आहे म्हणून त्याने व्यापाऱ्यांना विचारले, तेव्हा व्यापाऱ्यांनी भर्तरीस बोलावून जकातदाराला दाखविले, त्याला पाहताच त्याच्या तेजावरून हा अवतारी असावा, असे जकातदाराला वाटले.

जकातदाराने व्यापाऱ्यांच्या पुढाऱ्याला एकांती नेऊन सांगितले, 'तुमच्याकडून जकातीचा जो आकडा येणे आहे, तो मी तुम्हाला माफ करतो, पण तुमच्याकडे जो भर्तरी आहे, त्याला काही दिवस आमच्याकडे ठेवा.'

मग जकातदाराने आणि व्यापाऱ्यांनी भर्तरीस दोन गोष्टी सांगितल्या. लमाणांनी भर्तरीला जकातदाराच्या स्वाधीन केले व ते भर्तरीला म्हणाले, 'माल विकून कोणाकडे काय येणे आहे ते जकातदाराला सर्व माहीत आहे. तेव्हा त्याच्यावतीने तू जकात वसूल कर. तुला हेही मदत करतील. तू काही काळजी करू नको.'

अशा तऱ्हेने भर्तरीला बजावून व्यापारी आपल्या मार्गाने निघून गेले. मग जकातदाराने विक्रमला बोलावून आणले व त्याला जकातीचा हिशोब दाखवून तो सर्व पैसा भरावयास सांगितला. तेव्हा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विक्रमाने आपल्या जवळचे एक रत्न जकातीचा ऐवज पटेपर्यंत जकातदाराजवळ ठेवले व सांगितले, 'सध्या भर्तरीस आमच्याकडे जेवण्यासाठी पाठवीत जा, म्हणजे हळूहळू ओळख वाढेल.'

असे विक्रमानें सांगताच जकातदाराने भर्तरीच्या देखत विक्रमाला सांगितले, 'हा आमचा माणूस आहे, याची भोजनाची सोय तुझ्याकडे कर. तुझी आई स्वयंपाक करील व मी शिधा पाठवीन.'

याप्रमाणे ठरल्यावर विक्रमाने त्याचे म्हणणे मान्य केले व भर्तरीचा हात धरून आपल्या घरी गेला. घरी गेल्यावर थोडा वेळ दोघांचे बोलणे झाले. मग विक्रमाने रात्री घडलेला पशूंच्या भाषेपासूनचा सर्व प्रकार आईला सांगितला तेव्हा तिला फार आनंद झाला.

विक्रमाने पुत्राप्रमाणे भर्तरीचे संगोपन करण्यास आईला सांगितले. भोजन झाल्यावर भर्तरी तेथेच राहिला. तो जेव्हा जकातदाराकडे गेला तेंव्हा जकातदार म्हणाला, 'तू विक्रमाच्याच घरी राहा. मला काम लागेल. तेव्हा मी तुला बोलावून घेईन.'

मग भर्तरी आनंदाने विक्रमाकडे राहू लागला. ते दोघे मायलेक भर्तरीवर अतिशय प्रेम करत व तिघे अगदी आनंदाने व एकोप्याने वागत.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २७ वा

त्यावेळी अवंतीनगरात शुभविक्रम नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सुमेधावती नावाची एकुलती एक कन्या होती. ती फार रूपवान होती. एके दिवशी ती आपल्या वडिलांच्या शेजारी बसली असता, तिचे लग्न करावे असा विचार राजाच्या मनात आला. लगेच तो म्हणाला, 'सुमेधावती आता उपवर झाली आहे. तेव्हा तिच्या ' ास शोभणारा वर शोधून पाहावा.'

त्यावर सुमती प्रधान म्हणाला, 'माझ्या मनात एक विनंती करायची आहे; ती अशी की, आता आपले म्हातारपण दिसू लागले आहे. आपणास मुलगा होईल असे वाटत नाही. तेव्हा सुमेधासाठी जो मुलगा शोधायचा त्यालाच राज्यावर बसवावे. तोच तुमचा प्रतिपाळ करील आणि उत्तम राज्यकारभार सांभाळील.' सुमती मंत्र्याची गोष्ट राजाने मान्य केली. मुलगी देऊन मुलगा घ्यायचा असतो.

शुभविक्रम प्रधानाला म्हणाला,'तुम्ही आता असे करा की, हत्तीच्या सोंडेत माळ देऊन ईश्वरी कृपेने तो ज्याच्या गळ्यात माळ घालील त्याला राज्यावर बसवावे. त्याच्याशी सुमेधावतीचा विवाह करावा, हा विचार मला चांगला वाटतो.'

शुभविक्रम राजाने सुचविलेला मार्ग प्रधानासही आवडला. मग त्याने एका सुमुहूर्तावर एक मोठा मंडप उभारला. गुढ्या-तोरणे वगैरे लावून सर्व नगरात धामधूम सुरू झाली. नंतर हत्तीला सजवून त्याच्या सोंडेत दिव्य माळ देऊन त्याला नगरात सोडले. राजा, प्रधान,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सरदार, मानकरी व नागरिक असे पुष्कळ लोक त्या हत्तीच्या मागोमाग जात होते.

हत्तीने प्रथम सभामंडपातील सर्व लोक पाहिले. तिथे त्याने कोणाच्याही गळ्यात माळ घातली नाही. नंतर तो शहरात चालू लागला. संपूर्ण नगर फिरत फिरत शेवटी तो किल्ल्याजवळ येऊन उभा राहिला. तिथून तो पुढे जाईना,त्यावेळी किल्ल्यावर विक्रमासह आठजण पहारेकरी होते. त्या सर्वांना राजाने खाली बोलावले. ते आल्यावर त्यांपैकी विक्रमाच्या गळ्यात हत्तीने मोठ्या आनंदाने माळ घातली. ती घालताच वाद्ये वाजू लागली व सर्वांना फार आनंद झाला.

मग विक्रमास मोठ्या सन्मानाने हत्तीवर बसवून वाजतगाजत सुशोभित केलेल्या सभामंडपात आणले. सुवर्णाच्या सिंहासनावर बसविले. तेव्हा हा कुंभार आहे असे लोक बोलू लागले. ही गोष्ट राजाच्याही कानावर आली. त्याने प्रधानास एकांती नेऊन सांगितले, 'हा कुंभार आहे, अशी लोकांत चर्चा होत आहे. हे जर खरे असेल तर आपली मुलगी त्याला देणे योग्य नव्हे.'

राजाचे म्हणणे ऐकल्यावर प्रधानही काळजीत पडला. पण मग त्याने विचार करून विक्रमाच्या आठ साथीदारांना बोलावून आणले व विक्रमाच्या जातीची चौकशी केली. तेव्हा ते म्हणाले, 'विक्रम जातीचा कोण आहे, हे आम्हाला नक्की माहिती नाही, पण त्याला कुंभार म्हणतात. कुंभार लोकांत चौकशी केली तर त्याच्या जातीची खात्रीलायक माहिती मिळेल.'

हे ऐकल्यावर प्रधानाने कमठ कुंभाराला बोलावले व त्याच्याजवळ एकांतात विचारपूस केली. तेव्हा तो म्हणाला, 'मिथिलानगरीच्या सत्यवर्मा राजाची कन्या सत्यवती ही याची माता आणि स्वर्गात रहाणारा सुरोचन गंधर्व हा याचा पिता होय.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कुंभाराकडून ही माहिती ऐकल्यावर प्रधानाला फार आनंद झाला. मग प्रधान कमठासह राजाकडे गेला व खरी हकीकत त्याने राजाला सांगितली. त्यामुळे राजालाही फार समाधान वाटले. मग खुद्द सत्यवर्मा राजाला घेऊन येण्यास राजाने प्रधानास सांगितले. त्यामुळे सर्व संशय मुळापासून खुडला जाईल असे सुचवले. राजाने या गोष्टीस लगेच मान्यता दिली.

त्याप्रमाणे प्रधान कमठाला बरोबर घेऊन सत्यवर्मा राजाला आणण्यासाठी मिथिलानगरीत गेला. सत्यवर्माने तिथे त्यांचा उत्तम प्रकारे आदरसत्कार केला. मग कमठाने राजाला अवंतीनगरातील विक्रमाची सर्व हकीकत सांगितली व सुरोचन गंधर्व स्वर्गास गेल्याचेही सांगितले. शेवटी तो राजाला म्हणाला, 'महाराज, विक्रमाच्या जातीविषयी तेथील लोकांना संशय आहे. तेव्हा आपण आमच्याबरोबर तेथे येऊन सर्वांची संशयनिवृत्ती करावी.'

सत्यवर्माला ते ऐकल्यावर फार आनंद झाला. तो स्वतः अवंतीला आला व त्याने आपल्या कन्येला-सत्यवतीला भेट दिली, तेव्हा सर्वांच्या मनातील संशय दूर झाला. मग विक्रमास मोठ्या थाटात-जयजयकारात राज्याभिषेक झाला. त्यावेळी पुष्कळ दानधर्म केला. हा समारंभ झाल्यावर शुभविक्रम राजाने आपली कन्या सुमेधावती विक्रमास अर्पण केली. तो लग्नसमारंभही मोठ्या थाटात झाला. शेवटी सत्यवर्मा राजाने आपले राज्य विक्रमाला अर्पण केले.

विक्रम दोन्ही राज्यांचा राजा झाला व भर्तरी युवराज झाला. ते दोघे एकमेकांच्या विचाराने अवंतिकेला राहून राज्यकारभार करीत होते. तेव्हा सुमती प्रधानाच्या मनात आले की, आपली पिंगला ही भर्तरीला द्यावी, हे मनात येताच एके दिवशी त्याने विक्रमाजवळ ही गोष्ट काढली. सुमती प्रधानाचे म्हणणे विक्रमाने लगेच कबूल केले व लग्नतिथी ठरवून टाकली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

परंतु मध्येच एक विक्षेप आला. भर्तरी कोणत्या जातीचा आहे याची चौकशी करण्यासाठी एका परटाने प्रधानाला सुचविले. तेव्हा त्याने कुंभाराला विचारले असता कमठाने आपणास काही माहीत नसल्याचे सांगितले. मग त्याने सत्यवतीला विचारले, परंतु तिनेही हा माझ्या ठिकाणी झालेला मुलगा नसल्याचे सांगितले. मग प्रधानाने विक्रमाकडे चौकशी केली. विक्रमालाहि त्याची काहीच माहिती नव्हती. त्याने त्याला भाऊ मानले होते एवढेच. शेवटी प्रधानाने प्रत्यक्ष भर्तरीलाच माहिती विचारली. भर्तरीने आपली सर्व सविस्तर हकीकत निवेदन केली. ते ऐकून प्रधानाने त्याला सांगितले, 'जर सूर्याच्या वीर्यापासून तुम्ही उत्पन्न झाला आहात, तर सूर्याला लग्नासाठी येथे बोलवा. तो तुमचा पिता असल्याने येथे नक्की येईल.'

प्रधानाच्या या म्हणण्याला भर्तरीने लगेच मान्यता दिली. भर्तरीने अंगणात उभे राहून सूर्याची प्रार्थना केली की, 'जर मी तुझा मुलगा असेन तर माझ्या लग्नासाठी येथे येऊन सर्वांच्या संशयाची निवृत्ती करावी.'

पुत्राची प्रार्थना ऐकून सूर्य लगेच भूतलावर अवंतीनगरीस आला. त्याने प्रथम सुमती प्रधानाची भेट घेतली. आणि त्याला सांगितले, 'मनात कोणताही संशय न बाळगता माझा मुलगा जो भर्तरी त्याला तू तुझी मुलगी पिंगला दे. लग्नासारख्या मंगलकार्याला नवऱ्या मुलाचा बाप जवळ असावा असे तू म्हणशील, तर त्या बाबतीतही तू निश्चिंत राहा. प्रत्यक्ष देवांकडून जयजयकार करवून पुष्पवृष्टी करवीन. विक्रमराजाचा बाप म्हणजे सुरोचन गंधर्व, त्यालाहि या लग्नसमारंभासाठी येथे पाठवून देईन. पण मी जर येथे लग्नासाठी राहिलो तर पुष्कळ लोक माझ्या तेजाने भाजून जातील.'

सूर्याने स्वत: येऊन इतके सगळे सांगितल्यावर प्रधानाची शंका

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

फिटली आणि त्याने लग्नसमारंभाला प्रारंभ केला. भर्तरीच्या लग्नाच्या दिवशी, सीमांतपूजनाच्या प्रसंगी विक्रम राजाचा पिता सुरोचन गंधर्व तेथे आला. तो सत्यवतीला व विक्रमाला भेटला. विक्रम राजा वडिलांच्या पाया पडला. मग राजाने सुमती प्रधानाला बोलावून घेतले व सुरोचनाची भेट घडवली. तेव्हा सुरोचन गंधर्व प्रधानास म्हणाला, 'तू फार दैववान आहेस. म्हणूनच धृमी नारायणाचा अवतार जो भर्तरी तो तुझा जावई झाला. हा प्रत्यक्ष मित्रवरुणीचा (सूर्याचा) पुत्र होय.'

अशा तऱ्हेने भर्तरीची मूळकथा सांगितल्यावर प्रधान सुरोचनाच्या पाया पडला आणि आग्रहाने सीमांतपूजनासाठी त्याला मंडपात घेऊन गेला. गंधर्वाने मानवी रूप घेतले होते. सीमांतपूजनाचा समारंभ संपल्यावर वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी स्वर्गातून देवांनी पुष्पवृष्टी केली. ते पाहून मंडपातील सर्व लोकांनी टाळ्या वाजवून जयघोष केला. नंतर पाच दिवस हा समारंभ मोठ्या थाटाने साजरा झाला. मग सर्वांचा उचित गौरव करून त्यांनी सर्वांचा निरोप घेतला.

लग्नाच्या प्रसंगी राजाने गोरगरिबांना अपार धन वाटले. सुरोचन गंधर्व व सत्यवती मुलाच्या लग्नात व्याही व विहीणबाई म्हणून मिरवत होते. सुरोचन तेथे महिनाभर राहिला, नंतर सर्वांचा निरोप घेऊन तो स्वर्गात परत गेला.

लग्नानंतर भर्तरी व पिंगला एक विचाराने राहू लागली. पुढे काही दिवसांनी भर्तरीने दुसऱ्याही खूप स्त्रिया केल्या. त्याला एकूण बाराशे स्त्रिया होत्या, पण त्यांत मुख्य पट्टराणी अर्थात पिंगलाच होती. ती दोघे अत्यंत प्रेमाने वागत असत. त्यांना एकमेकांशिवाय घटकाभरहि चैन पडत नसे. अशा तऱ्हेने भर्तरी राजा सर्व सुखांचा पूर्ण उपभोग घेत असता बरीच वर्षे उलटली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

एके दिवशी भर्तरी अरण्यात शिकारीसाठी जात असता सूर्याने त्याला पाहिले व त्याच्या मनात विचार आला की, 'माझे दोन पुत्र, एक अगस्ती व दुसरा भर्तरीनाथ. त्यांपैकी अगस्तीने परमेश्वराची प्राप्ती करून घेऊन आपले हित साधून घेतले, पण दुसरा भर्तरीनाथ मात्र राज्यवैभवात गुंतला. त्याला विषयाचा प्याला गोड वाटत आहे. त्यामुळे तो सर्वस्वी हितापासून वंचित झाला. तेव्हा आता हा आपले हित साधून घेईल असा काहीतरी उपाय योजला पाहिजे.'

भर्तरीने स्वहिताचा मार्ग पाहावा म्हणून सूर्याने पृथ्वीवर येऊन दत्तात्रेयाची भेट घेतली. सर्व वृत्तांत निवेदन केला व आपल्या मनातील हेतू त्याला सांगितला. ते ऐकून दत्तात्रेयाने सूर्याला सांगितले, 'तू भर्तरीची चिंता करू नकोस. आपल्या स्थानी तू परत जा. मी त्याला नाथपंथी म्हणून मिरवून त्रैलोक्यात नावाजण्याजोगा करीन. भर्तरी हा माझ्या आशीर्वादाने चिरंजीव बनेल. पूर्वीचे जे भविष्य वर्तवून ठेवलेले आहे, त्याप्रमाणे घडून आल्याशिवाय राहणार नाही. आता तू पुत्राविषयी कसलीहि काळजी न करता स्वस्थ मनाने जा. मला जसे योग्य वाटेल तसे मी करीन.'

अशा तऱ्हेने सूर्याचे समाधान करून त्याची पाठवणी केली आणि दत्तात्रेय भर्तरीकडे गेला. इकडे भर्तरी अरण्यात शिकारीला गेला. त्याच्याबरोबर असंख्य सेना होती. चैत्र महिना होता. ऊन रणरणले होते. तो दिवसाचा तिसरा प्रहर असल्याने तहानेने सर्व सैन्य हळहळू लागले. त्यांनी इकडे तिकडे फिरून बराच शोध केला, पण पाणी सापडेना. सर्व जण व्याकुळ होऊन गेले. कोणी झाडपाला खाऊ लागले, तर कोणी लघुशंका प्राशन केली, राजाही पाणी पाणी करत होता. त्याच्याही घशाला कोरड पडली. बोलण्याचे अवसानहि त्याला राहिले नाही. अशी सर्वांची कठीण अवस्था होऊन बसली. ते पाहून दत्तात्रेयाने एक मायावी सरोवर निर्माण केले. त्यात कमळे होती.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

काठावर मोठमोठे वृक्ष असून ते फळांनी व फुलांनी बहरलेले. थंडगार वारा सुटलेला, पक्ष्यांचा किलबिलाट चाललेला, अशा सुंदर व रमणीय स्थानी दत्तात्रेय आश्रम बांधून राहिलेले दिसत होते.

पाण्यासाठी भटकत असताना हे रम्य सरोवर भर्तरीच्या दृष्टीस पडले. तो एकटाच पाणी पिण्यासाठी त्या सरोवराच्या काठी गेला. पाणी पिणार इतक्यात पलीकडे दत्तात्रेयाने ओरडून म्हटले, 'थांब, थांब! पाण्याला स्पर्श करू नकोस. तू कोण आहेस? तुझे नाव काय? ते सर्व मला प्रथम सांग.'

हे शब्द ऐकून राजा बघू लागला. तो त्याला दत्तात्रेय दिसले. त्यामुळे त्याला भीती वाटू लागली. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. तो नुसता टकमक पाहू लागला. तेव्हा भर्तरीची अवस्था पाहून दत्तात्रेय त्याला म्हणाला, 'तू बोलत का नाहीस? तू कोण आहेस? तुझे आई-बाप, गुरू कोण? ते सर्व मला शांतपणे सांग व मग पाणी पी. नाहीतर तू मरून जाशील.'

ते ऐकून भर्तरी प्रथम दत्तात्रेयांच्या पाया पडला. मग त्याने आपली सर्व हकीकत त्यांना सांगितली व अजूनपर्यंत गुरू केला नाही असेही सांगितले.

ते ऐकून दत्तात्रेय म्हणाले, 'ज्याअर्थी अजूनपर्यंत तू गुरू केला नाहीस त्याअर्थी तू अपवित्र आहेस. तुला अद्याप कोणी गुरू मिळाला नाही, त्याअर्थी तू पूर्वीचा पापी आहेस. तेव्हा तू, पाण्याला शिवू नकोस. पाण्याला स्पर्श करशील तर ते सर्व तळे कोरडे पडेल आणि माझ्या रागाने तू मात्र नाहक भस्म होऊन जाशील.'

अशा प्रकारे दत्तात्रेयाने भर्तरीचा तिरस्कार केल्यावर तो दत्तात्रेयाच्या पाया पडून नम्रपणे प्रार्थना करू लागला, की 'महाराज, माझा जीव तहानेने व्याकुळ झाला आहे. आपण अनुग्रह देऊन मला पाणी पाजावे.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अशा प्रकारे राजा दत्तात्रेयाला विनवू लागला, तेव्हा दत्तात्रेयाने सांगितले, 'तुला अनुग्रह देण्याइतकी तुझी पात्रता नाही. शंकर, ब्रह्मदेव यांसारखे लोक माझ्या अनुग्रहासाठी विनवण्या करतात आणि असे असताना तू मात्र मला अनुग्रह करावयास सांगतोस, हे कसे शक्य आहे?'

त्यावर भर्तरी म्हणाला, 'ते काहीही असो, पण तुम्ही कृपाळू संत आहात. दया, क्षमा तुमच्या अंगी आहे, तेव्हा कृपाकरून मला पाणी द्यावे, नाहीतर मी प्राणरहित होईन.'

तेव्हा दत्तात्रेयाला दया आली व तो म्हणाला, 'तू एवढे म्हणतोस तर मी तुला अनुग्रह देईन, पण तुला इथे बारा वर्षेपर्यंत तपश्चर्या करावी लागेल.'

त्यावर राजा म्हणाला, 'आता माझा प्राण चालला आहे आणि पुढे बारा वर्षे कोणी पाहिली आहेत?'

मग दत्तात्रेयाने त्याला समजावून सांगितले, 'तू मनाने संकल्प सोड म्हणजे मी तुला पाणी देतो. त्यामुळे तुझ्या सर्व बाधा चुकतील. तुला वैभव सोडावे लागेल. विरक्त व्हावे लागेल. हे सर्व तुला पसंत असेल तर बघ.'

दत्तात्रेयाची विचित्र व कठीण अट ऐकून राजाची मती गुंग झाली. तो विचार करू लागला. शेवटी त्याने विचार करून दत्तात्रेयाला सांगितले, 'मी अजून प्रपंचातून मुक्त झालो नाही. मी गयावर्जन करून आईवडिलांच्या ऋणातून मुक्त होईन. ही सर्व ऋणे अजून मला फेडायची आहेत. तेव्हा आणखी बारा वर्षे मला प्रपंच करण्याची परवानगी द्यावी.'

मग दत्तात्रेयाने राजाचे हे म्हणणे मान्य केले व त्याला पिण्यास पाणी देऊन अनुग्रह दिला. त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून कानात बीजमंत्र सांगितला व आपण दत्तात्रेय असल्याची त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ओळख दिली. नंतर मायेच्या सरोवरासह आपण गुप्त झाले. इकडे पाण्यावाचून सर्व तळमळत होते. त्यामुळे हे सर्व व्यर्थ गेले, असे भर्तरीला वाटून त्याने दत्तात्रेयाची प्रार्थना केली. दत्तात्रेयाने त्याची प्रार्थना ऐकून भोगावतीचे पाणी आणून सर्वांचे समाधान केले. कामधेनूचे स्मरण करून अन्नहि निर्माण केले. शेवटी राजाने भोगावतीत स्नान केले. सैन्यासह भोजन केले आणि पाणी पिऊन तृप्त झाल्यावर दर्शन घेऊन आपल्या नगरात गेला. मग दत्तात्रेयहि भोगावती व कामधेनूस रवाना करून आपण निघून गेले.

✵✵✵

अध्याय २८ वा

राजा परत अवंतीत आल्यावर रात्री भोजन करून पिंगलेच्या महालात गेला. पिंगलेने त्याला सुवर्णाच्या मंचकावर पुष्पशय्या अंथरून बसवले व त्याची षोडशोपचाराने पूजा करून राजावरील आपले प्रेम व्यक्त केले. मग ती दोघे जवळ बसून विनोदपूर्ण भाषणे करू लागली. राजाने तिला अत्यंत प्रेमाने जवळ घेतले व तो म्हणाला, 'सर्व राण्यांमध्ये तू माझी अत्यंत आवडती आहेस. अन्य राण्या मला आवडत नाहीत. सागरापासून लाटा दूर करता येत नाहीत, तसे तुझे जीवन आहे.'

अशा तऱ्हेने दोघांच्या तेव्हा पुष्कळ गप्पा झाल्या. नंतर पिंगलेने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राजाला तांबूल दिला व म्हणाली, 'महाराज, ब्रह्मदेवाने आपला जोडा निर्माण केला, त्याप्रमाणे योगही घडून आला. आपले दोघांचे एकमेकांवर विलक्षण प्रेम आहे. जसे मीठ पाण्यात विरघळल्यावर ते निराळे काढून दाखविता येत नाही त्याचप्रमाणे आपले दोघांचे मन एक होऊन गेले आहे. परंतु निर्दय काळ आपल्यावर केव्हा धाड घालील त्याची भीती वाटते. म्हणून मी आधी मरावे असे मला वाटते. ईश्वरकृपेने हे जर घडले तर मी मला मोठी भाग्यवान समजेन.'

अशा तऱ्हेने पिंगला राणी बोलत असता भर्तरी तिला म्हणाला, 'प्रिये, सर्व गोष्टी ईश्वराधीन आहेत. पुढच्या गोष्टी आपल्याला सांगता येणार नाहीत. कारण आपल्या कोणाच्या हातात काहीच नाही. माझ्यापूर्वी तुझी मरणाची इच्छा आहे, हे योग्य आहे, परंतु सूर्यपुत्र म्हणजे यम अगदी निर्दय आहे. तो सदैव उलटेच घडवीत असतो. तेव्हा न जाणो, जर तुझ्याआधी मी मरण पावलो तर पुढे तू काय करशील?'

ते ऐकून पिंगला उत्तरली, 'ब्रह्मदेवाने माझ्या कपाळी काय लिहिले आहे कळत नाही, पण जर तुम्ही म्हणता तसे घडून आले तर मी माझा जीव ठेवणार नाही. तुमच्याबरोबरच अग्नीत देहाची आहुती देईन.'

पिंगला राणीचे हे भावविवश बोलणे ऐकून भर्तरी म्हणाला, 'आता मी जिवंत आहे तोपर्यंत तुझे हे बोलणे ठीक आहे. स्वतःच्या प्राणासारख्या प्रिय गोष्टीचा घात कोणी करीत नाही. मला खूष करण्यासाठी तुझे हे सारे बोलणे आहे; पण वेळ आल्यावर मात्र मागे सरशील.'

यावर ती म्हणाली, 'मी मनापासून बोलले तरी तुम्हाला ते खरे वाटत नाही. पण इतके मात्र पक्के लक्षात असू द्या की, वैधव्याचा डाग मी माझ्या देहाला कधीच लागू देणार नाही. कशावरून म्हणाल

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तर ईश्वरसाक्षीने काया, वाचा, मन ही तुम्हाला अर्पण केली आहेत. मी कधीही विधवा राहणार नाही हे निश्चितच!'

असे बोलून पिंगला गप्प राहिली. राजाच्या मनात तिचे बोलणे ठसले आणि त्याने तिच्या या बोलण्याचा अनुभव पाहण्याचा मनात निश्चय केला.

पुढे एके दिवशी राजा भर्तरी अरण्यात शिकारीला गेला असता त्याला राणीच्या मागच्या बोलण्याची आठवण झाली आणि त्याने त्यातले खरेपण पाहण्याचे ठरवले. त्यासाठी त्याने मनात एक योजना आखली. त्याने एक हरिण जिवंत धरून त्याचा वध केला व आपला मुकुट, भूषणे, वस्त्रे त्याच्या रक्ताने भिजविली. नंतर ती वस्त्रे एका सेवकाजवळ देऊन त्याला सांगितले, 'ही वस्त्रे घेऊन तू पिंगलेकडे जा व तिला सांग की, राजा शिकार करीत असता वाघाने त्याच्यावर झडप घातली आणि त्याचा घात केला.'

हा निरोप तिला कळविण्यासाठी राजाने त्या सेवकाला अवंतीला पाठविले व आपण अरण्यातच राहिला.

इकडे राजाच्या सेवकाने अवंतीला जाऊन पिंगलेची गाठ घेतली व ती रक्ताने माखलेली वस्त्रे तिच्या पुढे ठेवून हात जोडून म्हणाला, 'राजा शिकार करीत असता जाळीतून वाघाने झडप घातली आणि त्याने राजांना मारले. राजाच्या कलेवराचे दहन करून त्यांच्याबरोबरचे लष्कर लवकरच परत येईल!'

सेवकाने सांगितलेला तो वृत्तांत ऐकून पिंगला हृदय बडवून शोक करू लागली. ती कपाळ बडवून घेऊ लागली. इतक्यात संपूर्ण राजवाड्यात ही दु:खकारक बातमी पसरली. ती ऐकून राजाच्या बाराशे स्त्रिया रडत आल्या व त्याही शोक करू लागल्या. पिंगलेला मात्र सर्वांपेक्षा विशेष दु:ख झाले. तिचा शोक विरळाच होता.

पिंगलेने सती जाण्याचा निश्चय केला. सर्व तयारीहि केली.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राजाचे वस्त्र परिधान केले, वाणे दिली व मोठ्या समारंभाने स्मशानात जाऊन अग्नी तयार केला. सर्वांनी तिला जड अंत:करणाने आशीर्वाद दिले. ही नवऱ्याची काया नवऱ्याला अर्पण करते असे म्हणून तिने अग्निकुंडात उडी टाकून आपले हित साधून घेतले. मग सर्व नगरवासी शोक करीतच आपापल्या घरी गेले.

रात्र झाल्यावर राजा नगरात जायला निघाला, तेव्हा आपल्या मरणाची बातमी सांगण्यासाठी राजवाड्यात जो सेवक त्याने पाठविला होता त्याची आठवण होऊन, त्याच्या मनात अनेक वाईट कल्पना येऊन गेल्या.

अशा तऱ्हेने मोठा प्रसंग ओढवला असताही भर्तरीचा बंधू विक्रमराजा स्वस्थ कसा राहिला, अशी शंका साहजिकच मनात येते. तसेच ज्या नोकराने राजवस्त्रे नेऊन पिंगलेला दिली, तो तरी या वेळेपर्यंत स्वस्थ कसा राहिला, अशीही शंका येते. परंतु विचार करता असे दिसते की, तो सेवक वस्त्रे दिल्यानंतर फार वेळ तेथे न राहता तसाच परत भर्तरीकडे अरण्यात गेला, परंतु राजा दुसऱ्या रस्त्याने परतल्यामुळे त्यांची चुकामूक झाली. तो सेवक नंतर भेटला. शिवाय त्या प्रसंगी विक्रमराजा मिथिलानगरीत आपल्या आजोळी गेला होता. सुमती प्रधान, शुभविक्रम राजा वगैरे मंडळीही राजाबरोबर गेली होती. राजवाड्यात फक्त भर्तरीच्या स्त्रिया होत्या. गावकरी लोकांनी पिंगलेला सती जाण्याविषयी विरोध केला होता, पण पिंगलेच्या हट्टापुढे व निश्चयापुढे कोणाचेच काही चालले नाही. अज्ञानामुळे पिंगला मात्र प्राणाला मुकली.

भर्तरी अवंतिकेच्या वेशीपाशी येताच द्वाररक्षकांनी पिंगला सती गेल्याचा वृत्तांत त्याला सांगितला, तेव्हा राजाला फारच दु:ख झाले. तो तसाच शोक करीत स्मशानात गेला व आपणही पिंगलेप्रमाणे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जळून जावे म्हणून तो तिच्या चितेत उडी टाकणार, तोच बरोबरच्या लोकांनी त्याला वेढा घातल्यामुळे त्याचे काहीच चालले नाही. पिंगलेचे गुण आठवून तो फार शोक करू लागला.

पिंगला सती गेली आणि भर्तरी स्मशानात शोक करीत आहे, ही वार्ता ऐकून गावातील लोकही धावत स्मशानात आले. राजाची शोचनीय अवस्था पाहून तेही राजाबरोबर रडू लागले, परंतु त्यांचा तो शोक वरकरणी होता.

राजा अशा तऱ्हेने शोकसागरात बुडाला असता गावातील लोक त्याची समजूत करू लागले. 'राजन्! तुम्ही सर्वज्ञ आहात. तुम्ही लोकांना बोध करता, तेव्हा होऊन गेलेल्या गोष्टीचा शोक करू नका. अशाश्वताचा शोक करून काय उपयोग! आता ईश्वरावर भरवसा ठेवून शांत व्हावे.'

राजाची समजूत काढण्याचा लोक प्रयत्न करीत होते, परंतु राजाचे दुःख कमी होईना. त्याचे कुणाच्याच बोलण्याकडे लक्ष नव्हते. शेवटी लोक कंटाळून एकामागोमाग एक आपापल्या घरी गेले. राजा मात्र स्मशानातच पिंगलेच्या चितेजवळ बसून राहिला, राख भरून टाकण्यासाठी दुसऱ्या दिवशी आप्त लोक स्मशानात गेले, परंतु भर्तरी चितेला कोणालाच हात लावू देईना व आपणही तेथून हलेना. शेवटी नाइलाजाने लोक निमूटपणे निघून गेले. भर्तरी मात्र अन्नपाण्यावाचून तसाच तेथे रात्रंदिवस बसून राहिला.

याप्रमाणे अवंती नगरात घडलेला वृत्तांत दूतांनी मिथिलेस जाऊन विक्रमराजाला सांगितला. तो ऐकून सत्यवर्मा, शुभविक्रम, सुमती प्रधान सर्व मंडळींना फार वाईट वाटले. ते सर्वजण ताबडतोब उज्जैनीस आले व स्मशानात जाऊन पाहतात तो त्यांना पिंगलेच्या दुःखाने विकल झालेला भर्तरी दारुण शोक करीत बसलेला दिसला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते पाहून विक्रम राजा भर्तरीची नानाप्रकारांनी समजूत काढू लागला, परंतु भर्तरी ऐकेना. तो वेड्यासारखा करू लागला. पिंगला! पिंगला! असे म्हणून रडत राहिला. त्याला बोध करता करता दहा दिवस उलटले व मग विक्रमाने पिंगलेची उत्तरक्रिया केली. ज्ञातीभोजन झाले. दाने दिली. नंतर तो नित्याप्रमाणे राज्यकारभार पाहू लागला. विक्रम राजा रोज जाऊन त्याला बोध करीत असे. अशा तऱ्हेने बारा वर्षे उलटली, पण भर्तरीत काहीच बदल झाला नाही. पिंगलेच्या दुःखाने भर्तरीने अन्न सोडले होते व तो फक्त वृक्षाची पाने खाऊन व पाणी पिऊन राहात होता; त्यामुळे तो फार कृश झाला.

भर्तरीचे क्लेश मित्रवरुणीस म्हणजे सूर्याला बघवले नाही. तो दत्तात्रेयाकडे गेला. दत्तात्रेयाने त्याला येण्याचा हेतू विचारला असता मित्रावरुणी म्हणाला, 'आपल्याला सर्व माहीत असताना तू अज्ञानपण घेऊन आम्हाला विचारतोस- ते मी नवीन सांगायला पाहिजे असे नाही, परंतु भर्तरीवर आपली कृपादृष्टी असू द्या म्हणजे झाले.'

मग दत्तात्रेयाने मित्रवरुणीला धीर देऊन त्याला समजावले, 'भर्तरीची चिंता न करता निर्धास्त मनाने घरी जा. मच्छिंद्रनाथाचा प्रज्ञावंत शिष्य गोरक्षनाथ फिरत फिरत भर्तरीकडे येईल व त्याला बोध करून ताळ्यावर आणील.' हे ऐकून मित्रवरुणी अत्यंत समाधानाने परत गेला.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय २९ वा

पूर्वी सांगितल्यावर मच्छिंद्रनाथ गर्भाद्री पर्वतावर राहिला आणि गोरक्षनाथ तीर्थयात्रा करीत होता. त्याने गिरनारास जाऊन, दत्तात्रेयाची भेट घेऊन त्याला नमस्कार केला. दत्तात्रेयाने त्याला प्रेमाने जवळ बसवले व मच्छिंद्रनाथ कोठे आहेत व तू इकडे कसा आलास वगैरे विचारपूस केली. तेव्हा गोरक्षनाथ म्हणाला, 'मच्छिंद्रनाथ गर्भाद्री पर्वतावर तपश्चर्या करावयास राहिले आहेत; आणि मी तीर्थे करीत आपल्या चरणांजवळ आलो आहे.'

ते ऐकून दत्तात्रेयाला समाधान वाटले. तो म्हणाला, 'माझे एक काम आहे. ते तू कर. ते काम म्हणजे मी भर्तरीवर अनुग्रह केला आहे. पण तो आपल्या बायकोसाठी स्मशानात शोक करीत राहिला आहे, त्याला आज बारा वर्षे झाली. तो गवत, झाडाची पाने खाऊन आपले जीवन कंठीत आहे. तेव्हा तू तेथे जाऊन त्याला युक्तीने सावध कर. हे सर्व जग मिथ्या, अशाश्वत आहे हे त्याच्या निदर्शनाला आणून दे व त्याला नाथपंथाची दीक्षा दे. मी त्याला मागे उपदेश केला तेव्हा त्याने मला, 'मी नाथपंथाची दीक्षा घेईन' असे वचन दिले होते.'

मग दत्तात्रेयाने गोरक्षाला भर्तरीची जन्मापासूनची संपूर्ण हकीकत सांगितली. ती ऐकल्यावर गोरक्ष म्हणाला, 'आपल्या आशीर्वादाने मी हे कार्य यशस्वीपणे करून देतो.'

असे म्हणून त्याने दत्तात्रेयाला नमस्कार केला आणि शीघ्र गतीने कामगिरीवर निघाला. मग गोरक्षनाथाने व्यानअस्त्र जपून भस्म कपाळी लावले आणि तो क्षणार्धात पन्नास योजने दूर असलेल्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अवंतीस पोहोचला. तिथे स्मशानात त्याला कृश झालेला भर्तरी दिसला. तो एकसारखा पिंगलेचा ध्यास करीत होता. त्याची अवस्था पाहून गोरक्षालाहि वाईट वाटले. त्याने विचार केला की, हा पिंगलेच्या विरहाने अगदी वेडा झाला आहे. यावेळी जर मी ह्याला उपदेश केला तर तो फोल होईल. म्हणून काही युक्तीने आपले काम साधावे.

अशा तऱ्हेने विचार करून गोरक्षनाथ कुंभाराकडे गेला. त्याने एक मडके विकत घेतले. त्याला 'बाटली' असे नाव दिले. ते मडके रंग देऊन सुशोभित केले. मग ते मडके घेऊन तो स्मशानात गेला. तेथे ठेच लागल्याचे निमित्त करून तो जमिनीवर पडला व बेशुद्ध पडल्याचा त्याने आव आणला. तेव्हा बाटली म्हणजे मडके फुटून गेले आहे असे पाहून तो रडू लागला. त्याने तिच्यासाठी फारच शोक केला. मग खापराचे सर्व तुकडे एकत्र करून तो रडत बसला.

बाटलीसाठी त्याने खूप शोक केला. त्यात तो म्हणे, 'ती मला अत्यंत उपयोगाची होतीं व मी मरून ती बाटली राहिली असती तर फार चांगले झाले असते.'

तिथे जवळच भर्तरी होता. त्याला हे पाहून फार आश्चर्य वाटले. ते विचित्र वागणे पाहून त्याला राहून राहून हसू येत होते. इकडे गोरक्षनाथ एकसारखा धाय मोकलून रडत राहिला. तो म्हणू लागला, 'माझे बाटलीधन कोणत्या दुर्जनाने हिरावून नेले, हे बाटली, एकदा तरी मला तुझे तोंड दाखव!'

गोरक्षाचा तो विचित्र विलाप ऐकून भर्तरी पिंगलेचा नाद विसरला. दमडी किंमतीची बाटली आणि एवढ्यासाठी 'बाटली, बाटली' म्हणत रडत असलेल्या गोरक्षनाथास पाहून भर्तरीला स्वस्थ बसवेना. तो गोरक्षनाथाला म्हणाला, 'अरे, तू स्वत:ला योगी म्हणवितोस आणि अडक्याची किंमत असलेली बाटली गेली म्हणून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वेड्यासारखा रडत बसला आहेस, हे कसे काय?'

हीं अनुकूल संधी आहे असे पाहून गोरक्षनाथाला आणखी हुरूप आला. तो म्हणाला, 'राजा, तू कोणासाठी दुःख करीत बसला आहेस? आवडत्या वस्तूच्या दुःखाचा अनुभव तुला आहेच. त्याचप्रमाणे माझी आवडती बाटली फुटल्याने मला किती दुःख झाले हे माझे मीच जाणतो!'

त्यावर भर्तरी म्हणाला, ' मडक्यासारख्या क्षुल्लक वस्तूसाठी मी शोक करीत नाही. सौदामिनीसारख्या माझ्या पिंगला राणीचा घात झाला म्हणून मला फार दुःख होत आहे. ती आता मला पुन्हा मिळायची नाही. परंतु अशी मडकी हवी तितकी मिळतील.'

ते ऐकून गोरक्षनाथाने सांगितले, 'तुझ्या पिंगलेसारख्या लक्षावधी पिंगला एका क्षणात मी निर्माण करून देईन, पण माझ्या बाटलीसारखी दुसरी बाटली केव्हाही मिळणार नाही.'

तेव्हा भर्तरी म्हणाला, 'तू लक्षावधी पिंगला उत्पन्न करून दाखव; म्हणजे मी तुला शेकडो बाटल्या निर्माण करून देतो. तू तुझा चमत्कार मला दाखव.'

त्यावर गोरक्षनाथ म्हणाला, 'मी पिंगला उत्पन्न करून दाखविल्या तर तू मला काय देशील?' तेव्हा आपले राज्यवैभव, सुखसेवन इ. सर्व त्याला देण्याचे भर्तरीने मान्य केले व पंचमहाभूतांना साक्षी ठेवून बोलल्याप्रमाणे न केल्यास माझे पूर्वज नरकवास भोगतील आणि मीही शंभर जन्म रौरव नरक भोगीन, अशी त्याने प्रतिज्ञा केली.

मग गोरक्षाने त्यास बजावले, 'बोलल्याप्रमाणे तू वागला नाहीस तर सहस्र जन्मापर्यंत नरकवास भोगशील.'

नंतर गोरक्षनाथाने कामिनीअस्त्राचा जप करून पिंगलेच्या नावाने भस्म फेकले आणि लक्षावधी पिंगला खाली उतरल्या. अगदी पिंगला राणीसारखीच त्यांची रूपे पाहून राजाला फार आश्चर्य वाटले

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्या सर्वांना जवळ बसवून त्याने संसारातील खाणाखुणा विचारल्या. त्यांनीही राजाच्या प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली. शेवटी पिंगलेने राजाला सांगितले, 'माझ्या विरहाने तुम्हाला दुःख झाले हे जरी खरे असले तरी अशाश्वत गोष्टींबद्दल असा शोक करणे योग्य नाही. मी मनापासून तुमच्यावर प्रेम करीत असता स्वतःला जाळून घेतले, परंतु गोरक्षनाथाने मला पुन्हा सजीव केले. तथापि शेवटी आम्हाला व तुम्हाला जायचेच आहे, ते कदापि चुकणार नाही. तेव्हा आता माझा छंद सोडून देऊन तुम्ही आपल्या देहाचे सार्थक करून घ्या व मोक्षाची प्राप्ती करून घ्या. फक्त माझा ध्यास करून तुम्हाला काहीच उपयोग होणार नाही. मी तुमची पत्नी असताना पतिव्रताधर्म आचरून आपले हित करून घेतले. आता तुम्ही आपल्या हिताचा मार्ग आचरावा.'

पिंगलेचे भाषण ऐकून राजाला विस्मय वाटला. मग भर्तरी लगेच गोरक्षनाथाच्या पाया पडला. तेव्हा गोरक्षनाथाने त्याला हाताला धरून उठवून सांगितले, 'राजा, माझा गुरु मच्छिंद्रनाथ दत्तात्रयेचा शिष्य आहे. आणि तुलाही दत्तात्रेयाचा अनुग्रह झालेला आहे. म्हणजे पर्यायाने तू माझ्या गुरूचा बंधू आहेस, म्हणून मला गुरुस्थानी आहेस. तेव्हा तू माझ्या पाया पडण्याऐवजी मीच तुझ्या पाया पडणे अधिक योग्य होय. म्हणून आता मीच तुला साष्टांग नमस्कार करतो. राजा, आता मला सांग, की तुझ्या मनात तरी काय आहे? तुझी पिंगलेसह राज्यसुखाचा उपभोग घेण्याची इच्छा आहे, की वैराग्याने वागून जन्माचे सार्थक करून घेण्याची?'

गोरक्षाचा तो प्रश्न ऐकून राजा म्हणाला, 'मी पिंगलेसाठी बारा वर्षे बसलो होतो, परंतु ती मला दिसली नव्हती. आणि तू तुझ्या योगसामर्थ्याने बघता बघता शेकडो पिंगला मला दाखवल्यास, असे हे सामर्थ्य राज्यवैभवात दृष्टीस पडत नाही. मी भ्रमात पडलो. श्रीगुरूच्या हातून निसटलो आणि मोठ्या संकटात सापडलो. कृपा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करून मला माझ्या गुरूचे दत्तात्रेयांचे दर्शन करवावे. मी योगमार्गच पत्करणार आहे.'

दत्तात्रेयाच्या दर्शनास जाण्यापूर्वी भर्तरी गोरक्षनाथास म्हणाला, 'आता तू ह्या सर्व पिंगला अदृश्य कर आणि प्रथम राजवाड्यात चल.'

गोरक्षनाथाने त्याचे म्हणणे मान्य केले. मग सर्व पिंगला अदृश्य करून राजाबरोबर तो राजवाड्यात गेला. त्यांना पाहून सर्वांनाच खूप आनंद झाला, विक्रमराजाने गोरक्षनाथास सुवर्णाच्या आसनावर बसवले. त्याला नमस्कार केला आणि त्याची षोडशोपचारांनी पूजा केली.

विक्रमराजाने गोरक्षनाथास प्रार्थना केली की, 'भर्तरीस कोणत्या युक्तीने भानावर आणले ते मला कृपा करून सांगावे.' मग गोरक्षनाथाने घडलेला सर्व प्रकार त्याला सविस्तरपणे सांगितला व पुढचा संकेतहि त्याच्या कानी घातला. विक्रम राजाने त्या दोघांना आणखी सहा महिनेपर्यंत तेथे राहण्याचा आग्रह केला. बारा वर्षे भर्तरी केवळ झाडाची पाने खाऊन राहिल्याने तो अगदी कृश झाला होता. म्हणून विक्रम राजा म्हणाला, 'सहा महिने येथे राहिलात म्हणजे तेवढ्या दिवसात भर्तरीच्या अंगी थोडी तरी शक्ती येईल.'

तेव्हा गोरक्षनाथाने सांगितले, 'भर्तरीचा आजचा निर्णय कायम राहील याची खात्री नाही, म्हणून आम्हाला येथे आणखी राहणे योग्य नाही.'

तरीही विक्रमासाठी तो तीन रात्री तिथे राहिला. नंतर भर्तरीला बरोबर घेऊन तो निघाला. त्याप्रसंगी भर्तरीच्या स्त्रियांनी गोरक्षनाथावर रागावून खूप वल्गना केल्या आणि शिव्यांची लाखोली वाहिली, परंतु विक्रम राजाने मात्र उभयतांना मोठ्या आनंदाने निरोप दिला. गावातील प्रज्ञावंत मंडळीही त्यांना पोहोचवण्यासाठी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विक्रमराजाबरोबर वेशीपर्यंत गेली.

गोरक्षानाथाने भर्तरीस निघताना स्पष्टच विचारले की, 'जर तुझे मन राजवैभवात गुंतले असेल तर तू अजून ही विचार कर व परत जा आणि खुशाल संसारसुखाचा उपभोग घे.'

भर्तरी प्रांजळपणे म्हणाला, 'आपण संसाराला विटलों आहोत' मग तशी खात्री करून घेऊन गोरक्षनाथाने आपली शैली, शिंगी, कंथा त्याला देऊन भिक्षेसाठी झोळी दिली व त्याची प्ररीक्षा पाहण्यासाठी त्याला त्याच्याच स्त्रियांकडे भिक्षेसाठी पाठविले. राजाला पाहून स्त्रियांनी रडून आकांत केला. राजाचे गुण आठवून त्या पुन्हा त्याला राहाण्याचा आग्रह करू लागल्या, पण भर्तरीचे मन अजिबात द्रवले नाही. तो त्यांचा तिरस्कार करून निघून गेला. मग विक्रम वगैरे सर्वजण नगरात परत गेले. विक्रमाने सर्व स्त्रियांना उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या.

भर्तरी फारच अशक्त झाला होता. त्याला चालण्याचे श्रम सहन होत नव्हते. ते पाहून गोरक्षनाथाने यानास्त्राची योजना करून भस्म मंत्रून त्याच्या कपाळाला लावताच भर्तृरीचा अशक्तपणा नाहीसा झाला आणि ते दोघे डोळे मिटून एका निमिषार्धात गिरनार पर्वतावर आले. दत्तात्रेयाने प्रेमाने त्यांना जवळ घेतले व त्यांचे समाधान केले.

* * *

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३० वा

गोरक्षनाथ भर्तरीसह तीन दिवस गिरनार पर्वतावर होते. मग दत्तात्रेयाची आज्ञा घेऊन गोरक्षनाथ मच्छिंद्रनाथाकडे जायला निघाला तेव्हा दत्तात्रेयाने त्याला सांगितले, 'मला बरेच दिवसांत मच्छिंद्रनाथ भेटला नाही. त्याला एकदा माझ्या भेटीला घेऊन ये.'

नंतर दत्तात्रेयाने भर्तरीला नाथपंथाची दीक्षा दिली. आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवून त्याला अमर केले. मग त्याच्याकडून विद्याभ्यास करवून घेतला. ब्रह्मज्ञान, ज्योतिष, व्याकरण, संगीत, रसायन, वेद ही सर्व व संपूर्ण अस्त्रविद्या शिकविल्या. साबरी विद्येतही त्याला निष्णात बनवले. नंतर नाग अश्वत्थाच्या ठिकाणी असलेल्या संपूर्ण दैवतांचा कृपाप्रसाद मिळवण्यासाठी त्याला तिकडे पाठवून दिले. मच्छिंद्रनाथासारखे तपाचरण करून त्याने बावन्न वीर प्रसन्न करून घेतले. इतके झाल्यावर दत्तात्रेयाने भर्तरीला आपल्याबरोबर बद्रिकाश्रमात नेऊन त्याला तपश्चर्येस बसवले व आपण गिरनार पर्वतावर जाऊन मच्छिंद्रनाथाची वाट पाहू लागले.

इकडे गोरक्षनाथ गर्भगिरी पर्वतावर येऊन मच्छिंद्रनाथाला भेटला व त्याने मच्छिंद्राला दत्तात्रेयाचा निरोप सांगितला. ते काही दिवसांनी दत्तात्रेयाच्या दर्शनासाठी निघाले. ते वैदर्भ देशाच्या दिशेने जात असता वाटेत कौंडण्यपुरात गेले. तिथे ते भिक्षेसाठी हिंडत होते. तिथल्या शशांगार नावाच्या राजाने रागावून आपल्या मुलाचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हात-पाय तोडून त्याला चव्हाट्यावर टाकून दिल्याचे त्यांनी पाहिले.

शशांगर राजा मोठा प्रज्ञावंत, धार्मिक, उदार, शूर असताना त्याने मुलाची इतकी भयंकर अवस्था का केली? राजा एवढा रागावण्याचे कारण त्याने ज्या मुलाची अशी अवस्था केली होती, तो त्याचा औरस पुत्र नव्हता. शंकराच्या आराधनेमुळे तो राजाला कृष्णा नदीत मिळाला होता. हा पुत्र मिळण्यापूर्वी बरेच दिवस राजाला संतान नव्हते. त्यामुळे तो नेहमी उदासपणे सगळे राज्यकारभार करीत असे.

एक दिवस राजाची पत्नी मंदाकिनी राजाला म्हणाली, 'मुलासाठी असे खिन्न होऊन बसण्यात काय अर्थ आहे. नशिबात असेल तसे होईल. काळजी करणे व्यर्थ आहे. अशा या काळजीने शरीर मात्र झिजत चालले आहे. अशाने संसाराचे वाटोळे होईल.'

राणीचा उपदेश राजाला पटला नाही. उलट त्याची चित्तवृत्ती अधिकच बिघडत चालली. मग राजाने शिवाची आराधना सुरू केली आणि राज्याचा भार प्रधानावर सोपवला.

शिवाराधनेसाठी राजा रामेश्वरास गेला व बरोबर दूतही नेले. तेथे जाताना तो फिरत फिरत कृष्णेच्या संगमाजवळ आला. तेथे शंकराने त्याला स्वप्नांत दृष्टांत दिला की, 'तुला येथेच पुत्राची प्राप्ती होईल. कृष्णा व तुंगभद्रेच्या डोहात पार्वतीसह माझी मूर्ती आहे, त्याची तू नित्य आराधना कर.'

शिवाज्ञेनुसार राजा संगमावर डोहात पाहू लागला. तेथे त्याला एक जुनाट लिंग दिसले. राजाने त्याची मोठ्या समारंभाने प्राणप्रतिष्ठा केली. हाच रामेश्वर आहे अशी त्याची पक्की श्रद्धा होती. त्याची प्रतिष्ठापना झाल्यावर पुष्कळ लोक दर्शनासाठी नेहमी येऊ लागले व 'जय जय शिव संगमेश्वर' असे बोलू लागले.

तेथून जवळच असलेल्या भद्रसंगम गावात मित्राचार्य नावाचा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

एक वेदपाठी ब्राह्मण राहात होता. त्याच्या पत्नीचे नांव शरयू. ती मोठी प्रतिव्रता होती. त्यांनाही पोटी संतान नव्हते. म्हणून त्या उभयतांनीही त्याच संगमेश्वराची आराधना करण्यास सुरुवात केली.

स्वर्गात शंकर आपल्या पुष्कळ गणांसह बसले होते. तेव्हा सुरोचना नावाच्या अप्सरेला शंकराने बोलावून आणले. सुरोचना तिथे आल्यावर शंकराच्या पाया पडली व उत्तम नाचायला व गायला लागली. तेव्हा शंकराची प्रसन्न मुद्रा पाहून ती शिवावर भाळली. त्यामुळे तिचा ताल चुकला. हे पाहून शंकर तिला म्हणाले, 'सुरोचने, तुझ्या मनातील हेतू मला कळला. मनात भ्रष्ट झाली आहेस, म्हणून तू भद्रसंगमी मित्राचार्य ब्राह्मणाच्या पोटी जन्म घे.'

शंकराने सुरोचनेला शाप देताच ती घाबरून गेली; आणि आपण स्वर्गच्युत होणार म्हणून तिला फार वाईट वाटले. शंकराशी रत होण्याचा विचार मनांत आणल्याचा हा भयंकर परिणाम होय, या समजुतीने तिला दुःख झाले. मग तिने शंकराची स्तुती करून उःशाप देण्याबद्दल विनंती केली. तेव्हा शंकराने प्रसन्न होऊन सुरोचनेला उःशाप दिला. तो म्हणाला, 'तू आता मृत्युलोकी जन्म घेशील. तुझी मनोकामना पूर्ण होण्यासाठी माझा तुला स्पर्श होताच तू स्वर्गात स्वस्थानी येशील.'

याप्रमाणे शंकराने हा उःशाप देताच ती तेथून निघाली व मित्राचार्यांची पत्नी शरयू हिच्या गर्भात राहिली. शरयूला नऊ महिने पूर्ण भरताच ती प्रसूत झाली. तिला कन्यारत्न झाले. ही कन्या मूळची अप्सरा असल्याने तिचे स्वरूप सुंदर होते. तिचे नाव 'कदंबा' असे ठेवले. ती बारा वर्षांची झाल्यावर तिच्या बापाने तिच्यासाठी योग्य वर पाहण्यास सुरुवात केली. परंतु ती सदैव विरक्त असे. रात्रंदिवस ती शंकराचे ध्यान करण्यात मग्न असे. शिवाच्या पूजेसाठी तिचे आईवडील नेहमी जात, त्यांच्याबरोबर ती पण नेमाने जात असे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मोठी झाल्यावर ती एकटीही शंकराच्या पूजेसाठी देवळात जाऊ लागली.

एके दिवशी ती एकटीच शिवाच्या देवळात गेली होती. त्यावेळी देवळात दुसरे कोणीच नव्हते. 'जय जय हर' म्हणून ती शिवाच्या पाया पडू लागली तोच शिव प्रकट झाला. तिचे लावण्य पाहताच शिव कामातुर झाला. मग तो तिला धरण्यासाठी तिच्यामागे धावू लागला. त्याचा हेतू समजून ती तेथून पळाली. शंकरही तिच्या मागोमाग धावत गेले व तिला त्यांनी धरले, पण शंकराचा स्पर्श होताच ती सुरोचना पूर्ववत् अप्सरा होऊन स्वर्गात गेली.

अशा प्रकारे ती शापमुक्त झाली, पण इकडे शंकराचा वीर्यपात होऊन ते रेत कृष्णा नदीत गेले. त्यावेळी शशांगर राजा स्नान करण्यासाठी तिथे आला होता. अर्घ्य देण्यासाठी त्याने हातात पाणी घेतले. तेव्हा ते शंकराचे वीर्य त्याच्या हातात आले. रेत एकत्रित होऊन राजाला ओंजळीत मनुष्यदेहाचा पुतळा दिसू लागला. तो पाहून आपणास शंकराने पुत्र दिला, असा विचार मनात करून तो राजा अतिआनंदाने घरी आला व त्याने तो मुलगा मंदाकिनीच्या स्वाधीन केला, त्यामुळे हा देवावतार असावा असे त्याला वाटले. मग राणीने त्याला आनंदाने हृदयाशी धरताच तिला पान्हा फुटला. त्याचे नाव 'कृष्णागर' असे ठेवले. मग थोडे दिवस तेथे राहून राजा पुन्हा कौंडण्यपुरास गेला.

कृष्णागर दहा वर्षांचा झाला, म्हणून राजाने त्याचे लग्न करण्याचे ठरवले. मग मुलाच्या रूपाला व गुणाला योग्य अशी वधू शोधण्यास त्याने मंत्रिमंडळातील लोकांना देशोदेशी पाठविले त्यांनी अनेक मुली पाहिल्या, पण मुलाला योग्य अशी मुलगी मिळेना, म्हणून ते सर्व परत कौंडण्यपुरास आले. त्यांनी राजाला सर्व हकीगत सांगितली. एके दिवशी मंदाकिनी राणीचे निधन झाले. तिच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वियोगाने राजाला फार शोक झाला. राजाने वर्षश्राद्धापर्यंतचे उत्तरकार्य केले.

पुढे राजाला मदनाची पीडा होऊ लागली. त्यामुळे त्याला विवाहाची इच्छा झाली. त्याने प्रधानाला बोलावले व आपल्या मनातील गोष्ट सांगून योग्य अशी मुलगी तुझ्या पाहण्यात आहे काय म्हणून विचारले. त्यावर प्रधान म्हणाला, 'पुरोहिताने बऱ्याच मुलींच्या टिपणांच्या नकला करून आणल्या आहेत. पत्रिका पाहून कोणत्या मुलीशी जुळते ते पाहावे, म्हणजे मग त्याचा विचार करून लग्न जमवण्यास बरे पडेल.'

प्रधानाने पुरोहिताला बोलावून आणले व सर्व मुलींची टिपणे स्वतः पाहिली. त्यात चित्रकूटचा राजा भूजध्वज याच्या भुजावंती नामक कन्येची पत्रिका चांगली जमली. ती मुलगीही अत्यंत तेजःपुंज होती. मग हे काम करण्यासाठी राजाने आपल्या प्रधानाला चित्रकूटच्या भूजध्वज राजाकडे पाठविले. प्रधान तिथे गेला आणि त्याने प्रथम राजाची भेट घेतली. त्याला आपल्या येण्याचा हेतू सांगितला. ते ऐकल्यावर भूजध्वज राजालाही आनंद झाला. प्रधानाने दूताकरवी राजाला सर्व वृत्तांत कळविला. राजाही लग्नासाठी चित्रकूटाला गेला.

तेथे हा लग्नसमारंभ उत्तम प्रकारे पार पडला. मग राजा भुजावंतीला घेऊन आपल्या नगरात परत आला. त्यावेळी भुजावंती तेरा वर्षांची होती व कृष्णागर सतरा वर्षांचा होता.

एके दिवशी या कृष्णागरची व तिची नजरानजर झाली. त्यापूर्वी त्यांनी एकमेकांना पाहिलेच नव्हते. एकदा राजा शिकारीसाठी बाहेर गेला होता व राजपुत्र त्याच्या राजवाड्यातून पतंग उडवत होता. त्याला पाहताच भुजावंतीला कामवासना उत्पन्न झाली. तिने दासीला बोलावून सांगितले, 'तो पलीकडच्या घरात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पतंग उडवीत आहे, त्याला माझ्याकडे घेऊन ये.'

राणीची अशा आज्ञा हाताच दासीने कृष्णागराजवळ जाऊन, तुला तुझ्या आईने बोलावले आहे, असा निरोप सांगितला. आईने निरोप पाठविला म्हणून राजपुत्र मोठ्या आनंदाने दासीबरोबर भुजावंतीच्या महालात गेला. त्यापूर्वी त्यांची लग्नातच भेट झाली होती. त्यानंतर ही दुसरी भेट फार दिवसांनी होत होती. आपली माता आपल्याला बोलावते आहे म्हणून आपले भाग्य उदयास आले असे वाटून त्याला आनंद झाला.

तो महालात पोहाचला तेव्हा भुजावंती दाराशीच त्याची वाट पहात उभी होती. त्याला तेथे पोहोचवून दासी निघून गेली. इकडे कृष्णागर आपल्या सापत्न आईजवळ गेल्यावर त्याने प्रथम आपल्या आईला नमस्कार केला. ती कामातुर झाली होती. त्यामुळे ती काहीच बोलली नाही, परंतु आईची ती नजर पाहून कृष्णागर एकदम दचकला. तिने धरून त्याला आत आणले व मला भोग देऊन माझी कामवासना पूर्ण कर असे सांगितले.

तिचे हे शब्द ऐकताच तो रागावून म्हणाला, 'तू माझी सावत्र आई आहेस आणि हे पापकर्म कसे करतेस? तू रानातले जनावर आहेस काय? स्त्रियांची जातच असंगळ व दुष्ट! त्या कसा अनर्थ करतील, याचा नेम नाही.'

असे म्हणून भयंकर संतापून त्याने तिचा हात झिडकारला व तो पुन्हा पतंग उडवायला गेला.

कामांध झाल्यामुळे भुजावंती देहभान विसरली होती. जेव्हा आपला हा सावत्र पुत्र आहे हे तिच्या लक्षात आले, तेव्हा ती घाबरून गेली. तिने दासीला बोलावले व सांगितले, 'मघाशी मी तुला ज्याला घेऊन यायला सांगितले तो कोणी परका नसून माझाच मुलगा होता. हा मोठा अनर्थ माझ्या हातून घडला आहे. तो आता राजाला सर्व

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सांगेल व राजा माझा प्राण घेईल. तेव्हा आता विष खाऊन आपण प्राणत्याग करावा, हे चांगले, म्हणजे ही घृणास्पद गोष्ट उघडकीला येणार नाही.'

✻✻✻

अध्याय ३१ वा

गतगोष्टीचा भुजावंतीला पश्चात्ताप झाला व ती प्राणघातास तयार झाली, परंतु दासीने तिला सांगितले, 'तुला जीव देण्याचे काहीही कारण नाही. ज्याप्रमाणे ईश्वरी संकेत असेल तसेच घडून येईल, उगाच खंत करीत बसू नको. स्वस्थपणाने जाऊन झोप. राजा शिकारीहून परत आल्यावर तुझ्या महालात येईल तेव्हा तू झोपून राहा. उठू नको. मग राजा तुला उठवून झोपण्याचे कारण विचारील. तेव्हा तू रडून आकांत कर व मी आता जगू इच्छित नाही म्हणून राजास सांग.अशा तऱ्हेने ढोंग करून रडू लागलीस म्हणजे राजा तुला रडण्याचे कारण विचारील. तेव्हा तू त्याला सांग की, तुमचा मुलगा कृष्णागर माझ्या महालात आला आणि मला धरायला धावला, परंतु मी त्याला ढकलून दिले. तेव्हा मला जगून काय करायचे आहे? असे बोलल्यावर राजाला राग येईल. मग तो मुलगा वगैरे काही मनात न आणता त्याला ताबडतोब ठार करील. तू निर्धास्तपणे आनंदाने खुशाल रहा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असा मार्ग सांगितला आणि दासी निघून गेली. पूर्व सूचनेनुसार भुजावंती सुवर्ण मंचकावर झोपली. तिने अन्नपाणी सर्व वर्ज्य केले. अंगावरील दागदागिने काढून टाकले. थोड्या वेळाने शशांगर राजा शिकारीहून परत आला. नेहमीप्रमाणे भुजावंती पंचारती घेऊन आली नाही म्हणून राजाने तिची दासीजवळ चौकशी केली. तेव्हा ती म्हणाली, 'राणी कसल्या दुःखाने दुखावली हे कळत नाही, पण ती मंचकावर स्वस्थ निजली आहे.'

दासीचे बोलणे ऐकताच राजा भुजावंतीच्या महालात गेला. तेथे पूर्वी ठरल्याप्रमाणे ती पलंगावर निजली होती. राजाने तिला निजण्याचे कारण विचारले तेव्हा ती काहीच न बोलता ढळढळा रडू लागली. त्यामुळे राजाला अधिकच कळवळा आला व त्याने तिला जवळ घेतले. तो पुन्हा पुन्हा विचारू लागला. तो म्हणाला, 'सखे, इतके दुःख करण्याचे कारण काय? तुला कोणी त्रास दिला का? तसे मला त्याचे केवळ नाव सांग म्हणजे त्याला होत्याचा नव्हता करून टाकतो. तू माझी पट्टराणी असताना तुला काचणी कोणाची? तुझ्याकडे वाकडी नजर करण्याचे धैर्य कोणाच्यात आहे? तू मला नाव सांग, मी त्याला पृथ्वीवर ठेवीत नाही, लगेच मारून टाकतो.'

राजाचे आश्वासन ऐकून भुजावंतीला समाधान वाटले. मग ती म्हणाली, 'महाराज, तुमच्या मुलाची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. तुम्ही शिकारीला गेल्यावर इथे कोणी नाही असे पाहून तो माझ्या महालात आला. माझा हात धरून मला म्हणाला, 'माझी इच्छा पुरी कर. त्याची कामवासना पाहून मी माझा हात युक्तीने सोडवून घेतला आणि पळत दुसऱ्या महालात गेले, तेव्हाची माझी अवस्था मी सांगूच शकत नाही. चालता चालता पडलेही, पण तशीच धडपडत उठले व पळाले. एकदाची महालात येऊन पोहोचले आणि दार लावून घेतले. तेव्हा त्याचा काहीच इलाज चालेनासा झाल्यावर तो निघून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गेला. आता मला जगायची इच्छा नाही. पण मरण्यापूर्वी एकदा तुमचे दर्शन घ्यावे म्हणून हा प्राण रक्षण केला आहे.'

भुजावंतीचे हे बोलणे ऐकून राजाचा क्रोध अनावर झाला. त्याचे डोळे तांबडे लाल झाले होते. राजवाड्याच्या बाहेर येऊन राजपुत्र कृष्णागरास मारून, जाळून टाकण्याची किंवा हातपाय तोडून त्याला लांब टाकून देण्याबद्दल त्याने सेवकांना आज्ञा केली. राजाची ती विचित्र आज्ञा ऐकून सेवक मुलाला घेऊन स्मशानात गेले व तेथे नेल्याची बातमी त्या सेवकांनी परत येऊन राजाला सांगितली.

राजाचे सेवक फार चतुर होते. राजाने आपल्या मुलाला मारून टाकण्याची ही भयंकर आज्ञा रागाच्या भरात दिली आहे, हे त्यांनी ओळखले होते. त्याला मारले आणि राजाचा राग शांत झाला तर काय अनर्थ होईल हे सांगता येत नाही; असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्यामुळे ते परत राजाकडे गेले, पण राजाचा निर्णय बदलला नाही. राजाचा निश्चय पाहिल्यावर सेवकहि निष्ठूर झाले व त्यांनी कृष्णागराला चव्हाट्यावर नेऊन सुवर्णाच्या चौरंगावर बसवले व त्याचे चऱ्हाटाने हातपाय बांधून टाकले.

कृष्णागराला चव्हाट्यावर नेल्याची वार्ता वाऱ्यासारखी गावात पसरली. तेव्हा सगळे गावकरी झुंडीझुंडीने त्याला पाहायला गर्दी करू लागले. काहीजण रदबदली करून राजाचा हुकूम फिरविण्यासाठी राजवाड्यात गेले, पण राजाचा भयंकर क्रोध पाहून कोणालाहि राजाजवळ ती गोष्ट काढण्याचा धीर होईना.

इकडे राजाज्ञाचे पालन करण्यासाठी सेवकांनी कृष्णागराचे हातपाय तोडले आणि ते निघून गेले. त्यामुळे तिथे एकच आकांत झाला. कोणी कोणाला विचारीना. कृष्णागर बेशुद्ध होऊन पडला. त्याचे डोळे पांढरे झाले. जीव कासावीस झाला. घशाला कोरड पडली. तोंडातून फेस निघू लागला. कृष्णागराची ती अवस्था पाहून गावातील

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लोकांना फार दु:ख झाले. म्हातारपणी राजाला चळ लागला, असे म्हणून अनेकांनी शशांगरला दोष दिला.

त्यावेळी सहज गोरक्षनाथ व मच्छिंद्रनाथ तिथे आले होते. गर्दी कशाची हे पाहण्यासाठी ते चव्हाट्यावर आले. तेथे कृष्णागरास अशा विकल अवस्थेत पडलेला पाहून गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून मच्छिंद्रनाथास त्याची दया आली. त्याने लोकांकडून सर्व माहिती काढून घेतली व मग अंतर्दृष्टीने तो पाहू लागला, तेव्हा त्याला सर्व खरा प्रकार कळला. त्यामुळे मच्छिंद्राचा क्रोध अनावर झाला. त्याला वाटले की, राजाने मूर्खपणाने बायकोच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून निर्दोषी मुलाचा घात केला आहे.

नंतर गोरक्षनाथानेहि अंतर्दृष्टीने कृष्णागराचा सर्व वृत्तांत जाणला आणि त्याला नांवारूपास आणून प्रसिद्ध करावे, म्हणून त्याने मच्छिंद्रनाथास सुचविले. त्यांनी कृष्णागरास त्या भयानक अवस्थेत चौरंगावर पाहिल्यामुळे त्याचे नाव 'चौरंगीनाथ' असे ठेवले. राजवाड्यात जाऊन राजाकडून ह्याला मागून घ्यावे आणि नाथपंथाची दीक्षा द्यावी, असे गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला सुचविले, परंतु राजाराणीला आपले सामर्थ्य दाखवून मगच हा कृष्णागर शिवपुत्र घेऊन जाऊ असे मच्छिंद्रनाथाचे म्हणणे पडले, परंतु गोरक्षनाथाला हे मान्य नव्हते. तो म्हणाला, प्रथम चौरंगीला घेऊन जाऊ. त्याला नाथपंथाची दीक्षा देऊ. सर्व विद्यांमध्ये त्याला प्रवीण करू आणि त्याच्याच हातून राजाला सामर्थ्य दाखवू. त्या व्यभिचारी राणीला चामुंडेला अर्पण करू. सध्या तरी युक्तीने राजाचे मन वळवून त्याच्याजवळून त्याला मागून घेऊन जावे.'

गोरक्षनाथाचे हे म्हणणे मच्छिंद्राने मान्य केले आणि ते लगेच राजवाड्यात गेले. त्यांनी द्वारपालांना आपली नावे सांगून आपण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राजाची भेट घेण्यासाठी आलो आहोत असा निरोप पाठविला. राजाला हा निरोप कळताच त्याला फार आनंद झाला. तो लगेच जातीने त्यांच्या स्वागताला गेला.

आल्याबरोबर राजा त्यांच्या पाया पडला. राजाने त्यांची खूप स्तुती केली व त्यांना राजवाड्यात नेऊन सुवर्णाच्या मंचकावर बसविले. नंतर त्याने षोडशोपचारांनी यथाविधि पूजा केली व हात जोडून नम्रपणे त्यांच्यासमोर उभा राहिला आणि काय आज्ञा आहे ती सांगा, अशी विनंती केली. त्यावर मच्छिंद्रनाथाने सांगितले, 'तुम्ही आज एका मुलाचे हातपाय तोडून टाकले आहेत, तो मुलगा आमच्या स्वाधीन करावा, एवढीच आमची इच्छा आहे.'

मच्छिंद्रनाथाच्या या विचित्र मागणीचे राजाला मोठे आश्चर्य वाटले. तो हसून म्हणाला, 'महाराज, त्याला हातपाय नाहीत, मग त्याचा तुम्हाला काय उपयोग होणार? तुम्हाला तो उपयोगी पडण्याऐवजी त्याचीच तुम्हाला सेवा करावी लागेल. सगळीकडे अंगाखांद्यावरून घेऊन फिरावे लागेल.'

ते ऐकून मच्छिंद्रनाथ राजाला म्हणाला, 'तू त्याला आमच्या स्वाधीन करणार आहेस का नाही, तेवढे फक्त सांग. तो आम्हाला उपयोगी पडेल की नाही हे तू पाहू नकोस.'

मच्छिंद्रनाथाने स्पष्टपणे विचारल्यावर राजाने मुलाला घेऊन जाण्याची परवानगी दिली. राजाची परवानगी मिळताच दोघे गुरुशिष्य त्या मुलाला चौरंगासकट आपल्या शिबिरात घेऊन गेले. बऱ्याच जणांच्या मनात अशी शंका आली की, हे जती जर निर्जीवासही सजीव करू शकतात, तर मग असे असताना या मुलाची अवस्था अशीच का ठेवली? निर्जीव पुतळ्यातून गहिनीनाथ निर्माण केला; मग कृष्णागराचे हातपाय पुन्हा निर्माण करणे त्यांना शक्य नव्हते काय? परंतु त्याला त्याच स्थितीत ठेवून त्यांना कार्यभाग

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करून घ्यायचा होता. गोरक्षनाथ व मच्छिंनाथ तेथे एक रात्र राहून पुढे चालू लागले.

पुढे ते हिंडत हिंडत बद्रिकाश्रमात गेले. शिवालयात जाऊन त्यांनी शिवाचे दर्शन घेतले. चौरंगीला तेथेच ठेवून ते दोघे अरण्यात गेले. अरण्यात त्यांना एक गुहा दिसली. त्यांनी चौरंगीला देवळातून आणून त्या गुहेत ठेवले आणि त्याची परीक्षा पाहण्याचे ठरविले.

त्या गुहेच्या तोंडाशीच एक भले मोठे झाड होते. त्या झाडाच्या सावलीत ते तिघेही बसले. तेव्हा चौरंगीला नाथदीक्षा देण्याची मच्छिंद्रनाथाने गोरक्षाला आज्ञा केली.

गुरूची आज्ञा ऐकून गोरक्षनाथ त्यावर म्हणाला, 'चौरंगीनाथाचे तप पाहून मगच मी त्याला अनुग्रह करीन.'

मच्छिंद्रनाथाला शिष्याचे हे म्हणणे लगेच पटले व त्याने चौरंगीला विचारले, 'बाळा, इथे तप करीत बसशील का? तप फार कठीण आहे.

तेव्हा चौरंगी कसलाही विचार न करता म्हणाला, 'तुम्ही ठेवाल तेथे आनंदाने राहीन. सांगाल ते मी करीन,पण एकच विनंती आहे की, तुम्ही कोठेही जा, पण माझे कूर्यदृष्टीने रक्षण करा. एवढे मला दिलेत की माझे कल्याण झाले.'

मच्छिंद्रनाथाने चौरंगीने केलेली विनंती आनंदाने मान्य केली. मग त्याला गुहेत ठेवून तप कसे करायचे ते समजावून सांगितले. मच्छिंद्रनाथ म्हणाला, 'तू येथे बसून दृष्टी एकसारखी या समोरच्या शिळेकडे ठेव. जर नजर दुसरीकडे गेली तर तो दगड अंगावर पडून नाहक मरण पावशील. आणि शरीराचे चूर्ण होईल. त्यामुळे आपल्याला जी कामे करायची आहेत ती जशीच्या तशीच राहून जातील, तेव्हा फार सावधगिरीने राहा व आपले हित यातून साधून घे.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मग त्यांनी त्याला एक मंत्र सांगून त्याचा जप करायला सांगितला. गोरक्षनाथाने त्याला एक फळ खायला दिले व सांगितले, 'ही फळे खाऊन तू गुजराण कर. मंत्र जपून तप कर आणि नजर सतत वर ठेवून जिवाचे रक्षण कर. आम्ही लवकरच तीर्थयात्रा उरकून येथे येऊ.'

याप्रमाणे चौरंगीला सांगून ते दोघे बाहेर पडले. त्यांनी गुहेच्या तोंडाशी एक शिळा ठेवली. मग गोरक्षनाथाने चामुंडेचे स्मरण करताच ती भूतलावर उपस्थित झाली. तेव्हा गोरक्षनाथ तिला म्हणाला, ' या गुहेत एक जीव आहे. त्याच्यासाठी तू नित्य फळे आणून देत जा. म्हणजे तो ती खाऊन पोट भरील, परंतु त्याला हे समजता कामा नये.'

चामुंडेला हे काम सांगून ते गिरनार पर्वतावर आले. चामुंडा आज्ञेप्रमाणे बिनचूक काम करीत असे.

चौरंगीला मात्र दगड अंगावर पडेल याची सतत भीती होती व गोरक्षानेही त्या दगडाबद्दल फार सावध राहाण्यास बजावले होते. एकसारखी नजर वर लावायला सांगितल्याकारणाने त्याला फळ खाण्याचेही भान राहात नसे. तो फक्त हवा खाऊन रहात असे. नजर हलू नये म्हणून अंगसुद्धा हलवीत नसे. त्याचे लक्ष योगसाधनेकडे असल्याने शरीर कृश होऊन केवळ हाडांचा सापळा तेवढा उरला. अशा तऱ्हेने चौरंगीनाथ फार कठोर तपश्चर्या करीत राहिला.

***

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३२ वा

इकडे चौरंगीनाथाला तपश्चर्येला बसवून मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ गिरनार पर्वतावर गेले. तिथे त्यांनी दत्तात्रेयाचे दर्शन घेतले. मच्छिंद्राला पाहताच दत्तात्रेयाला खूप आनंद झाला. मच्छिंद्रनाथाला हृदयाशी कवटाळून दत्त म्हणाले, 'तुला केव्हा भेटेन असे झाले होते.' मुलाच्या भेटीने आईला जसे आनंदाचे भरते येते, तसे मच्छिंद्रनाथाच्या भेटीने दत्तात्रेयास झाले. मग दोघांच्या योग, तीर्थयात्रा इत्यादीसंबंधी प्रेमपूर्वक गप्पागोष्टी झाल्या. सहा महिने एकत्रित राहिल्यानंतर ते तीर्थयात्रेस जाण्याविषयी आज्ञा मागू लागले. मच्छिंद्रनाथ म्हणाला, 'जगातले अज्ञान नाहीसे करण्यासाठी आम्ही अवतार घेतला आहे. त्यामुळे आम्हाला एके ठिकाणी जास्त राहता येत नाही.'

मग दत्तात्रेयाने त्यांना तीर्थयात्रेस जायला आनंदाने परवानगी दिली. प्रेमाने त्यांची बोळवण केल्यावर दत्तात्रेयाला सोडून जायचे म्हणून मच्छिंद्राच्या डोळ्यातून अश्रू वाहात होते. तेथून ते काशीला निघाले; फिरत फिरत प्रयागास गेले. तिथे त्रिविक्रम नावाचा धर्मज्ञानी राजा राज्य करीत होता. त्याची संपत्ती, सैन्य पाहून इंद्रही लाजत होता. तो मोठा ज्ञानी होता, पण पुत्र नसल्यामुळे त्याला कशातच रस वाटत नव्हता. त्याला साधुसंतांबद्दल फार श्रद्धा होती. त्याच्या राज्यात कोणी गरीब दिसत नसे. प्रजा मोठ्या आनंदात दिवस घालवीत होती. त्याची राणीही मोठी पतिव्रता असून त्याच्या मनाप्रमाणे वागत असे, पण संतती नसल्याने तीही खिन्न असे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राजाच्या म्हातारपणामुळे आता पुत्रप्राप्तीची आशा नव्हती म्हणून तिला फार दु:ख होई.

एके दिवशी राजा मरण पावला. तेव्हा राज्यात मोठा आकांत झाला. सगळी प्रजा शोकमग्न झाली. राणी रेवती तर दु:खसागरात बुडून गेली. त्रिविक्रमराजाचे गुण आठवून पुन्हा असा राजा होणार नाही, असे म्हणून लोक विलाप करू लागले. सर्व गावभर दु:ख-रडारड झाली.या संधीत मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ त्या शहरात आले.

मच्छिंद्रनाथाला गावकऱ्यांचे दु:ख पाहून कळवळा आला. त्याच्या मनात आले की, 'धन्य हा राजा, की ज्याच्यासाठी सर्व लोक हळहळत आहेत. अशा या राजाला पुन्हा जिवंत करावे. अशी कल्पना मनात येताच त्याने राजाचे आयुष्य शोधून पाहिले. तेव्हा राजा ब्रह्मस्वरूपी विलीन झाला आहे असे दिसले. त्यामुळे मच्छिंद्राचा काहीच उपाय चालेना, कारण बीज नाही तर वृक्ष कसा निर्माण होणार, असा विचार करून मच्छिंद्रनाथ गावातून परत जाऊ लागला. परंतु गोरक्षनाथाला मच्छिंद्रापेक्षा जास्त वाईट वाटत होते. लोकांना दु:खात ठेवून त्याला परत जाववेना. तरीपण तो तसाच गुरूबरोबर चालत होता.

गावाबाहेर अरण्यात एक शिवालय होते. त्यात ते दोघे जाऊन बसले. त्या देवळाच्या जवळच राजाच्या प्रेताला संस्कार करण्यासाठी नेऊन ठेवले होते. प्रेताबरोबर पुष्कळ मंडळी आली होती. त्यांचे ते दु:ख गोरक्षनाथाला पाहावेना. राजाला जिवंत करावे, अशी त्याने मच्छिंद्राला विनंती केली, पण मच्छिंद्रनाथाने त्याला गप्प बसावयास सांगितले. परंतु गोरक्षाला स्वस्थ बसवेना. तो म्हणाला, 'जर तुम्ही त्याला उठवणार नसाल, तर मी त्याला उठवून सर्वांच्या दु:खाचा परिहार करतो.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथाने त्याला सांगितले, 'राजाला उठविण्याचे सामर्थ्य तुझ्यात नाही.'

मच्छिंद्रनाथाचे हे बोलणे त्याला जणू आव्हानच वाटले. तो आणखीच हट्टाला पेटला. तो म्हणाला, 'मी राजाला उठवून सर्व लोकांना सुखी करीन आणि जर हे माझ्या हातून घडले नाही तर अग्निकाष्ठ भक्षण करून स्वत:चा नाश करून घेईन आणि जर याप्रमाणे मी वागलो नाही तर कोटी वर्षेपर्यंत रौरव नरक भोगीन.'

त्याची ती भयंकर प्रतिज्ञा ऐकून मच्छिंद्रनाथ त्याला म्हणाला, 'वत्सा, तू अविचाराने हा 'पण' केला. कारण राजा ब्रह्मस्वरूपी एकरूप झाला आहे.'

मच्छिंद्रनाथाचे म्हणणे ऐकून गोरक्षनाथाने अंतर्दृष्टीने त्याची खात्री करून घेतली तेव्हा तो फारच निराश झाला.

आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी गोरक्षनाथाने लाकडे गोळा केली. तेव्हा मच्छिंद्रनाथाच्या मनात आले की, आता हा अग्नीत उडी टाकल्याशिवाय राहणार नाही, कारण पूर्वी एकदा त्याने एका ब्राह्मणाच्या पत्नीला वड्यासाठी आपला डोळा काढून दिला होता. त्याने लगेच गोरक्षनाथाला जवळ बोलावले व म्हणाला, 'लोकांच्या कल्याणासाठी तू आपल्या जिवावर उदार झाला आहेस. तेव्हा आता मी तुला एक मार्ग सांगतो, त्याप्रमाणे वाग म्हणजे तुझ्या मनासारखे होईल. राजा जिवंत होईल व लोकांचे दुःख निवारण होईल. आता मी स्वत: राजाच्या देहात प्रवेश करतो. परंतु तू माझे शरीर बारा वर्षे जपून ठेव. बारा वर्षांनंतर मी पुन्हा माझ्या देहात प्रवेश करीन आणि आपल्याकडून होईन तेवढे आपण जगाचे कल्याण करू.'

मच्छिंद्रनाथाची ही युक्ती गोरक्षाला पटली. या गोष्टीस तो तत्काल तयार झाला. मग ठरल्याप्रमाणे लगेच मच्छिंद्रनाथाने आपले शरीर सोडून राजाच्या मृत शरीरात प्रवेश केला आणि राजा लगेच

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्मशानात उठून बसला. ते पाहून लोकांना खूपच आनंद झाला. मग सर्वांनी राजाचा एक सुवर्णाचा पुतळा करून जाळला. स्मशानातील क्रिया उरकून सर्वजण आनंदाने घरोघर परतले.

इकडे शंकराच्या देवळात गोरक्षनाथ मच्छिंद्रनाथाच्या शरीराचे रक्षण कसे करावे या विचारात पडला. तेवढ्यात तिथे गुरवीण आली. तिला गोरक्षाने सर्व खरा वृत्तांत सांगितला. तो म्हणाला, 'बारा वर्षेपर्यंत माझ्या गुरूचे प्रेत मला जपून ठेवले पाहिजे. त्यासाठी मला एखादी गुप्त जागा दाखव आणि ही गोष्ट तू कुणाजवळही बोलू नको. जर यातले काही उघडकीस आले तर मोठा अनर्थ घडेल.'

त्या गुरविणीने गोरक्षनाथाचे म्हणणे मान्य केले. त्या देवळात एक मोठे भुयार होते. तेथे ते प्रेत लपवून ठेवण्यास तिने सांगितले. त्याप्रमाणे ते प्रेत गुहेत ठेवले. ती जागा आणखी कोणालाच माहीत नव्हती. ती गुरवीण गोरक्षनाथाला म्हणाली, 'बारा वर्षे हा देह जपून ठेवायचा असे तुम्ही म्हणता, परंतु इतके दिवस हा देह कसा टिकू शकेल?'

यावर गोरक्षनाथ म्हणाला, 'माझा गुरु मच्छिंद्रनाथ चिरंजीव आहे. त्याचे शरीर नाशरहित आहे, परंतु ही गोष्ट फक्त आपल्या दोघांच्यातच ठेवायची. दुसऱ्या कोणाच्याही कानी जाऊ द्यायची नाही.'

त्रिविक्रमराजा जिवंत होऊन राजवाड्यात गेल्यावर मनात कोणतीही शंका न आणता पूर्वीसारखा सर्व कारभार पाहू लागला. राणीबरोबरही तो पूर्वीप्रमाणेच बोलू लागला. राजाच्या शरीरात प्रवेश केल्यावर मच्छिंद्रनाथ माहीतगाराप्रमाणे सर्व व्यवस्था चालवू लागला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्रिविक्रमराजाच्या स्वरूपात मच्छिंद्रनाथ त्याच शिवाच्या देवळात गेला. गोरक्षनाथाला तेथे पाहून त्याची आस्थेने चौकशी केली. गोरक्षाने त्याला आपली सर्व माहिती सांगितली. तसेच मच्छिंद्रनाथाचे शरीर जिथे ठेवले होते ती जागाही नेऊन दाखवली. मग राजा क्षणभर तेथे बसून आपल्या राजवाड्यात गेला. याप्रमाणे राजा नेहमी शिवालयात जात असे व आपले शरीर ठेवलेली जागा पाहात असे. तो थोडा वेळ शिवाजवळ बसे व मोठ्या आनंदाने गप्पागोष्टी करी. याप्रमाणे तीन महिने लोटले. एके दिवशी गोरक्षनाथाने राजाला सांगितले, 'आता मी तीर्थाटनाला जातो. आपण योगसाधना करून राहावे. त्याचबरोबर मी नसताना आपल्या गा शरीराचे रक्षण करावे.'

गोरक्षनाथाचे म्हणणे मच्छिंद्रनाथाने मान्य केले व गोरक्षनाथाला तीर्थयात्रेला जाण्याची आज्ञा दिली. गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून तो तीर्थयात्रेस निघून गेला.

पुढे सहा महिने उलटल्यावर राणी रेवती गरोदर राहिली. नवमास पूर्ण होताच ती प्रसूत होऊन मदनासारखा पुत्र झाला. बाराव्या दिवशी मुलाचे बारसे केले. त्याला पाळण्यात घालून 'धर्मनाथ' असे त्याचे नाव ठेवले. तो पाच वर्षांचा झाल्यावर एके दिवशी राजा व राणी शंकराच्या देवळात पूजेसाठी गेली. तेथे राणीने मनोभावे पूजा केल्यावर प्रार्थना केली, 'हे शंकरा, हे उमापते, राजा त्रिविक्रम याच्या आधी मला मरण दे. मला अहेवपणी मरण दे. सुवाशीण असताना मरणे हे उत्तम.'

राणीने केलेली ही प्रार्थना ऐकताच गुरविणीला हसू आले. तिला हसलेली पाहून राणीने तिला हसण्याचे कारण विचारले. तेव्हा ती म्हणाली, आपण सहज हसलो. पण त्यामुळे राणीचे समाधान झाले नाही. राणी तिला म्हणाली, तू संशय सोडून सर्व सांग. त्यावर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गुरविणीने सांगितले की, 'जर बोलले तर कदाचित त्यामुळे अनर्थ होईल. म्हणून मला भीति वाटते. आम्ही दुर्बळ व तुम्ही सत्ताधीश. मी जे सांगेन ती हकीकत ऐकून तुम्हाला राग आल्यास माझ्याच जिवावर बेतायचे!'

तिचे ते गूढ बोलणे ऐकून राणी म्हणाली, 'माझ्यापासून व राजापासून तुला कोणत्याही प्रकारचा धोका होणार नाही. पाहिजे तर मी तुला तसे वचन देते. तू निःशंक मनाने मला सर्व सांग.'

राणीने एवढे विश्वासात घेतल्यावर त्या गुरविणीने एकांतस्थानी जाऊन आरंभापासून शेवटपर्यंत संपूर्ण हकीकत राणीला सांगितली आणि शेवटी ती म्हणाली, 'त्रिविक्रमराजा मरण पावला आहे. त्याच्या देहात मच्छिंद्रनाथाने प्रवेश केला आहे. मच्छिंद्राचा देह गुहेत ठेवला आहे आणि तुम्ही विधवा असता स्वतःला सुवाशीण म्हणवता म्हणून मला हसू आवरले नाही.'

मच्छिंद्रनाथाचा गुहेत असलेला देह गुरविणीने राणीला दाखविला. त्यामुळे राणी उदास झाली आणि राजवाड्यात निघून गेली. तिथे नानाप्रकारचे विचार तिच्या मनात येऊ लागले. दुर्दैवाने पतिव्रता धर्मास आता मी अंतरलेच. नशिबात होते तसे घडून आले. परंतु बारा वर्षांनी पुन्हा येणारे संकट टाळण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. कारण मच्छिंद्राला परकाया-प्रवेश ही विद्या पूर्णपणे माहीत आहे. तो भुयारात ठेवलेल्या आपल्या शरीरात प्रवेश करणार, पण त्यावेळी आपला मुलगा लहान असणार व मीही निराश्रित होऊन उघड्यावर एकटी पडणार. तेव्हा आता मच्छिंद्रनाथाचा देह नाहीसा करून टाकावा हाच चांगला मार्ग आहे. देहच नसेल तर मच्छिंद्रनाथ जाणार कोठे? बीज नाहीसे केले म्हणजे वृक्ष उत्पन्न होणार नाही. हा विचार करून राणी कोणालाही न सांगता एका दासीला बरोबर घेऊन मध्यरात्री भुयारात गेली. दोन नोकरही बरोबर घेतले

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होते. त्यांच्याकडून भुयाराचा दरवाजा उघडून शस्त्राने मच्छिंद्रनाथाच्या देहाचे रतीएवढे तुकडे करून बाहेर टाकून दिले व गुहेचे दार पूर्वीप्रमाणे व्यवस्थित बंद करून ती राजवाड्यात मोठ्या समाधानाने परत गेली.

ही गडबड ऐकून पार्वती जागी झाली. ती शंकराला म्हणाली, 'रेवती राणीने मच्छिंद्रनाथाच्या देहाचे तुकडे तुकडे केले.' ते ऐकून शंकर खडबडून उठला. त्याला आपला प्राणच गेला असे वाटले, मग त्याने यक्षिणीला बोलावून मच्छिंद्रनाथाच्या देहाचे तुकडे एकत्र करून कैलासास पाठवून देण्याबद्दल पार्वतीला सांगितले. पार्वतीने बोलावताच अनेक चामुंडा तेथे येऊन हजर झाल्या. पार्वतीने त्यांना मच्छिंद्राच्या शरीराचे तुकडे वेचून, जपून ठेवण्याची व वीरभद्राच्या स्वाधीन करण्याची आज्ञा केली.

पार्वतीच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी सर्व तुकडे वेचून कैलासास नेले आणि तिथे वीरभद्राच्या स्वाधीन करून त्याला सर्व सविस्तर वृत्तांत सांगितला. शेवटी त्या वीरभद्राला म्हणाल्या, 'आमचा व तुमचा शत्रु मच्छिंद्रनाथ एकाएकी मरण पावला आहे. त्याने आम्हाला नग्न करून आमची फटफजिती केली होती. तसेच अष्टभैरवांचीही विटंबना केली होती. तुमचीही तीच दशा केली होती. मारुतीच्या बाबतीतही तेच घडले होते. सर्व देवांना भारी असा हा प्रबळ शत्रु अनायासे मरून आपल्या तावडीत सापडला आहे. तेव्हा त्याचे शरीर नीट जपून ठेवावे. त्याचा शिष्य गोरक्षनाथ हाही मोठा प्रतापी आहे. तो हे शरीर जिंकून नेण्यासाठी निश्चितच येईल तेव्हा फार सावध राहावे.'

ते म्हणणे वीरभद्राला पटले व त्याने चौऱ्यांशी कोटि बहात्तर लक्ष शिवगण रक्षणासाठी बसवले. कोटि यक्षिणी, चामुंडा, डंखिणी व शंखिणी यांचा खडा कडक पहारा ठेवला.

त्रिविक्रमराजा नित्य शंकराच्या देवळात गेल्यावर भुयाराकडे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जाऊन पाही, पण गुहेचे दार जसेच्या तसेच दिसत असे; त्यामुळे राणीने केलेला प्रकार त्याला समजला नाही. त्याची बारा वर्षांची मुदत भरली. गोरक्षनाथ तीर्थयात्रेला गेला होता, तोही मुदत संपल्यावर सावध झाला.

❋ ❋ ❋

अध्याय ३३ वा

मच्छिंद्रनाथाचा निरोप घेऊन गोरक्षनाथ फिरत फिरत गोदावरीच्या काठी भामनगर नावाच्या गावातील अरण्यात आला. त्याला खूप भूक लागली होती, पण तिथे एक योजनाच्या परिसरात पाणीसुद्धा मिळेना. मग तो तसाच फिरत राहिला. तेव्हा त्याला माणिक नावाचा दहा वर्षांचा शेतकऱ्याचा मुलगा शेतात काम करताना दिसला. ऐन माध्यान्ही तो जेवायला बसणार इतक्यात गोरक्षनाथाने तेथे जाऊन 'आदेश' केला. ते ऐकून माणिक लगेच तसेच जेवण टाकून उठला व गोरक्षनाथाच्या पाया पडला. मग त्याने गोरक्षनाथास तुम्ही कोण, कोठे जाता, येथे कसे आलात इत्यादी सर्व माहिती विचारली. तेव्हा गोरक्षनाथाने सांगितले, 'मी जती आहे. मला आता तहान व भूकही फार लागली आहे. तेव्हा जर काही जेवण्याखाण्याची सोय झाली तर पाहा.'

हे ऐकताच माणिक म्हणाला, 'महाराज, भोजन तयार आहे,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जेवायला बसावे.'

असे म्हणून माणिकाने त्याला जेवायला घालून तृप्त केले व त्याची चांगली व्यवस्था ठेवली. त्यामुळे गोरक्षनाथाचेही समाधान झाले.

गोरक्षनाथाने प्रसन्न होऊन माणिक शेतकऱ्यास कोणता वर पाहिजे असे विचारले; तेव्हा तो म्हणाला, 'आता तुमचे काम झाले ना? मग आता माझे नाव वगैरे विचारून काय फायदा? काम करून घेण्यासाठी आधी सर्व विचारपूस करायची असते, पण आता हे विचारण्यात काय अर्थ?'

यावर गोरक्षनाथ म्हणाला, 'तुझे म्हणणे बरोबर आहे, पण आज तू मला जेवायला घालून तृप्त केलेस, त्यामुळे मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तेव्हा तुझ्या मनात कसली इच्छा असेल तर मला सांग, मी पूर्ण करतो.'

माणिक म्हणाला, 'महाराज, तुम्ही घरोघर अन्नासाठी भिक्षा मागता आणि तुम्हाला माझी इच्छा समजली तरी तुमच्याजवळ मला द्यायला काय आहे?'

माणिकचा हा प्रश्न ऐकून गोरक्षनाथाने त्याला सांगितले, 'तुझी इच्छा मी पूर्ण करीन.'

याप्रमाणे त्या शेतकऱ्याचे बोलणे ऐकून गोरक्षनाथ मनात म्हणाला, 'हे शेतकरी लोक अरण्यात राहात असल्यामुळे अडाणी असतात. तेव्हा आपण ह्यांचे काहीतरी हित केले पाहिजे,' असा विचार करून गोरक्षनाथ त्याला म्हणाला, 'अरे, मी मागेन ती वस्तू देऊ करतोस, पण मागितल्यावर मात्र मागे हटू नकोस.'

हे माणिकला आव्हानच मिळाले. तो म्हणाला, 'अरे, जो प्राणही देण्यास तयार आहे, तो पाहिजे ते देण्यास मागेपुढे पाहील काय? तुला वाटेल ते तू माग. मी ते तुला देतो की नाही हे पाहा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गोरक्षनाथाने त्याची परीक्षा घ्यायची ठरवले. तो म्हणाला, 'जे जे तुला आवडते, त्याचा तूत्याग कर. जे मनातून करावेसे वाटते, ते तू करू नकोस. एवढीच माझी मागणी आहे.'

गोरक्षनाथाची ही मागणी त्या शेतकऱ्याने आनंदाने मान्य केली आणि गोरक्षनाथ ते विपिन सोडून पुढे निघून गेला.

थोड्या वेळाने माणिक सामानाचे ओझे डोक्यावर घेऊन शेतातून घरी निघाला, तेव्हा त्याला प्रथम जेवणाची इच्छा झाली. पण इतक्यात गोरक्षनाथाला दिलेल्या वचनाची त्याला आठवण झाली. मग त्याच्या मनात घरी जायचे आले, पण वचनात अडकल्यामुळे घरी जाता येत नाही, म्हणून त्याने तिथेच उभे राहून झोप घेतली. डोक्यावर ओझे तसेच होते. मग अंग हलवावयाची त्याला इच्छा झाली, पण त्याने हलविले नाही. त्याचा परिणाम असा झाला की, उडून आलेली झाडाची पाने खाण्यावाचून त्याला दुसरा मार्गच राहिला नाही. पण तेही खाता येईना. केवळ वायू भक्षण करून तो राहिला. त्यामुळे काही दिवसातच त्याचे शरीर कृश झाले. रक्त आटून गेले. अंगावर तीळभर मास राहिले नाही. त्वचा व अस्थि एक होऊन गेल्या; पण अशी बिकट अवस्था झाली तरी तो एका जागी स्वस्थ उभा राहिला.

इकडे गोरक्षनाथ फिरत फिरत बद्रिकेदारचे दर्शन घेऊन, चौरंगीनाथाची काय अवस्था झाली आहे हे पहायला गेला. त्याने गुहेच्या दाराची शिळा काढून आत पाहिले तर तो थक्कच झाला चौरंगीनाथाच्या अंगावर वारूळ वाढलेले होते आणि तोंडाने रामनामाचा जप चालवला होता. अशी त्याची अवस्था पाहून गोरक्षनाथ हळहळला. त्याने लगेच त्याच्या शरीरावरचे वारूळ काढून टाकले आणि पाहिले. तेव्हा तपसामर्थ्याने त्याला हातपाय फुटलेले दिसले. मग 'मी गोरक्षनाथ आलो आहे,' असे म्हणून त्याने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चौरंगीला सावध केले व त्याला बाहेर आणले. तो अगदी अशक्त झाला होता, पण गोरक्षनाथाने त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहताच त्याला चांगली शक्ती आली. मग चौरंगीनाथ गोरक्षनाथाच्या पाया पडला व मी आज सनाथ झालो असे त्याने म्हटले.

थोड्या गप्पा होऊन मग गोरक्षनाथाने खाण्यापिण्याच्या व्यवस्थेबद्दल चामुंडेकडे चौकशी केली. ती म्हणाली, 'आम्ही रोज तुमच्या आज्ञेप्रमाणे फळे आणून देत होतो, परंतु चौरंगीचे लक्ष वर सूर्याकडे असल्यामुळे त्याने ती कधीच खाल्ली नाहीत.'

असे सांगून चामुंडेने फळांचे पर्वतासारखे झालेले ढीग दाखवले. ते पाहून गोरक्षनाथाला धन्यता वाटली. त्याने चौरंगीच्या तपश्चर्येची मनापासून फारच वाखाणणी केली. मोठ्या आनंदाने आपला वरदहस्त त्याच्या मस्तकी ठेवला. मग तो त्याला घेऊन बद्रिकेदारला गेला. तिथे शिवाची व चौरंगीची भेट घडविली. नंतर गोरक्षनाथ तेथे सहा महिने राहिला व त्याने चौरंगीनाथाकडून सर्व शस्त्रे, अस्त्रे यांचा विद्याभ्यास करून घेतला. त्याला त्यात निपुण बनविले, अस्त्रविद्येतही त्याला आशीर्वाद देवविले.

मग बद्रिकेदाराचे दर्शन घेऊन गोरक्षनाथ चौरंगीनाथासह पुन्हा तीर्थयात्रेला निघाला. तो विदर्भ देशात उतरून कौंडण्यपुराला गेला. तिथे त्याने चौरंगीनाथाला आपल्या आई-वडिलांना भेटून येण्यास सांगितले. तो म्हणाला, 'त्यांनी तुला शिक्षा म्हणून तुझे हातपाय तोडले. आता तू त्यांना आपला प्रताप दाखव.'

गोरक्षनाथाच्या आज्ञेप्रमाणे चौरंगीनाथाने वातास्त्र मंत्रून ते शशांगर राजाच्या बागेत फुंकून टाकले. त्यामुळे बागेत काम करणारे सोळाशे माळी ते सर्व वादळामुळे आकाशात उडून गेले. मग वातास्त्र काढून टाकताच ते सर्वजण खाली कोसळले. बऱ्याच जणांना मूर्च्छा आली. काहीजण पळून गेले. काहीजण राजाकडे गेले आणि त्यांनी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

बागेतला प्रकार त्याला सांगितला. ते ऐकून सगळ्यांनाच फार आश्चर्य वाटले.

मग हे काम कोणाचे आहे हे पाहण्यासाठी राजाने दूत पाठवले. ते दूत राजाच्या आज्ञेप्रमाणे शोध घेत त्यांनी पाणवठ्यावर या दोन नाथांना पाहिले व ते राजाला जाऊन म्हणाले, 'महाराज, पाणवठ्याजवळ दोन तेजस्वी कानफाटे गोसावी बसलेले आम्ही पाहिले. ते खूप विद्यावंत असावेत असे वाटते.'

दूतांनी सांगितलेली हकीकत ऐकून राजाच्या मनात आले की, हे दोघे म्हणजे गोरक्षनाथ व मच्छिंद्रनाथ असतील. त्यांना आपण शरण गेले पाहिजे, नाहीं तर गाव पालथा घालतील आणि सर्वांचे प्राण घेतील. असा विचार मनात येताच राजा आपल्या लवाजम्यासह त्या दोघांच्या भेटीला गेला. राजा येत आहे हे पाहताच गोरक्षनाथाने चौरंगीनाथाला आपला प्रताप दाखवण्याची आज्ञा केली.

मग चौरंगीनाथाने पुन्हा वातास्त्राची योजना केली. त्यामुळे राजाबरोबर आलेले हत्ती, घोडे रथासकट सर्व सैन्य आकाशात उडून गेले. असला भयंकर प्रकार पाहून सर्वजण घाबरले व त्याची प्रर्थना करू लागले. तेव्हा चौरंगीनाथाने गोरक्षाच्या आज्ञेनुसार वातास्त्र काढून घेतले. तेव्हा सर्वजण हळूहळू खाली आले.

मग चौरंगी आपल्या पित्याच्या म्हणजे शशांगर राजाच्या पाया पडला व त्याचा पुत्र असल्याची ओळख दिली. मुलाची ओळख पटताच राजाला गहिवरून आले व त्याने त्याला पोटाशी धरले. नंतर राजा गोरक्षनाथाच्या पाया पडला. मग त्या दोघांचे चौरंगीच्या विद्येबद्दल बोलणे झाले.

थोड्या वेळाने राजाने गोरक्षनाथाला घरी चलण्याबद्दल खूप आग्रह केला. तेव्हा चौरंगी राजाला म्हणाला, 'काहीही झाले तरी आम्ही तुमच्या घरी येणार नाही, कारण सावत्र आईच्या दुष्ट

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आपण्यावर विश्वास ठेवून तुम्ही माझे हातपाय तोडलेत.' मग चौरंगीनाथाने पहिल्यापासूनचा खरा वृत्तांत राजाला सांगितला. तो ऐकून राजा खूप रागावला. त्याने राणीला झोडपीत आणण्याची सेवकांना आज्ञा केली, परंतु चोरंगीने सांगितले, 'तुम्ही तिला घरीच शिक्षा करावी हे चांगले.'

मग राजाने त्या दोघांना पालखीत घालून मोठ्या थाटामाटाने आपल्या राजवाड्यात आणले. तेथे आल्यावर पादत्राणांनी राजाने राणीला शिक्षा केली आणि तिला बाहेर हाकलून दिले. गोरक्षनाथाने राजाची समजूत काढली व त्याला दुसरी बायको करण्याचा उपदेश केला. आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवून त्याला वीर्यवान करून त्याचा वंश वाढेल असा आशीर्वाद दिला. यानंतर गोरक्षनाथ तेथे एक महिना राहिला. नंतर चौरंगीनाथास घेऊन पुढे निघून गेला.

कौंडण्यपुरातून निघाल्यावर ते दोघे फिरत फिरत प्रयागला गेले. तेथे स्नान करून शंकराच्या देवळात गेले. शिवाचें दर्शन घेतले. मग पूर्वीच्या गुरविणीस बोलावून गोरक्षनाथाने तिला गुरूच्या देहाबद्दल विचारले. तेव्हा ती घाबरून थरथरा कापू लागली. बोलताना अडखळू लागली. धड काही बोलेना. शेवटी ती गोरक्षनाथाच्या पाया पडली आणि शरण जाऊन त्याला म्हणाली, 'महाराज, क्षमा असावी. रेवती राणीने मला मोह घालून विचारले म्हणून मी तिला खरी गोष्ट सांगितली. अन्य कोणालाही मी ही गोष्ट सांगितली नाही. तुम्ही गुरूच्या देहाचीं काय अवस्था झाली आहे ती प्रत्यक्ष जाऊन पाहावी.'

असे जेव्हा ती म्हणाली तेव्हा गोरक्षनाथ घाबरून लगेच भुयाराकडे गेला. दार उघडून पहातो तो गुरूचे प्रेत तेथे नव्हतेच. ते पाहून त्याचा शोक अनावर झाला. त्याचा तो शोक पाहून गुरवीण त्याला म्हणाली, 'तुम्ही शोक करू नका. मी राणीला भेटून तिने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रेताचे काय केले ते विचारून घेते, तुम्ही काळजी करू नका.'

असे म्हणून ती लगेच राजवाड्यात गेली व राणीला भेटून म्हणाली, 'बाईसाहेब, मच्छिंद्रनाथाच्या शरीराबद्दल बारा वर्षांची मुदत मी तुम्हाला सांगितली होती, ती आता पुरी झाली आहे. म्हणून मला आज त्याची आठवण झाली. आणि म्हणूनच मी आपल्याकडे आले आहे.'

हे ऐकून राणीने तिला एकांतात नेले आणि म्हटले, मच्छिंद्रनाथाच्या देहाची हकीकत तू मला सांगितल्यावर तुला न समजता मी त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले आणि ते रानात टाकून दिले. त्यालाही आता खूप दिवस होऊन गेले. तेव्हा ते तुकडे किड्यामुंग्यांनी खाऊनही टाकले असतील. अशा तऱ्हेने मी काळजीचे बीजच नष्ट केले आहे. तू निर्धास्त राहा.'

राणीचे बोलणे ऐकून त्या गुरविणीला चिंता वाटली. काय घडायचे असेल ते घडेल, म्हणून तिने सर्व वृत्तांत गोरक्षनाथाला येऊन सांगितला. तो ऐकून गोरक्षनाथास फार राग आला, त्याने राणीला शिक्षा करण्याचे ठरविले, परंतु लगेच त्याच्या मनांत आले की, 'कसेही झाले तरी आता ती मच्छिंद्रनाथाची पत्नी आहे. म्हणजे आपली माता आहे; तेव्हा तिला शिक्षा करता येणार नाही.'

' गुरूच्या शरीराचे तुकडे झाले असले तरी त्यांचा पूर्ण नाश होणार नाही. कोठे तरी ते तुकडे पडलेले असतील. ते शोधावे लागतील.' असा विचार करून गोरक्षनाथ चौरंगीला म्हणाला, 'मच्छिंद्रनाथाच्या कलेवराचा शोध करण्यासाठी मी माझा देह येथे ठेवून, सूक्ष्मरूप धारण करून जातो; पण मी नसताना माझ्या शरीराचे तू नीट संरक्षण कर. कारण राणी रेवती मच्छिंद्रनाथाच्या देहाचा जसा नाश केला तसा माझ्याही देहाचा नाश करण्यास मागेपुढे पाहणार नाही. तेव्हा नीट सावधगिरीने वाग.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असे म्हणून मग गोरक्षनाथाने सूक्ष्म रूप धारण केले व सर्व गावे, अरण्ये, पृथ्वी, पाताळ सर्व ठिकाणे धुंडाळली; पण शरीराचा पत्ता लागेला. शेवटी तो शोध करीत कैलासाला गेला. तिथे त्याला गुरूच्या अस्थि, त्वचा, मांस वगैरे दिसले.

तिथला वीरभद्र शिवगणांना सांगत होता, 'बारा वर्षांची मुदत संपली आहे. आता मच्छिंद्रनाथाचे शरीर लक्षपूर्वक सांभाळा. त्याचा शिष्य गोरक्षनाथ गुरूचा शोध करण्यासाठी कोणत्या रूपात येईल हे सांगता येत नाही.'

वीरभद्राचे हे शब्द गोरक्षाच्या कानी पडले. तो तिथून निघून पुन्हा आपल्या शरीरात शिरला. मग गोरक्षनाथाने व चौरंगीनाथाने भस्म व झोळी घेऊन युद्धाची तयारी केली. गोरक्षाने प्रथम सूर्यावर पर्वतास्त्र सोडले. त्याबरोबर सूर्याचा रथ अडला ते पाहून सूर्याने पर्वतास्त्राचा नाश करण्यासाठी वज्रास्त्र सोडले आणि अडथळा करण्यासारखे पर्वतास्त्र सोडणारा कोण हे पाहिले, तेव्हा त्याला हे गोरक्षनाथाचे काम आहे, असे दिसून आले.

मग सूर्य आपल्या रथासह गोरक्षाजवळ आला. सूर्याचा ताप लागू नये म्हणून गोरक्षाने चंद्रास्त्राची योजना करून कोटी चंद्र निर्माण केले. त्यामुळे सूर्याचा दाह लागेनासा झाला. नंतर गोरक्ष व चौरंगी दोघेही सूर्याच्या पाया पडले. मला अडथळा आणण्याचे कारण काय म्हणून सूर्याने विचारल्यावर गोरक्षनाथाने सांगितले की, मच्छिंद्रनाथाचा देह शिवगणांनी कैलासाला नेला आहे. ते उपदेशाच्या गोष्टी ऐकायला तयार नाहीत. तेव्हा आपण मध्यस्थी करून तो आमच्या स्वाधीन होईल असे काहीतरी करावे. एवढे केले तर आमच्यावर मोठे उपकार होतील.'

गोरक्षनाथाचे म्हणणे सूर्याने मान्य केले आणि तो कैलासाला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गेला. त्याला पाहताच शिवगण त्याच्या पाया पडले आणि त्यांनी त्याला येण्याचे कारण विचारले, तेव्हा सूर्य म्हणाला, 'मच्छिंद्रनाथाच्या देहासाठी मी येथे गोरक्षनाथाकडून मध्यस्थी करायला आलो आहे. तुम्ही उगाच हट्टीपणा करू नका व मच्छिंद्रनाथाचे शरीर परत द्या.'

असे म्हणून सूर्याने त्यांना पुष्कळ बोध केला व गोरक्षाच्या सामर्थ्यांचीही प्रशंसा केली, परंतु सूर्याच्या उपदेशाचा वीरभद्रावर काहीच परिणाम झाला नाही. उलट तो सूर्याला म्हणाला, 'मच्छिंद्रनाथाने पूर्वी आम्हाला फार दुःख दिले आहे, प्राणही धोक्यात घातले होते. असे असताना असा भयंकर शत्रू अनायासे आमच्या तावडीत आलेला आहे. आता प्राण गेला तरी आम्ही त्याला पृथ्वीवर पाठविणार नाही. जर गोरक्षनाथ आमच्या विरुद्ध युद्धास उभा राहिला तर त्यालाही मच्छिंद्रनाथासारखेच करून टाकू.'

अशा तऱ्हेचे वीरभद्राचे शौर्याचे बोलणे ऐकून सूर्य म्हणाला, 'एवढा पराक्रम तुमच्यात होता तर मच्छिंद्रनाथाने पूर्वी तुमची दुर्दशा केली त्यावेळी तो कोठे पळून गेला होता? आता तो सहज योगायोगाने तुमच्या हाती आला आहे म्हणून प्रौढी मिरवता आहात, पण मच्छिंद्र व गोरक्ष हे दोघेही सारखेच शूर आहेत हे लक्षात ठेवा! शिवाय त्यावेळेस मच्छिंद्रनाथ एकटाच होता, पण आता गोरक्षाच्या जोडीला चौरंगीही आहे. ते दोघेही शूर आहेत, तेव्हा तुमच्या या अविचाराचा परिणाम चांगला होणार नाही.'

पण सूर्याचे सर्व प्रयत्न फुट गेले. वीरभद्र वगैरेंनी स्पष्टपणे सांगितले की, मच्छिंद्राचा देह परत देणार नाही. मग सूर्याने त्याला सुचवले, 'तुम्ही आता इतकेच करा की, हे युद्ध स्वर्गात न होता पृथ्वीवर होऊ द्या. कारण कैलासाला झाले तर कैलासाचे पीठ होईल

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आणि शिव तुम्हावर कोपेल.'

वीरभद्राच्या आज्ञेप्रमाणे अष्टभैरव, गण वगैरे सर्वजण विमाने घेऊन युद्धाला उभे ठाकले. बहात्तर कोटी चौऱ्याएशी लक्ष गण, तेहतीस कोटी देवांसह - शस्त्रास्त्रांसह युद्धाला आलेले पाहून गोरक्षनाथाने चौरंगीनाथाला सावध राहायला सांगितले. काही क्षणांतच युद्ध सुरू झाले. निरनिराळ्या अस्त्रांचे प्रयोग झाले. शेवटी चौरंगीच्या मोहिनी व वातास्त्राचा उपयोग झाला. त्यामुळे वीरभद्राच्या बाजूचे सैन्य देहभान विसरून पिसाटासारखे झाले. भ्रमिष्टासारखे होऊन ते देहभान विसरले. वीरभद्र ऐन वेळी चामुंडांसह तेथे येऊन दाखल झाला. आपल्या गणांची स्थिती पाहून वीरभद्र गोरक्षनाथावर विलक्षण संतापला. मग दोघेहि एकमेकांच्या नाशाला उद्युक्त होऊन शस्त्रास्त्रांचा एकसारखा मारा करू लागले. परंतु गोरक्षाच्या व चौरंगीच्या विलक्षण सामर्थ्यापुढे वीरभद्राची अनेक शस्त्रे व अस्त्रे निष्प्रभ ठरू लागली. शेवटी गोरक्षनाथाने संजीवनी मंत्र जपून सर्व दानवांना उठविले. त्यात त्रिपुर, मृदुमान्य महिषासुर, जालंधर, कालयवन, अघासुर, बकासुर, हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपु, मुचद, कुंवक्रदंत, रावण, इंद्रजित, कुंभकर्ण वगैरे राक्षस होते. ते पाहून सर्व देवांनी रणांगणातून पळ काढला. त्यांना मोठी काळजी लागली. त्यांनी वैकुंठाला जाऊन हा सर्व प्रकार विष्णूच्या कानावर घातला.

ते सर्व वृत्त ऐकल्यावर आपल्याला पुन्हा अवतार घ्यावा लागणार असे त्याला वाटू लागले. मग विष्णूने विचार करून शंकराला बोलावले व त्याला ही सर्व हकीकत सांगितली आणि एका वीरभद्राच्या द्वेषामुळे गोष्टी या थराला आल्या, असे सांगितले.

मग ते दोघे विघ्न निवारण्यासाठी गोरक्षनाथाकडे गेले व त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हरतऱ्हेने सांगितले. त्यावर गोरक्षनाथ म्हणाला, 'गुरूचे शरीर आणून द्या, म्हणजे मी लगेच युद्ध थांबवितो.'

मग शंकराने चामुंडेला पाठवून मच्छिंद्रनाथाचा देह आणविला व तो गोरक्षाच्या हवाली केली. मग राक्षसांना शांत करावयास सांगितले. तेव्हा गोरक्षनाथ म्हणाला, 'हे राक्षस अस्त्राच्या सहाय्याने उत्पन्न झालेले नाहीत, तर हे संजीवनी मंत्रप्रयोगामुळे निर्माण झालेले आहेत; तेव्हा पुन्हा अवतार घेऊन त्यांना मारून टाका; नाहीतर वीरभद्राची आशा सोडून द्या.

हे ऐकून शंकराने त्याला सांगितले, 'जेव्हा मधुदैत्य माजला होता तेव्हा आम्ही त्याला घाबरून रानोमाळ पळत होतो. शेवटी एकादशीने अवतार घेऊन त्याचा नाश केला. अशा तऱ्हेची संकटे पुष्कळ वेळा सहन करावी लागली, तेव्हा आता वेळ न गमावता लवकर राक्षसांचा पहिला बंदोबस्त कर. आम्ही वीरभद्राची आशा सोडून दिली आहे.'

असे शिव व विष्णु दोघेही बोलत होते. तेव्हा महाप्रतापी वीरभद्र एकटाच त्या राक्षसांशी लढत होता. ते पाहून मग गोरक्षनाथाने वाताकर्षण अस्त्र मंत्रून भस्म फेकताच वीरभद्रासह सर्व राक्षस गतप्राण होऊन जमिनीवर कोसळले.

तेव्हा शंकर व विष्णू दोघांनी गोरक्षनाथाच्या सामर्थ्याची खूपच स्तुती केली. मग गोरक्षनाथाने अग्न्यस्त्र योजून कोसळून पडलेल्या सर्वांना जाळून टाकले. हा वाताकर्षण प्रयोग नाथपंथियांशिवाय देवदानवांनाही माहीत नव्हता.

✱✱✱

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३४ वा

ह्या भयंकर युद्धात वीरभद्र मेला म्हणून शंकर शोक करू लागला. शिवाचे दु:ख पाहून गोरक्षनाथाला त्याचा कळवळा आला. त्याने विचार केला की, जेव्हा गुरूने मला बद्रिकाश्रमात तपश्चर्येला बसवले, तेव्हा शंकराने माझ्यासाठी पुष्कळ श्रम घेतले होते. आईसारखा त्यांनी माझा सांभाळ केला. त्यामुळे त्यांचा हा उपकार मला स्मरला पाहिजे. असे म्हणून गोरक्षनाथ लगेच शंकराच्या पाया पडला आणि म्हणाला, 'वीरभद्राच्या वियोगाने तुम्हाला दु:ख झाले आहे. तुम्ही जर मला त्याच्या अस्थि आणून द्याल तर मी त्याला उठवीन. संजीवनी मंत्राच्या सहाय्याने मी त्याला रणांगणातच सजीव केले असते, पण सर्व राक्षसांमध्ये त्याच्या अस्थि मिसळल्या असल्यामुळे त्याच्याबरोबर राक्षसही उठले असते.'

गोरक्षनाथाने असे म्हटल्यावर शिवाने सांगितले मी वीरभद्राच्या अस्थी ओळखून आणतो. असे सांगून ते वीरभद्राची हाडे आणण्यासाठी रणांगणावर गेले. जी हाडे शिवनामाचे स्मरण करतील ती वीरभद्राची हाडे असे ओळखून गोरक्षनाथाजवळ आणली. गोरक्षनाथाने संजीवनी मंत्र जपून वीरभद्रावर भस्म टाकताच तो जिवंत झाला आणि धनुष्यबाणाची चौकशी करू लागला; तो म्हणाला, 'आता सर्व राक्षसांचा संहार करून शेवटी त्या गोरक्षनाथासही यमसदनाला पाठवितो.'

मग शंकराने त्याला संपूर्ण हकीकत सांगितली आणि त्याचा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आणि गोरक्षनाथाचा स्नेह करून दिला. तेवढ्यात वायुचक्रात भ्रमत असलेले बहात्तर कोटी चौऱ्याएशी लक्ष शिवगण तेथे आले व गोरक्षनाथाच्या पाया पडून कैलासास परत गेले. मग गोरक्षनाथही मच्छिंद्रनाथाचा देह घेऊन शिवालयात आला.

इकडे त्रिविक्रम राजा राज्यवैभवात रमला होता. तो अकस्मात शंकराच्या दर्शनासाठी देवळात गेला. तिथे गोरक्षनाथ मच्छिंद्रनाथाच्या शरीराचे तुकडे जुळवत बसलेला त्याला दिसला. राजाने त्याला प्रेमाने मिठी मारली. मग सर्व विचारपूस केल्यावर गोरक्षनाथाने त्याला घडलेला सर्व वृत्तांत सविस्तरपणे सांगितला. ते ऐकून राजाला हळहळ वाटली. त्याने गोरक्षनाथाला सांगितले की, 'तू काही दिवस धैर्य धर. मी धर्मनाथाला राज्यावर बसवून लगबगीने परत येतो.'

असे आश्वासन देऊन तो राजवाड्यात परत गेला. राजाने लगेच प्रधानाचा विचार घेऊन देशोदेशीचे राजे बोलावून एका सुमुहूर्तावर धर्मनाथाला राज्यभिषेक केला. त्या समारंभाच्या वेळी याचकांना भरपूर धन दिले. राजांना अलंकार दिले, बंदी सोडले. अशा प्रकारे राजाराणीने अनेकांना संतुष्ट केले. पुढे एका महिन्यानंतर एके दिवशी त्रिविक्रमराजाच्या शरीरातून निघून मच्छिंद्रनाथाने शिवालयात ठेवलेल्या आपल्या देहात प्रवेश केला.

इकडे राजवाड्यात राजाला उठायला नेहमीपेक्षा उशीर झाल्यामुळे रेवती राणी महालात गेली व राजाला हलवून उठवू लागली, तो राजाचे प्राण गेल्याचे दिसले, तेव्हा तिने मोठा आकांत गेला. तो ऐकून धर्मनाथ, प्रधान वगैरे सर्व मंडळीही तेथे जमली. राजाच्या मृत्यूच्या बातमीने संपूर्ण प्रजा दुःखी झाली.

त्रिविक्रम राजा मरण पावल्याची बातमी शिवालयात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गोरक्षनाथला समजली. मग त्याने अस्थि, मांस वगैरे जमवून संजीवनी मंत्र जपून त्यावर भस्म फेकताच मच्छिंद्रनाथाने आपल्या देहात प्रवेश केला व तो उठून बसला.

इकडे राजाचे प्रेत स्मशानात नेऊन तेथे सर्व संस्कार करून नगरवासी आपापल्या घरी गेले. धर्मनाथाला वडिलांच्या वियोगाचे फारच दुःख झाले होते. त्याने अन्नपाणी वर्ज्य केले. त्याला जीव नकोसा झाला. ते पाहून रेवतीने त्याला एकांतात नेऊन सांगितले, 'बाळा, तू व्यर्थ का शोक करतोस? तुझा पिता मच्छिंद्रनाथच आहे. तो चिरंजीव आहे. तू आताच देवळात जाऊन त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून ये.'

पिता म्हणून मच्छिंद्रनाथाचे नाव ऐकताच तो माझा पिता कसा म्हणून धर्मनाथाने विचारले, तेव्हा रेवतीने मच्छिंद्रनाथाच्या परकायाप्रवेशाची संपूर्ण गोष्ट त्याला सांगितली. तो ऐकून धर्मनाथ आनंदी झाला. तो आपल्या सैन्यासह शिवालयात गेला. मच्छिंद्रनाथाच्या पाया पडला. आणि त्याला पालखीत बसवून मोठ्या समारंभाने राजवाड्यात घेऊन आला. तो वर्षभर तेथे राहिला. नंतर तो तीर्थयात्रेत जायला निघाला. तेव्हा धर्मनाथाला फारच वाईट वाटले. त्यामुळे तोही त्यांच्याबरोबर तीर्थयात्रेस निघाला. ते पाहून मच्छिंद्रनाथाने त्याची समजूत काढली. तो म्हणाला, 'मी बारा वर्षांनी परत येईन. तेव्हा गोरक्षाच्या हातून तुला दीक्षा देववीन व माझ्याबरोबर नेईन. आता तू मातेची सेवा कर आणि आनंदाने राज्यवैभवाचा उपभोग घे.'

मग मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ व चौरंगीनाथ असे त्रिवर्ग यात्रेला गेले. ते यात्रा करीत गोदातटी धामानगरात येऊन पोहोचले. तिथे गोरक्षनाथास माणिक शेतकऱ्याची आठवण झाली. त्याने शेतकऱ्याची सर्व हकीकत मच्छिंद्रनाथाला सांगितली. मग शेताची

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जागा लक्षात घेऊन ते तिघेजण माणिकजवळ गेले. तेथे जाऊन पाहतात तो काष्ठासारखा उभा असलेला माणिक त्यांना दिसला. त्याच्या केसाच्या जटा झाल्या होत्या. नखे वाढली होती. अंगावर तीळभरही मांस नव्हते. केवळ हाडांचा सांगाडा तेवढा उरला होता, पण तोंडाने मात्र सतत जप चालू होता. त्याचे ते तप पाहून गोरक्षनाथाला आश्चर्य वाटले. थोडा वेळ निरीक्षण करून तो मच्छिंद्रनाथाला म्हणाला, 'मघाशी मी तुम्हाला ज्याची गोष्ट सांगितली तो माणिक हाच आहे.'

मग तिघेजण त्याच्याजवळ गेले व त्यांनी त्याला व्रत पूर्ण करावयास सांगितले. तेव्हा तो म्हणाला,'तुम्हाला या गोष्टीची चौकशी कशाला हवी आहे? तुम्ही आपले तुमच्या मार्गाने जा.'

अशा तऱ्हेने त्यांनी त्या शेतकऱ्याला जे जे विचारले त्याची वाकडी उत्तरे तो देत होता. ते पाहून गोरक्षनाथाने विचार केला की याला युक्तीनेच ताळ्यावर आणले पाहिजे.

मग गोरक्षनाथ तेथे एकटाच राहिला आणि मच्छिंद्रनाथ व चौरंगीनाथ जवळच्या झाडाखाली गेले व गोरक्ष काय करतो ते उत्सुकतेने पाहू लागले. गोरक्षनाथ माणिकजवळ उभा राहून त्याला ऐकू जाईल अशा स्वरात म्हणाला, 'अहाहा! वाहवा! असा तपस्वी मी अजूनपर्यंत पाहिला नाही. तेव्हा अशाचा उपदेश घेऊन ह्याला गुरु करावा असे वाटते. त्यामुळे भाग्य उदयाला येईल.'

नंतर गोरक्ष त्याला म्हणाला, 'स्वामी, मला आपणाला गुरु करावयाची इच्छा आहे. आपण कृपा करून मला अनुग्रह द्यावा.'

हे ऐकून माणिक म्हणाला, 'बेटा, एवढा मोठा झालास तरी तुला काडीइतकीही अक्कल नाही. तू मला गुरू करू पाहतोस, त्यापेक्षा तूच माझा गुरु का होत नाहीस?'

गोरक्षनाथाने हे उत्तर ऐकताच क्षणार्धात त्याला मंत्रोपदेश

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केला. त्यामुळे तो ब्रह्मज्ञानी झाला. त्याला सर्व जग ब्रह्मरूप भासू लागले. तो तप सोडून गोरक्षनाथाच्या पाया पडला. गोरक्षनाथाने शक्तिप्रयोग मंत्रून ते भस्म त्याच्या अंगाला लावताच तो शक्तिसंपन्न झाला. मग गोरक्षनाथाने हाताला धरून त्याला मच्छिंद्रनाथांकडे नेले. त्यांनी हसून त्याचा विचित्र स्वभाव पाहून त्यांचे नाव 'अडभंग' असे ठेवले व त्याला दीक्षा दिली. मग ते चौघे तीर्थयात्रेला निघाले. वाटेत गोरक्षनाथाने अडभंगाला सर्व विद्या शिकविल्या आणि प्रवीण बनविले.

नंतर ते तीर्थयात्रा करून बारा वर्षांनी प्रयागला आले. तेव्हा धर्मनाथ राजाला पुत्र झाला होता, त्याचे नाव 'त्रिविक्रम' असे ठेवले होते. हे चौघे नगरात आल्याची वार्ता कळताच धर्मनाथ स्वतः सैन्यासह त्यांच्या स्वागताला गेला. मोठ्या सन्मानाने त्यांना पालखीतून राजवाड्यात आणले. धर्मनाथाने आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून दीक्षा घेण्याचा निर्णय केला.

मग माघ महिन्यातील पुण्यतिथी द्वितीया, जिला धर्मबीज म्हणतात, त्या दिवशी गोरक्षनाथाने धर्मनाथास अनुग्रह देऊन नाथपंथाची दीक्षा दिली. त्या समारंभाला सर्व देवांना पाचरण केले होते. गावातील प्रजेचा मेळा जमला होता. अनुग्रह दिल्यावर सर्वजण प्रसाद घेऊन आनंदाने आपापल्या स्थानी गेले. आयुष्यभर दरवर्षी असाच उत्सव होऊन प्रसाद मिळावा अशी देवांसकट सर्वांनी आपली इच्छा व्यक्त केली. गोरक्षनाथाने धर्मनाथबीजेचा उत्सव दरवर्षी करण्याची आज्ञा त्रिविक्रमाला दिली. त्यामुळे सर्वांना आनंद झाला आणि ठरल्याप्रमाणे दरवर्षी या दिवशी उत्सव होऊ लागला.

गोरक्षनाथाने आपल्या 'किमयागार' ग्रंथात असे म्हटले आहे की, आपापल्या शक्तीनुसार जो कोणी हे बीजेचे व्रत करील त्याच्या घरी दोष, दारिद्र्य, रोग, अभद्र संसार इ. विघ्ने स्वप्नांतही यायची।

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाहीत. प्रत्यक्ष लक्ष्मी त्यांच्या घरी वास्तव्य करील. याप्रमाणे धर्मनाथबीजेचा महिमा सांगितला जातो.

धर्मनाथाला नाथदीक्षा दिल्यावर तोहि त्यांच्याबरोबर यात्रेला निघाला व त्याला सर्व अभ्यासात प्रवीण केले. मग तीर्थक्षेत्रे फिरत फिरत बद्रिकाश्रमास जाऊन त्यांनी धर्मनाथाला शंकराच्या पायावर घातले व त्याला त्यांच्या स्वाधीन करून तपश्चर्येस बसविले. मग बारा वर्षांची मुदत संपताच ते चौघे तीर्थे उरकून बद्रिकाश्रमास आले. तिथे मोठ्या समारंभाने मावंदे केले. मावंद्यासाठी सर्व देवांना बोलावले. मावंद्याचा कार्यक्रम झाल्यावर सर्व देव वर देऊन स्वस्थानी निघून गेले. नंतर गोरक्षनाथा चौरंगीनाथ, अडभंगनाथ, मच्छिंद्रनाथ व धर्मनाथ असे पाचीजण तीर्थयात्रेस गेले.

पूर्वी ब्रह्मदेवाच्या वीर्यापासून अठ्ठ्यांशी सहस्र ऋषी उत्पन्न झाले. त्याच वेळी थोडेसे रेत पृथ्वीवर रेवानदीच्या काठावर पडले होते. त्यात चमसनारायणाने प्रवेश केला. ते मूल सूर्यासारखे तेजाने तळपत होते. जन्म होताच ते एकसारखा रडू लागले. त्याचवेळी सहन सरुख नावाचा एक कुणबी पाणी आणायला म्हणून नदीवर आला होता. ते बाळ रडत असलेले पाहून त्याचे हृदय कळवळले. त्याने लगेच त्या मुलाला उचलून घरी नेले.

घरी नेल्यावर नदीवर हा मुलगा मिळाल्याचे पत्नीला सांगून त्याने ते मूल तिच्या हवाली केले. तिने मोठ्या आनंदाने त्याला न्हाऊ घातले व आपल्या पोटच्या मुलांच्या शेजारी निजवले. तो रेवानदीच्या रेतीत सापडला म्हणून त्याचे नाव 'रेवणनाथ' असे ठेवले. थोडा मोठा झाल्यावर तो काम करायला बापाबरोबर शेतात जाऊ लागला. बारा वर्षांचा असतानाच तो शेतकीच्या कामात अत्यंत निपुण झाला.

एके दिवशी रेवणनाथ पहाटेच उठून बैलांना रानात चरायला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जेत होता. तेव्हा चांदणे स्वच्छ पडले होते. रस्ता साफ दिसत होता. इतक्यात दत्त पुढे येऊन उभे राहिले. दत्तात्रेयाला गिरनार पर्वतावर जायचे जोते. त्यांच्या पायात खडावा होत्या व त्यांनी कौपीन परिधान केली होती. जटा वाढवल्या होत्या. त्यांच्या दाढी, मिशा पिंगट वर्णाच्या होत्या. तिथे दत्तात्रेयाची व रेवणनाथाची गाठ पडली. त्यांचा स्पर्श होताच रेवणनाथास पूर्ण ज्ञान होऊन पूर्वजन्माची आठवण झाली. आणि त्याला त्याच्या वर्तमान परिस्थितीची रुखरुख लागली. आपण पूर्वीचे चमसनारायण असताना आता शेती करू लागलो, तसेच आता आपल्याला कोणी ओळखत नाही, आपण अज्ञानात पडलो या जाणिवेने त्याला फार वाईट वाटले. मग दत्तात्रेयाने त्याची चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, 'तुमच्या देहात त्रि-देवाचे अंश आहेत. यात सत्वगुणी जो महापुरुष तो म्हणजे मी आहे. मला येथे फार कष्ट करावे लागत आहेत, तेव्हा आता कृपा करून मला सनाथ करावे.'

अशी विनवणी करून तो दत्तात्रेयाच्या पाया पडला. त्याची भक्ती पाहून दत्तात्रेयाने आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला. नऊ नारायणांच्या अवतारापैकीच हा आहे हे दत्तात्रेयाला माहीत होते.

दत्तात्रेयाने त्याला तेव्हाच अनुग्रह का दिला नाही अशी शंका येईल, पण त्याचे कारण असे की, भक्तिमार्गाकडे मन लागल्याशिवाय अनुग्रह देऊन उपयोग नाही. म्हणून भक्तीकडे प्रवृत्ती झाली म्हणजे ज्ञान व वैराग्य सहज प्राप्त होते. असा मनात विचार आणून दत्तात्रेयाने तेव्हा त्याला अनुग्रहरहित ठेवले आणि सिद्धीची फक्त एक कला सांगितली. त्यामुळे रेवणनाथास खूप आनंद झाला. तो त्यांच्या पाया पडल्यावर दत्तात्रेय निघून गेले. एक सिद्धी प्राप्त झाली, तेवढ्यावरच त्याचे समाधान मानल्याने तो पूर्ण मुक्त झाला नाही.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३५ वा

रेवणनाथाने एका सिद्धकलेला प्राप्त करून घेऊन दत्तात्रेयाला परत पाठविले आणि तो शेतात गेला. दत्तात्रेयांनीही शहाणपणाने एका सिद्धीकलेवरच त्याची बोळवण केली. इकडे रेवणनाथ शेतात गेला व काम झाल्यावर मंत्रप्रयोग सुरात म्हणू लागला. तत्क्षणी सिद्धी समोर येऊन उभी राहिली व कशाला बोलावले म्हणून विचारले. रेवणनाथाने प्रथम तिला तिचे नाव विचारले, तेव्हा ती म्हणाली, 'मला सिद्धी म्हणतात.'

दत्तात्रेयाने जेव्हा रेवणनाथाला सिद्धी दिली तेव्हा तिचा प्रतापही सांगितला होता. तिचा मंत्र जपताच ती पुढे येईल व इच्छेप्रमाणे काम करील. पृथ्वीवरचे सकळ भोग क्षणार्धात पुढे आणून ठेवील. थोडक्यात म्हणजे ज्याची तू इच्छा करशील ते ती करील. तेव्हा जे काम तुला करायचे असेल ते तिला सांग.'

अशा तऱ्हेने प्रत्यक्ष सिद्धी येऊन उभी राहिलेली पाहिल्यावर रेवणनाथाला थोडा गर्व झाला. परंतु स्वभावाने तो निःस्पृह होता.

पुढे एके दिवशी तो असाच शेतात काम करीत असताना त्याने मंत्रप्रयोग म्हटला. त्याबरोबर महिमा नावाची सिद्धी पुढे येऊन उभी राहिली. लगेच त्याने हातातील औत व दोर टाकून तिला सांगितले की, 'जर तू सिद्धी आहेस तर पलीकडच्या झाडाखाली धान्याची रास पडली आहे ती सुवर्णाची करून दाखव; म्हणजे तू खरी सिद्धी आहेस, हे मला समजेल आणि मग मी तुला इच्छित काम सांगेन.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते ऐकून महिमा म्हणाली, 'मी एका क्षणात धान्याच्या राशी सुवर्णाच्या करून दाखविते.'

आणि क्षणार्धातच तिने धान्याच्या राशी सुवर्णाच्या करून दाखविल्या. ते पाहून रेवणनाथाची खात्री झाली. मग तो तिला म्हणाला, 'तू आता माझ्याजवळ रहा..तू सतत माझ्याजवळ असलीस म्हणजे मला पाहिजे ते मिळवण्यास बरे पडेल.'

रेवणनाथाचे बोलणे ऐकून सिद्धी म्हणाली, 'मी सतत तुझ्याजवळ राहीन, परंतु लोकांच्या दृष्टीला पडणार नाही. तूही माझ्या दर्शनाची इच्छा करू नको, पण तुझे काम मात्र करीन.'

रेवणनाथाने तिचे म्हणणे मान्य केले. मग ती सुवर्णाची रास गुप्त करून अदृश्य झाली. संध्याकाळपर्यंत शेतात काम करून रेवणनाथ घरी गेला. त्याने गोठ्यात बैल बांधले व रात्री स्वस्थ चित्ताने झोपला.

दुसऱ्या दिवशी त्याच्या मनात आले की आता व्यर्थ कष्ट कशासाठी करायचे? निधान आपल्या हाती असताना दैन्य भोगू नये; म्हणून मग तो शेतात गेलाच नाही. तेव्हा साधारण प्रहर दिवसापर्यंत वाट पाहून त्याचा बाप त्याला म्हणाला, 'बाळा, तू औत घेऊन शेतात जायचे सोडून घरी का बसला?'

यावर रेवणनाथ म्हणाला, 'शेतात जाऊन व रात्रंदिवस कष्ट करून काय मिळणार आहे?'

त्यावर बाप म्हणाला, 'पोटासाठी शेतात काम केले पाहिजे. अरे, शेत पिकले की पोटाची काळजी मिटली. नाही तर खायची भ्रांत होईल आणि उपाशी मरायची वेळ येईल.'

पित्याचे बोलणे ऐकल्यावर रेवणनाथ म्हणाला, 'आपल्या घरात काय कमी आहे म्हणून शेतात जाऊन कष्ट करून पिकवायचे,'

त्यावर बाप म्हणाला, 'अरे, आपल्या घरात काय आहे हे मला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

माहीत आहे? अरे बाबा, मी एक-एक दिवस कसा ढकलीत आहे ते माझे मलाच माहीत!'

मग रेवणनाथ म्हणाला, 'तुम्ही उगाच खोटे बोलता. खरे तर घर सोन्याने भरलेले आहे. मी काय म्हणतो हे पाहायचे असेल तर घरात फिरून पहा.'

त्यानुसार बाप पाहू लागला. तो त्याला घरात सोन्याच्या व धान्याच्या राशीच्या राशी दिसल्या. त्या पाहून बापाला फार आश्चर्य वाटले. त्याच्या मनात आले की, हा कोणीतरी अवतारी पुरुष असावा. तेव्हापासून त्याने मुलाला काम सांगायचे सोडून दिले व तो त्याच्या तंत्राने वागू लागला.

रेवणनाथ जेथे रहात होता तो बुंधुलगाव येण्याजाण्याच्या मार्गावर होता, त्यामुळे गावात नेहमी वाटसरू येत असत. तो गावात येणाऱ्या पांथस्थाला इच्छाभोजन घालू लागला. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. मग झुंडीच्या झुंडी त्याच्या घरी येऊ लागल्या. ज्याची इच्छा असेल तसे त्याला देऊन रेवणनाथ त्यांचे मनोरथ पुरवू लागला. तो मनुष्याचे रोगही नष्ट करू लागला. त्यामुळे लोक त्याला दुवा देऊन कीर्ती गाऊ लागले, त्यामुळे रेवणनाथ जिकडे तिकडे प्रसिद्ध झाला आणि सर्व लोक त्याला 'रेवणसिद्ध' म्हणू लागले.

एके दिवशी मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रा करीत असता बुंधुलगावात येऊन तेथल्या धर्मशाळेत उतरला. मच्छिंद्रनाथ गुरूचे चिंतन करीत आनंदाने बसला असता कित्येक लोक त्या धर्मशाळेत गेले. त्यांनी मच्छिंद्रनाथाला भोजनासाठी रेवणनाथाचे घर दाखविले. तेव्हा मच्छिंद्रनाथानी रेवणनाथाची चौकशी केली. लोकांनी रेवणसिद्धाची पहिल्यापासूनची सर्व माहिती सांगितली.

ती माहिती ऐकल्यावर मच्छिंद्रनाथ अंतरमनाने समजला, की हा रेवणनाथ म्हणजे चमसनारायणाचाच अवतार होय. नंतर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याच्याबद्दलची अधिक माहिती मिळविण्यासाठी रेवणनाथाच्या गुरूची चौकशी त्याने केली. पण ती कोणालाच सांगता आली नाही.

मग मच्छिंद्रनाथाने काही पशू, पक्षी, वाघ, सिंह यांना बोलावून त्यांना यथेच्छ खायला घालू लागला. हा चमत्कार पाहून हादेखील कोणी ईश्वरी अवतार आहे म्हणूनच पशु-पक्षी याच्याशी सलगी करतात, असे मच्छिंद्रनाथाबद्दल लोक म्हणू लागले.

लोकांनी हा चमत्कार रेवणसिद्धाला जाऊन सांगितला. मग त्याने स्वत: जाऊन हे प्रत्यक्ष पाहिले. सिंह, वाघ वगैरे हिंस्र जनावरे तसेच पशुपक्षीही मच्छिंद्रनाथाच्या अंगाखांद्यावर द्वैत सोडून खेळत आहेत हे पाहून त्यालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही.

हा चमत्कार कोण करतो हे पाहण्यासाठी रेवणनाथ घरी गेला. आणि दत्तमंत्रप्रयोग म्हणू लागला. तेव्हा प्रत्यक्ष सिद्धी येऊन उभी राहिली. तिने बोलावण्याचे कारण विचारताच तो म्हणाला, 'मच्छिंद्रनाथाप्रमाणे पशुपक्ष्यांनी व जनावरांनी माझ्या अंगाखांद्यावर प्रेमाने देहबुद्धी सोडून खेळावे व मी सांगेन त्याप्रमाणे वागावे असे झाले पाहिजे.'

रेवणनाथाची ही अपेक्षा ऐकून तिने त्याला सांगितले, 'तू जे सांगतोस ते ब्रह्मवेत्त्याशिवाय कोणाच्याही हातून होणार नाही. या सर्व गोष्टी तुला हव्या असतील तर प्रथम तू ब्रह्मवेत्ता हो. म्हणजे तुला या गोष्टी अवगत होतील.'

यावर रेवणनाथ म्हणाला, 'मग तूच मला ब्रह्मवेत्ता कर.'

तेव्हा सिद्धी म्हणाली, 'ही गोष्ट मला करता येणार नाही. तुझा गुरू दत्तात्रेय सर्वसमर्थ आहे. तू त्याची प्रार्थना कर आणि ही गोष्ट साध्य करून घे.'

सिद्धीच्या सांगण्यानुसार त्याने दत्ताची भेट घेण्याचे ठरविले. पूर्वी ज्या ठिकाणी दत्तात्रेयाची भेट झाली होती, तिथे जाऊन तो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तपश्चर्येला बसला. दत्तात्रेय केव्हा भेटतो असे त्याला झाले होते. त्याने अन्नपाणीही सोडले. झाडांची उडून आलेली पाने खाऊन तो निर्वाह करू लागला. त्यामुळे तो शक्तिहीन झाला. अंगावर तिळभर मांस राहिले नाही. नुसता हाडांचा सापळा शिल्लक राहिला.

त्याचे तप पाहून मच्छिंद्रनाथ म्हणाला, हा देवभेटीच्या प्रयत्नाला लागला आहे, पण त्याचा गुरू कोण हे त्याला अद्याप समजले नव्हते. तो रेवणनाथांच्या गुरूबद्दल पुन्हा चौकशी करू लागला, पण त्याला काहीच कळले नाही. लोक फक्त त्याची स्तुती करीत. उपकार करण्यास, अन्नपाणी, धन देण्यास रेवणनाथ मागेपुढे पाहात नसे, असे लोक सांगत. यावरून कोणत्या तरी गुरूच्या कृपेने याला सिद्धी प्राप्त झाली असावी, असे मच्छिंद्रनाथाच्या मनात आले.

मग त्याने त्याच्या गुरूचा शोध करण्यासाठी अणिमा, गरिमा, लाहिंमा, महिमा वगैरे अष्ट सिद्धींना बोलावले. त्या येताक्षणीच त्याच्या पाया पडल्या. तेव्हा नाथाने त्यांना विचारले, रेवणसिद्धाच्या सेवेस तुमच्यापैकी कोणत्या सिद्धीची योजना केली आहे?'

यावर महिमा म्हणाली, 'श्री दत्ताने मला याच्या सेवेत राहायला सांगितले आहे.'

ते ऐकून मच्छिंद्र म्हणाला, 'हा तर आपला गुरुबंधू आहे. त्याला साहाय्य करायला पाहिजे.' मग तो त्वरेने निघून गिरनार पर्वतावर येऊन दत्तात्रेयाला भेटला. दत्तात्रेयाला त्याने रेवणसिद्धाची सर्व हकीकत सांगितली व त्याच्या हितासाठी पुष्कळच रदबदली केली. तो म्हणाला, 'महाराज, रेवणसिद्ध हा प्रत्यक्ष चमसनारायणाचाच अवतार आहे हे आपण जाणता आहातच. तो तुमच्यासाठी दारुण क्लेश भोगीत आहे. तेव्हा आता आपण त्याच्यावर कृपा करावी. ज्या ठिकाणी तुमची प्रथम भेट झाली त्याच ठिकाणी तो तुमच्या दर्शनासाठी अन्न-पाण्याचा त्याग करून बसला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहे.'

ते ऐकून मच्छिंद्रनाथाला बरोबर घेऊन दत्तात्रेय व्यानास्त्र जपून रेवणनाथाजवळ गेले. तपामुळे कृश झालेल्या रेवणनाथाला पाहून दत्तात्रेयाचे अंत:करण कळवळले. त्यांनी लगेच त्याला मोठ्या प्रेमाने मिठी मारली. दत्तात्रेयाला समोर पाहून रेवणनाथाने दत्तात्रेयाच्या पायावर मस्तक ठेवले. तेव्हा दत्तात्रेयांने त्याच्या कानात मंत्रोपदेश केला. त्यामुळे रेवणनाथाचे अज्ञान व द्वैत नाहीसे झाले.

दत्ताने मग वज्रशक्ती योजून रेवणनाथाच्या कपाळावर भस्म लावले. त्यामुळे तो शक्तिवान झाला. नंतर त्याला बरोबर घेऊन दत्तात्रेय मच्छिंद्रनाथासह गिरनार पर्वतावर गेले. तेथे त्याला खूप दिवस ठेवून घेतले व सर्व शस्त्रांस्त्रासह सर्व विद्यात प्रवीण केले. तेव्हा रेवणनाथास आपण एकरूप झालो असे वाटले. त्याच्यातील द्वैतभाव नाहीसा होताच सर्व पशुपक्षी, हिंस्र जनावरेही निर्वेधपणे त्यांच्याजवळ येऊन पाया पडू लागली.

मग दत्तात्रेयाने रेवणनाथास नाथपंथाची दीक्षा देऊन मच्छिंद्रनाथाप्रमाणेच सर्व विद्यात निष्णात करून त्याला त्याच्या स्वाधीन केले. मग ते दोघे मार्तंड पर्वतावर गेले. तेथे त्यांनी नागेश्वराचे स्थान पाहून देवदर्शन घेतले आणि वर मिळवून साबरीमंत्राची कविता केली.

अशा तऱ्हेने सर्व विद्या साध्य झाल्यावर गिरनार पर्वतावर जाऊन मावंदे घालण्याचे रेवणनाथाने ठरविले. त्या समारंभास विष्णु, शंकर, इंद्र, वरुण, कुबेर वगैरे सर्व देव आले होते. हा समारंभ चार दिवस मोठ्या थाटात पार पडला. मग सर्व देव रेवणनाथाला वर देऊन आपापल्या स्थानी परत गेले आणि दत्तात्रेयाने रेवणनाथाला तीर्थयात्रा करायला पाठविले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इकडे माण देशात विटे नावाच्या गावात सरस्वती नावाचा ब्राह्मण राहात होता. त्याच्या पत्नीचे नाव जान्हवी असे होते. ती अत्यंत सुंदर होती. ती दोघे एकमेकांवर अगदी गाढ प्रेम करीत. त्यांना मुले होत पण ती आठ-दहा दिवसच जगत असत.

अशा तऱ्हेने त्यांचे सहा पुत्र मरण पावले. आणि नंतर झालेला सातवा पुत्र दहा वर्षे जगला. तो दहा वर्षे जगला त्यामुळे आता याला भय नाही असे जाणून सरस्वती ब्राह्मणाने मोठ्या थाटात बारसे करून ब्राह्मणभोजन घातले. भोजनाला पंचपक्वान्ने केली होती. त्याच दिवशी गावात रेवणनाथ आला होता. तो भिक्षेसाठी फिरत असता ब्राह्मणाकडे गेला. त्याला पाहताच हा कोणी तरी अवतारी पुरुष आहे असे सरस्वतीला वाटले. मग तो पाया पडला आणि त्याला जेवण करून जाण्याचा आग्रह केला. रेवणनाथाने त्याला सांगितले की, 'आम्ही कनिष्ठ वर्णाचे व तू ब्राह्मण आहेस, तेव्हा तू आमच्या पाया पडतोस हे योग्य नाही.'

हे ऐकून तो म्हणाला, 'या प्रसंगी जातीचा विचार न करता तपश्चर्येचा, विद्वत्तेचा विचार करणे योग्य होईल.'

ब्राह्मणाचा शुद्ध भाव पाहून रेवणनाथाने त्याचे म्हणणे मान्य केले. रेवणनाथाला मोठ्या सन्मानाने घरात जेवायला घेऊन गेला व त्याचे जेवण होईपर्यंत स्वतः त्याच्याजवळ बसून राहिला. खूप आग्रह करून त्याला जेवायला घातले. अन्य ब्राह्मण जेवत असतानाही हा रेवणनाथाजवळून उठला नाही. त्यावरून तो नाथाच्या भजनी लागला असे म्हणायला हरकत नाही. जेवण झाल्यावर तो नाथांची प्रार्थना करू लागला, 'महाराज, आज आपण माझ्याकडे वस्तीला राहा आणि उद्या जा.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याचा फारच आग्रह झाल्याने व त्याची मनापासूनची इच्छा पाहून रेवणनाथ राहावयास तयार झाला. रात्री पुन्हा जेवणासाठी सरस्वती ब्राह्मणाने नाथाला आग्रह केला, परंतु दुपारी भरपूर जेवण झाल्याने रात्री भूकच नव्हती. त्यामुळे नित्यकर्म उरकून नाथ झोपला. तो ब्राह्मण त्याचे पाय चेपून सेवा करू लागला.

परंतु मध्यरात्रीच्या सुमारास आईजवळ असलेल्या त्याच्या मुलावर सटवीने झडप घालून त्याचे प्राण कासावीस केले. तेव्हा मुलाची अवस्था पाहून त्याच्या आईने घाबरून नवऱ्याला हाक मारली. तेव्हा तो तिला म्हणाला, 'काय व्हायचे असेल ते होऊ दे. आपण पूर्वजन्मी केलेल्या पापांची ही फळे आहेत. ती आपल्याला भोगायलाच हवीत. त्या पापांमुळे आता सुख कसे मिळणार? मी उठून आलो तर नाथाची झोप मोडली तर ते वाईट.'

इकडे ब्राह्मण एवढे बोलतो आहे तोच तिकडे यमदूतांनी आपले पाश टाकून मुलाचे प्राण घेतले. मुलगा मरण पावलेला पाहून जान्हवीने दारुण शोक केला. तिने ती संपूर्ण रात्र रडूनच काढली. सकाळ झाली तेव्हा नाथाला हुंदक्यांचा आवाज ऐकू आला. तो ऐकून त्याने कोण रडत आहे म्हणून विचारले. तेव्हा तो अतिदुःखाने म्हणाला, 'मुलाचे प्राण कासावीस होत आहेत म्हणून माझी बायको अज्ञानाने रडत आहे.'

हे ऐकून नाथ त्याला म्हणाले, 'तुझ्या मुलाला माझ्याजवळ घेऊन ये.'

तेव्हा सरस्वती आपल्या पत्नीजवळ गेला असताना त्याला पुत्राचे प्रेत दृष्टीस पडले. नाथाला ही गोष्ट सांगताच त्याला यमाचा राग आला. त्या रागाच्या भरातच तो म्हणाला, 'मी येथे असताना यमाने हा डाव कसा साधला? आता यमाचा समाचार घेऊन त्यालाच नाहीसा करून टाकतो.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मग त्याने मुलाला जवळ आणण्यास सांगितले. सरस्वतीने मुलाला आणून नाथासमोर ठेवले. त्या बालकाचे प्रेत पाहून नाथाला फारच दुःख झाले. तुला हा एकच मुलगा आहे काय असे नाथाने विचारले, त्यावर सरस्वती म्हणाली, 'महाराज, हा माझा सातवा मुलगा आहे. माझी मागची सर्व मुले जन्मल्यावर पाचसात दिवसातच गेली. हाच एवढा दहा वर्षे जगला. आम्ही कमनशिबी! आमचा संसार सुरळीत कुठचा व्हायला! प्रारब्धात होते ते घडले.'

हे ऐकून रेवणनाथ सरस्वतीला धीर देऊन म्हणाला, तू तीन दिवस या प्रेताचे नीट रक्षण करून ठेव. आता मी स्वतः यमाकडे जाऊन तुझी सातही बाळे घेऊन येतो.'

असे सांगून नाथाने अमरमंत्र मंत्रून ते भस्म त्या मुलाच्या अंगाला लावले व व्यानास्त्राच्या सहाय्याने तो ताबडतोब यमाकडे गेला.

रेवणनाथ आलेला पाहून यमधर्म सिंहासनावरून उतरला व त्याला आपल्या आसनावर बसवून त्याने त्याची षोडशोपचारांनी पूजा केली आणि हात जोडून येण्याचे कारण विचारले, तेव्हा रेवणनाथ म्हणाला, 'यमधर्मा, मी स्वतः सरस्वती ब्राह्मणाच्या घरी असता तू तेथे येऊन त्याच्या मुलाचा प्राण कसा घेऊन गेलास? आता घडू नये ते घडले तरी चिंता नाही. परंतु तू त्याचा पुत्र परत दे आणि त्याचे पहिले सहा मुलगे कोठे ठेवले आहेस, तेही आणून दे. आणि जर हे घडून आले नाही तर तुला फार जड जाईल हे ध्यानात ठेव.'

हे ऐकून यमाने विचार केली की, 'आपण गोड बोलून याला शंकराकडे पाठवावे. ही जबाबदारी आपल्या अंगावर घेऊ नये. शंकराकडे सर्व मुखत्यारी आहे, असे सांगून त्याला कैलासाला पाठवावे. मग तिकडे काय वाटेल ते होवो!' मग तो नाथाला म्हणाला; 'महाराज, माझे म्हणणे नीट काळजीपूर्वक ऐकून घ्यावे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विष्णू, शंकर व ब्रह्मदेव हे तिघेही या गोष्टीचे अधिकारी आहेत. हा सर्व कारभार त्यांच्याच आज्ञेने चालतो. याचा मुख्य शंकर असून आम्ही त्याची चाकरी करतो. त्यामुळे मारण्याचे वा तारण्याचे काम आमच्याकडे नाही. तेव्हा आपण कैलासाला जावे व शंकराकडून ब्राह्मणाचे सात पुत्र मागून घ्यावे. ते तेथेच त्याच्याजवळ आहेत. त्याचे मन वळवून आपला कार्यभाग साधून घ्या. मज दीनावर कोपू नका.'

ते ऐकून रेवणनाथ म्हणाला, 'तू म्हणतोस त्याप्रमाणे ते काम शंकराचे असेल तर मी आता कैलासास जातो.'

असे म्हणून रेवणनाथ तेथून उठून कैलासास शंकराकडे जायला निघाला.

❋❋❋

अध्याय ३६ वा

यमलोकातून रेवणनाथ कैलासाला गेला. शिवगणांनी त्याची विचारपूस करण्यासाठी त्याला दारात हटकून उभे केले आणि आपण कोण, कुठले, काम काय वगैरे विचारू लागले, तेव्हा तो म्हणाला, 'मला रेवणनाथ म्हणतात. मी शंकराची भेट घ्यायला आलो आहे. कारण त्याने एका ब्राह्मणाचा मुलगा चोरून आणला आहे. त्याला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शिक्षा करून मुलाला घेऊन जाण्यासाठी मी येथे आलो आहे.'

त्याचे ते बोलणे ऐकून शिवगणांना राग आला. ते म्हणाले, 'बाबा, तू जे बोलतो आहेस त्यावरून तुझा गुरू गंधर्व असावा असे वाटते. म्हणून तू आता येथे न थांबता परत जा.'

शिवगणांच्या या बोलण्याचा नाथाला फारच राग आला. तो म्हणाला, 'माझा गुरू गंधर्व म्हणता काय? तर मग त्याचा प्रताप तुम्हाला दाखवतो. गंधर्वासारखे रानोमाळ फिरू नका.'

असे बोलून त्याने रागाने स्पर्शास्त्राची योजना केली व भस्म मंत्रून त्यांच्यावर फेकले. त्याबरोबर ते द्वारपाळ व तेराशे शिवगण हे सर्व जमिनीला खिळून बसले. पाय सुटेनात म्हणून ते सर्वजण हाताने पाय सोडवण्याचा प्रयत्न करू लागले तेव्हा हातही जमिनीला चिकटले व सर्वजण ओणवे राहिले.

नाथाच्या विपरीत करणीने गणांची झालेली बिकट अवस्था पाहून तेथले सर्व लोक घाबरून गेले. ते शिवापुढे हात जोडून म्हणाले, 'गावच्या दाराशी एक मनुष्य आला असून, त्याने तेराशे द्वाररक्षकगणांना जमिनीला खिळवून ओणवे करून टाकले आहे व त्यामुळे ते ओरडत आहेत.'

ते ऐकून शंकराने त्याला शिक्षा करण्यासाठी आठही काळभैरवांना आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणे काळभैरव शतकोटी गणांना घेऊन बाहेर पडले. त्यांना पाहून नाथाने स्पर्शास्त्राच्या सहाय्याने त्या गणांनाही ओणवे गेले, परंतु भैरवांनी त्या अस्त्रास जुमानले नाही. त्यांनी धनुष्य हातात घेऊन बाणावर निरनिराळ्या अस्त्रांची योजना करून बाण सोडले. तेव्हा नाथानेही तद्विरुद्ध अस्त्रांची योजना केली. त्यामुळे भैरवांच्या अस्त्रांचा तत्काळ नाश झाला. अष्टभैरव जर्जर झाले. रेवणनाथापुढे भैरवांचे काहीच

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चालेना.

तेव्हा दूतांनी हे वृत्त शिवाला सांगितले. ते ऐकून शिव रागाने स्वत: रणभूमीवर आला. शंकराला आलेला पाहून रेवणनाथाने मनात विचार केला की, 'शंकराशी फार युद्ध करण्याचे काही कारण नाही; एकाच अस्त्राने त्याचा बंदोबस्त करावा.' असे मनात आणून मग त्याने वाताकर्षण मंत्र जपून ते भस्म शंकरावर फेकले. तत्काळ शिवाचा श्वासोच्छ्वासच बंद झाला आणि तो नंदीवरून खाली कोसळला. हातातली शस्त्रे गळून गेली. मुखातून भडभडा रक्त वाहू लागले आणि अष्टभैरवही बेशुद्ध पडले.

याप्रमाणे शंकराची व गणांची भयंकर अवस्था झाल्याची वार्ता विष्णूला कळली. तो लगेच धावून आला. त्याने लगेच नाथाला आलिंगन देऊन पोटाशी धरले व विचारले, 'अरे, तुला रागवायला काय झाले?'

यावर रेवणनाथाने विष्णूला सांगितले, 'मी सरस्वती ब्राह्मणाकडे असताना शंकराने यमाला पाठवून त्याचा पुत्र मारला, म्हणून मी त्याचा प्राण घेऊन संजीवनी अस्त्राच्या योगाने मुलाला जिवंत करून घेऊन जाणार आहे, आणि जर तुम्हाला प्राणाची पर्वा असेल तर तुम्ही त्या ब्राह्मणाची सातही बाळे आणून द्या; म्हणजे मी शंकराच्या प्राणांचे रक्षण करतो.'

रेवणनाथाची ही मागणी ऐकून विष्णूने त्याला सांगितले, 'ती सातही बाळे माझ्याजवळ आहेत. मी ते सातही प्राण तुझ्या हवाली करतो, पण देह मात्र तू निर्माण कर'

विष्णूचे हे म्हणणे रेवणनाथाने मान्य केले. मग वातप्रेरक अस्त्र जपून नाथाने शंकराला सावध केले. विभक्त अस्त्राचा जप करून सर्व गणांना मुक्त केले आणि स्थितीमंत्र म्हणून अष्टभैरवांना भस्म लावून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्यांना पूर्ववत् केले. मग सर्वांनी नाथाला नमस्कार केला. विष्णूने सातही प्राण नाथाच्या स्वाधीन केले व त्याला निघायची परवानगी दिली.

सातही प्राण ताब्यात मिळाल्यावर रेवणनाथ यानास्त्राच्या सहाय्याने ब्राह्मणाकडे आला व त्याला मुलाचे प्रेत कुटून त्याचा मेणासारखा गोळा करून आणायला सांगितले. त्याप्रमाणे प्रेत कुटून आणल्यावर त्याचे सात भाग करून सात पुतळे तयार केले. नंतर संजीवनी प्रयोग योजून सातही बाळे जिवंत केली. तो मुले जिवंत होताच रडू लागली. त्या सर्वांना सरस्वती व त्याच्या पत्नीच्या स्वाधीन करून त्यांचे संगोपन करायला सांगितले. बाराव्या दिवशी बारसे करून सारंगीनाथ, निजानंद, दीनानाथ, यदुनाथ, निरंजननाथ, गहिनीनाथ अशी त्यांची नावे रेवणनाथाने ठेवली.

हे सातही पुरुष पुढे जगविख्यात झाले. रेवणनाथाने त्यांना बारा वर्षांनंतर नाथपंथाची दीक्षा दिली. सर्वांना सर्व विद्यांत निपुण बनविले. रेवणनाथ तिथेच राहून आजतागायत त्यांच्याकडून सेवा घेत आहे.

पूर्वी सरस्वतीच्या उद्देशाने ब्रह्मदेवाचे वीर्यपतन होऊन ते एका सर्पिणीच्या मस्तकावर येऊन पडले होते. ते तिने भक्षण केले. त्यामुळे तिच्या पोटात गर्भ वाढू लागला. ही गोष्ट अंतर्ज्ञानाने अस्तिक ऋषींना समजली. नऊ नारायणांपैकी एकजण तिच्या पोटी येईल व त्याला लोक नागनाथ म्हणतील हेही त्यांनी जाणले.

मग अस्तिक मुनीने त्या सर्पिणीला बोलावले आणि सांगितले; तुझ्या पोटी जो गर्भ आहे, तो दुर्बळ नाही. तो नारायण आहे. काळजी करू नकोस. आता तुला सांगायचे कारण इतकेच की, पुढे तुझ्यावर मोठे दुर्घट ओढवणार आहे. सध्या जनमेजय राजाने मोठे सर्पसत्र

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आरंभिले असून मोठमोठ्या ऋषींच्या मदतीने समिधांच्या ऐवजी तो सर्पांची आहुती यज्ञकुंडात देत आहे. तेव्हा तू सावध राहा. कोठे तरी लपून रहा.

याप्रमाणे अस्तिक ऋषींचे बोलणे ऐकून ती घाबरून गेली व त्यांना विचारू लागली, 'मी लपून राहीन, पण मला राहायला निर्भय. अशी कोणती जागा आहे ते तुम्हीच सांगावे.'

तेव्हा अस्तिक ऋषींनी तिला सांगितले, 'येथे जवळच एक जुनाट वडाचे झाड आहे. त्या झाडाच्या ढोलीत तू राहा आणि कसलीही काळजी करू नको.'

मग ती सर्पीण अस्तिक ऋषींच्या सांगण्याप्रमाणे त्या झाडाच्या ढोलीत लपली. अस्तिक ऋषींनी अचल अशा वज्रप्रयोगाने ते झाड सिंचन करून ठेवले आणि आपण हस्तिनापुराला निघून गेले.

तिथून निघून अस्तिकमुनी जनमेजय राजाच्या यज्ञमंडपात आले आणि त्यांनी सर्व ऋषींना भेटून ही गुप्त हकीकत सांगितली. मग ते म्हणाले, 'हे ब्रह्मवीर्य सर्पिणीच्या पोटात आहे. पुढे तो पुरुष वटसिद्ध नागनाथ या नावाने प्रकट होईल. नऊ नारायणांपैकी अविर्होत्र नारायणाचा तो अवतार आहे, म्हणून त्याला मारू नये.'

हा वृत्तांत ऐकून सर्व ऋषींनी अस्तिक मुनींच्या म्हणण्याला आनंदाने मान्यता दिली. पुढे काही दिवसांनी हे सर्पसत्र संपले आणि सर्पिणीचेही नऊ महिने पूर्ण झाले. मग ती सर्पीण योग्य वेळ येताच प्रसूत झाली. तिने एक अंडे घातले. ते अंडे वडाच्या पोकळीत पुष्कळ दिवस होते. त्या अंड्यात अविर्होत्र नारायणाने संचार केला.

पुढे अविर्होत्र नारायणाचे शरीर वाढताच अंडे फुटले आणि मूल दिसू लागले. जन्मताच ते बाळ ढोलीतच रडून आकांत करू लागले. पण तेथे त्याचे रक्षण करण्यास कोणीच नव्हते.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कोशधर्म नावाचा एक गरीब ब्राह्मण होता. तो अथर्ववेदी गौड ब्राह्मण वेदशास्त्रात पारंगत होता, परंतु घरात अठरा विश्वे दारिद्र्य असल्याने संसारात त्याचे हाल होत. या गरिबीमुळे पत्रावळीसाठी तो वडाची पाने आणीत असे.

एके दिवशी तो नेहमीप्रमाणे त्या झाडाजवळ गेला, तर त्याला मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. आवाजाच्या दिशेने तो शोध घेत होता, पण त्याला कोणीच दिसले नाही. त्यामुळे त्याला मोठे आश्चर्य वाटले. हा मुलाचाच आवाज आहे याबद्दल त्याची खात्री झाली. एवढ्यात स्वर्गातल्या देवांनी त्याला सांगितले, 'कोशधर्मा, या वडाच्या झाडाच्या पोकळीत बालक रडत आहे; त्याला तू तुझ्या घरी घेऊन जा व त्याचे उत्तम प्रकारे पालन कर. हा मुलगा तुझ्या घरी आला की तुझे दारिद्र्य नष्ट होईल. हा मुलगा सामान्य नाही तर साक्षात् अविर्होत्र नारायण आहे.'

असे सांगून देवांनी एक बाण सोडला. त्या बाणाने झाड मोडले आणि कोशधर्माला तिथेले तेजस्वी बालक दिसले. त्या बालकावर देवांनी फुलांचा वर्षाव केला आणि हात जोडून त्या नारायणास नमस्कार केला. मग कोशधर्म ब्राह्मणाला सांगितले, 'महाराज, या पृथ्वीवर आपण मोठे भाग्यवान आहात म्हणूनच हा वटसिद्ध नागनाथ तुम्हाला प्राप्त झाला आहे. हा पद्मिनी नामक नागिणीच्या पोटी जन्मला आहे व वटवृक्षामध्ये त्याचे संरक्षण झाले आहे. म्हणून ह्याचे 'वटसिद्ध नागनाथ' हेच नाव ठेवावे. हा सिद्ध असून योगी लोकांचा नाथ होईल.'

ती देववाणी ऐकून कोशधर्माला फार आनंद झाला. त्याने त्या मुलाला उचलून घरी नेले व घरी गेल्यावर त्याने ही सर्व वार्ता आपली पत्नी सुरादेवी हिला सांगितली. ती ऐकून तिलाही फार आनंद झाला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ती म्हणाली, 'मला वाटते की, हा चंद्र किंवा सूर्यच अवतरला आहे.'

असे म्हणून तिने बाळाला उचलून जवळ घेतले, तो तिला पान्हा फुटला. मग ती आनंदाने त्या मुलाचे सर्व करू लागली. त्याचे बारसे करून 'वटसिद्ध नागनाथ' असे नाव ठेवले. सुरादेवीच्या ठिकाणी सावत्र मातेचा भाव दिसत नव्हता. वटसिद्ध मोठा झाल्यावर सातव्या वर्षी कोशधर्माने यथाविधी त्याची मुंज केली.

एके दिवशी टळटळीत दुपारी वटसिद्ध नागनाथ भागीरथी नदीच्या काठावर काशीविश्वेश्वरासमोर त्याच्या बरोबरची मुले जमवून खेळ खेळू लागला. त्याच वेळी दत्तात्रेय तेथे आला व या छोट्यांचा खेळ पाहू लागला. दत्तात्रेयाची दृष्टी या तेजस्वी बालकावर गेली. तेथे मुलांच्या पंक्ती बसवून त्यांना वटसिद्ध नागनाथ लटकेच अन्न वाढत होता व मुलेही खोटंखोटं नको म्हणत होती आणि हा खूप आग्रह करून वाढत होता.

मुलांचा चाललेला हा खेळ पाहून दत्तात्रेयाला आश्चर्य वाटले. खोट्याच अन्नाने पोट भरले असे मुले म्हणत होती म्हणून त्याला हसूही आले आणि त्याला त्या मुलांची गंमत करायची लहर आली.

त्याबरोबर त्याने बालरूप धारण केले व अंगणात उभा राहून तो म्हणाला, 'मी अतिथी आलो आहे. मला भूक लागली आहे, तेव्हा काही खायला अन्न वाढा.'

हे ऐकून ती मुले त्याच्या अंगावर धावून जाऊन त्याला म्हणू लागली, 'आमच्या नेहमीच्यात खेळायला तू कोण आहेस? जातोस की नाही? का मारू?

असे म्हणून काही मुले काठ्या उगारू लागली व काही मुले दगड मारायला लागली. ते पाहून नागनाथ त्यांना म्हणाला, 'आपल्यात तो नवीन मुलगा आला आहे, त्याला असा घालवून देऊ नका. आपल्यासारखेच त्यालाही वाढू. आयत्या वेळी आलेल्या ब्राह्मणाला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अतिथी समजून वागवावे; परत घालवू नये.'

मग त्याचे कल्पनेनेच स्नान, षोडशोपचारांनी पूजा वगैरे सर्व झाले. जेवताना एखाद्या यजमानासारखा नागनाथ रसाळ वाणीने सावकाश जेवा, घाई करूँ नका, जे लागेल ते मागा, असा आग्रह करीत होता. ते पाहून हा मोठा उदार आहे असे दत्तात्रेयाला वाटले. हा पूर्वीचा कोणीतरी योगी असावा असेही त्याच्या मनात आले. लोकांना तृप्त करणारा, उदार बुद्धीचा माणूस पूर्वपुण्याईवाचून होणार नाही. असा विचार करून दत्तात्रेय त्याचा पूर्वजन्म शोधू लागला."

हा पूर्वजन्मीचा आविर्होत्र नारायण असल्याचे दत्तात्रेयाला कळून आले. मग दत्तात्रेयाने त्याच्यावर कृपा करून त्याला सिद्धी दिली. त्यामुळे नागनाथ ज्या पदार्थाचे नाव काढी ते पदार्थ उत्पन्न होऊ लागले.

नंतर नागनाथाला जवळ बोलावून मुलांना जेवायला घाला असे दत्तात्रेयाने नाथाला सांगितले. पण सिद्धीचे अन्न तू कधीही खाऊ नकोस असे सांगितले. बरेच दिवस तिथं राहिल्यावर जायच्या आधी दत्तात्रेयाने आपले नाव त्याला सांगितले आणि त्याचे नाव विचारून घेतले.

मग नेहमीच खेळताना नागनाथ ज्या पदार्थाचे नाव घेई तो पदार्थ उत्पन्न होऊ लागला, त्यामुळे मुले नित्य तृप्त होऊन जाऊ लागली. घरी गेल्यावर ती फार कमी जेवत. भूक नसण्याचे कारण आईबापांनी मुलांना विचारले असता आम्ही सुग्रास भोजन करून येतो असे सांगू लागली. सुरुवातीला आईवडिलांना हे खरे वाटले नाही. पण मग ते स्वतः भागीरथीच्या तीरावर जाऊन पाहून खात्री करून आले.

या गोष्टीची चर्चा सर्व गावभर झाली. नागनाथाचा बाप

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कोशधर्म याच्याही कानावर आली. बऱ्याच जणांनी त्याला सांगितले, की 'भागीरथीच्या तीरावर तुझा मुलगा अपार पंक्ती बसवून उत्तमोत्तम पक्वान्नांच्या जेवणावळी नेहमी घालत असतो. हे आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून आलो आहोत. तो अन्न कोठून आणतो व कसे तयार करतो हे आम्हाला कळत नाही. त्याने जमिनीवर हात ठेवला की पदार्थ तयार होतो.'

हे ऐकल्यावर कोशधर्माला देवाचे मागचे बोलणे आठवले, पण त्याने लोकांना काहीच बोलून दाखवले नाही. पुढे एके दिवशी कोशधर्माने वटसिद्ध नागनाथाला हाताला धरून मांडीवर बसवले आणि जेवणावळीसंबंधी विचारले. तेव्हा तो वडिलांना म्हणाला की, 'तुम्हालाही मी असेच भोजन घालून दाखवतो, असे म्हणून तो लगेच मांडीवरून उठला व जमिनीवर हात ठेवून अन्नाची इच्छा प्रकट केली. तोच उत्तम अन्नाने भरलेले ताट तेथे उत्पन्न झाले. ते पाहून कोशधर्मास फारच आश्चर्य वाटले.

मग कोशधर्माने त्याला विचारले, तुला ही सिद्धी कोणी दिली त्याचे नाव मला सांग.

त्यावर तो म्हणाला, 'बाबा, आम्ही मुले एकदा खेळत होतो. तिथे दत्तात्रेय नावाचा मुलगा आला. सर्व मुले त्याच्या अंगावर गेली. पण मी मात्र त्याची लटक्याच पदार्थांनी मनोभावे पूजा केली. तेव्हा त्याने माझ्या डोक्यावर हात ठेवून कानात काही मंत्र सांगितला व अन्न वाढायला लावले. आणि आता त्या दिवसापासून माझ्या हातून पाहिजे तो पदार्थ आपोआप निर्माण होतो.

मग त्या दिवसापासून कोशधर्म मुलांकडून अतिथि अभ्यागतांची पूजा करवून त्यास भोजन घालून पाठवू लागला, त्यामुळे दत्तात्रेयास आणखीनच आनंद झाला. मग नागनाथाकडे पुष्कळ

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अतिथी जेवून, द्रव्य, वस्त्र, धान्य वगैरे घेऊन तृप्त मनाने जाऊ लागले. त्यामुळे नागनाथ जगप्रसिद्ध झाला. प्रत्येकजण त्याची स्तुती करू लागला.

मग एके दिवशी नागनाथाने कोशधर्माला विचारले, 'माझ्या हातून या सर्व कोष्टी घडतात, यामागे परमेश्वराचा हेतु कोणता? आणि बालवेषात भेटलेला दत्तात्रेय नावाचा मुलगा कोण होता ते मला सांगा.'

तेव्हा कोशधर्म म्हणाला, 'तो दत्तात्रेय म्हणजे तिन्ही देवांचा अवतार होय. तुझे नशीब चांगले म्हणूनच तो तुला भेटून गेला.'

ते ऐकून नागनाथ म्हणाला, मग दत्तात्रेयाची भेट मला पुन्हा कशी होईल? त्यावर कोशधर्म म्हणाला, 'तो एके ठिकाणी नसतो. त्यामुळे आता त्याची भेट होणे कठीण. आपण कितीही त्याच्या भेटीची इच्छा केली तरी तो भेटतोच असे नाही. तो आपणहोऊन कृपा करून दर्शन देईल तेव्हा खरे.'

कोशधर्माचे बोलणे ऐकल्यावर नागनाथाने दत्तात्रेयाच्या दर्शनास जाण्याच्या निश्चय केला. मग एके दिवशी आईला विचारून तो मातापूर, पंचाळेश्वर वगैरे ठिकाणी शोध करू लागला, परंतु तेथे काहीच पत्ता न लागल्यामुळे तो कोल्हापुराला गेला व तेथे दत्तात्रेयाबद्दल चौकशी करू लागला. त्याचे बोलणे ऐकून लोक त्याला वेड समजून हसू लागले आणि म्हणाले, 'तू विचारतोस तो दत्तात्रेय इथे नेहमी येतो पण कोणाला दिसत नाही. कोणत्याही रूपाने येतो व भिक्षा मागून जातो.'

तेव्हा नागनाथाने विचारले, 'तो येथेच भिक्षेसाठी येण्याचे कारण काय? त्याला दुसऱ्या गावात भिक्षा मिळत नाही का?'

त्यावर त्या कोल्हापुरातल्या लोकांनी त्याला सांगितले, की, 'तो या कोल्हापुराशिवाय अन्य ठिकाणचे अन्न घेत नाही. येथे जर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अन्न मिळाले नाही तर उपास करतो, पण दुसऱ्या गावी भिक्षेसाठी जात नाही. इथले शाकपत्रही तो परम पवित्र समजून सेवन करतो.'

तेव्हा वटसिद्ध नागनाथाने विचार केला की, या गावातील सर्वांना जेवायला बोलवावे. त्यांना घरात चूल पेटवू देऊ नये. म्हणजे त्याला दुसरीकडे कोठेच अन्न मिळणार नाही व साहजिकपणेच तो आपल्याकडे येईल, परंतु आपल्याकडचे सिद्ध अन्न तो घेणार नाही, ही खूण जाणून त्याला ओळखावे आणि ती पटताच त्याचे पाय धरावे. असा विचार करून तो लक्ष्मीच्या देवळात गेला व पुजाऱ्याकडून एक ओवरी मागून घेऊन तेथे राहिला.

काही दिवस तेथे राहिल्यावर पुजाऱ्याला बोलावून तो म्हणाला, मला गावभोजन घालायची इच्छा आहे, तेव्हा आपण काही मदत करावी. अशी विनंती केली, तेव्हा तो पुजारी म्हणाला, 'सर्व गावाला जेवण घालायचे म्हणजे एवढ्या सर्वांना पुरेल एवढे अन्न तुझ्याजवळ कोठे आहे? बाकीची खटपट आम्ही करू, पण मुळात सामानच कोठून आणणार?'

तेव्हा नाथाने सांगितले, 'त्याची काळजी तुम्ही करू नका. सामानाची सगळी व्यवस्था मी करतो. पण तेवढी अन्य खटपट मात्र तुम्ही करा.'

पुजाऱ्याने त्याचे म्हणणे कबूल केले. शेवटी नाथाने द्रव्य,धान्य, तेल, तूप साखर वगैरे सर्व शिधा सिद्धीच्या सहाय्याने भरपूर आणून ठेवला व पुजाऱ्याला बोलावून ते सामान दाखविले.

❋ ❋ ❋

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ३७ वा

वटसिद्ध नागनाथाने मंदिरातील पुजाऱ्याला धान्याच्या राशी दाखविल्या आणि त्या संपेपर्यंत भोजनावळी चालू द्या असे म्हटले. त्याने जेवणावळीस अगदी राजापासून रंकापर्यंत व ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्वांना दोन्ही-तिन्ही वेळचे भोजनाचे आग्रहाचे आमंत्रण दिले. गावात कोणीही चूल पूटवू नये, असेही सांगितले. सर्व वर्णांच्या लोकांना भोजन सारखेच होते. निरनिराळ्या जातींच्या लोकांची उत्तम व्यवस्था ठेवून कार्याला प्रारंभ झाला होता.

अशा तऱ्हेने नागनाथाच्या प्रेमपूर्वक आमंत्रणामुळे गावात कोणीच स्वयंपाकासाठी चूल पेटवली नाही. अन्न घरी घेऊन जायलाही मोकळीक होती. कोरडे किंवा शिजलेले अन्न, जसे हवे असेल तसे व हवे असेल तेवढे घेऊन जाण्याची परवानगी होती, त्यामुळे गावात घरोघरी सिद्धीचे अन्नच होते. दिवा लावण्यापुरतीच लोकांना विस्तवाची गरज भासली. हा समाराधनेचा कार्यक्रम सतत महिनाभर चालला होता.

पहिल्याच दिवशी दत्तात्रेयाला भिक्षेची मारामार पडली. त्या दिवशी तो कुत्सित रूप घेऊन घरोघर भिक्षा मागत होता, पण तिथले लोक त्याला म्हणत, 'आज गावात मोठे प्रयोजन आहे तेथे जा. तिथे सर्व प्रकारचे अन्न मिळेल. अरे, उत्तम अन्न सोडून कदान्नासाठी गावात का भटकतोस उगाच? आम्हाला सगळ्यांनाच तेथे जेवायला जायचे आहे. कोणाच्या घरात चूलही पेटणार नाही. मग तुझ्यासाठी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अन्न कोण शिजविणार?'

लोकांचे हे बोलणे ऐकून, ते प्रयोजन पाहून यावे असं दत्तात्रेयाच्या मनात आले. तो तेथे गेला. अन्न कसे तयार होते हे तत्काळ त्याच्या लक्षात आले. सिद्धीच्या योगाने अन्नाच्या राशी झाल्या आहेत हे तो उमगला. मग ही मोठी समाराधना कोण घालीत आहे त्याची लोकांजवळ चौकशी केली असता त्याला वटसिद्ध नागनाथाचे नाव समजले.

ते ऐकून वीस वर्षांपूर्वी आपण ज्याला सिद्धी दिली तोच हा असून आपल्या दर्शनाच्या इच्छेने या गावी येऊन त्याने हे संतर्पण केले आहे, हे दत्तात्रेयाच्या लक्षात आले. त्या दिवशी त्याने उपवास केला. तो तेथून तसाच उपाशी परत जाऊ लागला. म्हणून लोकांनी त्याला पुष्कळ आग्रह केला, पण ते सिद्धीचे अन्न असल्यामुळे तो न जेवता परत गेला. तो दररोज गावात येऊन कोरडी भिक्षा मागे. कोणी विचारपूस केली तर तो सांगत असे की मी भिक्षेच्या अन्नाशिवाय दुसरे कुठलेच अन्न भक्षण करत नाही.

असे सांगून मग काशीला जाऊन जेवण करी. याप्रमाणे एक महिना उलटला. नागनाथाच्या मनात आले की, 'एक महिना उलटला तरी मला अजून स्वामीचे दर्शन होत नाही, असे कसे झाले!' मग त्याने गावातील लोकांना विचारले, 'गावात भिक्षा मागायला कोणी अतिथी येतो का?'

तेव्हा गावकऱ्यांनी सांगितले, 'तुम्ही म्हणता त्याप्रमाणे एक अतिथी भिक्षा मागायला नेमाने येतो. ती कोरान्नाची भिक्षा मागतो. त्याला विचारले असता भिक्षेशिवाय इतर अन्न खात नाही, असे त्याने सांगितले.

हे ऐकल्यावर नागनाथाने म्हटले, 'असा अतिथी पुन्हा आल्यास

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मला सांगा, मी त्याला विनंती करून भोजन घालीन.' असे लोकांना त्याने आवर्जून सांगितले व मग असेही सांगितले की, 'आणि एक गोष्ट नीट लक्षात ठेवा की त्या भिक्षा मागणाऱ्याला येथल्या अन्नाची भिक्षा त्याला सांगूनच घाला आणि ती जर त्याने घेण्यास नकार दिला तर झटकन् मला येऊन सांगा.'

असे पाच-पन्नास लोकांना नागनाथाने सांगून ठेवले होते. एके दिवशी दत्तात्रेय भिक्षेला आला. त्याला हे नाथाघरचे अन्न आहे असे सांगून लोक ठरल्याप्रमाणे भिक्षा घालू लागले, पण त्यामुळे ती भिक्षा तो घेईना. इतक्यात कोणीतरी जाऊन ही गोष्ट नाथाला सांगितली. नाथ ताबडतोब हातातले काम टाकून तेथे आला.

तेथे आल्यावर नाथाने प्रथम हात जोडून नमस्कार केला. मग पाया पडला आणि म्हणाला, 'वीस वर्षांत आपली भेट झाली नाही. आपण मला टाकून गेला. त्यामुळे मी अनाथ होऊन उघड्यावर पडलो आहे. आता आणखी अंत न पाहता माझ्यावर कृपा करावी.'

अशा तऱ्हेने त्याने दत्ताची खूप स्तुती केली. त्याच्या भक्तीची तीव्रता दत्तात्रेयाच्या ध्यानात आली. म्हणून त्याने त्याला उठवून जवळ घेतले व प्रेमभराने आलिंगन दिले. नागनाथाचे अश्रू पुसले व त्याला एकांतात नेऊन आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवून कानात मंत्र सांगितला.

आत्मखूण पटताच तो ब्रह्मरूप झाला व त्याच्या अज्ञानाचा समूळ नाश केला. मग दत्ताने आपले स्वरूप प्रकट केले. त्यामुळे खूप आनंद झाला. मग तो दत्तात्रेयाच्या पुन्हा पाया पडला. त्याला दत्तात्रेयाने जवळ घेऊन म्हटले तू अविर्होत्र नारायणाचा अवतार आहेस, म्हणूनच मी त्यावेळी तुला सिद्धी दिली होती. तुझी भेट घेण्याची फार इच्छा होती; पण तो योग आज घडून आला.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मग ते तेथून काशीला जायला निघाले. निघताना प्रथम दत्ताने यानमंत्राने भस्म मंत्रून नाथाच्या कपाळी लावले. त्यामुळे ते पवन-वेगाने काशीला पोहोचले. तेथे सर्व नित्यनेम उरकून ते यानास्त्र जपून लगेच बद्रिकाश्रमात गेले. तेथे शिवालयात जाऊन दत्तात्रेयाने उमाकांताची भेट घेतली. नंतर त्याने हा कोण म्हणून दत्ताला विचारले. तेव्हा दत्तात्रेयाने त्याला सांगितले, की 'हा नागनाथ म्हणजेच अविर्होत्र नारायणाचा अवतार आहे.'

हे समजल्यावर शंकराने त्याला नाथपंथाची दीक्षा देण्यास सांगितले. दत्तात्रेयाने ते लगेच कबूल केले. नंतर नागनाथासह दत्तात्रेय सहा महिने तिथे राहिले. त्या सहा महिन्यात नाथाला सर्व विद्यात आणि चौसष्ट कलातही दत्तात्रेयाने निष्णात केले. मग दत्तात्रेयाने सर्व शस्त्रास्त्रविद्यातही त्याला निपुण केले व नंतर बद्रिकाश्रमात नेऊन तपश्चर्येला बसविले. त्याला नाथदीक्षा दिली, तेथे त्याने बारा वर्षे तप केले. मग सर्व देवांनी त्याला अनेक वर दिले.

मग मावंदे करून त्याने सर्व देवांना संतुष्ट केले. मावंदे झाल्यावर सर्वजण आपापल्या स्थानी परत गेले. नंतर दत्तात्रेयाने नाथाला तीर्थयात्रेला जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे नागनाथ दत्तात्रेयाच्या पाया पडून लगेच तीर्थयात्रेस निघाला. दत्तात्रेयही गिरनार पर्वतावर गेला.

नागनाथ यात्रा करत करत बालेघाटास पोहोचला. तेथे तो अरण्यात राहिला. तरीही निरनिराळ्या गावातील लोक त्याच्या दर्शनाला येऊ लागले. त्या लोकांनी त्याला तेथे राहायचा आग्रह केला आणि अनेक लोकही तिथे येऊन राहिले. त्या वस्तीचे नाव वडवळ असे ठेवले. एक दिवस मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रा करीत वडवळ गावी आले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गावात आल्यावर नागनाथाची कीर्ती ऐकून ते नाथाच्या दर्शनाला गेले, परंतु शिष्यांनी दारातच त्याला आत जाण्यास मनाई केली. ते म्हणाले, 'नाथबाबा, पुढे जाऊ नका. आम्ही आधी आत जाऊन सांगतो व मग तुम्हाला दर्शन घडवतो. त्याच्या परवानगीशिवाय तुम्हाला आत जाता येणार नाही.'

शिष्यांचे बोलणे ऐकून मच्छिंद्रनाथाला राग आला. देवाच्या किंवा साधूच्या दर्शनाला जायला परवानगी कशाला पाहिजे? मच्छिंद्रनाथाने रागाने एकदम त्या शिष्यांच्या थोबाडीत मारल्या. त्याबरोबर दुसरे सातशे शिष्य पहिल्याच्या मदतीला आले, परंतु त्या सर्वांना मच्छिंद्रनाथाने स्पर्शास्त्राच्या सहाय्याने जमिनीला चिकटवून टाकले व सगळ्यांनाच तो थोबाडीत मारू लागला. तेव्हा त्यांनीं रडून-ओरडून आकांत केला.

नागनाथ मठामध्ये ध्यान लावून बसला होता, ही गडबड ऐकून तो बाहेर आला. ध्यानात विघ्न आल्यावर नागनाथाला फार राग आला होता. त्यातून त्याने शिष्याची अवस्था समक्षच पाहिली. मच्छिंद्रनाथा त्यांना थोबाडीत मारत होता हेही त्याने पाहिले.

तेव्हा त्याने प्रथम गरुडबंधनविद्या जपून स्वर्गात गरुडाचे बंधन केले व नंतर विभक्तास्त्राच्या सहाय्याने आपल्या शिष्यांना मुक्त केले. शिष्य मुक्त होताच ते नागनाथाच्या पाठीमागे जाऊन उभे राहिले. त्या सर्वांचे चूर्ण करण्याचा विचार मच्छिंद्रनाथाच्या मनात आला. त्याने लगेच पर्वतास्त्राची योजना केली. नागनाथाने वज्रास्त्राचा जप केला. म्हणून त्या दोघांनी परस्परांवर विविध अस्त्रांचे प्रयोग केले. शेवटी नागनाथाने सर्पास्त्राची योजना करून मोठमोठे सर्प उत्पन्न केले. ते सर्प मच्छिंद्रनाथास दंश करू लागले, तेव्हा मच्छिंद्रनाथाने गरुडास्त्राची योजना केली, परंतु नागनाथाने पूर्वीच गरुडास बांधून टाकल्यामुळे मच्छिंद्रनाथाच्या गरुडास्त्राचा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रभाव नाहीसा झाला. सर्पाच्या दंशांनी मच्छिंद्रनाथास अगदी मरणोन्मुख करून टाकले. शेवटी त्याने गुरूचे स्मरण केले, 'हे देवा दत्तात्रेया! आता वेळ न घालवता धावून ये.'

मच्छिंद्रनाथाने दत्तात्रेयाचे नाव घेताच नागनाथास आश्चर्य वाटले व तो संशयात पडला. त्याच्या मनात आले, 'आपल्या गुरूचे स्मरण करणारा हा कोण? कोणाचा शिष्य?' मग तो मच्छिंद्रनाथाजवळ गेला आणि त्याने त्याची चौकशी केली तेव्हा 'आदेश' करून मच्छिंद्रनाथाने आपले नाव सांगून म्हटले, 'माझा गुरू दत्तात्रेय. त्याचा मी शिष्य आहे. माझ्यानंतर जालिंदर मग भर्तृहरी, त्यामागून रेवण. या नाथपंथाच्या आरंभीचा मीच आहे, म्हणजे मी दत्तात्रेयाचा मोठा मुलगा आहे.'

मच्छिंद्रनाथाने आपली हकीकत सांगितल्यावर नागनाथाचे हृदय उचंबळून आले. त्याने लगेच गरुडाचे बंधन सोडून गरुडास्त्राचा जप केला. त्याबरोबर गरुड खाली उतरला व सर्प भयभीत होऊन गेले आणि विष शोषून अदृश्य झाले. गरुडाचे काम होताच तो दोघा नाथांना नमस्कार करून स्वर्गात परत गेला. नंतर नागनाथ मच्छिंद्रनाथाच्या पाया पडला व म्हणाला, 'वडील बंधू पित्यासमान असतात म्हणून तुम्ही मला गुरूच्या ठिकाणी आहात. मला क्षमा करावी.'

नंतर तो त्याला मठात घेऊन गेला. मच्छिंद्रनाथ महिनाभर तिथे राहिला. एके दिवशी मच्छिंद्रनाथाने नागनाथाला विचारले, 'तू दाराशी सेवक ठेवून लोकांना आत जाण्यास प्रतिबंध का करतोस? भाविक लोक मोठ्या भक्तीने दर्शनास येतात, परंतु तुझे शिष्य त्यांना आत जाऊ देत नाहीत. त्यामुळे ते निराश होऊन परत जातात. तंटा होण्याचे मूळ कारण हेच आहे.'

हे ऐकून नागनाथ म्हणाला, 'मी निरंतर ध्यानस्थ बसतो. लोक

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

येतात आणि माझ्या ध्यानात व्यत्यय येतो, म्हणून दाराशी रक्षक ठेवले.'

यावर मच्छिंद्रनाथाने त्याला सांगितले, 'हे चांगले नाही. लोक पावन व्हावयास आपल्याकडे येतात व ते दारातून परत जातात; तेव्हा आतापासून मुक्तद्वार ठेव.'

असे सांगून मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रेस गेले. इकडे दाराशी मनाई नसल्यामुळे नागनाथाच्या दर्शनास लोकांची गर्दी होऊ लागली. नाथाच्या शिष्यांतच चांगुणा म्हणून एक शिष्य होता. त्याची स्त्री मठात मृत्यू पावली. तिला नाथाने पुन्हा जीवदान दिले. या गोष्टीचा सगळीकडे बोभाटा झाला. मग कोणी मेले म्हणजे त्याच्या घरचे लोक ते प्रेत मठात नेत आणि नागनाथ त्यास जिवंत करीत असे, परंतु अशामुळे यम संकटात आला. त्याने ही गोष्ट ब्रह्मदेवास सांगितली. मग ब्रह्मदेव स्वतः वडवाळेस आला व त्याने नागनाथाला सांगून या गोष्टी बंद करविल्या.

❄ ❄ ❄

अध्याय ३८ वा

पूर्वी हिमालयाची कन्या पार्वती हिच्या विवाहसमयी सर्व देव, दानव, हरिहर, ब्रह्मदेव वगैरे सर्व देवगण जमले होते. तेव्हा पार्वतीचे अनुपम लावण्य पाहून ब्रह्मदेवाची कामवासना उफाळून आली. ती

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्याच्या आवाक्याबाहेर जाऊन वीर्यपतन झाले. त्यामुळे ब्रह्मदेवाला संकोच वाटला आणि त्याने ते वीर्य टाचेनेच रगडले, म्हणून त्याचे खूप भाग झाले.

एका बाजूस त्याचे साठ हजार भाग झाले आणि त्यापासून साठ हजार वालखिल्य ऋषी निर्माण झाले. दुसऱ्या बाजूला गेलेला एक भाग तसाच पडून राहिला होता. सेवकांनी केर काढताना त्यात तो गेला. पुढे लग्नविधी व्यवस्थित पार पडल्यावर लाजाहोमाचे भस्म व तो केर नोकरांनी नदीत टाकून दिला. त्यामुळे त्यात ते रेतही पाण्याबरोबर वाहात गेले. वाहात वाहात ते एका ठिकाणी गवतात अडकून राहिले. पुष्कळ दिवस ते रेत तसेच राहिले. पुढे काही दिवसांनी पिप्पलायन नारायणाने त्यात संचार केला व चरपटीनाथाचा अवतार धारण केला. हा मुलगा नऊ महिन्यांनंतर दृष्टीला दिसू लागला.

सत्यश्रवा या नावाचा एक ब्राह्मण पुनीत नावाच्या गावात राहात होता. तो एक दिवस भागीरथीच्या काठावर दर्भ गोळा करण्यास गेला होता. त्याला हा सूर्याप्रमाणे तेजःपुंज मुलगा दिसला. त्याचे ते अनुपम तेज पाहून सत्यश्रव्याच्या मनात अनेक तर्कवितर्क येऊ लागले, 'एवढे तेजस्वी मूल कोणाचे असेल? उर्वशीने तर आपले मूल टाकले नसेल ना?' त्याच्या मनात विचारांचा गोंधळ झाला. तो सारखा त्या मुलाकडे पाहात होता, परंतु त्याला घरी न्यायचा धीर होता नव्हता. हे मूल कोणाचे हे न समजल्याने तो त्याला उचलेना. त्यामुळे त्याच्या मनाची अवस्था द्विधा झाली. मुलगा हातपाय हलवून रडू लागला.

स्वर्गातल्या देवांनी मुलाला पाहिले. हा पिप्पलायन नारायणाचा अवतार आहे हे जाणून देवांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी केली. मुलाच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अंगावर पडणारी फुले सत्यश्रवा काढू लागला, पण ती संपत नव्हती. त्यामुळे हा पिशाचाचा खेळ असावा असे त्याला वाटले. म्हणून तो घाबरून दर्भही न घेता पळत सुटला. ते पाहून देवांना हसू आले. ते म्हणू लागले, 'सत्यश्रवा, पळू नको, उभा राहा.'

हे शब्द ऐकून सत्यश्रवा आणखीनच घाबरला आणि पूर्वीपेक्षा अधिक वेगाने पळू लागला.

मग तो मुलगा सत्यश्रव्याच्या हवाली करण्यासाठी स्वर्गातल्या देवांनी नारदाला पाठविले. नारद ब्राह्मणाच्या वेषात सत्यश्रव्यापुढे येऊन उभा राहिला. धावण्यामुळे नारदाला धाप लागली होती. त्याचा जीव कासावीस झाला होता. नारदाने त्याला थांबवून घाबरण्याचे कारण विचारले. तेव्हा त्याने मनातली भीती ब्राह्मणाला बोलून दाखविली.

नारदाने त्याला एका झाडाखाली नेऊन बसविले. जरा वेळाने तो शांत झाल्यावर त्याला पिप्पलायनाच्या जन्माची सर्व माहिती सांगितली. भूतचेष्टा नसल्याची त्याची खात्री पटवली आणि मुलाला घरी नेऊन त्याचे संगोपन करायला सांगितले. शेवटी नारद त्याला म्हणाला, 'हा पिप्पलायन नारायणाचा अवतार आहे, यावर तू विश्वास ठेव. कारण देवांचे बोलणे मी ऐकले आणि ते तुला सांगितले. आता मनात कोणतीही शंका किंवा संशय ठेवू नकोस.'

नारदाने असे म्हटल्यावर आपले नाव स्वर्गात कसे कळले असा संशय सत्यश्रव्याला आला व क्षणभर तो उभा राहिला. एवढ्यात सत्यश्रव्याने वर पाहिले, तो त्याला सर्व देवांचे दर्शन झाले! ही सर्व नारदाची कृपा होती. ते पाहून सत्यश्रव्याने नारदाला सांगितले, 'तू म्हणतोस ते खरे आहे. मला येथून सर्व देव दिसत आहेत, पण आता तू माझ्याबरोबर चल आणि गवतातला तो मुलगा काढून माझ्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्वाधीन कर.'

नारदाने हे लगेच मान्य केले. ते दोघे बाळाजवळ गेले आणि नारदाने मोठ्या आनंदाने मुलगा सत्यश्रव्याच्या हातात दिला व त्याचे नाव 'चरपटीनाथ' ठेवण्यास सांगितले. नंतर नारद स्वर्गात गेला. सत्यश्रवा मुलाला घेऊन घरी आला.

सत्यश्रव्याची पत्नी चंद्रा ही लावण्यवती होती; शिवाय पतिव्रता म्हणून नावाजली जात होती. ती वृत्तीने फार धार्मिक होती. घरी आल्यावर सत्यश्रवा तिला म्हणाला, 'मी दर्भ आणण्यासाठी भागीरथीच्या काठावर गेलो होतो. तिथे मला हा लाभ झाला. देवाने आज आपल्याला हा मुलगा दिला आहे. याला 'चरपटी' नावाने हाक मारीत जा. याच्या योगाने आज मला देवाचे दर्शन झाले.'

मग ही सर्व हकीकत त्याने सांगितल्यावर चंद्राला फार आनंद झाला. दर्भाच्या निमित्ताने आज वंशवेल आपल्या हाती लागला, असे तिला वाटले. तिने त्या मुलाला जवळ घेतले. त्याला न्हाऊमाखू घालून स्तनपान करविले व पाळण्यात घालून त्याचे 'चरपटी' असे नाव ठेवून ती गाणी म्हणू लागली.

चंद्रा त्याचे मनापासून लालनपालन करीत होती. अशी सात वर्षे गेली. सातव्या वर्षी त्याची सत्यश्रव्याने यथाविधी मुंज केली व त्याला वेदशास्त्रात निपुण बनवले. नंतर एके दिवशी नारद फिरत फिरत ब्राह्मणरूपाने त्याच गावात आले. सत्यश्रव्याच्या घरी गेले. त्यांनी चरपटीनाथाला पाहिले तेव्हा तो बारा वर्षांचा होता. ब्रह्मदेवाच्या वीर्यापासून चरपटीची उत्पत्ती झाल्यामुळे तो आपला भाऊ आहे असे समजून नारदांना त्याच्याबद्दल विशेष प्रेम वाटले.

यानंतर नारद तेथून निघून बद्रिकाश्रमात गेले. तेथे त्यांनी शंकर, दत्तात्रेय व मच्छिंद्रनाथ या सर्वांची भेट घेतली. मग चौघेजण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

बोलत असताना नारदांनी त्यांना चरपटीनी पहिल्यापासूनची माहिती सांगितली. ती ऐकून शंकराने दत्तात्रेयाला सांगितले, 'तुमची नवनारायणांना नाथ करण्याची इच्छा आहे, तेव्हा चरपटीलाही आपण दीक्षा देऊन नाथपंथात आणावे.'

शंकराचे म्हणणे ऐकून दत्तात्रेय त्याला म्हणाले, 'पश्चात्तापाशिवाय दीक्षा देता येत नाही. तेव्हा चरपटीला अनुताप झाल्यानंतर पाहू.'

यावर नारद म्हणाले, 'हे खरे आहे. चरपटीच्या ठिकाणी पश्चात्ताप होईल अशी व्यवस्था मी करतो. पण आपण मात्र अनुग्रह देण्याची सिद्धता करावी.'

असे सांगून नारद पुन्हा आपल्या कामासाठी निघाले. ते सत्यश्रव्याच्या गावी आले आणि त्याला म्हणाले, 'मी येथे विद्यार्थी होऊन राहातो, तेव्हा मला विद्या शिकवण्याची कृपा करावी.'

सत्यश्रव्याने त्याच्या बोलण्यास मान्यता दिली. नारदाला तो कुलंब ह्या नावाने हाक मारीत असे. मग कुलंब व चरपटी हे दोघे तिथे विद्याभ्यास करू लागले.

सत्यश्रवा हा ग्रामजोशी होता. एके दिवशी एका यजमानाकडे ओटी भरण्याचा कार्यक्रम होता. त्यासाठी त्याने सत्यश्रव्याला बोलावले होते; परंतु सत्यश्रवा पूजेला बसला होता म्हणून त्याने यजमानाकडे चरपटीला पाठवले व त्याच्याबरोबरच कुलंबालाही मदतीसाठी पाठवले. तेथे गेल्यावर चरपटीने कार्यक्रम यथाविधी पार पाडला. मग यजमानाने त्याला देण्यासाठी दक्षिणा आणली.

नारदाला पूर्वगोष्टीचे स्मरण झाले. आणि ही संधी साधून चरपटीला पश्चात्ताप घडवावा असे त्यांना वाटले. ते चरपटीला म्हणाले, 'तू या वेळेस दक्षिणा घेऊ नकोस. कारण आपण दोघे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अज्ञानी विद्यार्थी आहोत. दक्षिणा किती घ्यायची ते आपल्याला समजत नाही. त्यामुळे यजमानही जास्त न देता कमीच देईल. तेव्हा आता दक्षिणा न घेताच घरी चल. मागून सत्यश्रवा येऊन दक्षिणा नेईल.'

कुलंबाचे बोलणे ऐकून तो म्हणाला, 'अरे, पण मी रिकाम्या हाताने कसा घरी जाऊ?'

तेव्हा नारद म्हणाले, 'तू घेतलेली दक्षिणा जर कमी असेल तर ती तुझा पिता कबूल करणार नाही.'

तेव्हा चरपटी म्हणाला, 'मी यजमानापासून युक्तीने जास्त दक्षिणा घेतो. वाजवीपेक्षा जास्त दक्षिणा पाहिल्यावर बाप रागवेल कशाला? उलट शाबासकी देईल, नाही का?'

अशा तऱ्हेने त्याचा वाद चालू असताना यजमानाने थोडीशी दक्षिणा भिजवून चरपटीच्या हातावर ठेवली. नारदांनी आधीच कळ लावून दिली होती. त्यात आणखी दक्षिणाही मनाप्रमाणे मिळाली नाही. ते पाहून चरपटीला राग आला. तो यजमानाला म्हणाला, 'तुम्ही मला ओळखलं नाही. कोणत्या कार्यात कोणत्या ब्राह्मणाला किती दक्षिणा द्यायची हे तुम्हाला कळत नाही?'

ते ऐकून यजमान म्हणाला, 'अरे भटा, ऐकून घे. याचकाला खूप पैसा द्यावा हे खरे, पण दात्याजवळ सामर्थ्य नसेल तर तो काय करील?'

त्यावर चरपटी रागाच्या भरात म्हणाला, 'आपल्या सामर्थ्यानुसार कामाला हात घालावा.'

अशा तऱ्हेने दक्षिणेबद्दल दोघांचे भांडण चालू असताना नारद सत्यश्रव्याकडे येऊन म्हणाले, 'चरपटीने दक्षिणेसाठी यजमानाशी मोठे भांडण करून त्याचे मन दुखविले आहे. तो म्हणाला, लोक आधीच, ब्राह्मण असंतुष्ट असतात असे बोलतात. त्यातून चरपटीने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हे भ्रष्ट कृत्य केले आणि तुमचे बरेच नुकसान केले आहे. आपण पडलो याचक. आर्जव करून यजमानाला खूष करून त्याच्यापासून पैसे घेतले पाहिजेत.'

नारदांकडून हे ऐकताच सत्यश्रवा रागावला व पूजा उरकून लगेच यजमानाकडे गेला. तेथे त्या दोघांची सर्व बोलाचाली त्याने समक्षच ऐकली. त्यामुळे त्याला मुलाचा जास्तीच राग आला. यजमानाबरोबर अशा तऱ्हेने भांडल्यामुळे त्याने मुलाच्या खाडकन् तोंडात मारली.

चरपटी अगोदर रागातच होता. त्यात बापाने शिक्षा केली. त्यामुळे रागाच्या भरात तो तिथून निघून गावाबाहेर भगवतीच्या देवळात जाऊन बसला. नारदांच्या हे सर्व लक्षात आले. कारण ते अंतर्ज्ञानी होते. मग दुसऱ्या ब्राह्मणाचे रूप घेऊन ते भगवतीच्या देवळात दर्शनासाठी गेले.

दर्शन घेतल्यावर ते चरपटीजवळ जाऊन, तुम्ही कोण, कोठे राहता वगैरे चौकशी करू लागला. तेव्हा चरपटीने त्याला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून ब्राह्मणरूपी नारद म्हणाले, 'सत्यश्रवा ब्राह्मणाला वेड लागलेले दिसते. अविचाराने वागून मुलगा मात्र दुखावला. त्या मूर्ख म्हाताऱ्याची बुद्धी चळली. पुत्रमर्यादा राखून आपला मान सांभाळावा लागतो. आता तू त्याला पुन्हा तोंड म्हणून दाखवू नकोस. खुशाल त्याला सोडून अरण्यात निघून जा.'

याप्रमाणे नारदाने उपदेश करताच चरपटीला अधिकच राग आला आणि त्याला पूर्ण पश्चात्ताप झाला व त्याने पुन्हा घरी न जाण्याचे ठरविले. मग तो त्या ब्राह्मणाला म्हणाला, 'तुम्ही माझ्या घरी जाऊन गुपचूपपणे त्या कुलंबाला घेऊन या. मग आम्ही दोघे मिळून कोठे तरी दुसऱ्या देशात जाऊन विद्याभ्यास करून आनंदाने राहू.'

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हे ऐकून तो ब्राह्मणरूपी नारद कुलंबाला आणण्यासाठी बाहेर गेला. थोड्याच वेळात कुलंबाचा वेष घेऊन तो आला. नंतर या रागीट सत्यश्रव्याजवळ न राहाता दुसरीकडे कोठे तरी जाऊन विद्याभ्यास करावा असे कुलंबाचेही मत पडले. ते उभयता निघाले: ते खूप लांब गेल्यावर कुलंब त्याला म्हणाला, 'आता आपण प्रथम बद्रिकाश्रमात जाऊन बद्रिकेदारचे दर्शन घेऊ आणि मग काशीला जाऊन तेथे विद्याभ्यास करू. कारण तिथे खूप विद्वान ब्राह्मण आहेत.'

कुलंबाच्या म्हणण्यानुसार ते दोघे बद्रिकाश्रमात गेले. तेथे देवालयात जाऊन त्यांनी बद्रिकेदारास नमस्कार केला. इतक्यात तिथे दत्तात्रेय व मच्छिंद्रनाथ प्रकट झाले. कुलंबाने दत्तात्रेयाच्या पाया पडून मच्छिंद्रनाथासही नमस्कार केला. चरपटीही दोघांच्या पाया पडला. आणि हे कोण आहेत म्हणून त्याने कुलंबाजवळ चौकशी केली. तेव्हा कुलंबाने त्याला त्यांची नावे सांगितली. नंतर स्वत:चेही खरे स्वरूप त्याला सांगितले. तो म्हणाला, 'तुझे कार्य करण्यासाठी मी कुलंबाचा वेष घेऊन तुझ्याबरोबर वावरत होतो.'

हे ऐकताच चरपटी नारदाच्या पाया पडला आणि दर्शन देण्यासाठी विनंती करू लागला, तेव्हा नारदाने त्याला सांगितले, 'हे बघ, आम्ही तिघे तुला प्रकट दर्शन देऊ, परंतु गुरुप्रसादाशिवाय आम्ही तुला दिसणार नाही. गुरूने तुझ्या कानात मंत्र सांगितला की, सर्व जग ब्रह्मरूप दिसू लागेल.'

त्यावर चरपटी म्हणाला, 'त्रिभुवनात तुमच्याहून श्रेष्ठ असा कोणता गुरू मी शोधून काढू? तेव्हा आता तुम्हीच मला येथे अनुग्रह देऊन सनाथ करावे.'

तेव्हा नारद दत्तात्रेयाला म्हणाला, 'हे काम तुम्ही करा. मग

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दत्ताने चरपटीच्या मस्तकावर हात ठेवला व कानात मंत्र सांगितला. त्यामुळे त्याचे अज्ञान दूर झाले व त्याला दिव्यज्ञानाची प्राप्ती झाली. यानंतर चरपटीनाथास त्याने दर्शन दिले. त्या तिघांच्या पायावर त्याने मस्तक ठेवले. शंकरही तिथे प्रकट झाले व त्यांनी चरपटीनाथाला दर्शन दिले. प्रेमाने त्याला कुरवाळले आणि विद्याभ्यास करवून घेऊन नाथपंथाची दीक्षा देण्यास दत्तात्रेयास सांगितले.

मग दत्तात्रेयाने शंकराच्या सूचनेप्रमाणे त्याला सर्व विद्या शिकवल्या. संपूर्ण अस्त्रविद्येत निपुण केले व तपश्चर्येस बसवले. पुढे नागअश्वत्थावर जाऊन, बारा वर्षे राहून वीरसाधन करविले व नवकोटी सात लक्ष साबरी कवित्व केले. मग त्याला सर्व देवांनी येऊन मनापासून आशीर्वाद दिले. नंतर दत्तात्रेय गिरनार पर्वतावर गेले व चरपटीनाथ तीर्थयात्रेला निघाला. त्याने रामेश्वर, काशी वगैरे बहुतेक सर्व तीर्थे उरकली. त्याने पुष्कळ शिष्य केले. त्यांतून सिद्धकला जाणणारे नऊ शिष्य उदयास आले.

❋ ❋ ❋

अध्याय ३९ वा

चरपटीनाथाने पृथ्वीवरील गया, प्रयाग, काशी, रामेश्वर इ. सर्व तीर्थयात्रा केल्यावर, स्वर्ग, पाताळ या ठिकाणच्याही तीर्थयात्रा कराव्या, असे त्याच्या मनात आले. मग तो बद्रिकाश्रमात गेला आणि त्याने शंकराचे दर्शन घेतले. मग तेथेच त्याने यानास्त्राचा प्रयोग मंत्रून ते भस्म कपाळाला लावले व तो स्वर्गात जायला निघाला. प्रथम तो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सत्यलोकामध्ये गेला. तिथे ब्रह्मदेवाच्या पाया पडून, हात जोडून उभा राहिला. त्याला पाहून ब्रह्मदेव हा योगी कोण, कोठून आला वगैरे चौकशी करू लागले. त्यावेळी नारद तिथेच होता. त्याने चरपटीची जन्मापासूनची सर्व हकीगत कथन केली.

ती ऐकल्यावर ब्रह्मदेवाने आनंदाने त्याला मांडीवर घेऊन, येण्याचे कारण विचारले. तेव्हा तुमच्या दर्शनासाठी आलो असे चरपटीनाथाने सांगितले. मग ब्रह्मदेवाने त्याला तेथेच राहाण्याचा खूप आग्रह केला. ब्रह्मदेवाच्या आग्रहासाठी तो तेथे एक वर्ष राहिला. चरपटीनाथ व नारद एकमेकांच्या विचाराने राहात होते.

एके दिवशी नारद अमरपुरीस गेला. त्याला पाहून इंद्राने विनोदाने म्हटले, 'यावे कळीचे नारद.'

इंद्राचे शब्द ऐकून नारदाला राग आला. तो मनात म्हणू लागला, तुलाही एकदा अद्दल घडविल्याशिवाय राहणार नाही. असा विचार करीतच नारद तेथून निघून गेला.

या गोष्टीला काही दिवस झाले तरी नारदाच्या मनात इंद्राचे शब्द घर करून होते. चरपटीनाथाकडून इंद्राची फजिती करण्याचा बेत नारदाने आखला. नारद एके दिवशी फिरण्यासाठी चरपटीनाथाला बरोबर घेऊन इंद्राच्या बागेत गेला. जाताना चरपटीनाथ हळूहळू चालत होता. तेव्हा या चालीने आपण लवकर पोहोचणार नाही, असे नारदाने त्याला म्हटल्यावर चरपटीनाथ म्हणाला, 'आम्हा मनुष्याची चालायची गती एवढीच. चपळपणांचा एखादा उपाय तुम्हाला माहीत असल्यास तो योजावा आणि मला घेऊन जावे.'

मग नारदाने त्याला गमनकला अर्पण केली. ती कला विष्णूकडून नारदाला मिळाली होती. त्यामुळे इच्छिल्या जागी जाता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

येते. ती चरपटीनाथास आता प्राप्त झाली. त्रिभुवनातील सर्व गोष्टी डोळ्यांना दिसू लागतात. लोकांची आयुष्ये कळतात. चोरून केलेली कामे समजतात. कोण कुठे आहे हे लक्षात येते. अशी ती गमनकला चरपटीनाथाला प्राप्त होताच त्याला खूप आनंद झाला.

मग डोळ्याचे पाते लवते न लवते व तोच ते अमरपुरीला इंद्राच्या बागेत पोहोचले. तिथे गेल्यावर चरपटीनाथ नारदाला म्हणाला, 'मला बागेतली फळे खावीत असे वाटते.'

नारद त्याला म्हणाले, 'मग तुझा हात कोण धरणार? तुला खायची तेवढी फळे खा.'

मग चरपटीनाथाने भरपूर फळे तोडून खाल्ली. नंतर तेथली बरीचशी फुले तोडून ब्रह्मदेव देवपूजेला बसले होते, तेथे नेऊन ठेवली. याप्रमाणे तो नेहमी इंद्राच्या बागेत जाऊन फळे खात असे व फुले घेऊन जात असे.

त्याच्या या प्रकाराने बागेचा नाश होऊ लागला. हा नाश कोण करतो, याचा इंद्राचे माळी शोध घेऊ लागले. पण त्यांना काही केल्या पत्ता लागेना. मग एके दिवशी तो लपून बसला. थोड्या वेळाने नित्याप्रमाणे नारद व चरपटीनाथ दोघे बागेत शिरले. चरपटी फळे तोडू लागला, तोच रक्षकांनी मागून येऊन नाथाला धरले. ते पाहून नारद सत्यलोकास पळून गेला. इकडे रक्षकांनी चरपटीनाथाला यथेच्छ बडवले. त्यामुळे त्याला राग आला. त्याने लगेच वाताकर्षण अस्त्र सोडले. त्यामुळे त्यांचे प्राण कासावीस झाले. श्वासोच्छ्वास बंद पडले. डोळे पांढरे झाले. तोंडातून रक्त येऊ लागले.

त्या माळ्यांची ही स्थिती पाहून अन्य माळी घाबरून मागच्या मागेच पळून गेले आणि त्यांनी इंद्राला जाऊन सांगितले की, 'एक सूर्यासारखा तेजस्वी मुलगा बागेत फिरत आहे. त्याला आपल्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रक्षकांनी हटकले तर त्याने त्यांचे प्राण घेतले. सर्व बागेची नासधूस केली आहे. आमचे त्याच्यापुढे काहीच चालत नाही, म्हणून आम्ही तुम्हाला सांगायला येथे आलो.'

हे ऐकून इंद्राने देवसेनेला बोलावून सांगितले की, तुम्ही त्याला पकडून शिक्षा करून इथे आणा. तो आवरत नाही असे दिसले तर युक्ति-प्रयुक्तीने धरून आणा. देवांची ती सेना पाहून चरपटीनाथाने चातुर्याने वाताकर्षणाच्या सहाय्याने सर्वांची फटफजिती केली.

देवसेनेची वार्ता समजण्यासाठी इंद्राने दूत पाठविले होते. त्यांनी तिथली वार्ता इंद्राला सांगितली, की देवांचे त्याच्यापुढे काही चालत नाही. तो पुढे येऊन तुमचेही प्राण घेईल आणि सर्व नगरी ओसाड करील असे वाटते. तो लहान दिसत असला तरी कृतांतासारखा आहे.

हे ऐकून इंद्र घाबरला. त्याने लगेच ऐरावत तयार करण्याची आज्ञा केली. तेव्हा हेर त्याला म्हणाले, 'त्या मुलाच्या हातात धनुष्यबाण नाही किंवा कोणतेही अस्त्र नाही. कोणती तरी विद्या त्याला साध्य झाली आहे. पाहता पाहता तो लोकांना मरणोन्मुख करतो. आपण तेथे जाऊ नये. येथूनच काही उपाय करावा, नाही तर शंकराला मदतीला आणावे. म्हणजे तो लगेच देवांना उठवील, नाही तर सर्व देव मरून जातील.'

हेराचे बोलणे ऐकून इंद्र कैलासाला आला. शंकराच्या पाया पडून त्याने घडलेला सर्व वृत्तान्त त्याला सांगितला. शंकराने तो कोण आहे असे विचारले, तेव्हा इंद्र म्हणाला, 'मी त्याला अद्याप पाहिलेला नाही. त्याने माझ्या बागेचा नाश केला, म्हणून मी सैन्य पाठवले, परंतु ते सर्व मरणोन्मुख झाले. म्हणून मी पळत येथे आलो आहे.'

हे ऐकून शंकराने आपल्या गणांना त्याच्यावर चालून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जाण्यासाठी सिद्ध रहायला सांगितले आणि विष्णूलाही बरोबर येण्याचा निरोप दिला. मग अष्टभैरव, अष्टपुत्र व गण असा शतकोटी समुदाय बरोबर घेऊन शंकर अमरावतीस गेले. ती प्रचंड सेना पाहताच चरपटीनाथाने वाताकर्षण मंत्र जपला. त्यामुळे शिवासह सर्व हवालदिल झाले. इंद्र, शंकर आणि त्याची प्रचंड सेना मूर्च्छित पडलेली पाहून नारद इंद्राकडे पाहून हसू लागला आणि मनात म्हणाला, 'अहंकारी माणसाला शिक्षा झाली, हे बरे झाले.'

शिवदूतांनी वैकुंठाला जाऊन हा प्रकार विष्णूला सांगितला. त्यामुळे छपन्न कोटी अनुयायांसह विष्णू तडक अमरावतीला गेला.

शिवासह सर्वांची झालेली दयनीय अवस्था पाहून विष्णूला राग आला. त्याने आपल्या गणांना युद्ध करण्याची आज्ञा केली. आपण स्वत: हातात गांडीव धनुष्य व सुदर्शन घेऊन युद्धास सज्ज झाला, पण चर्पटीनाथाने युक्तीने मोहनास्त्र टाकून त्याच्या हातातील शस्त्रास्त्रांचा बंदोबस्त केला. संपूर्ण विष्णुगणांची अवस्थाही अशीच झाली.

आपल्या गणांची ही दुर्दशा पाहून विष्णूने सुदर्शनाची योजना केली. विष्णूने भयंकर संतप्त होऊन ते मोठ्या आवेशाने उगारले, परंतु ते नाथाजवळ जाताच निष्प्रभ झाले.

चरपटीनाथ हा प्रत्यक्ष पिप्पलायन नारायणाचा अवतार म्हणजे तो आपला स्वामी ठरतो, असा विचार करून सुदर्शनाने नाथाला वंदन केले व ते त्याच्या उजव्या हातात जाऊन बसले. चरपटीनाथाच्या हातात सुदर्शन चक्र गेल्यामुळे तोच साक्षात् विष्णू वाटू लागला. आपले सुदर्शन त्याच्या हातात पाहून विष्णूला मोठे आश्चर्य वाटले. मग विष्णू हातात गदा घेऊन नाथाजवळ येऊ लागला. तेव्हा चरपटीनाथाने वाताकर्षणास्त्राची योजना केली. त्यामुळे विष्णूही

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

धाडकन जमिनीवर कोसळला. हातातील गदा लांब पडली व शंख इ. आयुधेही गळून पडली. मग चरपटीनाथ विष्णूजवळ आला व त्याने त्याच्या गळ्यातील कौस्तुभमणी काढून घेतला. वैजयंती माळ घेतली, तसेच मुकुट, शंख, गदा हेही घेतले. नंतर तो शिवाजवळ गेला. त्याची आयुधे घेतली. एवढे झाल्यावर तो सत्यलोकास जाऊन ब्रह्मदेवासमोर नम्रपणे उभा राहिला.

शिवाची व विष्णूची आयुधे घेऊन आलेल्या चरपटीला पाहताच ब्रह्मदेव प्रथम दचकला. नंतर त्याने त्याचे प्रेमभराने स्वागत केले. परंतु काही घोटाळा झाला आहे, असे समजून तो चिंतेत पडला. मग नाथाला जवळ घेऊन ही आयुधे कोठून आणलीस म्हणून युक्तीने विचारपूस करू लागला. तेव्हा चरपटीनाथाने घडलेला सर्व वृत्तांत सविस्तरपणे सांगितला. ते ऐकून ब्रह्मदेव घाबरला व त्याला म्हणाला, 'मुला, विष्णु हा माझा बाप व तुझा आजा आहे. महादेव तर सर्व जगाचे आराध्यदैवत होय. ते दोघे गतप्राण झाले तर पृथ्वी निराश्रित होईल आणि मग आपले काही चालणार नाही. तेव्हा तू लवकर जाऊन त्यांना उठव, नाही तर मला मारून टाक.'

ते ऐकून चरपटीनाथ लगेच त्यांना सावध करण्यास तयार झाला. ब्रह्मदेव व चरपटी अमरपुरीला आले. तिथे विष्णु, शंकर इ. देव निश्चेष्ट पडलेले ब्रह्मदेवाने पाहिले. तेव्हा त्याने देवांना, लवकर सावध करण्यास चरपटीनाथास सांगितले.

मग चरपटीनाथाने वाताकर्षणास्त्र परत घेतले व जे गतप्राण झाले होते, त्यांना संजीवनी मंत्राने जिवंत केले. मग चरपटीनाथाला विष्णूच्या व शंकराच्या पाया पडण्यास सांगितले. त्यांनी हा कोण म्हणून विचारल्यावर ब्रह्मदेवाने नाथाच्या जन्मापासूनचे वृत्त विष्णूला सांगितले. विष्णूची व शिवाची भूषणे ब्रह्मदेवाने परत देवविली मग

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सर्व मंडळी मोठ्या आनंदाने आपल्या स्थानी परत गेली.

नंतर नारद गायन करीत इंद्राजवळ गेला व नमस्कार करून त्याला म्हणाला, 'कोणत्या नारदाने कळ लावली, म्हणून तुम्हाला इतके संकटात पडावे लागले. आम्ही तुमच्या दर्शनास येतो व तुम्ही मात्र आम्हाला 'कळलाव्या' म्हणता. आता आजचा हा प्रसंग तरी आमच्या त्या कळीमुळे नाही ना ओढवला? मला वाटते, तुम्हाला कोणीतरी चांगलाच हात दाखवलेला दिसतो!'

नारदाचे हे बोलणे ऐकून इंद्र मनात खजील झाला. मग त्याने नारदाची पूजा करून त्याची पाठवणी केली व त्या दिवसापासून त्याने 'कळीचा नारद' म्हणणे सोडून दिले.

नंतर ब्रह्मदेव चरपटीनाथाला घेऊन सत्यलोकाला गेला. नंतर पर्वणी पाहून ते मणिकर्णिकेच्या स्नानाला गेले. एकवीस स्वर्गीचे लोकही स्नानाला आले होते. यानंतर चरपटीनाथ ब्रह्मदेवाच्या आग्रहास्तव एक वर्षभर सत्यलोकात राहिला. तेथून मग पृथ्वीवर येऊन तो पाताळात गेला. त्याने भोगावतीचे स्नान केले. त्याचबरोबर सप्तपाताळ फिरून बळीच्या घरी जाऊन वामनाच्या पाया पडला. बळीने त्याचा चांगला आदरसत्कार केला. अशा तऱ्हेने बळीकडून मोठा सन्मान घेऊन मग तो पृथ्वीवर आला.

* * *

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अध्याय ४० वा

मागे सांगितल्याप्रमाणे चरपटीनाथाने स्वर्गात जाऊन इंद्राचा गर्व उतरवला, पण इंद्राला ही गोष्ट लागून राहिली होती. तो बृहस्पतीजवळ चरपटीनाथाबद्दल बोलला व शेवटी म्हणाला, 'तो वयाने लहान असला तरी तेजस्वी आहे हे खरे, पण प्रत्यक्ष हरिहराच्या प्राणावरच तो उठला होता. इतकी शक्ती दुसऱ्या कोणातही नाही. त्याच्याजवळ असलेली वाताकर्षण विद्या देव व दानव यांच्याकडे नाही. त्यामुळेच देव निर्बळ होतात. नाथपंथात ही विद्या कशी आली हे कळत नाही, परंतु आता स्वस्थ बसून चालायचे नाही. काही तरी युक्तिप्रयुक्तीने ही विद्या आपल्याला मिळवायला हवी. नाही तर त्यांच्या घरी जाऊन त्यांचे दास्यत्व स्वीकारायला हवे.'

इंद्राचे हे बोलणे ऐकून बृहस्पतीने युक्ती सुचवली. तो म्हणाला, 'सोमयागाचे निमित्त करून नाथाला इथे बोलवावे हे उत्तम. मग ते येथे आल्यावर तू त्याची उत्तम देखभाल कर. त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव कर आणि त्याच्या इच्छेनुरूप वागून त्यांना प्रसन्न करून, आपला मतलब साधून घे. हाच सोपा व शक्य असा मार्ग आहे.'

बृहस्पतीचा मार्ग इंद्राला आवडला, पण नाथाकडे कोणाला पाठवावे, असा त्याला प्रश्न पडला. तेव्हा बृहस्पतीने त्याला सांगितले, 'उपरिचरवसू हा मच्छिंद्रनाथाचा पिता होय. तो जाऊन नाथाला घेऊन येईल. मग मच्छिंद्र आपल्याला मार्ग सांगेल. तो बाकीच्या नाथांना घेऊन येईल व तुझा हेतू पूर्ण करील. तू या बाबतीत

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अजिबात चिंता करू नकोस.'

मग इंद्राने लगेच मातलीला पाठवून उपरिचराला बोलावले. त्याला मनातील योजना सांगितली व विमान देऊन नाथांना आणायला पाठवले. उपरिचर वसू चौऱ्याऐंशी सिद्धांसह नवनाथांना घेऊन सोमयागासाठी अमरावतीस आला. सर्वजण आलेले पाहताच इंद्र त्यांना सामोरा गेला व नम्रपणाने त्यांच्या पाया पडला. मग त्याने सर्वांना मोठ्या आदराने घरी नेले. आसनावर बसवले आणि त्यांची पूजा केली. त्यावेळी सर्व देवही तेथेच होते. अशा तऱ्हेने त्यांचे यथाविधी स्वागत करून सोमयज्ञाची आपली कल्पना इंद्राने त्या सर्वांना सांगितली. त्यासाठी कोणती जागा निवडावी याबद्दल त्यांना विचारू लागला.

तेव्हा मच्छिंद्रनाथ व बृहस्पती यांनी एकमेकांच्या विचारांनी सिंहलद्वीप नक्की केले. तिथे एक अरण्य आहे. तिथे दाट, शीतल छाया, मुबलक पाणी असल्याने तेच ठिकाण उत्तम असल्याचे सांगितले.

इंद्राने तत्परतेने तेथे यज्ञाची तयारी केली. बृहस्पतीकडे मंत्र म्हणण्याची व नवनाथाकडे कुंडात आहुती देण्याची योजना केली. हे यज्ञस्थान किलोतलेच्या सीमेत होते, त्यामुळे येथे असलेल्या मीननाथाची मच्छिंद्रनाथाला आठवण झाली. मग त्याने उपरिचर वसूला पाठवून मीननाथाला सर्व विद्याभ्यासात पारंगत केले. यानंतर मच्छिंद्रनाथाच्या अधिपत्याखाली ठरल्याप्रमाणे सोमयागास प्रारंभ झाला. बृहस्पतीने इंद्राला सांगितले, 'आता या वेळेस आपण स्वतः न बसता उपरिचरवसूला बसवावे.'

मग इंद्राने उपरिचरवसूच्या हातात यज्ञकंकण बांधले व आपण स्वतः देखरेख करू लागला. जे लागेल ते स्वतः देत होता. त्याने सेवा करण्यात कोठेही उणीव भास दिली नाही. जे थकत असत. त्यांचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पायही तो चेपत असे. इंद्राची ही सेवा पाहून सर्व नाथ समाधान पावले व प्रसन्न झाले.

या वेळी मच्छिंद्रनाथ मीननाथाला विद्या शिकवीत होता. तो वातांकर्षण विद्या सांगत असताना इंद्राने मोराचे रूप घेऊन झाडावर बसून ती विद्या साध्य करून घेतली. ज्यासाठी एवढी घडपड चालू होती, ती विद्या प्राप्त होताच इंद्राला फार समाधान वाटले. हा यज्ञ एक वर्षापर्यंत चालू होता. मच्छिंद्रनाथ तोपर्यंत मीननाथाला विद्या शिकवत होता.

यानंतर यज्ञाची सांगता होताच प्रज्ञावंत मच्छिंद्रनाथ अग्रपूजेला बसला. त्याची यथासांग पूजा झाल्यावर इंद्राने दुसऱ्या नाथांचीही पूजा केली व वस्त्रेभूषणे देऊन त्यांना गौरविले. सर्व नाथ कनकासनावर बसल्यावर इंद्र हात जोडून म्हणाला, 'माझ्याकडून एक अन्याय झाला आहे; त्याची मला आपण सर्वांनी क्षमा करावी. तो अन्याय म्हणजे मीननाथाला विद्या शिकवत असताना ती सर्व मी चोरून शिकलो आहे. तेव्हा आता आपण सर्वांनी वर देऊन ती फलद्रूप करावी.'

इंद्राचे हे बोलणे ऐकून सर्व नाथ एकदम रागावले आणि रागाच्या भरात त्यांनी शाप दिला की, 'तू अशा तऱ्हेने आम्हाला फसवून येथे आणलेस व विद्या साधून घेतली आहेस, पण ही विद्या तुला निष्फळ ठरेल.'

हा भयंकर शाप ऐकून उपरिक्षवसू व बृहस्पती यांनी खूप विनवणी केली. इंद्राने एवढ्या दीर्घप्रयत्नाने व अत्यंत श्रमाने मिळवलेली विद्या फलद्रूप व्हावी, यासाठी उःशाप द्यावा, म्हणून पुनः पुन्हा विनवू लागले.

तेव्हा नाथांनी त्याला उःशाप दिला. ते म्हणाले, 'इंद्राने बारा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वर्षे तपश्चर्या करावी व नाथपंथाचा अजिबात छळ करू नये, म्हणजे ती विद्या फलद्रूप होईल.'

मग सर्व नाथ आपापल्या स्थानी परत गेले. इंद्राने सह्याद्री पर्वतावर बारा वर्षे तपश्चर्या केली. मंत्राच्या वेळी तो जे पाणी सोडी त्याचा प्रवाह तयार झाला व तो भीमरथीस जाऊन मिळाला. त्याला 'इंद्रायणी' नाव पडले. याप्रमाणे तपश्चर्या पूर्ण झाल्यावर इंद्र अमरावतीस गेला.

नवनाथ बरेच दिवस तीर्थयात्रा करीत होते. शके सत्राशे दहापर्यंत ते प्रकटरूपाने फिरत होते. नंतर मात्र ते गुप्त झाले. एका मठीत कानिफ राहिला. त्याच्याजवळ आई-बाप म्हणून ओळखला जाणारा मच्छिंद्रनाथ राहिला. जालिंदरनाथाला लोक, 'जानपीर' म्हणतात. तो गर्भगिरीवर राहिला व त्याच्या खालच्या बाजूला गहिनीनाथ म्हणजेच गैबीपीर राहिला. तसेच वडवळ गावी नागनाथ आणि विटयाला रेवणनाथ राहिला. चरपटीनाथ, चौरंगीनाथ व अडबंगीनाथ आजही गुप्तरूपाने तीर्थयात्रा करीत आहेत. भर्तरी पाताळात असतो तर मीननाथ स्वर्गात जाऊन राहिला. गिरनार पर्वतावर दत्तात्रेयाच्या आश्रमात गोरक्षनाथाचा मुक्काम असतो. गोपीचंद व धर्मनाथ स्वसामर्थ्याने वैकुंठाला गेले. विष्णूने विमानाने मैनावतीला वैकुंठात नेले.

अशा प्रकारे चौऱ्याऐंशी सिद्धांपासून नाथपंथ पुढे आला व सामर्थ्यशाली म्हणून ओळखला गेला. येथेच या नवनाथांचे चरित्र संपले, असे सांगून मालुकवी पुढे पहिल्या अध्यायापासूनची फलश्रुती सांगतात.

मालुकवी म्हणतात की, पहिल्या अध्यायात गणपतीचे स्तवन आणि मच्छिंद्रनाथाची जन्मकथा आहे. त्याचे नित्य वाचन केले तर घरातील समंधबाधा नाहीशी होते.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दुसऱ्या अध्यायात मच्छिंद्रनाथास दत्ताचे व शिवाचे दर्शन घडते. नागाश्वत्थवृक्षाखाली जाऊन सर्व विद्या प्राप्त करून घेतल्या वगैरे कथाभाग येतो. हा नित्य पठण केल्याने दारिद्र्य नाहीसे होते आणि अपार धन लाभते.

तिसऱ्या अध्यायात प्रारंभी मारुतीचे व मच्छिंद्राचे युद्ध आणि नंतर दिव्य इ. वर्णन येते. नित्य वाचन केले तर शत्रूची शक्ती क्षीण होईल. मारुती तुमच्या पाठीशी उभा राहून तुमच्या घरी राहील.

चौथ्या अध्यायात अष्टभैरव व चामुंडा यांची कथा आहे. हे जर मनोभावे नेहमी वाचले तर शत्रूने केलेली सर्व कपटकारस्थाने कोसळून पडतील आणि शत्रू पराभूत पावेल.

आता पाचव्या अध्यायात मच्छिंद्रनाथ सर्व भूतांना वश करून घेऊन विजयी होतो. या कथेचे नित्य पठण केले तर घरातील भूतसंचार नष्ट होतो आणि भुते घरी आली तरी घर सोडून जातात.

सहाव्या अध्यायात मच्छिंद्रनाथास कालिकास्त्र मिळते. हा कथाभाग जर रोज वाचला तर शत्रूवर मोहिनी पडते. शत्रू आपला दास होऊन सुतासारखा सरळ येईल.

सातव्या अध्यायात वीरभद्राची अपूर्व कथा येते. ती नित्य ऐकली अथवा वाचली तर कोणतीही व्यथा होत नाही. आधीच झाली असेल तर ती नष्ट होईल.घरात सदा शांती राहील.

आठव्या अध्यायात रामचंद्राचे दर्शन व सूर्याबरोबर युद्ध हा कथाभाग आहे. याचे नित्य वाचन केले असता बऱ्याच दिवसांत न भेटलेली मंडळी घरी येऊन भेटतील व त्यामुळे त्यांच्याविषयीची चिंता दूर होईल.

नवव्या अध्यायात गोरक्षनाथाची जन्मकथा येते. हा अध्याय नेहमी ऐकला अथवा वाचला तर इच्छा असलेल्या विद्या साध्य

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होतील. ब्रह्मज्ञान, रसायन, कविता वगैरे सर्व विद्या अवगत होतील.

दहाव्या अध्यायात गहिनीनाथाच्या जन्माचे वर्णन येते. ते नित्य वाचले तर त्याचा विशेषकरून स्त्रियांना फायदा होईल. त्यांच्यातील कपटपणादी दोष नष्ट होतील. संतती लाभ होतील.

अकराव्या अध्यायांत जालिंदरनाथ बृहद्रवाच्या वनात कसा उत्पन्न झाला, हा कथाभाग आहे. या कथेचे नित्य पठण केले असता अग्नीचा त्रास होत नाही. ज्याच्या घरात पूर्वीचे काही दोष असतील तर ते जाऊन मुलाबाळांसह सुखाने संपत्तीचा उपभोग घेता येईल.

बाराव्या अध्यायात कानिफाची जन्मकथा आणि त्याच्या सामर्थ्याचे वर्णन आहे. हा अध्याय नेहमी वाचला तर कोणत्याही देवतेचा क्षोभ होत नाही आणि जर आधीच कोणाचा कोप झाला असेल तर तो लगेच शांत होईल व घरात सर्वत्र सुख-शांती राहील.

तेराव्या अध्यायात जालिंदराची व मैनावतीची भेट होते. तो तिला उपदेश करतो, हा कथाभाग आहे. या अध्यायाचे पठण केले तर स्त्रीहत्येचा दोष नाहीसा होतो.

चौदाव्या अध्यायात गोपीचंदाने आपल्या स्त्रीच्या सांगण्यामुळे जालिंदरास खड्ड्यात पुरले ही कथा येते. याचे नित्य वाचन केले असता तुरुंगातील व्यक्तीची निर्दोष म्हणून मुक्तता होईल.

पंधराव्या अध्यायात कानिफा व मारुतीचे युद्ध झाले. मग कानिफनाथ स्त्रीराज्यात जाऊन तेथील आदरातिथ्याचा लाभ घेणे इ. कथा आहे. घरातले व बाहेरचे कलह हा अध्याय नेहमी ऐकला असता आपोआप मिटतील. सर्वजण शांतीने, सुखाने व निर्भयपणे राहू लागतील.

सोळाव्या अध्यायात कानिफनाथ व गोपीचंद भेटीचा वृत्तान्त आहे. हा अध्याय पठण केला तर दुस्वप्नांचा नाश होईल व चिंताही दूर होईल.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सतराव्या अध्यायात कानिफनाथाने जालिंदरास खड्ड्यातून काढले, आणि गोपीचंदास नाथदीक्षा दिली, ही कथा वर्णन केलेली आहे. या अध्यायाचे नित्य वाचन केले तर कोणताही योग सहजसाध्य होईल. मनातील सर्व दुष्ट बुद्धी नाहीशी होईल.

अठराव्या अध्यायात गोपीचंदाच्या बहिणीचा मृत्यू होतो व पुन्हा ती सजीव होते, हे कथानक आहे. हा अध्याय नित्य वाचला असता ब्रह्महत्येसारख्या पापाचाही नाश होईल, आणि कुंभीपाक नरकातील पूर्वजांची सुटका होईल.

एकोणिसाव्या अध्यायात राम, मारुती व गोरक्षनाथ यांच्या भेटीचा प्रसंग आहे. हा अध्याय जर नित्य पठण केला तर मोक्षप्राप्ती होईल.

विसाव्या अध्यायात गोरक्षनाथ युक्तीने स्त्रीराज्यात प्रवेश मिळवितो व आपल्या गुरूची-मच्छिंद्रनाथाची भेट घेतो. याचे नित्य वाचन केले असता प्रपंच व्यवस्थित होतो.

एकविसाव्या अध्यायात गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाला स्त्रीराज्यातून बाहेर काढले हा कथाभाग येतो. हा ऐकला असता, गोहत्येचे पाप नाहीसे होईल व निष्कलंक म्हणून मोठ्या सन्मानाने मिरवाल.

बाविसाव्या अध्यायात गोरक्षनाथाने मीननाथाला मारले व पुन्हा आपल्या मंत्रसामर्थ्याच्या योगाने सजीव केले. ही कथा नित्य वाचली असता पुत्रप्राप्तीची इच्छा असणाऱ्यास पुत्र होईल व तो मोठा विद्यासंपन्न बनेल.

तेविसाव्या अध्यायात मच्छिंद्रनाथाचा सोन्याचा मोह व गहिनीनाथाला केलेला उपदेश वगैरे कथा वर्णिलेली आहे. याचे नित्य पठण केले असता घरात नेहमी सोने येईल.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चोविसाव्या अध्यायात भर्तृहरीची जन्मकथा येते. ही नेहमी वाचली असता मुले होऊन ती मरत असतील तर ती वाचून संसार सुखाचा होईल.

पंचविसाव्या अध्यायात सुरोचन गंधर्व शापामुळे गाढव झाल्याची कथा आहे. हा अध्याय रोज वाचला तर कोणताही शाप बाधत नाही. मनुष्यजन्माशिवाय दुसरा जन्म येणार नाही व आरोग्य चांगले राहून पुत्र गुणी होईल.

सव्विसाव्या अध्यायात गंधर्वपुत्र विक्रमाची व भर्तृहरीची भेट होते. हा अध्याय नित्य ऐकला असता गोहत्या-पाप नष्ट होईल.

सत्ताविसाव्या अध्यायात विक्रम व सुमेधा यांचा विवाह आणि भर्तृहरी-पिंगला यांच्या विवाहाचे वर्णन येते. हा अध्याय वाचला असता हरवलेली वस्तू पुन्हा सापडेल.

अठ्ठाविसाव्या अध्यायात पिंगलेसाठी भर्तृहरी स्मशानात विरक्त होऊन तपाचरण करीत असल्याचे वर्णन आहे. हा अध्याय नित्य मनोभावे वाचला असता त्या भाविकांचे लग्न होते. पत्नी चांगली, सुशील व गुणवान मिळते.

एकोणतिसाव्या अध्यायात भर्तृहरीच्या विरक्तपणाचा कथाभाग येतो. याचे नित्य पठण केले तर क्षयासारख्या भयंकर रोगापासून सुटका होईल.

तिसाव्या अध्यायात चौरंगीनाथाचा जन्म, भर्तृहरीला दत्तात्रेयाचे प्रत्यक्ष दर्शन इ. वर्णन येते. या अध्यायाचे नित्य वाचन केले तर तुमच्या घरात येणाऱ्या चोराचे डोळे जातील.

एकतिसाव्या अध्यायात चौरंगीनाथ हिमाळयावर तप करीत असल्याची कथा येते. तिच्या श्रवणाने व वाचनाने कोणत्याही कपटमंत्राची बाधा होणार नाही.

बत्तिसाव्या अध्यायात मच्छिंद्रनाथाचा त्रिविक्रम राजाच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

देहात प्रवेश, हा कथाभाग आहे. हा अध्याय नेहमी वाचला तर सर्व गंडांतरे दूर होतील.

तेहतिसाव्या अध्यायात माणिक शेतकऱ्याची परीक्षा, गोरक्षाचे वीरभद्राबरोबर युद्ध हा कथाभाग आहे. याचे नित्य वाचन केले तर धनुर्वाताचे भय नष्ट होईल. झाला असेल तर तो बरा होईल.

चौतिसाव्या अध्यायात रेवणनाथाचा जन्मवृत्तांत येतो. तो नेहमी ऐकला तर कोणत्याही कार्यात यश मिळेल.

पस्तिसाव्या अध्यायात रेवणनाथ विद्यासंपन्न झाल्याचे वर्णन येते. हा अध्याय नियमितपणे वाचला तर पोटी मोठा सिद्धपुरुष जन्माला येईल.

छत्तिसाव्या अध्यायात वटसिद्ध नागनाथाच्या जन्माची अपूर्व कथा आहे. ही कथा श्रवण, पठण केली असता, विंचू अथवा सापाने दंश केला तरी विष बाधणार नाही.

सदतिसाव्या अध्यायात दत्तात्रेयाचे दर्शन आणि नागनाथ व मच्छिंद्रनाथ भेटीचा वृत्तांत आहे. हा अध्याय नेहमी वाचला असता घरात सर्व कुशल होईल.

अडतिसाव्या अध्यायात चरपटीनाथाची जन्मकथा व दत्तात्रेय-भेट सांगितली आहे. याचे नित्य वाचन केले तर हिवताप, नवज्वर इ. तापांतून सुटका होईल व शांती लाभेल.

एकोणचाळिसाव्या अध्यायात चरपटीने स्वर्गातल्या देवांना जिंकल्याचे वर्णन येते. हा अध्याय नेहमी ऐकला तर युद्धात विजय मिळेल.

आणि शेवटी चाळिसाव्या अध्यायात इंद्राचा सोमयाग, नाथाचा आशीर्वाद हे कथानक आहे. त्या अध्यायांचे मनोभावे पठण केले तर इच्छिलेले सर्व प्राप्त होईल. यश, ऐश्वर्य, संतती वगैरेचा लाभ

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होईल. दु:ख, दारिद्र्य जाईल, संसार सुखाचा होईल.

अशा तऱ्हेने प्रत्येक अध्यायाची फलश्रुती सांगून मालु कवी म्हणतात, 'चाळिसावा हा एकच अध्याय परीस आहे, जणूकाही कामधेनू, कल्पतरू आहे! इतका तो अध्याय फलदायी ठरतो.'

गोरक्षनाथाचा या ग्रंथाबद्दलचा असा अभिप्राय आहे की, 'याला जो कोणी असत्य मानेल किंवा त्याची निंदा करील तो विघ्नसंतोषी इहपरलोकी सुखी न राहता त्याचा निर्वंश होऊन तो शेवटी नरकात जाईल.'

अशा तऱ्हेने हा नवनाथांच्या वर्णनाचा ग्रंथ शके सत्राशे एक्केचाळीस प्रमाथीनाम संवत्सरी ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेस समाप्त झाला.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ....8216........

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

।। नवनाथांचा श्लोक ।।

गोरक्ष जालिंदर चर्पटाश्चिच अड्बंग कानिफ मच्छिंद्रराद्या: । चौरंगिरेवाणकभर्त्रि संज्ञा भूम्यां बभूवुर्नवनाथ सिद्धा: ।।

।। श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ।।

❋ ❋ ❋

आरती श्रीगणपतीची

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।। सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।। कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।१।। जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती ।। दर्शनमात्रे मनकामना पुरती ।।धृ०।। रत्नखचित फरा तुजगौरीकुमरा ।। चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।। हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।। रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।जय०।। २ ।। लंबोदर पीतांबर फणिवरवंदना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।। जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती ।। दर्शन ०।।३।।

आरती नवनाथांची

जयदेव जयदेव जय श्रीनवनाथा । भक्तगणा उद्धारी देऊनि सिद्ध करा ।। जयदेव जयदेव ०।।धृ०।।

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मच्छिंद्र गोरक्ष तैसे जालिंदरनाथ । कानिफ गहिनीनाथ नागेशासहित ।। चर्पटी भर्तरी रेवण मिळूनी नऊनाथ । नवनारायण अवतार नवनाथ संत ।।१।। जयदेव जयदेव० ।।

भक्तिशक्ति बोधावैराग्यासहित । तापत्रय ते. हरितीस्मरा एकचित्त ।। नमने चरित्रपठणे दुरितांचा अंत । भक्तजनासी तारी नवनाथ खचित ।।२।। जयदेव जयदेव० ।।

इहपर साधुनी देती समस्त नवनाथ ।। भूत समंधा प्रेत घालविती सत्य ।। भक्तजनांचे पुरवा तुम्हीच संकल्प ।। कृतार्थ होता दावा सदानंदरूप ।।३।। जयदेव जयदेव० ।।

दु:खी दीन दरिद्री लोकांना तारा । देऊनी सुखसंपत्ति मुक्ति दोही करा ।। स्मरण घडावे आता नित्य नित्य नाथा । शरणागत मी तुमच्या पायी मम माथा ।।४।। जयदेव जयदेव० ।।

नवनाथाचा आधार सकलांना आता । आरती ओवाळिता हरली भव चिंता ।। ब्रह्मसनातन शांति देई मम चित्ता । शरण विनायक चरणी लोटांगण आता ।।५।। जयदेव जयदेव० ।।

(समाप्त)

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सोपी भाषा, पांढरा कागद, सविस्तर सार, [illegible]आकर्षक ४
रंगी कव्हर व प्रत्येक अध्यायाचे ४ [illegible] चित्र

श्री नवनाथ कथासार — श्री रामविजय कथासार

श्री हरिविजय कथासार — श्री भक्तविजय कथासार

श्री पांडवप्रताप कथासार — श्री काशीखंड कथासार

श्री गुरुचरित्र कथासार — श्री गणेश पुराण कथासार

श्री देवी माहात्म्य कथासार — संपूर्ण चातुर्मास

श्री मल्हारी माहात्म्य कथासार

श्री अमृतमधुर संपूर्ण ज्ञानेश्वरी

श्री गजानन महाराज चरित्र

श्रीगजानन महाराज विजय पारायण

श्री गजानन महाराज भक्ति विजय

सुट्या पानांचा ग्रंथ

श्री नवनाथ भक्तिसार — श्री रामविजय

श्री हरिविजय — श्री काशीखंड

श्री भक्तविजय — श्री पांडवप्रताप

मे. सरस्वती ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, पुणे-२.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative